
# विश्वमोहिनी गीता

डॉ. श्रीराम भातखंडे



# विश्वमोहिनी गीता

(गीताविषयक प्रश्न आणि उत्तरे)

डॉ. श्रीराम महादेव भातखंडे
एम्.ए., पीएच.डी.

"*विश्वमोहिनी गीता*" हे डॉ. भातखंडे लिखित पुस्तक प्रकाशित करण्याचा संकल्प झाला. डॉ. भातखंडे यांच्या विद्यार्थिनी डॉ. सौ. वैशाली दाबके यांनी खूप मेहनतीने या लेखमालेचे संकलन केले व पुस्तकाच्या निर्मितीत अमूल्य सहकार्य केले. अपार उद्योगसमूहाचे अध्यक्ष डॉ. नरेन्द्र देसाई यांनी मुखपृष्ठासाठी भगवान श्रीकृष्णाचे सुंदर चित्र उपलब्ध करून दिले आणि ठाण्यातील प्रसिद्ध मुद्रक श्री. शंकर दत्तात्रय घाटपांडे यांनी अत्यंत वाजवी मोबदल्यात या पुस्तकाची छपाई करून दिली व सेवाभावनेनेच या कार्याला हातभार लावला हे नमूद करावेसे वाटते.

आज "*विश्वमोहिनी गीता*" या रूपात डॉ. भातखंडे यांचे विचार मराठी वाचकांसमोर सादर करताना आनंद होतोय. या पुस्तकाच्या निर्मितीच्या निमित्ताने डॉ. भातखंडे यांचा व माझा ऋणानुबंध अधिक दृढ झाला. कृष्णभक्ती हा आमच्या दोघांमधला समान दुवा. त्यांच्या निस्पृह, निरलस व साध्या व्यक्तिमत्त्वाने मीही प्रभावित झालो. डॉ.भातखंडे यांनी या पुस्तकासाठी कोणतेही मानधन न घेता पुस्तकाचे सर्वाधिकार द्वारकाधीश चॅरिटीजकडे सुपूर्द केले आहेत हे विशेष आनंदाने व अभिमानाने नमूद करावेसे वाटते. आम्हा उभयतांच्या प्रयत्नांतून हे एक कृष्णकार्यच घडले असे मी मानतो. "विश्वमोहिनी गीता" विश्ववंद्य व्हावी व जगभरातील प्रत्येक हिंदूसाठी धर्मग्रंथ म्हणून भगवान श्रीकृष्णाची ही वाङ्मयीमूर्ती पूजनीय व्हावी हीच भगवान द्वारकाधीशाचरणी प्रार्थना.

**अजित कारखानीस**

अध्यक्ष व कार्यकारी विश्वस्त

श्री द्वारकाधीश चॅरिटीज

❀❀❀



# लेखकाचे मनोगत

"स्वामिन् तव शरणम्" हे द्वैमासिक श्रीस्वामीसमर्थ परिवारातर्फे ठाणे येथून प्रसिद्ध होते. मनोरमा मुकुंद करंदीकर या द्वैमासिकाच्या संचालिका आहेत. या द्वैमासिकात जानेवारी १९८९ ते डिसेंबर १९९२ या काळात मी "गीता सुगीता कर्तव्या" या शीर्षकाखाली गीतेवरील प्रश्नोत्तर स्वरूपी २० लेख लिहिले. तीच प्रश्नोत्तरे आणि इतर पुष्कळ नवीन प्रकरणे घालून "विश्वमोहिनी गीता" हे पुस्तक तयार झाले.

केवळ परमेश्वराची इच्छा म्हणून माझी आणि कृष्णभक्त श्री. अजित कारखानीस यांची ओळख झाली आणि त्यांनी हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. श्री. कारखानीस यांना मी मनःपूर्वक शतशः धन्यवाद देतो. त्यांची कृष्णावर असलेली अनन्यभक्ती वाढत राहो आणि नित्य सतेज राहो ही शुभेच्छा.

माझी पत्नी सौ. सुहासिनी हिने पुस्तकाची मूळ प्रत वाचून काही उपयुक्त सूचना केल्या आणि वेळोवेळी सर्वतोपरी सहाय्य केले. हे मी सहर्ष नमूद करीत आहे. माझा भाऊ चि. प्रभाकर याने पुस्तकातील सर्व संकल्पना नीट तपासल्या.

डॉ. सौ. वैशाली दाबके यांनी पुस्तकाचे स्वरूप ठरविण्याविषयी तसेच गीतेतील सुभाषिते निवडण्यासाठी मदत केली. शिवाय मुद्रितेही काळजीपूर्वक तपासली. सौ. अदिति अजित जमखंडीकर यांनी विषयसूची तयार केली. तसेच सौ. ज्योति सतीश साताळकर यांनीही पुस्तकासाठी हरप्रकारे मदत केली. मी या सर्वांचा अंतःकरणपूर्वक आभारी आहे.

श्रीमदाद्यशंकराचार्य आणि त्यांच्यानंतर झालेल्या अनेक आचार्यांनी आणि विद्वानांनी गीतेवर भाष्ये आणि पुस्तके लिहिली आहेत. त्यांचा उपयोग मला गीता समजण्यासाठी झाला. त्या सर्वांचा मी ऋणी आहे. शेवटी निवडक ग्रंथसूची दिली आहे.

श्रीकृष्ण आपणा सर्वांचे कल्याण करो ही प्रार्थना.

❀❀❀

## प्रस्तुत पुस्तकाविषयी

गीतेवर असंख्य पुस्तके उपलब्ध असताना आणखी हे पुस्तक कशाला असा जर कोणाला प्रश्न पडला तर त्याचे उत्तर अंशतः पुढीलप्रमाणे देता येईल.

१) आद्य शंकराचार्य आणि त्यांच्यानंतर झालेल्या अनेक आचार्यांनी गीतेवर भाष्य केले आहे. ज्ञानेश्वरीसारखा गीतेवरील मोठा ग्रंथ मराठीत उपलब्ध आहे. याशिवाय भारतीय आणि पाश्चिमात्य विद्वानांनी गीतेवर अक्षरशः हजारो पुस्तके लिहिली आहेत. परंतु जवळ जवळ सगळ्यांनी आपापल्या दृष्टिकोनाप्रमाणे गीतेचे विवरण केले आहे. अगदी साम्यवादी विवरणसुद्धा आहे. त्यामुळे गीतेच्या शिकवणीविषयी वाचक पुष्कळवेळा गोंधळून जातो. असे होऊ नये म्हणून कोणताही अभिनिवेश न स्वीकारता जिज्ञासू वाचकांसाठी जशी गीता मूळ स्वरूपात आहे तशी फक्त प्रश्न आणि उत्तरे या माध्यमातून या पुस्तकात दिली आहे. शिवाय गीता वाचताना अनेक प्रश्न पडतात. ते लेखकाने स्वतःच निर्माण करून त्यांची उत्तरे दिली आहेत जेणे करून गीतेविषयी जिज्ञासा पुरी होईल. ही उत्तरे तर्कसंगत आणि साधार दिली आहेत.

२) गीतेचा उपदेश करणाऱ्या श्रीकृष्णाचे चरित्र "कृष्णं वन्दे जगद्गुरुम्" या शीर्षकाखाली सुरवातीला दिले आहे.

३) नंतर गीतेचे तत्त्वज्ञान आणि थोरवी थोडक्यात दिली आहे. शीर्षक आहे विश्वमोहिनी गीता.

४) यानंतर प्रश्न आणि उत्तरे सुरू झाली आहेत. एकूण २३३ प्रश्न आणि उत्तरे आहेत. प्रत्येक अध्यायाच्या शेवटी सारांश/समालोचन आहे.

५) प्रश्न आणि उत्तरे यांच्यानंतर उपसंहार आहे.

६) गीतेतील पुष्पिका, गीतेची दोन मोठी रूपे, गीता पारायण इत्यादि सहा परिशिष्टे आहेत. सहाव्या परिशिष्टात गीतेमधील महत्त्वाची सुभाषिते सार्थ दिली आहेत.

७) विषयसूची आणि निवडक ग्रंथसूची शेवटी दिली आहे.

८) या पुस्तकातील शुद्धलेखनाच्या बाबतीत जुन्या आणि नवीन अशा दोन्ही नियमांचा वापर केला आहे. मात्र संस्कृत आणि संस्कृतोद्भव शब्द पुष्कळवेळा तसेच ठेवले आहेत.

गीतेचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच वाचकांना सुरवातीला हे पुस्तक नक्की उपयोगी पडेल असा लेखकास विश्वास वाटतो.



## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| | प्रकाशकाचे निवेदन | | |
| | लेखकाचे मनोगत | | |
| | प्रस्तुत पुस्तकाविषयी | | |
| १. | कृष्णं वन्दे जगद्गुरुम् । | .. | १ |
| २. | विश्वमोहिनी गीता | .. | ५ |
| ३. | गीता आणि महाभारत | .. | ९ |
| ४. | गीताध्यान | | १५ |
| ५. | गीतेचा काळ | | १८ |
| ६. | अध्याय पहिला - अर्जुनविषादयोग | | २१ |
| ७. | अध्याय दुसरा - सांख्ययोग | | २८ |
| ८. | अध्याय तिसरा - कर्मयोग | | ४२ |
| ९. | अध्याय चौथा - ज्ञानकर्मसंन्यासयोग | .. | ४९ |
| १०. | अध्याय पाचवा - कर्मसंन्यासयोग | .. | ५४ |
| ११. | अध्याय सहावा - आत्मसंयमयोग | .. | ५८ |
| १२. | अध्याय सातवा - ज्ञानविज्ञानयोग | .. | ६४ |
| १३. | अध्याय आठवा - अक्षरब्रह्मयोग | .. | ६९ |
| १४. | अध्याय नववा - राजविद्याराजगुह्ययोग | .. | ७४ |
| १५. | अध्याय दहावा - विभूतियोग | .. | ८० |
| १६. | अध्याय अकरावा - विश्वरूपदर्शनयोग | .. | ८६ |
| १७. | अध्याय बारावा - भक्तियोग | .. | ९४ |
| १८. | अध्याय तेरावा - क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग | .. | १०० |
| १९. | अध्याय चौदावा - गुणत्रयविभागयोग | .. | १०७ |

२०. अध्याय पंधरावा - पुरुषोत्तमयोग .. ११२
२१. अध्याय सोळावा - दैवासुरसंपद्विभागयोग .. ११८
२२. अध्याय सतरावा - श्रद्धात्रयविभागयोग .. १२३
२३. अध्याय अठरावा - मोक्षसंन्यासयोग .. १२७
२४. उपसंहार .. १३७
२५. गीतेतील पुष्पिका - परिशिष्ट १ .. १३९
२६. गीतेची दोन मोठी रूपे - परिशिष्ट २ .. १४१
२७. गीता पारायण - परिशिष्ट ३ .. १४२
२८. दहा वाक्यांत गीता - परिशिष्ट ४ .. १४३
२९. घरोघरी पार्थसारथी असावा - परिशिष्ट ५ .. १४४
३०. गीतेमधील निवडक सुभाषिते - परिशिष्ट ६ .. १४५
३१. विषयसूची .. १५३
३२. निवडक ग्रंथसूची .. १५६





भगवान द्वारकाधीश

# १. कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ।



अखिल भारतवर्षात श्रीकृष्ण हे दैवत अतिशय लोकप्रिय आहे. असंख्य भारतीयांचे श्रीकृष्ण हे आराध्य दैवत आहे. आबालवृद्धांनी अगदी मनापासून ज्याची उपासना करावी असे हे दैवत आहे. कृष्ण या नावातच मुळी जादू आहे. कृष्ण सगळ्यांना आकर्षित करून घेतो. या त्याच्या विशेष गुणामुळे त्याचे कृष्ण हे नाव सार्थ होते. साधुसंत म्हणतात की ''आमचे मन आजच तुझ्या चरण कमलरूपी पिंजऱ्यात बंदिस्त होऊ दे.'' श्रीकृष्णाचे सर्व चरित्र अद्‌भुत आणि विलक्षण प्रसंगांनी भरलेले आहे. श्रीकृष्णाचे सर्व जीवन अत्यंत समृद्ध आहे. म्हणूनच त्याची उपासना करणारे पण समृद्ध होतात. भारतीयांच्या जीवनावर त्याने फार मोठी मोहिनी घातली आहे. श्रीकृष्ण ही ऐतिहासिक विभूति आहे. तो प्रत्यक्ष झाला. विष्णूचे दहा अवतार आहेत. त्यापैकी मत्स्यावतारापासून वामनावतारापर्यंतचे पहिले पाच अवतार काल्पनिक आहेत. परंतु आपला कृष्ण काल्पनिक नाही. तो पूर्णावतार आहे. तो इसवी सनापूर्वी ३५०० ते ४००० या काळात झाला. पण या काळाबाबत मतभिन्नता आहे.

## देवकीचा 'आठवा' आठवा

वसुदेव आणि देवकीच्या पोटी श्रीकृष्णाने जन्म घेतला. कंसाच्या कारागृहात असलेली देवकी पहिल्या सात अपत्यांच्यावेळी आलेल्या कटु अनुभवामुळे धास्तावलेली होती आणि अशा स्थितीत ती **आठव्या** महिन्यातच प्रसूत झाली. तो दिवस होता **श्रावण वद्य अष्टमीचा** आणि वेळ होती मध्यरात्रीची. नक्षत्र होते रोहिणी आणि वार होता बुधवार. श्रीकृष्ण हे देवकीचे **आठवे** अपत्य. श्रीकृष्ण हा विष्णूचा **आठवा** अवतार आहे. अशाप्रकारे आठव्या महिन्यात, अष्टमीला, देवकीचे आठवे अपत्य म्हणून विष्णूचा आठवा अवतार झाला. आपल्या जीवनाचे सार्थक होण्याकरिता अशा या आठव्याला म्हणजे देवकीच्या आठव्या अपत्याला नेहमी आठवा.

देवकीच्या पोटी जरी श्रीकृष्णाने जन्म घेतला तरी त्याचे संगोपन मात्र नंदपत्नी यशोदा हिने केले. श्रीकृष्णाचे बालपण गोकुळात गेले. तेथे तो 'गोपाल' होता. गो म्हणजे इंद्रिये आणि त्यांचा स्वामी म्हणजे गोपाल. गाईंचे पालन करणारा म्हणूनही तो गोपाल होता.

## श्रीकृष्णाचे जीवन

बालपणी गोकुळात श्रीकृष्णाने असंख्य पराक्रम केले. १२ व्या दिवशी पूतना

राक्षसीचा वध व नंतर शकटासुर, कालिया, धेनुकासुर, कंस, चाणूर इत्यादि अनेकांचे धर्माच्या संवर्धनासाठी त्याला निर्दालन करावे लागले. गोवर्धन पर्वत करांगुलीवर उचलून त्याने इंद्राचे गर्वहरण केले. श्रीकृष्णाने वयाच्या अठराव्या वर्षी कंसाचा वध केला. मोठेपणी नरकासुर आणि जरासंध यांचा वध त्याला करावा लागला.

श्रीकृष्णाचे उपनयन उशिरा झाले. क्षत्रियांचा उपनयनाचा काल २२ वर्षांपर्यंत असतो. मथुरेमध्ये वसुदेव आणि देवकी यांनी त्याचे उपनयन केले. गर्गमुनींनी हा संस्कार केला. नंतर उज्जयिनी येथे सांदीपनींच्या आश्रमात त्याचे अध्ययन झाले. बलरामही त्याच्याबरोबर होता. तेथेच त्यांना सुदामा भेटला. याचे चरित्र भागवताच्या दशम स्कंधात आहे. केवळ सहा महिन्यातच कृष्णाचे सर्व अध्ययन पुरे झाले. वेदवेदांगांबरोबर श्रीकृष्णाचा धनुर्वेदाचाही अभ्यास पुरा झाला.

श्रीकृष्णाचा विवाह पंचविसाव्या वर्षी झाला. तेव्हा रुक्मिणी १८ वर्षांची होती. रुक्मिणीपासून श्रीकृष्णाला ९ सुस्वरूप पुत्र आणि चारुमती ही कन्या झाली. मोठ्या मुलाचे नाव प्रद्युम्न होते. हा मदनाचा अवतार होता. क्षत्रियांच्या चालीरितीप्रमाणे श्रीकृष्णाला रुक्मिणी या पट्टराणीशिवाय आणखी सात स्त्रिया होत्या. त्या सर्वांना पुत्र आणि कन्या झाल्या.

## श्रीकृष्णाचा दिनक्रम

पहाटे स्तुतिपाठक सुस्वर स्तवनांनी श्रीकृष्णाला जाग आणत असत. द्वारकेचा राजा श्रीकृष्ण रोज ब्राह्ममुहूर्तावर म्हणजे सूर्योदयापूर्वी ९६ मिनिटे उठत असे. स्वतः परब्रह्म असूनही तो ध्यान करीत असे. ध्यान हे प्रत्येकाने करायला पाहिजे. **असे म्हणतात की प्रार्थनेत साधक परमेश्वराशी संवाद साधतो तर ध्यानात परमेश्वर साधकाशी संवाद साधतो.** स्नान झाल्यावर अग्नीस आहुती देऊन नित्य गायत्री मंत्राचा जप श्रीकृष्ण करीत असे. नंतर देव, पितर आणि ऋषी यांचे तर्पण करीत असे. तदनंतर विद्वज्जनांचे दर्शन घेऊन दानधर्म करीत असे. नंतर यथाकाल राजसभेत जाऊन न्यायनिवाडा करण्याची त्याची पद्धत होती. दुपारी भोजनोत्तर विश्रांती घेतल्यावर इतिहास आणि पुराण श्रवण होत असे. गृहस्थाश्रमातील सर्व कर्तव्यांचे पालन करून त्याने प्रजाजनांना आदर्श घालून दिला.

## मनमोहन श्रीकृष्ण

श्रीकृष्णाचे सौंदर्य अद्वितीय होते. तो रूपसुंदर होता. रुक्मिणीने तिच्या पहिल्या वहिल्या पत्रात त्याला भुवनसुंदर म्हटले आहे. गोपींसाठी तो मदन होता. अनेक काव्यांचा कृष्ण हा विषय झाला. अर्जुनाचा तो सखा होता आणि सगळ्या पांडवांचा तो मार्गदर्शक होता. तो शूर आणि पराक्रमी होता. तो गदायुद्धातही प्रवीण होता. महाभारताच्या उद्योग



पर्वात त्याचे असे वर्णन आहे की त्याचा स्वर मेघासारखा गंभीर होता. एका स्वरात तो सतत बोलत असे आणि ते अर्थपूर्ण. तो उत्तम वक्ता होता. तो आदर्श पुत्र होता. आपल्या आईवडिलांवर त्याचे अपरंपार प्रेम होते. बंधुप्रेमातही तो मागे नव्हता. तो संसारी होता आणि त्याने जगात कसे वागावे हे शिकवले. श्रीकृष्ण तत्त्वज्ञ होता आणि राजकारणी होता पण निस्वार्थी. तो उदार आणि निर्मोही होता. ज्यांचे राज्य त्याने जिंकले ते त्याने त्यांच्या वारसांना दिले. भागवतपुराणाप्रमाणे श्रीकृष्ण १२५ वर्षांचे पूर्णायुष्य जगला. तो काव्य, कला आणि संगीत यांचा नायक आहे. निम्बार्क, वल्लभ, चैतन्य इत्यादि अनेक संप्रदायांचे दैवत श्रीकृष्ण आहे.

## राधाकृष्ण -

राधेचे आणि कृष्णाचे नाव एकमेकांशी निगडीत आहे. गहू वर्णाची, भरदार केसांची नागिणी एवढी लांब वेणी असलेल्या राधेचे रूप संमोहक होते. ती कृष्णाची प्रेयसी होती. वैष्णव संप्रदायातील ती आराध्य देवता आहे.

राधा ही श्रीकृष्णाची शक्ती आहे. ब्रह्मवैवर्त पुराणात श्रीकृष्णाने असे म्हटले आहे की, ''हे राधे तू माझी देहार्धस्वरूप आहेस. तू ईश्वराची मूलप्रकृती आहेस.'' सांख्यतत्त्वज्ञानाच्या परिभाषेत राधा आणि कृष्ण यांना प्रकृति व पुरुष असे म्हणता येईल. ब्रह्मवैवर्त पुराणात राधाकृष्णांच्या लीलांचे वर्णन आहे. राधा प्रेममयी आहे. भागवतपुराणात राधेचा प्रत्यक्ष उल्लेख नाही. मात्र अनेक पुराणांनी राधेचे माहात्म्य वर्णन केले आहे आणि वाढविले आहे. मधुराभक्तीमध्ये राधेला श्रीकृष्णाची ल्हादिनी शक्ती मानतात. ब्रह्मवैवर्तपुराणाप्रमाणे ''राधा'' हा शब्द एक मंत्र आहे. राधा या शब्दात पुढीलप्रमाणे चार अक्षरे आहेत; र + आ = रा आणि ध + आ = धा. 'र' च्या उच्चाराने कोटि जन्मातील शुभाशुभ कर्मे व त्यांची फले नाहीशी होतात. त्यानंतर येणाऱ्या 'आ' चा उच्चार केल्यामुळे गर्भवास, मृत्यू व रोगराई टळते. 'ध' च्या उच्चारणाने दीर्घायुष्य प्राप्त होते आणि त्यानंतर येणाऱ्या 'आ' च्या उच्चारामुळे भवबंधनातून सुटका होते. गर्भवास, रोग इत्यादि दुःखातून मुक्त करून दीर्घायुष्य देणारी आणि भवबंधनातून मुक्त करणारी राधा ही फार मोठी देवता आहे. याच भावनेतून ''राधाकृष्ण गोपालकृष्ण'' या गोड नामांची गोडी चाखावी. राधा आणि कृष्ण यांचा संबंध कमालीचा निर्मल असून चंद्र आणि चंद्रिकेप्रमाणे आहे.

श्रीकृष्णाच्या भक्तांसाठी वृंदावन हे पुण्यक्षेत्र आहे. ते मथुरेपासून सहा मैलावर उत्तरेला आहे. मथुरेच्या आसपासच्या प्रदेशाला व्रजमंडल म्हणतात. वृंदा म्हणजे तुळस. फार पूर्वी तेथे तुळशीचे वन होते. म्हणून वृंदावन हे नाव पडले. तसेच वृंदा हे राधेचेही एक नाव आहे. वृंदावन श्रीकृष्णाच्या रासक्रीडेची भूमी आहे. म्हणूनही वृंदावन पवित्र आहे.

कृष्णस्तु भगवान् स्वयम्।

आसेतुहिमाचल श्रीकृष्णाची भक्ती करण्यात येते. अनेक संतांनी आणि भक्तांनी त्याला परब्रह्म म्हणून स्वीकारले. श्रीकृष्णावर असंख्य रचना सगळ्या भाषेत झाल्या आणि होत आहेत. कवींनी त्याला आपल्या काव्याचा विषय बनवला. अनेक पुराणांनी त्याला उचलून धरले. तो आबालवृद्धांना आवडतो. कोणाला बाळकृष्ण, तर कोणाला राधाकृष्ण तर प्रौढांना गीतोपदेशक तत्त्वज्ञ म्हणून तो आवडतो. श्रीकृष्णाने भारतीयांच्या विचारांना दिशा दिली. उपनिषदांतील गूढ ब्रह्म त्याने सोपे करून सांगितले. ''जीवनात सतत कर्म करीत रहा'' हाच प्रधान संदेश त्याने गीतेत सांगितला. कोणतेही कर्म जाणून केले की त्याचा ज्ञानाशी संबंध येतो, फलाची इच्छा सोडून कर्म केले की कर्मयोग होतो आणि फल परमेश्वराला अर्पण केले की भक्तियोगही होतो. अशाप्रकारे एकाच कर्मात कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग अंशतः येतात. **''अनेक पुस्तके वाचण्यापेक्षा एकच पुस्तक अनेक वेळा वाचावे!'' असे जर कोणते पुस्तक असेल तर ते पुस्तक म्हणजे गीता होय.** भारतीयांना त्याने दिलेल्या मोठ्यात मोठ्या या देणगीची महती पुढील स्वतंत्र प्रकरणात दिली आहे.

सध्याचे दिवस अत्यंत अस्थिर आहेत आणि येणारा काळही काही वर्षे अस्थिर असण्याची शक्यता आहे. आपल्या भारतभूमीचे रक्षण आणि कल्याण होण्यासाठी तसेच आपले स्वतःचेही कल्याण होण्यासाठी वैयक्तिक आणि सामूहिक उपासनेची नितांत आवश्यकता आहे. आपण सामूहिक उपासनेत फारच मागे आहोत. **''ॐ नमो भगवते वासुदेवाय''** या मंत्राचा दररोज दहावेळा किंवा १०८ वेळा जप केल्याने पुष्कळ काही साध्य होईल. आजूबाजूचे वातावरण पवित्र होईल आणि सर्वांचे कल्याण होईल.

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ॥

❁❁❁



# २. विश्वमोहिनी गीता

गीतेच्या तत्त्वज्ञानाने विश्वाला मोहिनी घातली आहे. गीतेच्या मोहात पडावे असेच तिचे रूप आहे. चटकन हाकेला उपयोगी पडणारी ती एकमेव माउली आहे. ती सगळ्यांना बरोबर घेऊन जाते आणि सगळ्यांवर प्रेम करते.

प्रत्येक मनुष्य जीवनात कधीना कधी उदास होतो, खिन्न होतो, त्याला 'डिप्रेशन' येते. याला कोणीही अपवाद नाही. अर्जुनाच्या जीवनातही असा काळ आला होता. कौरवांशी युद्ध करण्याच्या अगोदर तो विषादग्रस्त झाला होता. परंतु श्रीकृष्णाच्या मार्गदर्शनामुळे त्याने 'विषादातून' 'योग' साधला. अगोदर त्याने स्वतःशीच युद्ध केले, जिंकले आणि नंतर कौरवांशी युद्ध केले व तो विजयी झाला. विषादातून बाहेर पडण्यासाठी गीतेसारखा अद्वितीय ग्रंथ दुसरा कोणताही नाही. दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारा गीता हा एकमेव ग्रंथ आहे. जीवनाच्या तत्त्वज्ञानावर गीतेसारखा सोपा असा दुसरा कोणताही ग्रंथ नाही. गीता साक्षात् परमेश्वराच्या मुखकमलातून निघाली असल्यामुळे अत्यंत पवित्र आहे.

### गीतेचे विहंगावलोकन

युद्धभूमी ही गीतेची पार्श्वभूमी आहे. समोर युद्धासाठी उभे असलेले आपले गुरुजन आणि आप्त पाहून अर्जुन पुरता गोंधळून गेला. तो गलितगात्र झाला आणि विषण्ण झाला. आपल्यासमोर उभ्या असलेल्या मोठ्या माणसांना मी कसे मारू हा एकच विचार त्याला त्रास देत राहिला.

देह आणि आत्मा हे भिन्न आहेत, आत्मा अविनाशी तर देह विनाशी. आत्म्याला कोणीच मारू शकत नाही. आत्म्याचे ज्ञान झालेले पुरुष जन्म आणि मृत्यू यांच्याबद्दल कधीही शोक करीत नाहीत. आत्मा कधी जन्म पावत नाही आणि त्यामुळे त्याच्या मृत्यूचा प्रश्नच उद्भवत नाही. श्रीकृष्णाने दुसऱ्या अध्यायात अर्जुनाला आत्म्याचे अमरत्व पटवून दिले आणि ते त्याला पटले आणि तो युद्धाकरिता तयार होऊ लागला.

कोणतेही कर्म कसे करावे याची युक्ती श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितली. कर्मापासून तर कोणाचीच सुटका नाही. हे तर सत्य आहे. म्हणून कर्म जर फळाची आसक्ती सोडून केले आणि कर्म परमेश्वराला अर्पण केले तर कर्मफळाच्या बंधनातून सुटका होते. कौशल्याने कर्म करणे म्हणजे योग होय.

कर्मफळाचा त्याग करावा, कर्माचा नव्हे असे गीता सांगते. आपल्या वाट्याला आलेले कर्म आजन्म करीत रहावे. जर कर्म केले नाही तर आपले शरीरसुद्धा चालणार नाही. श्रीकृष्णाला या जगात काहीच मिळवायचे नव्हते. तरी त्याने स्वतः कर्म करीत

राहून लोकांपुढे आदर्श ठेवला. कारण श्रेष्ठ माणूस जसे आचरण करतो तसेच इतर सामान्य माणसे आचरण करतात.

यज्ञामध्ये विविध देवतांना उद्देशून आहुती दिल्या जातात. परंतु गीतेमधील यज्ञ फार वरच्या दर्जाचा आहे. द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, ज्ञानयज्ञ असे अनेक यज्ञ सांगून **''यज्ञानां जपयज्ञोऽस्मि ।''** असे श्रीकृष्णाने सांगितले.

मनुष्य पुष्कळ वेळा पाप करतो कारण रजोगुणापासून उत्पन्न झालेला काम त्याला पाप करायला प्रवृत्त करतो. कामापासून क्रोध, संमोह, स्मृतिभ्रंश यांची साखळीच तयार होते आणि शेवटी विनाश होतो. म्हणून अत्यंत प्रयत्नपूर्वक कामरूपी शत्रूपासून नित्य दूर राहिले पाहिजे. काम, क्रोध आणि लोभ हे नरकाचे तीन दरवाजे आहेत.

आपला उद्धार आपणच करावा. आपण आपल्याला कधीही अधोगतीला जाऊ देऊ नये. आपल्या उद्धारासाठी आपण स्वतःहून प्रयत्न केले नाहीत तर आपणच आपले शत्रू होऊ.

साधना कशी करावी हे सहाव्या अध्यायात विस्ताराने आले आहे. जो मार्गस्थ झाला तो कधीही भ्रष्ट होत नाही. समजा या जन्मात आपली साधना पुरी झाली नाही तरी पुढच्या जन्मी ती साधना जशीच्या तशी प्राप्त होते आणि साधक तेथून पुढे जातो. साधना करताना चंचल मन स्थिर होत नाही. अशी अर्जुनाने तक्रार केली. तेव्हा श्रीकृष्ण म्हणाला की मन चंचल आहे हे मला कबूल आहे. परंतु अभ्यास आणि वैराग्य या दोन साधनांनी त्याला ताब्यात ठेवता येते.

आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी आणि ज्ञानी असे गीतेने भक्तांचे चार प्रकार सांगितले आहेत. या सर्वांचे तात्कालिक ध्येय निरनिराळ्या प्रकारचे असले तरी हे सर्व भक्त परमेश्वराला प्रिय आहेत. हजारो मनुष्यांमध्ये एखादा मनुष्य परमेश्वराचे ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करतो आणि त्यांच्यातील एखादा यशस्वी होतो. जो मनुष्य अंतकाली परमेश्वराचे स्मरण करीत देह सोडतो तो परमेश्वरालाच जाऊन मिळतो.

परमेश्वर सर्वत्र आहे हे नक्की. तरीपण अर्जुनाच्या विनंतीवरून श्रीकृष्णाने त्याला निवडक ६९ विभूति सांगितल्या. विभूति म्हणजे परमेश्वराचे अलौकिक सामर्थ्य, विस्तार, त्याचे वास्तव्य असलेले स्थान आणि स्वरूप होय.

अर्जुनाला श्रीकृष्णाचे विश्वरूप पहायची तीव्र इच्छा झाली. सर्वसाधारण डोळ्यांनी ते पाहता येणे शक्य नसल्याने श्रीकृष्णाने त्याला दिव्य दृष्टी दिली आणि त्याला विश्वरूप दाखविले. परमेश्वराच्या रूपाचा स्पर्श अकराव्या अध्यायाला झाला असल्याने श्रीकृष्णभक्तांना हा अध्याय म्हणजे एक अमोल ठेवा वाटतो. अर्जुन विश्वरूप पाहून घाबरून गेला. म्हणून त्याने श्रीकृष्णाला त्याचे नेहमीचे सौम्य रूप दाखवायला सांगितले आणि तसे त्याने दाखविले. सौम्य रूप पाहिल्यावर अर्जुन भानावर आला.



परमेश्वराचे सगुण आणि निर्गुण अशा दोन्ही प्रकारचे रूप आहे. सगुण रूपाचे उपासक मला अधिक प्रिय आहेत असे श्रीकृष्णाने प्रथम म्हटले पण नंतर स्पष्ट केले की निर्गुणाचे उपासकही मलाच येऊन मिळतात. भक्ताने कोणत्याही प्राणिमात्राचा द्वेष करता कामा नये. तो करुणासंपन्न पाहिजे. अहंकाराचा वारा त्याला लागता कामा नये. सुखदुःखात त्याची चित्तवृत्ती सारखी राहिली पाहिजे. त्याने नित्यसंतुष्ट, क्षमाशील, संयमी आणि जितेंद्रिय राहिले पाहिजे. गीतेच्या बाराव्या अध्यायाचे नाव भक्तियोग आहे. भक्त या अध्यायाचे नित्य पठण करतात.

आपले शरीर सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी युक्त आहे. सत्त्वगुण श्रेष्ठ आहे. कफ, पित्त आणि वात हे तीन विकार जसे आपल्या शरीरात असतात त्याप्रमाणे हे तीन गुण प्रत्येकाच्या शरीरात असतात. शरीर सोडताना जर सत्त्वगुणाचे शरीरात प्राबल्य असेल तर उत्तम लोकाची प्राप्ती होते. परंतु साधकाने या तीनही गुणांना पार करून जायचे असते. जेव्हा साधक त्रिगुणातीत होतो तेव्हाच तो सर्व दुःखातून मुक्त होतो. त्रिगुणातीत होणे हेच मनुष्याच्या आयुष्याचे इतिकर्तव्य आहे.

संसाररूपी अश्वत्थ वृक्ष हा एक विलक्षण वृक्ष आहे. या वृक्षाचे वर्णन १५ व्या अध्यायात आले आहे. या वृक्षाचा अफाट विस्तार आहे. हा वृक्ष आपल्या ज्ञानाच्या आड येतो. म्हणून अनासक्तीरूप शस्त्राने हा वृक्ष तोडायचा आहे. हा वृक्ष तोडल्यावर अविनाशी अव्यय अशा आदिकारणाकडे म्हणजे ब्रह्मपदाकडे जाता येते.

प्रत्येक मनुष्य जन्माला येताना दैवी किंवा आसुरी संपत्ती घेऊन जन्माला येतो. अर्जुन दैवी संपत्ती घेऊन जन्मास आला होता. दैवी संपत्ती असलेल्या माणसाचा मोक्षाचा मार्ग सुकर होतो. दैवी संपत्ती म्हणजे सद्गुणांची संपत्ती तर आसुरी संपत्ती म्हणजे दुर्गुणांची रेलचेल.

श्रद्धा, आहार, यज्ञ, तप, दान इत्यादींचे सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार आहेत. सात्त्विक प्रकार श्रेष्ठ होय. साधकांनी हे तीनही प्रकार जाणून घेऊन सात्त्विक प्रकाराचीच कास धरली पाहिजे. कर्म, कर्ता, बुद्धी, धृती आणि सुख यांचेही त्रिविध प्रकार आहेत.

साधकाने सात्त्विक अन्नच घेतले पाहिजे. अन्नापासून सर्व शरीर धारण केले जाते. जसे अन्न तसे मन असते. सात्त्विक आहार हा साधनेचा पाया आहे.

ज्याच्यापासून सर्व प्राणिमात्रे निर्माण झाली, ज्याच्यामुळे त्यांचे पालनपोषण होते आणि शेवटी ज्याच्यामध्ये ती विलीन होतात असे आदिकारण म्हणजे ब्रह्म होय. ब्रह्म हे उपनिषदांचे वैभव आहे. ॐ, तत् आणि सत् या तीन शब्दांनी ब्रह्माचा निर्देश करण्यात येतो.

फार पुरातन काळापासून संन्यास प्रसिद्ध आहे. परंतु गीतेचा संन्यास परंपरेपासून

निराळा आहे. सर्व काम्य कर्मांचा त्याग म्हणजे संन्यास अशी नाविन्यपूर्ण व्याख्या गीतेने दिली आहे. साधकाने यज्ञ, दान व तप ही कर्मे केली पाहिजेत. ही कर्मे चित्तशुद्धिकारक आहेत आणि ती कर्त्याला पवित्र करतात. प्रत्येकाने आपल्या वाट्याला आलेले कर्म ईश्वरार्पणबुद्धीने करत रहावे कारण त्यानेच परमसिद्धी प्राप्त होते. हाच गीतेचा संदेश आहे.

शेवटी श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले की तू तुझे मन माझ्या ठिकाणी लाव. तू माझा भक्त हो, तू माझे पूजन कर आणि तू मला वंदन कर. असे केल्याने तू मलाच येऊन मिळशील. हे मी प्रतिज्ञापूर्वक सांगत आहे. तू मलाच शरण ये. मी सांगितलेल्या धर्मरूप संवादाचे जो कोणी अध्ययन करील तो माझीच ज्ञानयज्ञाने पूजा करतो असे होईल. आपला धर्मसंवाद ऐकणाऱ्यालाही उत्तम गती मिळेल.

यानंतर अर्जुन म्हणाला की माझा मोह आता पूर्णपणे नाहीसा झाला आहे. मी निःसंदेह झालो आहे. तू मला जसे सांगितलेस तसेच मी आता करीन - **करिष्ये वचनं तव** । मी आता निःशंक युद्ध करीन. सुरवातीला मोहाने विषण्ण झालेला अर्जुन बलसंपन्न झाला आणि युद्ध करण्यास प्रवृत्त झाला.

**गीतेची थोरवी**

आपले प्रारब्ध भोग भोगत असतानासुद्धा जो गीतेचा सदोदित अभ्यास करतो तो संसारात राहूनही सुखी होतो. कमलपत्राला ज्याप्रमाणे पाण्याचा लेप लागत नाही त्याप्रमाणे त्याला पातकांचा स्पर्श होत नाही. तो भय आणि शोक यांपासून मुक्त होतो. ज्या घरात गीतेचे पुस्तक आहे व ज्या घरात गीतापठण होते ते घर प्रयाग वगैरे तीर्थांसारखे अत्यंत पवित्र होय. ज्या घरात गीतेचे अध्ययन, अध्यापन व श्रवण चालते तेथे परमेश्वराचा नित्य वास असतो. गीतेचे अध्ययन करणाऱ्याचे पूर्वजन्मी केलेले पाप नाहीसे होते. ''गीता हे माझे सर्वोत्तम घर आहे. गीताज्ञानाचा आश्रय करून मी त्रैलोक्याचे पालन करतो,'' असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

जो दररोज अठरा अध्याय म्हणतो त्याला परमपदाची प्राप्ती होते. पण जो ९ किंवा ६ किंवा ३ अध्याय किंवा जो भक्तिभावाने एकतरी अध्याय म्हणतो त्यालासुद्धा अनंत प्रकारचे पुण्य मिळते. ज्याला काहीच जमत नाही त्याने कमीतकमी एक श्लोक किंवा चरणही म्हटला तरी त्याला पुष्कळ काळपर्यंत मनुष्यजन्मच मिळेल. गीता नुसती श्रवण केली आणि गीतार्थाचे अनुसंधान ठेवले तरी जीवन्मुक्त होता येते. अशी ही गीतेची थोरवी वराहपुराणात दिली आहे.

❀ ❀ ❀



# ३. गीता आणि महाभारत



श्रीमद्भगवद्गीतेने जनमानसावर प्रचंड मोहिनी घातली आहे. गीता हे नाव उच्चारल्याबरोबर आपल्या अंतःकरणात आदर उत्पन्न होतो. कमीतकमी गेली दोन ते अडीच हजार वर्षे गीतेचे अध्ययन-अध्यापन होत आले आहे आणि यावच्चंद्रदिवाकरौ होत राहील यात तिळमात्र संदेह नाही. हिंदुस्थानातील सर्व तत्त्ववेत्त्यांनी गीतेचा आश्रय घेतला. कित्येक तत्त्ववेत्त्यांच्या जीवनाचा गीता हा अविभाज्य भाग होता. सर्वसामान्यांनीसुद्धा गीतेला उचलून धरले आहे. आजही कित्येक श्रद्धाळू माणसे गीतेचा एकतरी अध्याय म्हटल्याशिवाय झोपी जात नाहीत. गीता ही अशी प्रचंड शक्ती आहे की जिच्यामुळे ऐहिक आणि पारलौकिक कल्याण होते. इहपर कल्याणाचा मार्ग दाखवणारा गीतेसारखा सोपा आणि सुंदर ग्रंथ दुसरा कोणताही नाही. यामुळे गीतेची लोकप्रियता अखंड राहिली आहे. भगवद्गीतेनंतर जे जे तत्त्वज्ञानविषयक व धार्मिक ग्रंथ झाले त्यांना गीतेला ओलांडून जाता आले नाही. गीतेची दखल त्यांना घ्यावीच लागली. गीता ही सगळ्यांच्या कौतुकाचा विषय होऊन राहिली आहे.

आज हिंदु धर्म म्हणजे नक्की काय या प्रश्नाचे उत्तर जरी पुष्कळांना देता आले नाही तरी हिंदूंचा धर्मग्रंथ कोणता या प्रश्नाचे उत्तर मात्र सगळ्यांना देता येते. हिंदूंचा धर्मग्रंथ श्रीमद्भगवद्गीता हा आहे. यातील समृद्ध विचारांमुळे गीता हा ग्रंथ अखिल विश्वाचा धर्मग्रंथ होण्यास सुयोग्य आहे. वेदान्ताच्या प्रस्थानत्रयीत गीतेला अनन्यसाधारण स्थान आहे. उपनिषदे, ब्रह्मसूत्रे व गीता ही वेदांताची प्रस्थानत्रयी - पण या त्रयीत गीता हीच एकमेव लोकप्रिय झाली. उपनिषदे आणि ब्रह्मसूत्रे समजण्यास थोडी कठीण आहेत. पुष्कळ माणसे ती वाचण्याच्या भरीस पडत नाहीत. परंतु गीता वाचली नाही किंवा ऐकली नाही असे सहसा होत नाही. गीतेने जनसामान्यांच्या मनाची पकड घेतली. याचे कारण ती केवळ सोपी आहे हे नव्हे, तर गीता महाभारताचा एक भाग आहे आणि महाभारत हे सगळ्या भारतवासियांच्या जीवनाशी समरस झाले आहे. महाभारत हे एक राष्ट्रीय महाकाव्य आहे. अलीकडे दूरदर्शनवरही महाभारत दाखवले गेल्यामुळे आता तर महाभारत देशाच्या कानाकोपऱ्यात जाऊन पोहोचले आहे. एवढेच नव्हे तर परदेशांतही ते जाऊन पोहोचले आहे. गीतेला लाभलेली महाभारताची पार्श्वभूमी हे पण गीतेच्या लोकप्रियतेचे एक कारण आहे.

तत्त्वज्ञानावरील ग्रंथांमध्ये गीतेएवढा सोपा ग्रंथ दुसरा कोणताही नाही. गीतेने सगळ्यांना लहानांना आणि मोठ्यांना आकर्षून घेतले. गीतेचे रहस्य सांगणारे लोकमान्य टिळक गीतेच्या आनंदाने आकंठ तृप्त झाले होते. विनोबांचा आणि गीतेचा संबंधही अतूट होता. त्यांनी ''गीताप्रवचने'' पुस्तकात म्हटले आहे की, ''माझे शरीर आईच्या दुधावर पोसले, त्यापेक्षाही माझे हृदय व बुद्धी यांचे गीतेच्या दुधावर अधिक पोषण झाले आहे. मी प्रायःगीतेच्याच वातावरणात असतो. गीता म्हणजे माझे प्राणतत्त्व. मी गीतेविषयी इतरांशी कधी बोलतो, तेव्हा गीतेच्या समुद्रावर तरंगत असतो आणि एकटा असतो त्यावेळेस त्या अमृतसमुद्रात खोल बुडी मारून बसतो.''

एकलक्षश्लोकात्मक महाभारताचा संदेश व्यासांनी गीतेत सांगितला आहे. गीतेचे महत्त्व लक्षात घेऊन कित्येक आचार्यांनी गीतेवर भाष्ये लिहिली. कित्येकांनी टीका लिहिल्या, कित्येक भाषांतरे झाली. जगातील जवळ जवळ सर्व प्रमुख भाषांमध्ये गीतेची भाषांतरे झाली आहेत. रसग्रहणात्मक व विवेचनात्मक असे ग्रंथ गीतेवर निर्माण झाले आहेत. गीतेवरील विविध स्वरूपांच्या ग्रंथांचा अगदी सुकाळ झाला आहे असे म्हटले तरी वावगे होणार नाही. असे असूनही गीतेवर नवनवीन ग्रंथ प्रकाशित होत आहेत आणि होत राहतील, हेच खरे गीतेचे वैशिष्ट्य आहे. ''**क्षणे क्षणे यन्नवतामुपैति तदेव रूपं रमणीयतायाः ।**'' हे रमणीयत्वाचे लक्षण गीतेला अगदी तंतोतंत लागू पडते. गीता नित्यनूतन आहे. अनेकांना ती स्फूर्ती आणि प्रेरणा देते.

शंकराचार्यांनी चर्पटपंजरिका स्तोत्रामध्ये गीतेचा गौरव केला आहे. ज्याने गीतेचे थोडे जरी पठण केले आहे त्याच्याविषयी यम चर्चा तरी करू शकेल काय ? असे त्यांनी म्हटले आहे. गीतेचा थोडा जरी अभ्यास केला तरी तो हितावह आहे. गीता वाचणाऱ्याला मृत्यूचे भय नाही. त्याचप्रमाणे थोडेसे गंगाजल सेवन करणाऱ्याला तसेच श्रीकृष्णाची पूजा करणाऱ्यांनाही मृत्यूचे भय नाही. स्तोत्रातील मूळ श्लोक पुढीलप्रमाणे आहे.

**भगवद्गीता किंचिदधीता ।**
**गंगाजललवकणिका पीता ।**
**सकृदपि यस्य मुरारिसमर्चा ।**
**तस्य यमः किं कुरुते चर्चाम् ।।**

गीतेचे महत्त्व एवढे आहे की, एका गीतेचे नीट अध्ययन केले तरी पुरे, एकच गीता 'सुगीता' करावी की जी स्वतः श्रीकृष्णाच्या मुखकमलातून बाहेर पडली आहे. गीतेचा नीट अभ्यास केला की, इतर शास्त्रांचे अध्ययन करण्याचे कारण नाही. किंवा इतर शास्त्रांच्या विस्ताराकडेसुद्धा बघण्याची आवश्यकता नाही असे अगदी सुस्पष्टपणे गीताप्रशस्तीच्या पुढील श्लोकात सांगितले आहे.



**गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः ।**
**या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्मात् विनिःसृता ।।**

गीतेवर अनेक ग्रंथ आहेत हे सर्वांस माहित आहे. परंतु या सर्व ग्रंथांपेक्षा निराळ्या पद्धतीने आणि नाविन्यतेने म्हणजे प्रश्नोत्तररूपाने गीतेचा आशय आणि महत्त्व सादर करण्याचा प्रयत्न या पुस्तकात केला आहे. प्रश्न कधी लहान तर कधी मोठे असतील, कधी साधे असतील तर कधी गहन असतील. परंतु हेतु एवढाच आहे की, गीतेचे विविध पैलू प्रश्नोत्तरांच्याद्वारे वाचकांच्या पुढे यावेत. प्रथम गीतेविषयी परिचयात्मक प्रश्नोत्तरे, नंतर प्रत्येक अध्यायावर आधारित प्रश्नोत्तरे व शेवटी समालोचनात्मक प्रश्नोत्तरे सादर करण्यात आली आहेत.

**प्रश्न १ गीतेला भगवद्गीता हे नाव कसे पडले ?**
**उत्तर** – महाभारतामध्ये शांतिपर्वात अनेक प्रकरणांस गीता असे नाव दिलेले आहे. उदा. पिंगलगीता, शंपाकगीता, हारीतगीता, पराशरगीता, हंसगीता इत्यादी. पण या गीता कृष्णाच्या मुखी नाहीत. या सगळ्या गीतांच्याहून निराळी अशी गीता भगवान श्रीकृष्णाच्या मुखातून बाहेर पडली. गीता साक्षात् भगवानाने सांगितली असल्यामुळे गीतेला भगवद्गीता असे म्हणतात. भगवान् शब्दामध्ये मूळ शब्द भगवत् आहे आणि भगवत् आणि गीता यांचा संधी होऊन भगवद्गीता शब्द तयार झाला. भारताचार्य कै. चिं. वि. वैद्य यांच्यामते गीतेला भगवद्गीता हे नाव सौतीने दिले असावे. हे नाव इसवीसन पूर्व २५० वर्षांपासून प्रचलित असावे.

**प्रश्न २ सौतीचा महाभारताशी किती सहभाग आहे ?**
**उत्तर** – सौती या सूतपुत्राने पूर्वीच्या 'भारत' या ग्रंथाला सध्याच्या महाभारताचे विशाल रूप दिले.

व्यासांच्या नावावर प्रसिद्ध असलेल्या महाभारताचे मूळ नाव 'जय' हे होते. त्यामध्ये फक्त ८८०० श्लोक होते. नंतर व्यासांच्या शिष्यपरंपरेतील वैशंपायन याने अर्जुनाचा पणतु राजा जनमेजय याने सर्पसत्र केले त्यावेळी व्यासांचा 'जय' हा ग्रंथ सांगितला. परंतु असे करताना त्याने अनेक कथांची भर घातल्याने एकूण श्लोकसंख्या २४००० झाली व 'जय' या ग्रंथाला 'भारत' हे नाव प्राप्त झाले. त्यानंतर कित्येक वर्षांनी नैमिषारण्यात शौनकाचा बारा वर्षे मुदतीचा यज्ञ चालू असताना सौतीने भारत ग्रंथाचे पठण केले. परंतु या समयी शौनक आणि इतर ऋषी यांच्याशी झालेली प्रश्नोत्तरे त्याने 'भारतात' घातली, तसेच अनेक आख्याने, उपाख्याने यांची भर घातली. शिवाय हरिवंश हे परिशिष्टही जोडले. अशाप्रकारे या वाढलेल्या 'भारताचे' 'महाभारत' झाले.

महाभारताचे मूळ नाव 'जय' होते. हे महाभारताच्या प्रारंभीच्या पुढील श्लोकावरून दिसते.

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् ।**
**देवीं सरस्वतीं चैव ततो जयमुदीरयेत् ।।**

(अर्थ - नारायणाला, तसेच नरश्रेष्ठ अर्जुनाला आणि सरस्वती देवीला वंदन करून, जय हा ग्रंथ म्हणण्यास सुरवात करावी.)

पुराणकाळी वरील श्लोकाच्या दुसऱ्या चरणातील 'चैव' या शब्दाबद्दल 'व्यासं' हा शब्द प्रचलित झाला आणि आता महाभारत वाचताना व्यासांनाही वंदन केले जाते.

**प्रश्न ३ सध्याच्या महाभारतावरून पूर्वीचा 'जय' ग्रंथ किंवा त्यानंतरचा 'भारत' ग्रंथ रचणे शक्य आहे का ?**

**उत्तर** - महाभारत हे 'जय' आणि 'भारत' या दोन्ही ग्रंथांच्या अनुक्रमे बारापट व चौपट एवढ्या पटीने वाढले असल्यामुळे हे दोन्ही ग्रंथ पुन्हा रचणे शक्य नाही असे विद्वानांचे मत आहे.

**प्रश्न ४ महाभारताची किती पर्वे आहेत व कोणत्या पर्वात गीता आहे ?**

**उत्तर** - महाभारतामध्ये एकूण अठरा पर्वे आहेत व श्लोकसंख्या साधारणतः एक लक्ष आहे. महाभारतातील पर्वांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १) आदि | २) सभा | ३) वन | ४) विराट |
| ५) उद्योग | ६) भीष्म | ७) द्रोण | ८) कर्ण |
| ९) शल्य | १०) सौप्तिक | ११) स्त्री | १२) शान्ति |
| १३) अनुशासन | १४) अश्वमेध | १५) आश्रमवासिक | १६) मौसल |
| १७) महाप्रस्थानिक | १८) स्वर्गारोहण. | | |

महाभारताच्या भीष्मपर्वाचे अध्याय २३ ते ४० म्हणजे श्रीमद्भगवद्गीता होय.

**प्रश्न ५ महाभारताच्या अठरा पर्वांचा आणि गीतेच्या अठरा अध्यायांचा काही संबंध आहे का ?**

**उत्तर** - महाभारताच्या अठरा पर्वांचा आणि गीतेच्या अठरा अध्यायांचा काही संबंध नाही. केवळ योगायोगाने अठरा ही संख्या एक आली आहे. तसे पाहिले तर कौरव पांडवांचे युद्ध अठरा दिवस चालले. त्यांच्या सैन्यांची संख्याही अठरा अक्षौहिणी होती. महाभारतानंतर पुराणे झाली. त्यांची संख्या अठरा आहे. उपपुराणांची संख्याही अठरा आहे. अठरा ही काही विशेष वस्तुस्थिती निदर्शक संख्या नाही.

**प्रश्न ६ ज्याप्रमाणे महाभारताची संस्करणे झाली त्याप्रमाणे गीतेची झाली का ?**

**उत्तर** - या प्रश्नाच्या उत्तराबाबत विद्वानांमध्ये एकवाक्यता नाही. काहींच्या मते गीता



मुळात होती तशीच अद्यापि आहे. काही संशोधकांच्या मते महाभारताप्रमाणे गीतेचीही संस्करणे झाली. हे दोन्ही पक्ष उचलून धरणारे विद्वान भारतीय तसेच पाश्चिमात्यही आहेत. अगदी अलीकडे कै. डॉ. ग. श्री. खैर यांनी आपल्या ''मूळ गीतेचा शोध'' या १९६७ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथामध्ये म्हटले आहे की, गीता ही एकाच ग्रंथकाराची कृती नसून ती तीन निरनिराळ्या लेखकांची कृती आहे. त्यांनी ग्रंथाच्या शेवटी तीन रंगाच्या शाईने तीन लेखकांनी लिहिलेली सध्याची गीता छापली आहे.

या प्रश्नाच्या उत्तराच्या आरंभी म्हटल्याप्रमाणे गीतेच्या संस्करणांबद्दल तसेच संक्रमणांबद्दल एकवाक्यता नाही. परंतु गीता मुळात होती तशीच अद्यापि आहे हाच पक्ष जवळजवळ बहुतांशी विद्वानांनी उचलून धरला आहे. गीतेची संस्करणे झाली हा पक्ष मानणाऱ्यांची संख्या अगदी अल्प आहे.

संशोधकांचे मत काहीही असो. श्रद्धाळू भारतीयांना गीता हा ग्रंथ अतिशय पवित्र आणि पूज्य आहे. गीतेसारखा मनःशांती देणारा दुसरा ग्रंथ नाही. अशा या ग्रंथाचे वाचन, मनन आणि चिंतन करावे व गीतेच्या संस्करणाविषयी वा तत्सम विचार मनातही आणू नये हेच श्रेयस्कर. कारण गीतेच्या संस्करणांना अथवा संक्रमणांना महत्त्व नसून गीतेच्या विचारांना सर्वाधिक महत्त्व आहे.

**प्रश्न ७ गीता महाभारतातील प्रक्षिप्त भाग आहे का ?**

**उत्तर** - नाही. गीता महाभारताचाच भाग आहे. महाभारतात गीतेचा सातवेळा तसा स्पष्ट उल्लेख आहे. गीता आणि महाभारताचा इतर भाग यांच्यामध्ये २७ पूर्ण श्लोक अगदी सारखे आहेत आणि १२ श्लोकांच्या एक एक ओळी थोड्याफार पाठभेदाने सारख्या आहेत. शिवाय सारखे चरण असलेले अनेक श्लोक महाभारतात आणि गीतेत आहेत. ज्याने महाभारत रचले त्यानेच गीता रचली. गीता हा महाभारताचाच भाग आहे.

**प्रश्न ८ गीतेमध्ये एकूण किती श्लोक आहेत व कोणाच्या तोंडी किती श्लोक आहेत ?**

**उत्तर** - गीतेमध्ये एकूण ७०० श्लोक आहेत व ते श्रीकृष्ण व इतर तिघे मिळून चौघांच्या तोंडी खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| धृतराष्ट्र | - | १ |
| संजय | - | ४१ |
| अर्जुन | - | ८४ |
| श्रीकृष्ण | - | ५७४ |
| | | ७०० |

गीतेच्या प्रारंभी "धर्मक्षेत्रे कुरूक्षेत्रे...." हा जो श्लोक आहे तोच एकमेव श्लोक धृतराष्ट्राच्या तोंडी आहे.

**प्रश्न ९ गीतेमध्ये सातशे श्लोक आहेत असे अधिकृतरीत्या प्रथम कोणत्या आचार्यांनी म्हटले ?**

**उत्तर –** शंकराचार्यांनी गीतेवरील आपल्या भाष्याच्या प्रारंभीच गीतेमध्ये सातशे श्लोक असल्याचा स्पष्ट उल्लेख केला आहे. ते म्हणतात, **"तं धर्मं भगवता यथोपदिष्टं वेदव्यासः सर्वज्ञो भगवान्गीताख्यैः सप्तभिः श्लोकशतैरूपनिबबन्ध ।"** (अर्थ – तो धर्म भगवान् श्रीकृष्णांनी अर्जुनाला जसा उपदेशिला तसाच तो सर्वज्ञानी भगवान् वेदव्यासांनी ज्याला गीता हे नाव आहे, अशा सातशे श्लोकांनी ग्रंथबद्ध केला) शंकराचार्यांचा काल इ.स. ७८८ ते ८२० धरला जातो. यावरून कमीत कमी गेले १२०० वर्षे तरी गीतेच्या श्लोक संख्येबाबत निश्चितता आहे असे स्पष्ट दिसते.

**प्रश्न १० पुष्कळवेळा टीका आणि भाष्य हे शब्द अध्यात्मग्रंथांच्या संबंधात वापरले जातात. परंतु यांचा नक्की अर्थ काय ?**

**उत्तर –** टीका आणि भाष्य हे शब्द पुष्कळवेळा समानार्थी वापरले जातात. परंतु त्यामध्ये भेद आहे. टीकाकाराचा मूळ उद्देश ग्रंथाचा अन्वय आणि अर्थ स्पष्ट करून सांगणे एवढाच असतो. परंतु भाष्यकाराचे कार्य याच्याहीपुढे जाऊन मूळ ग्रंथात सांगितलेल्या तत्त्वज्ञानाचे समालोचन करून स्वमते तात्पर्य दाखविणे हे असते.

❁ ❁ ❁



# ४. गीताध्यान

**प्रश्न ११ गीताध्यान हे काय आहे ? त्यात किती श्लोक आहेत व त्यांचा अर्थ काय ?**

**उत्तर –** गीताध्यान हे गीता वाचायला सुरवात करायच्या अगोदर करायचे असते. गीतेच्या निरनिराळ्या प्रतींत गीताध्यानाची श्लोकसंख्या निरनिराळी दिसून येते. काही ठिकाणी आठ तर काही ठिकाणी नऊ तर आणखी काही ठिकाणी दहा अशी दिसून येते. काही ठिकाणी याहूनही कमी संख्या आहे. शिवाय श्लोकांचा क्रमही ठिकठिकाणी भिन्न आहे. गीताध्यानात सर्वसाधारणपणे सापडणारे नऊ श्लोक पुढे सार्थ दिले आहेत.

**पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं**
**व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ।**
**अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनी**
**मम्ब त्वामनुसंदधामि भगवद्‌गीते भवद्वेषिणीम् ॥१॥**

हे माते भगवद्गीते ! भगवान् नारायणांनी स्वतः, पार्थाला म्हणजे अर्जुनाला उपदेशिलेली, पुरातन काळाच्या व्यासमुनींनी महाभारतामध्ये ग्रथित केलेली, अद्वैतरूपी अमृताचा वर्षाव करणारी आणि संसाराच्या दुःखाचा निरास करणारी, अठरा अध्याय असलेली अशी पूज्य जी गीता त्या तुझे मी (निरंतर) चिंतन करतो.

**नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविंदायतपत्रनेत्र ।**
**येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥२॥**

प्रफुल्ल कमलासारखे नेत्र असणाऱ्या, ज्यांची बुद्धी विशाल आहे अशा हे व्यासमहर्षे, ज्या तुम्ही भारतरूपी तेलाने तेवणारा ज्ञानस्वरूपी असा मोठा दीप प्रज्वलित केलात, त्या तुम्हाला नमस्कार असो.

**प्रपन्नपारिजाताय तोत्त्रवेत्रैकपाणये ।**
**ज्ञानमुद्राय कृष्णाय गीतामृतदुहे नमः ॥३॥**

शरण आलेल्यांना कल्पवृक्षाप्रमाणे असलेल्या, ज्याच्या हातात चाबकाची काठी आहे, ज्याने ज्ञानमुद्रा धारण केली आहे अशा त्या गीतारूपी अमृताचे दोहन करणाऱ्या श्रीकृष्णाला नमस्कार असो.

**सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनन्दनः ।**
**पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥४॥**

सर्व उपनिषदे या गायी, श्रीकृष्ण हा दोहन करणारा आहे. बुद्धिमान पार्थ वासरू असून, त्या गायींचे दूध गीतारूपी मोठे अमृत होय.

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।
देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ॥५॥

कंस आणि चाणूर यांना मारणाऱ्या, वसुदेवाचा पुत्र व देवकीचा परम आनंद अशा जगद्गुरु श्रीकृष्णाला मी वंदन करतो.

भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गांधारनीलोत्पला
शल्यग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला ।
अश्वत्थामविकर्णघोरमकरा दुर्योधनावर्तिनी
सोत्तीर्णा खलु पाण्डवै रणनदी कैवर्तकः केशवः ॥६॥

भीष्म आणि द्रोण ज्या रणरूपी नदीचे तीर आहेत, जयद्रथ हा जिच्यातील पाणी आहे, शकुनी हा जिच्यातील काळा खडक आहे, शल्य हा जिच्यातील सुसर आहे, कृपाचार्य जिच्या प्रवाहात आहेत, कर्णरूपी लाटा जिच्या तीरावर आदळत आहेत, अश्वत्थामा आणि विकर्ण हे जिच्यातील भयंकर नक्र आहेत आणि दुर्योधन हा जिच्यातील भोवरा आहे अशी रणनदी पांडवांनी उल्लंघिली याचे कारण त्यांचा नावाडी साक्षात् श्रीकृष्ण होता.

पाराशर्यवचः सरोजममलं गीतार्थगन्धोत्कटं
नानाख्यानककेसरं हरिकथासद्वासनावासितम् ।
लोके सज्जनषट्पदैरहरहः पेपीयमानं मुदा
भूयाद् भारतपंकजं कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे ॥७॥

पराशरपुत्र व्यासमुनींच्या वाक्यस्वरूपी सरोवरात उगवलेले, निर्मल गीतार्थाने सुगंधित झालेले, विविध आख्याने हेच ज्याचे केसर आहेत, हरिकथेच्या वर्णनाने जे प्रफुल्लित झाले आहे, जे सज्जनरूपी भ्रमरांकडून प्रत्यही आनंदाने सेवन केले जाते व जे कलिकालाच्या पातकांचा नाश करते असे भारतरूपी कमल आमचे कल्याण करणारे होवो.

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ।
यत्कृपा तमहं वन्दे परमानन्दमाधवम् ॥८॥

ज्याचा कृपाकटाक्ष मुक्याला बोलका करतो आणि पांगळ्याकडून डोंगर उल्लंघन करवू शकतो अशा त्या आनंदातिशयाचा ठेवा असलेल्या माधवाला मी वंदन करतो.



यं ब्रह्मा वरुणेन्द्ररुद्रमरुतः स्तुन्वन्ति दिव्यैः स्तवै -
र्वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर्गायन्ति यं सामगाः ।
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यन्ति यं योगिनो
यस्यान्तं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥९॥

ब्रह्मदेव, वरुण, इंद्र व मरुद्गण ज्याची दिव्य स्तोत्रांनी स्तुती करतात, सामगान करणारे अंगे, पदे, क्रम व उपनिषदांसह वेदांनी ज्याचे गान वर्णन करतात, योगी लोक ज्याला ध्यानाने स्थिर केलेल्या मनाने पहातात व ज्याचा अंत देव व दानव यांना लागत नाही, अशा त्या देवाला नमस्कार असो.

या गीताध्यानामध्ये गीतेची स्तुती आहे. व्यासांना वंदन आहे. श्रीकृष्णाला नमन आहे. श्रीकृष्णाची जगद्गुरू म्हणून स्तुती आहे. रणरूपी नदीचे अलंकारिक वर्णन आहे. भारत आणि महाभारत या दोहोंचाही उल्लेख आहे आणि शेवटी सर्वेश्वर देवास वंदन आहे.

**प्रश्न १२ गीताध्यान कोणी रचले व ते केव्हा प्रचारात आले ?**

**उत्तर** – गीताध्यान कोणी रचले हे सांगता येत नाही. पण हे कोणी एका व्यक्तीने रचले नाही. या ध्यानात निरनिराळ्या ठिकाणचे श्लोक एकत्र केले आहेत. हे गीताध्यान केव्हा प्रचारात आले हेही नक्की सांगता येत नाही. परंतु महाभारताचा यात उल्लेख असल्यामुळे, हे उघड आहे की महाभारताचे विशाल स्वरूप नक्की झाल्यावरच हे रचण्यात आले असावे. साधारणतः इसवीसनानंतर पहिल्या किंवा दुसऱ्या शतकापासून हे प्रसिद्ध असावे.

# ५. गीतेचा काळ

**प्रश्न १३ गीता ही प्रत्यक्ष युद्धभूमीवर सांगितली गेली का ?**

**उत्तर –** गीतेच्या अभ्यासकांच्या मनात हा प्रश्न वारंवार उद्‌भवतो. या प्रश्नाची चर्चाही पुष्कळ वेळा केली जाते. प्रत्यक्षात श्रीकृष्णाने युद्धभूमीवर काय सांगितले हे कोणालाही जाणता येणार नाही. परंतु युद्धाचा प्रसंग निर्माण झाल्यावर आणि अर्जुनाची स्थिती शोकाकुल झाल्यावर श्रीकृष्णाने त्यास उपदेश केला आणि तोच उपदेश महाभारतकारांनी श्लोकबद्ध केला हे निश्चित. आपलेच सगेसोयरे युद्धासाठी उभे आहेत असे पाहिल्यावर मनात कालवाकालव होणे स्वाभाविक आहे. हाच प्रसंग व्यासांनी उपदेशासाठी टिपला. मनुष्य जेव्हा किंकर्तव्यमूढ होतो तेव्हा त्याला उपदेश करणाऱ्या मार्गदर्शकाची आवश्यकता असते आणि ही भूमिका श्रीकृष्णाने उत्तम रीतीने पार पाडली आहे. थोडक्यात युद्धाच्या निमित्ताने श्रीकृष्णाने अर्जुनास उपदेश केला आणि याच उपदेशाचे महाभारतकारांनी गीतेत रूपांतर केले. अशा प्रकारे श्रीकृष्णाने उपदेश जरी युद्धप्रसंगी आणि युद्धभूमीवर केला असला तरी गीता प्रत्यक्षात नंतर लिहिली गेली.

**प्रश्न १४ ज्या युद्धाच्या निमित्ताने गीता सांगितली गेली ते युद्ध प्रत्यक्ष झाले का ? झाले असल्यास ते केव्हा झाले ?**

**उत्तर –** कौरव आणि पांडव यांचे युद्ध झाले असे आता इतिहासकारांनी मान्य केले आहे. परंतु युद्धप्रसंगाचा सर्वच तपशील त्यांना मान्य नाही.

युद्ध झाले हे जरी सर्वांनी मान्य केले आहे तरी या भारतीय युद्धाच्या कालाबाबत विद्वानांचे नेहमीप्रमाणे एकमत नाही. भारतीय युद्धाचा काल म्हणजे एक वादग्रस्त प्रश्न आहे. मोठमोठ्या विद्वानांनी व इतिहासकारांनी महाभारताच्या अंतर्गत व बहिर्गत पुराव्यांवरून युद्धाचा काल ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु या कालामध्ये कित्येक हजार वर्षांचे अंतर पडले आहे. काही प्रमुख विद्वानांनी ठरविलेला युद्धाचा काल पुढीलप्रमाणे आहे.

| नाव | इसवीसनापूर्वी वर्षे |
|---|---|
| विसाजीपंत लेले | ६२६७ |
| जनार्दन बाळाजी मोडक | ४९९९ |
| चिंतामणराव वैद्य | ३१०१ |
| वि. व. आठवले | ३०१८ |
| ज. स. करंदीकर | १९३१ |
| सतीशचंद्र विद्याभूषण | १९२२ |
| लोकमान्य बाळ गंगाधर टिळक | १४९९ |
| रमेशचंद्र दत्त | १३९९ |
| वल्लंडी अय्यर | १२७२ |
| त्र्यं. गु. काळे | १२६३ |
| के.ल. दप्तरी | ११९७ |
| सीतानाथ प्रधान | ११५१ |



वरील विविध काळांकडे पाहिले तर असे दिसून येते की श्री. लेले यांनी भारतीय युद्धाचा काल इसवीसनापूर्वी ६२६७ इतका मागे नेला आहे. तर श्री. सीतानाथ प्रधान यांनी तो इसवीसनापूर्वी ११५१ इतका अलीकडे आणला आहे. परंतु या सर्वांचा सुवर्णमध्य भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांनी साधला आहे. त्यांनी ठरविलेला काल इसवीसनापूर्वी ३१०१ हा आहे. चिंतामणराव वैद्य हे महाभारताचे विशेष अभ्यासक होते. म्हणून त्यांनी ठरविलेल्या काळाला मान्यता प्राप्त झाली आहे. म्हणून कौरवपांडवांचे युद्ध इसवीसनापूर्वी ३१०१ या काळी झाले असे धरावयास हरकत नाही.

**प्रश्न १५ भारतीय युद्धानंतर गीता केव्हा रचण्यात आली ?**

**उत्तर –** कौरव व पांडव यांचे युद्ध झाल्यानंतर महाभारत रचण्यात आले. जय, भारत व महाभारत अशा तीन टप्प्यांत महाभारत पूर्ण झाले. युद्धाची घटना व त्यानंतर कित्येक वर्षांनी रचले गेलेले महाभारत या दोन निराळ्या घटना आहेत व त्यांचा काल भिन्न आहे हे लक्षात ठेवावयास पाहिजे. प्रा. गार्बे यांनी गीतेचा काल ख्रिस्तपूर्व २०० वर्षे धरला आहे. डॉ. भांडारकर, तेलंग, शं.बा. दिक्षित व लोकमान्य टिळक यांच्या मते भगवद्‌गीता सुमारे शकापूर्वी ५०० वर्षे(म्हणजे इसवीसनापूर्वी ४२१) अस्तित्वात होती. म्हणून गीतेचा काल आणि पर्यायाने महाभारताच्या पूर्णतेचा काल इसवीसनापूर्वी ४२१ हा धरायला हरकत नाही. लोकमान्य टिळक यांच्यामते हल्लीचे महाभारत आणि गीता हे दोन्ही ग्रंथ एकाच्याच हातचे आहे. चिंतामणराव वैद्य यांच्या मते मात्र गीतेचा काल इसवीसनापूर्वी ५००च्याही अगोदर काही शतके आहे. भारतीय युद्धाच्या कालाबाबत जशी भिन्न भिन्न मते आहेत, त्याचप्रमाणे गीतेच्या कालाबाबतही विभिन्न मते आहेत हे येथे आवश्य नमूद केले पाहिजे.

**प्रश्न १६ व्यासांना महाभारत रचण्यासाठी किती काळ लागला ?**

**उत्तर –** व्यासांनी सतत परिश्रम करून व सदैव प्रसन्न राहून अदम्य उत्साहाने महाभारताची रचना केली. त्यांना महाभारत लिहिण्यास तीन वर्षे लागली असा उल्लेख खुद्द आदिपर्वात (५६.१२) पुढीलप्रमाणे आहे -

त्रिभिर्वर्षैः सदोत्थायी कृष्णद्वैपायनो मुनिः ।
महाभारतमाख्यानं कृतवानिदमुत्तमम् ॥

वरील श्लोकात व्यासांचा कृष्णद्वैपायन असा उल्लेख आहे. व्यासांचा जन्म यमुनेच्या द्वीपात झाला म्हणून त्यांना द्वैपायन म्हणतात. शरीराच्या रंगावरून त्यांना ''कृष्ण मुनि'' म्हणण्यात येत असे. त्यांनी वेदांची चार संहितेमध्ये विभागणी केली म्हणून त्यांना वेदव्यास असेही म्हणतात. शिवाय बादरायण या नावानेही व्यास विश्रुत आहेत.

**प्रश्न १७ महाभारताला आणखी दुसऱ्या कोणत्या नावाने संबोधण्यात येते ?**
**उत्तर** – महाभारताला ''शतसाहस्री संहिता'' या नावाने संबोधण्यात येते कारण महाभारतामध्ये एक शत सहस्र (एक लाख) श्लोक आहेत.

❁❁❁



# ६.अर्जुनविषादयोग (श्लोकसंख्या ४७)

## अध्याय पहिला

**प्रश्न १८ गीतेच्या पहिल्याच श्लोकात जेथे भारतीय युद्ध झाले त्या कुरुक्षेत्राचा उल्लेख आहे. हे कुरुक्षेत्र कोठे आहे ?**
**उत्तर** – कुरुक्षेत्र हरयाणामध्ये आहे. खरे पाहता दिल्ली हे शहरच मुळी कुरुक्षेत्र मैदानावर वसलेले आहे. दिल्ली ते कुरुक्षेत्र अंतर १५६ किलोमीटर आहे. सध्या कुरुक्षेत्र येथे कुरुक्षेत्र नावाचे विद्यापीठ आहे. विशेष म्हणजे या विद्यापीठाचा तारेचा पत्ता 'धर्मक्षेत्र' असा आहे.

**प्रश्न १९ कुरुक्षेत्राला धर्मक्षेत्र का म्हटले आहे ?**
**उत्तर** – कुरुक्षेत्राला धर्मक्षेत्र का म्हटले आहे याबद्दलचा कथाभाग महाभारताच्या शल्यपर्वात आला आहे. असे म्हणतात की कुरु नावाचा राजा व कौरवपांडवांचा पूर्वज या क्षेत्रात मोठ्या कष्टाने शेती करीत असे. त्याचे कष्ट पाहून दया आल्याने इन्द्राने त्याला असा वर दिला की येथे जे तपश्चर्या करतील अथवा युद्धात वीरगती पावतील त्यांना स्वर्गप्राप्ती होईल. इंद्राच्या वरानंतर कुरु राजाने शेती करण्याचे बंद केले. इंद्राच्या वरामुळे कुरुक्षेत्राला धर्मक्षेत्र हे नाव पडले. भारतीय युद्धाच्या अगोदर व नंतरही अनेक लढाया येथे झाल्या. परशुरामाने याच कुरुक्षेत्रावर एकवीस वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली असे म्हणतात.

कौरवपांडवांच्या युद्धात धर्माचा रक्षणकर्ता श्रीकृष्ण हा साक्षी होता व तो धर्माने आचरण करणाऱ्या पांडवांच्या बाजूने होता. या कारणास्तवही धर्मक्षेत्र हे विशेषण कुरुक्षेत्राला शोभून दिसते. कुरूंची भूमि म्हणून कुरुक्षेत्र व धर्माने आचरण करणाऱ्यांना येथे हमखास विजय प्राप्त होतो म्हणून धर्मक्षेत्र असे थोडक्यात म्हणता येते.

मनुस्मृतीमध्ये (२.१९) कुरुक्षेत्राला ब्रह्मर्षिदेश म्हणजे ब्रह्मर्षींनी रहाण्यास योग्य देश असे म्हटले आहे.

**प्रश्न २० – कौरव व पांडव यांचे युद्ध ज्या कुरुक्षेत्रावर झाले ते कुरुक्षेत्र मैदान किती विस्तीर्ण होते ?**
**उत्तर** – कौरवपांडवांच्या युद्धाच्या वेळी कुरुक्षेत्राचा विस्तार सुमारे दोनशे मैल लांब व दोनशे मैल रुंद एवढा प्रचंड होता. या विस्तीर्ण रणांगणावर दोन्ही सैन्यांची शिबिरे पसरली होती. कुरुक्षेत्रावर वीरगती प्राप्त होणाऱ्यांना स्वर्ग मिळतो आणि युद्धासाठी मोठे मैदान पाहिजे म्हणून उभयपक्षांनी कुरुक्षेत्राची निवड केली असावी.

**प्र.२१ – गीतेच्या पहिल्याच श्लोकात धृतराष्ट्राने संजयास कुरुक्षेत्रावर युद्धासाठी जमलेल्या माझ्या आणि पांडूच्या पुत्रांनी काय केले असा प्रश्न केला. हा संजय कोण आणि त्याला युद्धभूमीवर घडलेल्या घटना कशा समजत ?**

**उत्तर –** संजय हा सूतपुत्र होता व अंध धृतराष्ट्राचा सारथी होता. युद्ध सुरू होण्याच्या अगोदर महर्षि व्यास धृतराष्ट्राकडे गेले आणि त्यांनी त्याला सांगितले की तुझी युद्ध पहायची इच्छा असल्यास मी तुला दिव्य दृष्टी देतो. परंतु आपल्या कुळाचा होणारा संभाव्य नाश मला पहायची इच्छा नाही असे त्यांनी उत्तर दिले. तेव्हा व्यासांनी संजयास दिव्य दृष्टी दिली व त्याला बसल्या बसल्याच युद्धभूमीवर घडणाऱ्या घटना प्रत्यक्ष दिसतील अशी व्यवस्था केली. त्यामुळे संजयाने युद्धाचे प्रत्यक्ष वर्णन धृतराष्ट्राला सांगितले. अशी माहिती भीष्मपर्वात दिली आहे. महाभारतकाळी हल्लीसारखी दूरदर्शन व्यवस्था नव्हती. परंतु व्यासांच्या कृपेने दूरवरील दर्शन घेणारा दूरदर्शनचा पहिला प्रेक्षक संजय झाला.

**प्रश्न २२ – युद्धासाठी जमलेल्या कौरवांकडे आणि पांडवांकडे किती सैन्य होते ?**

**उत्तर –** कौरवांकडे ११ अक्षौहिणी आणि पांडवांकडे ७ अक्षौहिणी असे एकूण १८ अक्षौहिणी सैन्य होते. एका अक्षौहिणीत पुढीलप्रमाणे चतुरंग सेना असे -

| | |
|---|---|
| २१, ८७० | रथात बसून लढणारे |
| २१, ८७० | हत्तीवर बसून लढणारे |
| ६५, ६१० | घोड्यावर बसून लढणारे |
| १,०९,३५० | पायदळ |
| २,१८,७०० | |

अशा प्रकारे एका अक्षौहिणीत २,१८,७०० वीर असत. दोन्ही सैन्ये मिळून अठरा अक्षौहिणीतील वीरांची संख्या ३९,३६,६०० होती.

अठरा अक्षौहिणींचा उल्लेख गीतेत नाही. ही संख्या उद्योगपर्वात (१२६-१२७) सांगितली आहे. परंतु अक्षौहिणीतील वीरांची संख्या मात्र महाभारतातील पुढील चार पर्वात निरनिराळी सांगितली आहे. आणि त्यांचा एकमेकांशी समन्वय होत नाही.

| | |
|---|---|
| आदिपर्व अध्याय २ | (श्लोक १९ ते २७) |
| उद्योगपर्व अध्याय १५५ | (श्लोक २४ ते २९) |
| शल्यपर्व अध्याय ८ | (श्लोक ३७ ते ४१) |
| स्त्रीपर्व अध्याय २६ | (श्लोक ९ व १०) |

उत्तराच्या सुरवातीस दिलेली अक्षौहिणीतील वीरांची संख्या आदिपर्वात दिलेल्या संख्येप्रमाणे आहे.



युद्धाचे वेळी सैन्य कसे उभे करावे हे शांतिपर्वात (अध्याय ९९) सांगितले आहे. सैन्याच्या अग्रभागी हत्ती, त्याच्यानंतर रथ, त्यांच्यामागे घोडदळ व घोडदळाच्या मध्यभागी पायदळ अशी सैन्यरचना असे.

**प्रश्न २३ कौरव व पांडव यांच्याकडे प्रमुख वीर कोण होते ?**

**उत्तर –** गीतेमध्ये पहिल्या अध्यायात श्लोक २ ते ११ मध्ये प्रमुख वीरांचे वर्णन केले आहे. दोन्ही सैन्यांकडे रथी महारथी होते. रथी म्हणजे रथात बसून युद्ध करणारा. महारथी म्हणजे एकाच वेळी दहा हजार धनुर्धरांशी जो युद्ध करतो तो. महारथी शस्त्र आणि शास्त्र (युद्धाचे) या दोन्हींमध्ये प्रवीण असतो असे पुढील श्लोकात सांगितले आहे -

**एको दशसहस्राणि योधयेद्यस्तु वीर्यवान् ।**
**शस्त्रशास्त्रप्रवीणश्च महारथ इति स्मृतः ॥**

दोन्ही सैन्यांमधील फक्त गीतेमध्ये उल्लेखिलेले वीर अनुक्रमे पुढीलप्रमाणे आहेत.

**पांडवांकडील वीर -**

द्रुपदपुत्र धृष्टद्युम्न

युयुधान (सात्यकी) अर्जुनाचा पट्टशिष्य व श्रीकृष्णाचा आवडता यादववीर.

विराट - अभिमन्यूचा सासरा व उत्तरेचे वडील

द्रुपद - द्रौपदीचे वडील व पांडवांचा सासरा.

धृष्टकेतु - शिशुपालाचा मुलगा व चेदि देशाचा राजा.

चेकितान - एक यादव

काशिराज - काशी देशाचा राजा

पुरुजित कुंतिभोज - धर्म, भीम व अर्जुन यांचा मामा.

शैब्य - शिबि देशाचा राजा.

युधामन्यु - पांचाल देशवासी.

विक्रान्त - एक वीर.

उत्तमौजा - पांचाल देशवासी.

सौभद्र - सुभद्रेचा पुत्र अभिमन्यु.

द्रौपदेय - द्रौपदीचे पाच पांडवांपासून झालेले पाच पुत्र. वरील सर्व वीरांना महारथी म्हटले आहे.

**कौरवांकडील वीर**

द्रोणाचार्य - कौरव व पांडवांचे गुरू.

भीष्म - कौरव व पांडवाचे पितामह.

कर्ण - दुर्योधनाचा प्रिय मित्र.

कृप - द्रोणाचार्यांच्या पत्नीचा (कृपीचा) भाऊ.
अश्वत्थामा - द्रोणाचार्यांचा पुत्र.
विकर्ण - दुर्योधनाचा भाऊ.
सौमदत्ति - सोमदत्ताचा पुत्र भूरिश्रवा.

**प्रश्न २४ युद्ध सुरू होण्याच्या अगोदर कोणी कोणते शंख वाजवले ?**
**उत्तर** - दुर्योधनाला आनंद व्हावा आणि त्याला उत्साह प्राप्त व्हावा यासाठी प्रथम भीष्माचार्यांनी शंख वाजवला व त्याचबरोबर इतर शंख, ढोल, शिंगे इत्यादी रणवाद्यांचा घनघोर आवाज झाला. भीष्माचार्यांच्या नंतर इतरांनी आपापले पुढील शंख वाजवले.
श्रीकृष्ण - पांचजन्य (पंचजन नावाच्या राक्षसाच्या अस्थीपासून निर्माण केलेला शंख)
अर्जुन - देवदत्त (अग्नीने प्रसन्न होऊन अर्जुनाला दिलेला शंख).
भीम - पौंड्र (पौंड्र नावाचा मोठा शंख).
युधिष्ठिर - अनन्तविजय.
नकुल - सुघोष.
सहदेव - पुष्पक.

यानंतर काशिराज, शिखंडी, धृष्टद्युम्न, विराट, सात्यकी, द्रुपद, सौभद्र इत्यादींनी आपापले शंख वाजवले.

**प्रश्न २५ दोन्ही सैन्ये एकमेकांसमोर उभी राहिली असता पुढे काय झाले ?**
**उत्तर** - दोन्ही सैन्यांनी युद्धाचा पवित्रा घेतलेला पाहून अर्जुनाने श्रीकृष्णाला आपला रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी घेऊन जाण्यास सांगितले. अर्जुनाला आपल्याला कोणाशी लढायचे आहे याचा अंदाज घ्यायचा होता व दुष्ट दुर्योधनाचे हित साधण्याकरता कोण कोण उत्सुक आहेत हे अवलोकन करायचे होते. अर्जुनाच्या विनंतीप्रमाणे श्रीकृष्णाने रथ उभय सैन्यांच्या मधोमध नेऊन उभा केला व युद्धासाठी जमलेल्या कौरवांना पहा असे त्याने अर्जुनाला सांगितले.

**प्रश्न २६ श्रीकृष्णाने अर्जुनाचा रथ दोन्ही सैन्यांच्या मध्यभागी उभा केल्यावर अर्जुनाला काय दिसले ?**
**उत्तर** - अर्जुनाला आपल्यासमोर आपलेच आजे (भीष्म), वडीलपुरुष, मामा, आचार्य(द्रोणाचार्य), आचार्यपुत्र (अश्वत्थामा), पुत्र, नातू, मेव्हणे, मित्र आणि अनेक सगेसोयरे युद्धासाठी आलेले दिसले.

**प्रश्न २७ दोन्ही सैन्यांतील आपापले नातेवाईक लढाईकरता आलेले पाहून अर्जुनाची काय अवस्था झाली ?**
**उत्तर** - युद्धाला उत्सुक असलेले नातेवाईक पाहून अर्जुनाला वाटले की, त्याची गात्रेच



गळून पडत आहेत. त्याचे तोंड कोरडे पडू लागले आणि शरीराला कंप सुटला. त्याच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. त्याचे प्रसिद्ध गांडीव धनुष्यसुद्धा गळून पडत आहे असे त्याला वाटले. सगळीकडून गात्रपीडा सुरू झाली आणि मन भ्रमण करू लागले. शरीराच्या या दुरवस्थेमुळे त्याला नीट उभे राहणेसुद्धा अशक्य झाले. त्याला विपरीत (अमंगल) लक्षणे दिसू लागली. ज्यांच्याकरता राज्य मिळवायचे तेच नातेवाईक येथे लढाईकरता आलेले पाहून त्याला अतीव दुःख झाले. तो म्हणाला यांना मारून प्रत्यक्ष त्रैलोक्याचे राज्य मिळणार असले तरी ते मला नको, मग यःकश्चित् पृथ्वीच्या राज्यासाठी मी यांना मारण्याची का बरे इच्छा धरावी ? या आततायी कौरवांना मारून काय मोठा आनंद मिळणार आहे ? (घरे जाळणारा, विषप्रयोग करणारा, हातात शस्त्र घेऊन मारायला आलेला, संपत्ती लुटणारा किंवा दुसऱ्याची जमीन अथवा स्त्री लुबाडणारा असे सहा आततायी होत) (वसिष्ठ स्मृति ३.१६) वास्तविक पहाता वरील व्याख्येनुसार कौरव आततायी होते व त्यांना मारायला काहीच हरकत नव्हती. आततायी माणसांना मारण्यात पाप नाही असे मनुस्मृतीत (८.३५० व ३५१) म्हटले आहे. कौरव दुष्ट आणि पापी असल्यामुळे त्यांची अधोगती ठरलेलीच आहे. अशा या पापी माणसांना मारून त्यांना मारल्याचे पातक मात्र घ्यावे लागेल.

स्वतःच्या बांधवांना मारून आम्ही पांडव सुखी कसे होऊ ? हे श्रीकृष्णा, लोभाने ग्रासलेल्या कौरवांना कुलक्षयाने होणारा भयंकर परिणाम दिसत नाही. त्याप्रमाणे मित्रद्रोहही समजत नाही. (मित्रदोह म्हणजे मित्रमंडळींचा द्वेष केल्याने होणारे पातक). परंतु आम्हाला हे सर्व समजत असल्यामुळे आम्ही युद्धासारख्या घोर कर्मापासून निवृत्त होणे हेच योग्य आहे.

**प्रश्न २८ कुलक्षयाचे दुष्परिणाम अर्जुनाने कसे वर्णिले आहेत ?**
**उत्तर** - कुलक्षय झाला असता, आपापल्या कुलातील कुलधर्म चालविणारी माणसे नष्ट होतात आणि त्यामुळे परंपरेने चालत आलेले चांगले आचार नाहीसे होतात व त्याबरोबर धर्मही लुप्त होतो. धर्म लुप्त झाल्यावर साहजिकच अधर्माचा उदय होतो आणि तो उरलेल्या सर्व कुलांमध्ये पसरतो व अशाप्रकारे अधर्माचे साम्राज्य पसरते आणि भ्रष्टाचार सुरू होतो. भ्रष्टाचारामुळे कुलस्त्रिया(कुलीन स्त्रिया) बिघडतात आणि घरातील स्त्रियाच बिघडल्या की वर्णसंकराला वाट मोकळी मिळते. घरातील स्त्री पतित झाली की सगळे घरच पतित होते. वर्णसंकरामुळे कुलक्षय करणाऱ्यांचे त्याचप्रमाणे कुलातील सर्वांचे अतोनात नुकसान होते. आणि त्यामुळे उभयतांना वाईट गती प्राप्त होते व त्यांना नरकवास भोगावा लागतो. कुलक्षयामुळे श्राद्धादिक प्रथा बंद पडतात आणि त्यामुळे पितरांनाही त्रास होतो. कुलधर्माबरोबर जातिधर्मही नाहीसे होतात व अशाप्रकारे सगळीकडे अनाचार फैलावतो. ज्यांचे कुलधर्म नाहीसे झाले आहेत अशा सर्वांना नक्कीच नरकात रहावे

लागते असे आम्ही ऐकले आहे असे भ्रान्त अवस्थेतील अर्जुन म्हणाला.

**प्रश्न २९ कुलक्षयाच्या दुष्परिणामांचे वर्णन केल्यावर अर्जुनाने काय केले ?**

**उत्तर** – अर्जुनाला एकाएकी विरक्ती प्राप्त झाली. तो म्हणाला अरेरे ! राज्याच्या लोभाने आम्ही किती मोठे पातक करावयास तयार झालो आहोत ! राज्यलाभामुळे मिळणाऱ्या सुखासाठी आम्ही स्वजनांनाच मारायला उद्युक्त झालो आहोत. असे महापातक करण्यापेक्षा मी शस्त्रच धारण करणार नाही व अशा परिस्थितीत मला सशस्त्र कौरवांनी खुशाल ठार मारले तरी ते कल्याणकारकच होईल असे मला वाटते. असे म्हणून दोन्ही सैन्ये पहायला आलेल्या अर्जुनाने आपले धनुष्य बाणासहित खाली टाकले. युद्धभूमीवर असलेल्या आपल्या रथात उभे राहून सैन्ये पहात असता शोकाने ग्रासलेला अर्जुन रथामधील आसनावर खाली बसला.

येथे गीतेचा 'अर्जुनविषादयोग' नावाचा पहिला अध्याय संपला. गीतेतील प्रत्येक अध्यायाच्या शेवटी 'इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु' असा असलेला उल्लेख महाभारतात नाही. गीतेला धर्मग्रंथाचे स्थान प्राप्त झाल्यावर त्याची रचना झाली असावी असे वाटते.

**प्रश्न ३० गीतेच्या पहिल्या अध्यायाचे समालोचन कसे करता येईल ?**

**उत्तर** – गीतेचा पहिला अध्याय म्हणजे गीतेतील पुढील अध्यायांमध्ये आलेल्या तत्त्वज्ञानाचा आधार आहे. पहिला अध्याय म्हणजे एक अधिष्ठान आहे. अर्जुनाच्या मनात आलेल्या शंका पहिल्या अध्यायात आहेत आणि त्यांचे निराकरण पुढील अध्यायांत आहे. तत्त्वज्ञान काही एकदम सांगायला सुरवात करण्याची पद्धत नाही. काहीतरी निमित्त, प्रसंग इत्यादि पाहिजेच. अगोदर काही पार्श्वभूमी पाहिजे. पहिल्या अध्यायाने हे काम केले आहे.

गीताग्रंथ ब्रह्मसूत्रांवरील शांकरभाष्याप्रमाणे पूर्वपक्ष आणि उत्तरपक्ष या पद्धतीने लिहिलेला नाही. गीताग्रंथ वर्णनात्मक आणि संवादात्मक आहे. अर्जुन हा काही सामान्य मनुष्य नव्हता. तो चांगला जाणकार, शूर आणि विवेकी होता. परंतु त्याच्याही मनात चलबिचल झाली आणि युद्ध करू नये असे वाटले. हा विचार त्याच्या परंपराप्राप्त कर्तव्याच्या विरुद्ध होता. तो क्षत्रिय होता. धर्मयुद्ध करणे हे त्याचे कर्तव्य होते. परंतु मोठ्या माणसांच्या मनात सुद्धा कधी कधी कार्य आणि अकार्याविषयी संदेह निर्माण होतो. तसेच अर्जुनाचे झाले. असेही म्हणता येईल की अर्जुनाचे निमित्त करून भगवान् श्रीकृष्णाने जगदुद्धारासाठी गीता सांगितली. गीतेमध्ये केवळ अर्जुनाच्या शंकांचे निराकरण नाही तर मनुष्याने जीवनात कसे वागावे यासंबंधी उत्तम मार्गदर्शन आहे. जीवनाच्या कोणत्याही अवस्थेत उपयोगी पडणारा गीताग्रंथ आहे. गीतेतील विषयांची मांडणी इतकी



सुबोध आणि मनोहर आहे की विचारी आणि निर्मळ मनुष्य गीतावाचनात तल्लीन होऊन जातो. अशा या गीतेचा पहिला अध्याय म्हणजे अनुपम विचारशिल्पाचा पाया आहे. ज्ञानेश्वरांच्या शब्दांत सांगायचे तर पहिला अध्याय म्हणजे गीताशास्त्राच्या प्रवृत्तीची प्रस्तावना आहे. (ज्ञा. १८.१४३५)

❁❁❁

# ७. सांख्ययोग (श्लोकसंख्या ७२)

## अध्याय दुसरा

**प्रश्न ३१ अर्जुन रथामध्ये स्वस्थ बसलेला पाहून श्रीकृष्ण त्यास काय म्हणाला?**

**उत्तर** – करुणेने व्याकुळ झालेल्या, ज्याचे डोळे अश्रूंनी पूर्ण भरले आहेत आणि जो अतीव खिन्न झाला आहे अशा अर्जुनाला श्रीकृष्ण म्हणाला - हे अर्जुना, या लढाईच्या प्रसंगी तुझ्या मनात मोह कसा उत्पन्न झाला ? सज्जनाला न शोभणारे, स्वर्गप्राप्ती हिरावून घेणारे आणि तुझी अपकीर्ती करणारे वेड तुझ्या डोक्यात कोठून शिरले ? हे अर्जुना, तू विचारांच्या भित्रेपणाला थारा देऊ नकोस. तुझ्यासारख्या वीराला हृदयाची दुर्बलता शोभा देत नाही. तू शत्रूंना जर्जर करून सोडणारा महाप्रतापी वीर आहेस. तू तुझा दुबळेपणा टाकून देऊन ऊठ आणि युद्धाला सिद्ध हो.

**प्रश्न ३२ अर्जुनाने श्रीकृष्णास काय उत्तर दिले ?**

**उत्तर** – हे मधुसूदना, कुलवृद्ध पितामह भीष्मांवर मी कसे बाण टाकू ? ज्यांनी मला धनुर्विद्या शिकवली (व ज्यांचा मी प्रिय शिष्य आहे) त्या गुरु द्रोणाचार्यांवरसुद्धा मी बाण कसे सोडू ? हे दोघेही मला नितांत वंदनीय आहेत. या गुरुजनांची हत्या करण्यापेक्षा भिक्षान्न खाऊन जगणे श्रेयस्कर होईल. हे गुरुजन नाइलाजाने अर्थाचे दास झालेले दिसतात. तरीही त्यांना मारणे योग्य नाही. त्यांना मारून जरी मला इहलोकीचे ऐश्वर्य मिळाले तरी ते त्यांच्या रक्ताने माखलेले असेल. म्हणून मला समजत नाही की आम्ही त्यांना युद्धात मारून जिंकावे की आम्ही त्यांच्याकडून जिंकले जावे. खरे म्हणजे अशा गुरुजनांना मारून आम्ही जगावे असे नाही. परंतु हेच गुरुजन आणि कौरव युद्धाला समोर उभे राहिले आहेत.

हे कृष्णा, मोहाने आणि अज्ञानाने माझा नेहमीचा क्षात्र स्वभाव लोप पावला आहे. काय करावे आणि काय करू नये याविषयी निर्णय घेण्यास माझी बुद्धी असमर्थ झाली आहे. त्यामुळे मी काय केल्याने नक्की श्रेयस्कर होईल हे मला ठामपणे सांग. मी तुला शिष्य म्हणून शरण आलो आहे. मला योग्य प्रकारे बोध कर. या पृथ्वीचे निष्कंटक आणि समृद्ध राज्य जरी मला मिळाले किंवा प्रत्यक्ष देवांचे अधिपत्य मला मिळाले तरीसुद्धा माझ्या इंद्रियांना शोषून टाकणारा शोक नाहीसा होईल असे साधन मला दिसत नाही. अशा प्रकारे श्रीकृष्णाला उत्तर देऊन 'मी लढणार नाही' असे म्हणून अर्जुन स्तब्ध झाला. (गीता २.९)



**प्रश्न ३३ गीता खरी दुसऱ्या अध्यायापासून सुरू झाली या म्हणण्यात कितपत तथ्य आहे ?**

**उत्तर** – श्रीकृष्णाने अर्जुनास त्याचे मनोदौर्बल्य घालवण्याकरिता सविस्तर उपदेश केला आणि याच उपदेशापासून (श्लोक २.११) खरी गीता सुरू झाली असे म्हणतात. याचे सर्वसाधारण कारण असे दिले जाते की शंकराचार्यांचे गीतेवरील प्रास्ताविक भाष्य सोडल्यास त्यांनी दुसऱ्या अध्यायाच्या नवव्या श्लोकापर्यंत शब्दशः भाष्य केले नाही. शंकराचार्यांनी भाष्य केले नसले तरी गीतेच्या त्या भागाचा उपयोग नाही असे अजिबात नाही. गीतेचे तत्त्वज्ञान सुरू होण्यापूर्वी लागणारी प्रस्तावना पहिला संपूर्ण अध्याय व दुसऱ्या अध्यायातील नवव्या श्लोकापर्यंत आली आहे. म्हणून गीतेची सुरवात पहिल्या अध्यायातील पहिल्या श्लोकापासूनच झाली. मात्र तत्त्वज्ञानाचा भाग असलेली गीता दुसऱ्या अध्यायातील अकराव्या श्लोकापासून सुरू झाली असे म्हणता येईल.

**प्रश्न ३४ – दोन्ही सैन्यांमध्ये खिन्न होऊन स्तब्ध बसलेल्या अर्जुनास श्रीकृष्णाने काय उपदेश केला ?**

**उत्तर** – हे अर्जुना, तू वास्तविक पहाता ज्यांचा शोक करू नये त्यांचा शोक करीत आहेस आणि शिवाय वरती शहाणपणाच्या गोष्टी सांगत आहेस. जे कोणी तुझ्यापुढे युद्धासाठी आले आहेत त्यांच्याशी युद्ध करणे हेच योग्य आहे. त्यांच्याबद्दल शोक करणे बिलकुल उचित नाही. ज्ञानी माणसे ज्यांचे प्राण गेले त्यांच्याबद्दल शोक करीत नाहीत तसेच जे रणांगणात जिवंत राहिले व त्यामुळे त्यांची स्वर्गप्राप्तीची संधी हुकली त्यांच्याबद्दलही शोक करीत नाहीत. ज्ञानी माणसांना आत्मस्वरूपाची यथार्थ कल्पना असल्यामुळे ते जीवन आणि मृत्यू यांच्या पलीकडे गेलेले असतात. ते शोकाच्या आधीन कधीही होत नाहीत.

हे अर्जुना, तू किंवा मी पूर्वी नव्हतो किंवा तुझ्यापुढे युद्धार्थ उभे असलेले राजे पूर्वी कधी नव्हते असे नाही आणि यापुढेही आपण नसू असेही अजिबात नाही. (या देहाच्या प्राप्तीपूर्वीही आपण दुसऱ्या स्वरूपात होतो आणि देहपातानंतर आपण परत नसणार असे नाही. जन्म मरणाचे चक्र अखंड चालू आहे. जन्म आणि मृत्यू ही साखळी आहे. असे असल्यामुळे या साखळीच्या मधल्याच एखाद्या दुव्याचे दुःख करणे योग्य नव्हे.

ज्याने देह धारण केला त्याला देही म्हणतात. देही म्हणजे जीवात्मा. ज्याप्रमाणे देहाला बाल्य, तारुण्य आणि वार्धक्य प्राप्त होते त्याचप्रमाणे देहान्तरप्राप्ती (म्हणजे मृत्यूनंतर दुसऱ्या देहाची प्राप्ती) होते. आणि याबाबतीत विवेकी मनुष्य बिलकुल विकारी होत नाही. तो कधीही याविषयी मोह पावत नाही. (बालपण,तरुणपण आणि म्हातारपण या शरीराच्या तीन भिन्न स्वरूपाच्या अवस्था आहेत. परंतु एक अवस्था संपून दुसऱ्या अवस्थेत पदार्पण झाले तरी अंतस्थ आत्म्यात बदल होत नाही अगर त्याचा नाशही

होत नाही. तीनही अवस्थांमध्ये आत्मा अविकारी असतो. त्याचप्रमाणे मृत्यूनंतर येणाऱ्या देहान्तरप्राप्तीच्या वेळीही तो निर्विकारच असतो. त्याच्यात कधीही बदल होत नाही. कोणत्याही अवस्थेमध्ये आत्मस्वरूपात बदल होत नाही.)

**प्रश्न ३५ मात्रास्पर्श म्हणजे काय ?**

**उत्तर** – मात्रा शब्दाचे सतरा अर्थ आहेत. येथे मात्रा म्हणजे श्रोत्र, चक्षु इत्यादि इंद्रिये व स्पर्श म्हणजे त्यांचे विषयांशी जवळ येणे. ज्यांच्या योगे बाह्य पदार्थ मोजले जातात किंवा कळतात ती इंद्रिये असा मात्रा शब्दाचा अर्थ शांकरभाष्यात केला आहे. मात्रास्पर्श म्हणजे इंद्रियांचा विषयांशी संयोग. इंद्रियजन्य संयोग व त्यापासून निर्माण होणारे शीतोष्णादि सुखदुःख नाश पावणारे आहे. इंद्रियांपासून मिळणारे सुख संपूर्णपणे अनित्य आहे, विनाशी आहे. ते येणारे आणि जाणारे आहे. परंतु हे नरश्रेष्ठा अर्जुना, सुख आणि दुःख समान मानणाऱ्या ज्ञानी पुरुषाला इंद्रियसुखांची बाधा होत नाही. इंद्रियांपासून मिळणाऱ्या सुख आणि दुःखाच्या बाबतीत ज्ञानी पुरुषाचे समत्व कायम रहाते व तो अमरत्व प्राप्त करून घेण्यास संपूर्णतया समर्थ असतो.

**प्रश्न ३६ आत्म्याचे अमरत्व कसे वर्णिले आहे ?**

**उत्तर** – जे खरोखरच असत् आहे म्हणजे जे अस्तित्वातच नाही ते कधीही आहेसे होत नाही, म्हणजे ते कधीच अस्तित्वात येत नाही. त्याचप्रमाणे जे सत् आहे म्हणजे ज्याला त्रिकालाबाधित खरे अस्तित्व आहे ते कधीही नाहीसे होत नाही. सत् आणि असत् शब्दांचा अर्थ तत्त्वज्ञानी माणसांनी असा लावला आहे. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर ज्याला काळाची, देशाची अगर पदार्थाची मर्यादा आहे ते सर्व असत् होय आणि जे अमर्याद आहे ते सत् होय. मर्यादा आली म्हणजे परिमितत्व आले. मोजकेपणा आला. परंतु आत्मा हा अपरिमित आहे, सत् आहे.

ज्याने हे सर्व जग व्यापले आहे ते मूळ आत्मतत्त्व अविनाशी आहे. आणि अशा या अविनाशी आणि अमर तत्त्वाचा कोणीही नाश करू शकत नाही. हे देह मात्र नाशिवंत आहेत. त्यांना अंत आहे. परंतु देहामध्ये असलेला आत्मा अक्षय्य आणि अविनाशी आहे. जो कोणी आत्म्याला मारणारा समजतो किंवा जो कोणी आत्मा मरतो असे मानतो त्या दोघांनाही आत्मा समजला नाही असे नक्की म्हणावयास हरकत नाही. कारण आत्मा कोणालाही मारत नाही किंवा कोणाकडून मारलाही जात नाही. आत्मा हा नित्य आहे.

आत्मा कधीही जन्म पावत नाही किंवा मरतही नाही. त्याला खरा जन्म असता तरच त्याला मृत्यू आला असता. म्हणून हा आत्मा होऊन गेला आहे आणि परत होणार नाही असे नाही. हा आत्मा अज (जन्म नसलेला, अजन्मा) व नित्य आहे. हा शाश्वत



आहे. म्हणजे चिरकाल टिकणारा आहे आणि पुरातन आहे. शरीर जरी मारले गेले तरी हा आत्मा मारला जात नाही. शरीर नाहीसे झाले तरी आत्मा नाहीसा होत नाही. ज्याने हा आत्मा अविनाशी, अज, नित्य आणि अव्यय (सदासर्वकाळ एकस्वरूप असणारा) आहे असे जाणले तो पुरुष दुसऱ्या कोणास मारणार तरी कसा आणि मारविणार तरी कसा ? त्याच्याकडून या दोन्ही क्रिया घडणे शक्य नाही.

**प्रश्न ३७ जीवात्मा जुनी झालेली शरीरे टाकून नवीन धारण करतो हे ठीक आहे. परंतु लहान मुले किंवा तरुण माणसे अकाली मृत्यू पावतात की ज्यांची शरीरे जुनी झालेली नसतात, त्यांच्या बाबतीत हे विधान कसे लागू पडेल ?**

**उत्तर** – या प्रश्नाचे उत्तर गीतेत दिलेले नाही. वासांसि जीर्णानि (२.२२) हा श्लोक वाचल्यावर वाचकास हा प्रश्न उपस्थित होतो. म्हणून लेखकाने हा प्रश्न येथे मुद्दाम हाताळण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणून येथे दिलेल्या उत्तराचा गीतेशी बरोबर किंवा चुकीचा संबंध जोडू नये. गीतेवरील भाष्यांमध्येही हा प्रश्न कोणी उपस्थित केलेला दिसत नाही.

प्रत्येक प्राणिमात्राला पुनर्जन्म आहे. जीवात्मा जन्मभरच्या संस्कारांचे व इच्छांचे संचित बरोबर घेऊन पहिला देह सोडतो. असे करताना तो मन, बुद्धी, वासना इत्यादि बरोबर घेऊन बाहेर पडतो व लिंग देह धारण करतो. दुसरा नवीन देह धारण करीपर्यंत पुष्कळ काळ जातो. जीवात्म्याला एकूण पुढील अवस्थांमधून जावे लागते असे म्हणतात. पहिली अवस्था म्हणजे उत्क्रान्ती – म्हणजे पहिल्या देहातून बाहेर पडणे. तदनंतर परलोकगमन म्हणजे परलोकात जाणे व तेथे आपल्या पापपुण्यानुसार सुखदुःखाचा अनुभव घेणे व रहाणे. त्याच्यानंतर आपल्या वासनांनुरूप पुढच्या जन्माच्या वाटेला लागणे आणि गर्भाशयात प्रवेश करणे. परंतु या सर्व प्रक्रियेमध्ये काही कारणाने जीवात्म्याचा प्रवेश योग्य ठिकाणी आणि योग्य देहात झाला नाही तर तो जीवात्मा त्याच्या लक्षात चूक येताच देह सोडतो. मग तो उपजत मृत्यू असेल, बालमृत्यू असेल किंवा तारुण्यातील मृत्यू असेल. पण अशा जीवात्म्याने अकाली देह सोडण्याचे कारण इतरांना समजत नाही. कोणताही जीवात्मा उपजत मृत्यू यावा किंवा लहान वयात मृत्यू यावा म्हणून देह धारण करीत नाही. जन्म धारण करीत असताना झालेली चूक एवढेच अल्पवयीन मृत्यूचे कारण देता येईल.

काही सत्पुरुष विशिष्ट कार्यासाठी जन्म घेतात आणि ते कार्य झाले की देह सोडतात. त्यांचा देह तेव्हा जुना झालेला नसतो. शरीररूपी वस्त्र नवीन असूनसुद्धा त्याचा ते त्याग करतात. उदाहरणार्थ – निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव आणि मुक्ताबाई यांनी अनुक्रमे वयाच्या २५,२२,१९ आणि १७ व्या वर्षी देह सोडले. शंकराचार्यांनी वयाच्या ३२ व्या वर्षी देह सोडला तर अलीकडच्या काळात विवेकानंदांनी सुद्धा अल्पवयातच देहत्याग

केला. अशा सत्पुरुषांचे देहत्यागाच्या वेळचे वय जरी लहान असले तरी त्यांनी केलेले कार्य विचारात घेतल्यावर असे दिसून येते की देहत्यागाच्या वेळच्या प्रत्यक्ष वर्षांतील वयापेक्षा कार्यरूपी वय कित्येक वर्षांनी अधिक असते. अगदी ३२ वर्षांच्या काळांत त्यांनी ६४ किंवा १०० वर्षांचे किंवा त्याहून अधिक कार्य केलेले असते आणि अशा अर्थाने जीर्ण झालेल्या शरीराचा ते त्याग करतात. अशावेळी प्रारब्धानुसार एखाद्या सत्पुरुषावर रोगवश होऊनसुद्धा देहत्याग करण्याची पाळी येते. यानंतर परत गीतेतील मुख्य विषयाकडे वळणे योग्य होईल.

**प्रश्न ३८ आत्म्याचे अमरत्व पटवून देण्याचा श्रीकृष्णाने कसा प्रयत्न केला आहे ?**

**उत्तर** – या आत्म्याला कोणतेही शस्त्र तोडू शकत नाही. कोणत्याही शस्त्राने आत्म्याचे विभाजन होत नाही. साक्षात् अग्नीसुद्धा आत्म्याला जाळू शकत नाही. पाण्याचेही आत्म्यापुढे काही चालत नाही. पाणी आत्म्याला भिजवू शकत नाही अथवा कुजवू शकत नाही. एवढेच काय वारा याला शोषू शकत नाही अगर सुकवूही शकत नाही. असा हा आत्मा अच्छेद्य व अदाह्य आहे. त्याचप्रमाणे अक्लेद्य आणि अशोष्य आहे. हा आत्मा नित्य आहे. हा कधीही नाहीसा होणारा नाही. हा आत्मा सर्वव्यापक आहे. हा आत्मा कोठे नाही असे एकही ठिकाण नाही. प्रत्येक वस्तूमध्ये तो आहे. हा आत्मा स्थिर आहे, हा अचल आहे. हा सनातन आहे आणि चिरकालीन आहे. हा आत्मा अभिनव नाही म्हणजे नवीन उत्पन्न झालेला नाही. हा पूर्वीपासून आहेच.

हा आत्मा अव्यक्त आहे. इंद्रियांना हा अगोचर आहे. भौतिक वस्तूंप्रमाणे हा व्यक्त नाही, दृश्य नाही. प्रत्यक्ष दिसत नाही. हा अचिंत्य आहे म्हणजे मनाने जाणणे याला शक्य नाही. हा अविकारी आहे. दुधात बदल होऊन ज्याप्रमाणे दही बनते त्याप्रमाणे याच्यामध्ये कशामुळे आणि कोणत्याही प्रकारे बदल होत नाही. आत्मा हा अशा प्रकारे अमर आहे. म्हणून हे अर्जुना, तू भीष्मादिकांविषयी शोक करू नकोस.

समजा हा आत्मा प्रत्येक शरीर धारण करण्याच्या वेळी उत्पन्न होतो आणि शरीर सोडताना मृत्यू पावतो असे जरी घटकाभर गृहीत धरले तरीसुद्धा तू शोक करणे योग्य नाही. कारण जो जो प्राणिमात्र जन्मला त्याचा मृत्यू हा अगदी नक्की आहे. मृत्यू ही गोष्ट अटळ आहे. मृत्यू कोणीही टाळू शकत नाही. म्हणून तू शोक करू नकोस. ज्या गोष्टी होणारच आहेत, ज्या कधीही टाळता येणार नाहीत त्यांच्याबद्दल शोक करण्यात काय अर्थ आहे ?

प्राणिमात्रांनी देह धारण केल्यावर ती व्यक्त रूपाने दिसतात. परंतु तत्पूर्वीचा देह दिसत नसल्याने प्राणिमात्रे उत्पत्तीपूर्वी एक प्रकारे अव्यक्त असतात असे म्हटले जाते.



तसेच निधनानंतर परत ती अव्यक्त होतात, दिसत नाहीशी होतात. फक्त देह धारण केलेल्या मध्यंतरीच्या काळात ती स्पष्टरूपाने व्यक्त असतात आणि इंद्रियगोचर होतात. अव्यक्त, व्यक्त आणि परत अव्यक्त अशी प्राणिमात्रांची अवस्था असताना शोक करण्याचे काय कारण ? ती अव्यक्तांतून येतात आणि परत अव्यक्तांत जातात. तरी अर्जुना, या बाबतीत तू शोक करू नकोस.

**प्रश्न ३९ आत्म्याविषयी सर्वसाधारणपणे कसे बघितले अगर बोलले जाते ?**

**उत्तर** – आत्मा हा सहजासहजी जाणण्यासारखा नाही. कोणी एखादा याच्याकडे आश्चर्याप्रमाणे पाहतो म्हणजे आत्मा म्हणजे एक अद्भुत आश्चर्य म्हणून पहातो. दुसरा कोणी एखादा अपूर्व आश्चर्याप्रमाणे याच्याविषयी बोलतो, वर्णन करतो. तर तिसरा कोणी ते वर्णन एखादे आश्चर्य ऐकावे असे ऐकतो आणि अशा प्रकारे श्रवण करून आत्म्याविषयी काहीच जाणले जात नाही. आत्मा हा दुर्बोध आहे. त्याचे यथार्थ ज्ञान होणे फार कठीण आहे. परंतु आत्म्याविषयी बोलणारी माणसे पुष्कळ आहेत आणि ऐकणारीही आहेत. ज्याला आत्मस्वरूपाचे यथार्थ ज्ञान झाले आहे तो आत्म्याचे वर्णन करीत बसणार नाही. आत्म्याचा द्रष्टा, श्रोता आणि वक्ता ही तीन माणसे खरोखर दुर्लभ आहेत.

**प्रश्न ४० 'तू आता युद्धाला तयार हो' हे सांगण्यापूर्वी श्रीकृष्णाने अर्जुनाला काय उपदेश केला ?**

**उत्तर** – हे अर्जुना, प्रत्येकाच्या शरीरात आत्मा आहे आणि या आत्म्याला कोणीही मारू शकत नाही. तो संपूर्णपणे अवध्य आहे. अशी वस्तुस्थिती असताना तू कोणाविषयीही शोक करणे योग्य नाही. जरी शरीर मारले गेले तरी तो कधीही मारला जात नाही. शिवाय तुझा क्षत्रिय धर्म आहे. युद्ध करणे हे तुझे कर्तव्य आहे. युद्ध म्हटले म्हणजे स्वकीयांचा, परकीयांचा किंवा उभयतांचासुद्धा मृत्यू होणे अटळ आहे. तुझ्या जन्मजात धर्माकडे पाहून तू चलबिचल पावणे योग्य नाही. क्षत्रियांना धर्मयुद्धाहून श्रेयस्कर असे दुसरे काहीही नाही. शोक करणे हा क्षत्रियांचा धर्म नव्हे. तू न मागता, स्वर्गाचे उघडलेले दार अनायासे तुला प्राप्त झाले आहे. फार मोठ्या सुखी क्षत्रियांना असे युद्ध आणि असे भाग्य प्राप्त होते. असे सर्व काही असताना तू जर युद्ध केले नाहीस किंवा ते करण्याचे टाळलेस तर केवळ तू तुझा धर्म व कीर्ती गमावशील असे नाही तर तुला पापही लागेल. तू एक संभावित आणि कुलीन पुरुष आहेस. तू एक मान्यवर वीर आहेस. आणि असे असताना तू जर युद्ध केले नाहीस तर तुझी अक्षय्य अपकीर्ती सर्व लोक गात राहतील आणि संभावित माणसाला आपली अपकीर्ती मरणाहून फार भयंकर असते. कर्णादिकांच्या भीतीने तू रणातून पळून गेलास असे महारथी वीरांना वाटेल आणि ज्यांच्यामध्ये तुला मानमान्यता मिळाली आहे त्यांच्यामध्ये तू हलका होशील. ते तुझा

तिरस्कार करतील. तू त्यांच्या चेष्टेचा विषय होशील. जे बोलू नये ते तुझ्याबद्दल तुझे शत्रू पुष्कळ बोलतील. तुझ्या सामर्थ्याची निंदा होण्याहून अधिक दुःखदायी तुला काय बरे असेल ? जर यदाकदाचित् युद्धामध्ये तू शत्रूंकडून मारला गेलास तर तुला स्वर्ग नक्की मिळेल. तू जर शत्रूंना जिंकलेस तर तू या पृथ्वीचे साम्राज्य भोगशील. म्हणून हे अर्जुना, मी शत्रूंना मारीन किंवा मरेन असा दृढनिश्चय करून तू युद्धाला तयार हो. सुखाविषयी प्रेम आणि दुःखाविषयी तिरस्कार न करता म्हणजे सुख आणि दुःख सारखेच मानून त्याचप्रमाणे जय आणि पराजय, लाभ आणि हानी यांना सारखेच मानून तू दृढनिश्चयाने युद्धाला तयार हो. असे केले असताना तुला पाप लागणार नाही. (२.३८)

**प्रश्न ४१ 'आतापर्यंत मी तुला सांख्यपद्धतीप्रमाणे ज्ञान सांगितले. आता तुला योगपद्धतीचे ज्ञान सांगतो की ज्यायोगे तू कर्मबंध टाकून देऊ शकशील.' असे श्रीकृष्णाने ३९ व्या श्लोकात म्हटले आहे. येथील सांख्य आणि योग यांचा उल्लेख षड्दर्शनांपैकी आहे का ?**

**उत्तर –** येथील सांख्य आणि योग यांचा उल्लेख षड्दर्शनांपैकी नाही. सांख्य शब्दाने कपिल मुनींचे सांख्य येथे अपेक्षित नाही किंवा योग शब्दाने पतंजली ऋषींच्या योगसूत्रांचाही निर्देश होत नाही.

शंकराचार्यांनी सांख्य म्हणजे परमार्थ वस्तू जो आत्मा त्याच्या विवेकाविषयी ज्ञान असा अर्थ केला आहे. तर योग म्हणजे आत्मज्ञानप्राप्तीचा उपाय असे सांगितले आहे. मध्वाचार्यांनी सांख्य शब्दाचा अर्थ ज्ञान व योग शब्दाचा अर्थ उपाय असा केला आहे. सांख्य म्हणजे आत्मतत्त्व असे रामानुजाचार्य म्हणतात आणि मोक्षसाधनभूत कर्मानुष्ठानांतील बुद्धियोग म्हणजे येथील योग होय असे त्यांचे मत आहे. ज्ञानेश्वरांनी पण सांख्य म्हणजे ज्ञान व योग म्हणजे बुद्धियोग असा अर्थ केला आहे.

लोकमान्य टिळकांनी सांख्य म्हणजे संन्यासमार्ग आणि योग म्हणजे कर्ममार्ग हेच अर्थ या ठिकाणी घेतले पाहिजेत असे म्हटले आहे. लोकमान्य टिळकांनी कर्मयोगावर भर दिला आहे. लोकमान्यांनी गीतारहस्य लिहिले तेव्हा भारत पारतंत्र्यात होता आणि त्यावेळी सर्व भारतीयांनी निष्क्रिय न राहता कर्मप्रवृत्त होणे अत्यावश्यक होते. सर्वसाधारणतः जेथे जेथे योग शब्द आला आहे तेथे तेथे त्यांनी (कर्म) योग असा अर्थ केला आहे. किंबहुना त्यांनी आपल्या ग्रंथाचे नावच मुळी 'श्रीमद्‌भगवद्‌गीतारहस्य अथवा कर्मयोगशास्त्र' असे ठेवले आहे. त्यांच्या ग्रंथाच्या नावावरूनच त्यांचा उद्देश आणि त्यांना अभिप्रेत असलेला गीतेचा अर्थ स्पष्ट होतो.

गीतेच्या अभ्यासकांना माहित आहे की गीतेत फक्त कर्मयोगच सांगितलेला नाही. गीतेत कर्मयोगाव्यतिरिक्त ज्ञानयोग, भक्तियोग इत्यादि योग आहेत. गीतेच्या प्रत्येक अध्यायाच्या शेवटी असलेल्या उल्लेखामध्ये त्या त्या अध्यायातील योगाचे नाव दिलेले



आहे. पहिल्या अध्यायाला विषादयोग म्हटले आहे. तर दुसऱ्या अध्यायाला सांख्ययोग म्हटले आहे. अर्जुनाने त्याला झालेल्या विषादाचा 'योग' बनवला. त्याला खिन्नता प्राप्त झाली असता श्रीकृष्णाने त्याच्या खिन्नतेचे निराकरण केले. त्यामुळे अर्जुनाला विषादातून योग साधता आला. पण हे सर्वांना शक्य नाही. गीतेच्या पुष्पिकेमध्ये 'योगशास्त्रे' असा शब्द आहे. गीता हे एक योगशास्त्र आहे म्हणजे परमेश्वराशी साधकाचा योग म्हणजे ऐक्य जुळवून आणणारे शास्त्र आहे.

योग शब्दाचा अर्थ फार व्यापक आहे. युज् म्हणजे जोडणे या धातूपासून योग शब्द तयार झाला आहे. ज्या मार्गाचे आचरण केले असता आपली परमेश्वराशी जुळणी होते व आपले अंतिम ध्येय साध्य होते तो मार्ग म्हणजे योग होय. जो मार्ग परमेश्वराशी ऐक्य घडवून आणतो तो मार्ग म्हणजे योग होय. थोडक्यात जो मार्ग परमेश्वराकडे घेऊन जातो व त्याच्याशी एकरूपता घडवून आणतो त्याला योग म्हणता येईल. मग तो कोणताही योग म्हणजे मार्ग असू शकेल.

**प्रश्न ४२ परमेश्वरप्राप्तीच्या योगमार्गाचे वैशिष्ट्य काय ?**

**उत्तर –** परमेश्वराकडे जाणाऱ्या कोणत्याही मार्गाचा अवलंब केला असता सुरू केलेल्या कर्माचा नाश होत नाही व त्यात सहसा अडथळाही येत नाही. या मार्गाचे थोडे सुद्धा केलेले आचरण फार मोठ्या भयापासून संरक्षण करते व जन्ममरणादि संसाराचे भय नाहीसे करते. ईश्वराच्या आराधनेसाठी केलेले कर्म कधीही फुकट जात नाही. त्या कर्माचा कधीही नाश होत नाही. व्यावहारिक कर्मात फळ नक्की मिळेल अशी शाश्वती नसते. परंतु ईश्वरविषयक केलेल्या कर्माचे नियत फळ मिळत नाही असे कधीही होत नाही.

**प्रश्न ४३ बुद्धीविषयी श्रीकृष्णाने काय म्हटले आहे ?**

**उत्तर –** या मोक्षमार्गात कार्य आणि अकार्य यांचा निश्चय करणारी बुद्धी एकाग्र असावी लागते. कारण बुद्धीला बहुविध फाटे आहेत. जे मूढ लोक वेदांच्या रमणीय अर्थवादातच आसक्त होऊन रहातात व कर्मकांडात गुंतून राहतात त्यांची बुद्धी स्थिर होऊ शकत नाही. त्यांना असे वाटते की विविध प्रकारच्या यज्ञयागादींनी ऐश्वर्याची प्राप्ती होते व स्वर्ग मिळतो आणि स्वर्गप्राप्ती होणे हेच सर्वकाही आहे. अशाप्रकारे भोग आणि ऐश्वर्य यांच्या पाठीमागे लागलेल्या माणसांची व्यवसायात्मिका बुद्धी (कार्याकार्याचा निश्चय करणारी बुद्धी) कधीही स्थिर होऊ शकत नाही.

हे अर्जुना, वेद सर्वसाधारणपणे सत्त्व, रज आणि तम या त्रिगुणांनी प्रेरित केलेल्या कर्मांचे प्रतिपादन करणारे आहेत. त्रैगुण्य हाच त्यांचा विषय आहे. त्रैगुण्य म्हणजे संसार असाही अर्थ आहे. अशा या वेदांतील त्रिगुणात्मक कर्मांना ओलांडून तू पुढे चल. तू सुखदुःख, लाभहानी इत्यादी द्वंद्वांकडे दुर्लक्ष कर. तू सत्त्वगुणी हो. योगक्षेमाची चिंता

करू नकोस. (न मिळालेली वस्तु मिळविणे याचे नाव योग व मिळवलेल्या वस्तूचे रक्षण करणे म्हणजे क्षेम अशी योगक्षेम शब्दाची व्याख्या आहे.) मात्र तू आत्मस्वरूपाविषयी सावधान हो. पाणीच पाणी चहूकडे झाले असताना विहिरीचे जसे प्रयोजन रहात नाही तसे ज्ञान प्राप्त झालेल्या माणसाला वेदांचे प्रयोजन रहात नाही. त्याला वेदांतील कर्मकांडात्मक भागात रस वाटत नाही आणि त्याला त्या भागाची आवश्यकता रहात नाही.

**प्रश्न ४४ – हे अर्जुना, कर्मे करण्यापुरताच तुझा अधिकार आहे परंतु त्याच्या फळांवर तुझा अधिकार नाही – असे सांगणारा प्रसिद्ध श्लोक कोणता ?**

**उत्तर –** **कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥२.४७ ॥**

हाच तो प्रसिद्ध श्लोक होय. या श्लोकाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे -

१) हे अर्जुना, कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे.
२) कर्माची फळे कधीही तुझ्या अधिकारात नाहीत.
३) फळाच्या हेतूने तू कर्म करणारा होऊ नकोस.
४) (त्याचप्रमाणे) कर्मच न करण्याचा तू आग्रह धरू नकोस. (कर्म करीत रहा).

हा श्लोक प्रसिद्ध असण्याचे कारण असे आहे की, या श्लोकाच्या चार चरणांमध्ये कर्मयोगाचे रहस्य सुबद्ध रीतीने दिले आहे. लोकमान्य टिळकांनी या श्लोकाच्या चार चरणांना कर्मयोगाची चतुःसूत्री असेच म्हटले आहे.

हे अर्जुना, तुझा अधिकार फक्त कर्म करण्यापुरताच आहे. मग ते तुझे विहित कर्म असो की वेदोक्त कर्म असो. तू कधीही त्या कर्मांच्या फळांवर अधिकार सांगणारा होऊ नकोस. कर्मफलाच्या तृष्णेची तुला बाधा न होवो. कर्म करताना फळाची इच्छा धरून तू कर्म करू नकोस. (जर कर्मफळाकडे लक्ष ठेवले तर हाती घेतलेले कर्म एखादेवेळेस बरोबर होणार नाही.) परंतु कर्मफळाची इच्छा धरायची नाही म्हणून कर्मच करायचे नाही असे तू करू नकोस. तू कर्म सोडू नकोस पण फलाभिलाषा मात्र अवश्य सोड. (प्रत्येकाने आपापले कर्म केलेच पाहिजे. परंतु त्या कर्माच्या फळामध्ये आसक्ती ठेवता कामा नये. फळामध्ये आसक्ती ठेवली नाही म्हणजे कर्म बंधनकारक होत नाही. कर्माचा त्रास होत नाही. कर्म एकदा हातावेगळे केले की संपले अशी धारणा करून कर्म केले की कर्माचा संसर्ग होत नाही.)

असे कोणी म्हणेल की विद्यार्थ्यांनी अभ्यास करताना चांगल्या गुणांची अपेक्षा ठेवायची की नाही ? तर याचे उत्तर असे आहे की विद्यार्थ्यांनी आपले विहित कर्म म्हणजे अभ्यास करताना फळाची आशा ठेवायची नाही असे नाही. वरील श्लोकांच्या



अगोदर वेदांतील कर्मांचा उल्लेख आहे. ज्ञानी माणसाने ती कर्मे करताना फळाची इच्छा धरायची नाही असा त्याचा अर्थ आहे. या श्लोकाच्या अगोदरचे श्लोक लक्षात घेतले म्हणजे या श्लोकाचा अर्थ सुस्पष्ट होतो. विद्यार्थ्यांनी आपला अभ्यास केलाच पाहिजे आणि उत्तम गुणांची अपेक्षाही बाळगलीच पाहिजे. परंतु अभ्यास करून झाल्यावर व परीक्षा संपल्यावर मात्र कर्मफळाची फार आसक्ती किंवा काळजी करू नये. कारण अभ्यास करण्याचे कर्तव्यकर्म झालेले असते आणि पुढील गोष्टी विद्यार्थ्यांच्या हातात नसतात. विद्यार्थ्यांच्या पालकांनीही हे लक्षात घ्यायला पाहिजे.

या श्लोकात उल्लेखिल्याप्रमाणे जर आपल्याला सर्वच कर्मे करता आली तर किती बहार येईल. खरे पाहता अशी कर्मे करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. जर कर्म कर्तव्यबुद्धीने केले आणि ईश्वरार्पण केले तर कर्माचा संसर्गच होणार नाही. त्यांच्यापासून त्रास होणार नाही.

**प्रश्न ४५ कर्मयोगाला अनुसरून कर्म कसे करायचे ?**

**उत्तर –** हे धनंजया, तू आसक्ती सोडून कर्म कर. तू योगस्थ हो म्हणजे तू हाती घेतलेले कर्म सिद्धीस जावो अगर न जावो याबद्दल तू काळजी करू नकोस. काळजी न करता मनोवृत्ती सम ठेऊन व स्थिर ठेऊन कार्य कर असे श्रीकृष्ण म्हणतो. कारण योग म्हणजे तरी काय ? बुद्धीच्या समतोलपणाला योग म्हणतात. समत्वबुद्धीने केलेल्या कर्माहून फळाच्या इच्छेने केलेले कर्म फारच निकृष्ट आहे. तू समत्वबुद्धी संपादन कर आणि अशा बुद्धीत स्थिर हो. फळाची इच्छा ठेऊन कर्म करणारी कर्मठ माणसे खालच्या दर्जाची होत.

जो समत्वबुद्धी संपादन करतो व कर्म करतो तो योगयुक्त होत्साता पुण्य (सुकृत) आणि पाप (दुष्कृत) या दोहोंपासून अलिप्त रहातो. दूर रहातो. म्हणून हे अर्जुना, तू समत्वबुद्धियोगाचा आश्रय कर. कारण पाप आणि पुण्य या दोन्हीमध्ये न अडकता कर्म करण्याचे कौशल्य म्हणजे योग होय. **(योगः कर्मसु कौशलम् ।)**

कोणाला येथे शंका येईल की समत्वबुद्धीने कर्म करणारा पापापासून अलिप्त रहातो हे ठीक आहे पण पुण्यापासूनही दूर रहातो हे कसे ? याचे उत्तर असे आहे की पुण्यकर्म काय अगर पापकर्म काय दोन्ही कर्मेच आहेत. फलाभिलाषा धरून केलेले कर्म बंधनात टाकते. या न्यायाने फलाभिलाषा धरून केलेले पुण्यकर्म असले तरी त्याचे फळ भले पुण्यप्रद का होईना भोगावेच लागते. फळ भोगायचे म्हटले म्हणजे बंधकत्व आले. म्हणून समत्वबुद्धी ठेऊन कर्म करणारा मनुष्य पुण्य आणि पाप यांच्यापासून अलिप्त रहातो. तो निष्काम कर्म करतो म्हणून त्याला पुण्यही भोगावे लागत नाही. – पाप तर नाहीच नाही.

**प्रश्न ४६ समत्वबुद्धीने कर्म केल्याने काय होते ?**

**उत्तर –** ज्ञानी माणसे फक्त कर्मफळाचा त्याग करतात, कर्माचा नव्हे. समत्वबुद्धीने त्यांनी कर्म केल्याने कर्मापासून निर्माण होणाऱ्या चांगल्या अगर वाईट फळामध्ये त्यांना अडकायला होत नाही. ही माणसे जन्म आणि जन्मामुळे निर्माण होणाऱ्या बंधनापासून मुक्त होतात आणि दुःखरहित अशा स्थितीप्रत म्हणजे मोक्षाप्रत (अनामयपद) जातात. (समत्वबुद्धीने कर्म केल्याने मोक्षस्थिती प्राप्त होते असे येथे निःसंदिग्धपणे म्हटले आहे.)

हे अर्जुना, जेव्हा तुझी बुद्धी मोहरूपी मालिन्य (गढूळपणा) पार करून पुढे जाईल तेव्हा तुला श्रवण करण्यास योग्य व जे अगोदर श्रवण केले आहे या दोन्हींमध्ये रस वाटणार नाही. (एकदा बुद्धी शुद्ध होऊन वैराग्य प्राप्त झाले की अध्यात्मज्ञानाव्यतिरिक्त अमुक एक श्रवण करावे असे वाटणार नाही. श्रवणाविषयीची आसक्तीसुद्धा नाहीशी होईल तसेच जे श्रवण केले आहे त्याबद्दलही तसेच होईल.) श्रुतिवाक्यांना भुलून गांगरलेली तुझी बुद्धी जेव्हा विक्षेपरहित होईल व निश्चल होईल तेव्हा तुला समत्वबुद्धिरूपी योग प्राप्त होईल व आत्मज्ञानरूपी समाधीमध्ये तू स्थिर होशील.

येथपर्यंत स्थिरबुद्धीचा (समत्वबुद्धीचा) उल्लेख वारंवार आला. स्थिरबुद्धी ज्याला प्राप्त झाली आहे म्हणजे जो स्थितप्रज्ञ आहे तो कसा असतो याविषयी अर्जुनाला आकांक्षा उत्पन्न झाली.

**प्रश्न ४७ हे श्रीकृष्णा, स्थितप्रज्ञाचे लक्षण काय आहे ? स्थितप्रज्ञ काय बोलतो ? तो कसा राहतो आणि कसा वागतो ?**

**उत्तर –** या प्रश्नाचे उत्तर या अध्यायातील ५५ ते ७२ या १८ श्लोकांत आले आहे.

जेव्हा मनुष्य सर्वप्रकारच्या इच्छांचा त्याग करतो व स्वतःच्या ठिकाणी संतुष्ट होऊन रहातो तेव्हा त्याला स्थितप्रज्ञ असे म्हणतात. स्थितप्रज्ञ मनुष्याचे दुःखकारक प्रसंगातसुद्धा मन विषण्ण होत नाही. त्याचप्रमाणे सुखदायी प्रसंगामध्येसुद्धा तो आनंदी होत नाही. सुखाविषयी त्याला लालसा वाटत नाही. प्रीती, भय व क्रोध यांच्यापासून तो दूर असतो. शुभ किंवा अशुभ प्रसंग आले तरी त्याला आनंद किंवा दुःख होत नाही. त्याची बुद्धी अचल रहाते. कासव ज्याप्रमाणे आपले अवयव आवरून घेते त्याप्रमाणे स्थितप्रज्ञ मनुष्य विषयांपासून आपली इंद्रिये आवरून धरतो. त्याची इंद्रिये कधीही विषयांच्या आहारी जात नाहीत. संयमामुळे इंद्रियांनी जरी प्रत्यक्ष विषयांचा उपभोग घेतला नाही तरी त्या विषयांच्या उपभोगाविषयी आसक्ती सर्वसाधारणपणे मनातून तरी नाहीशी होत नाही असे जगात दिसून येते. परंतु जो स्थितप्रज्ञ आहे त्याच्या मनातसुद्धा विषयवासना रहात नाही.

हे अर्जुना, विद्वान माणसालासुद्धा इंद्रिये आवरणे कठीण जाते. (मग सामान्य



मनुष्याची काय कथा ? ) इंद्रिये ही इतकी बलवान् आहेत की विद्वान माणसाचे मन ती जबरदस्तीने खेचून विषयांकडे घेऊन जातात. (जगात कधी कधी असे दिसून येते की बुद्धिमान माणसे विषयांच्या बाबतीत घसरतात आणि त्यामुळे त्यांच्या कर्तृत्वाला कलंक लागतो.) अशी ही बलवान् इंद्रिये आवरून घेऊन व शांतचित्त होऊन माझ्या ठिकाणी मन लावावे. इंद्रिये ज्याच्या आधीन झाली त्याची प्रज्ञा प्रतिष्ठित झाली असे समजायला हरकत नाही. तो स्थितप्रज्ञच होय.

**प्रश्न ४८ विषयांचे चिंतन केल्याने काय होते ?**

**उत्तर –** काही माणसे शरीराने विषयांपासून दूर रहातात परंतु मनाने विषयांचे चिंतन करीत राहतात. एकदा मन विषयांमध्ये गुंतले की त्या विषयांबद्दल मनामध्ये प्रीती व आसक्ती निर्माण होते. आसक्तीमुळे कामवासना (विषयांवरची इच्छा) तीव्र होते. कामवासना न शमल्यामुळे क्रोध निर्माण होतो. मनुष्य एकदा रागावला की त्याचा विवेक सुटतो. विवेक सुटल्यावर स्मृतिभ्रंश होतो आणि अंतःकरणावर झालेले संस्कार लोप पावतात. एकदा स्मृतिभ्रंश म्हणजे आठवणच नाहीशी झाली की बुद्धीचा नाश होतो. बुद्धीचा नाश झाला की सर्वच संपले. तो मनुष्य पुरुषार्थ प्राप्त करण्यास असमर्थ होतो. विषयांचे चिंतन करीत राहिल्याने अशाप्रकारे अनर्थपरंपरा निर्माण होऊन शेवटी नाश होतो.

परंतु जो मनुष्य प्रीती आणि द्वेष या दोन्हींपासून मुक्त असतो, आपल्या वश असलेल्या इंद्रियांनी जो विषयांचा मोजकाच उपभोग घेतो व त्याच्या इच्छेनुरूप अंतःकरणही चालते त्याला प्रसाद म्हणजे स्वास्थ्य आणि प्रसन्नता प्राप्त होते. एकदा प्रसादरूप स्थिती प्राप्त झाली की आपोआप सर्व दुःखांचा नाश होतो आणि चित्त प्रसन्न असल्यामुळे त्याची बुद्धीसुद्धा सर्वबाजूंनी स्थिर होते.

पण या उलट जो संयमी नाही त्याची बुद्धी स्थिर होत नाही. जोपर्यंत बुद्धी स्थिर नाही तोपर्यंत चित्त एकाग्र होणे शक्य नाही. तसेच चित्त एकाग्र झाल्याशिवाय मनःशांती लाभत नाही आणि मनःशांती नाही म्हणजे अर्थातच त्याला सुख कोठचे लाभणार ? जलप्रवाहातील (अनियंत्रित) नौकेला ज्याप्रमाणे वारा भरकटवून टाकतो त्याप्रमाणे इंद्रियांच्या पाठी लागलेले मन बुद्धीला झपाटते व भलत्याच मार्गाला नेते. जो विषयांचे चिंतन करतो व विषयांतच रमतो त्याला सुख लाभत नाही. परंतु जो आपली इंद्रिये विषयांपासून आवरून धरतो त्याला सुख मिळते व त्याचीच बुद्धी स्थिर झाली असे म्हणता येईल.

**प्रश्न ४९ सर्व प्राणिमात्रांची जी रात्र, ती स्थितप्रज्ञाची रात्र नसते म्हणजे काय ?**

**उत्तर –** **'या निशा सर्वभूतानाम्' (२.६९)** या श्लोकात म्हटले आहे की सर्वसाधारण

माणसांची जी रात्र, त्या रात्री स्थितप्रज्ञ जागा असतो व जेव्हा प्राणिमात्र जागे असतात म्हणजे जो त्यांचा दिवस तेव्हा स्थितप्रज्ञाची रात्र असते. हे वर्णन अलंकारिक असल्यामुळे शब्दशः घ्यायचे नाही.

सामान्य माणसाला जेथे रस वाटतो तेथे संयमी मनुष्याला गोडी वाटत नाही. विषयात रमणाऱ्या सर्वसामान्य माणसाला जेव्हा सुखलाभ म्हणजे दिवस वाटतो तेव्हा स्थितप्रज्ञ झोपलेला असतो. म्हणजे त्याला व्यावहारिक सुखलाभात गोडी नसते. तो जेव्हा परमार्थात रंगलेला असतो तेव्हा त्याचा दिवस असतो. सामान्य माणसाला स्थितप्रज्ञाचा असा दिवस म्हणजे रात्र वाटते. थोडक्यात स्थितप्रज्ञ हा संयमी असल्यामुळे त्याचा सुखरूपी दिवस म्हणजे इतरांची रात्र व त्याची रात्र म्हणजे इतरांचा दिवस होय. स्थितप्रज्ञ म्हणजे संयमी व सर्वसामान्य मनुष्य म्हणजे असंयमी. संयमी आणि असंयमी यांची बैठकच निराळी असल्यामुळे त्यांचे दिवसरात्र निरनिराळे असणे स्वाभाविक आहे. स्थितप्रज्ञ ब्रह्मानंदाचा उपभोग घेतो व तोच त्याचा दिवस असतो. याउलट सामान्य मनुष्य व्यावहारिक सुखलाभात रमतो व तो त्याला दिवस असतो. तेव्हा स्थितप्रज्ञ निद्रिस्त असतो.

जगातसुद्धा असे दिसून येते की परमार्थाची चर्चा रंगात आली असता सामान्य माणसाला झोप येते व अनावरसुद्धा होते परंतु अशावेळी ज्ञानी माणसे अत्यंत जागरूक असतात. संयमी आणि सामान्य माणसांच्या गोडीचे विषय निरनिराळे असल्यामुळे त्यांची दिवसरात्र निरनिराळी असतात असे विरोधाभासात्मक अलंकारिक वर्णन करण्यात येते.

**प्रश्न ५० खरे सुख कोणाला मिळते ?**

**उत्तर** – स्थितप्रज्ञ माणसालाच खरे सुख मिळते. कारण त्याची इंद्रिये स्वाधीन असतात. त्याच्या मनात जरी भोग्य विषय शिरले तरी ज्याप्रमाणे समुद्रामध्ये सगळ्या बाजूने पाणी शिरलेले जसे गडप होते व समुद्राची मर्यादा जशी ढळत नाही त्याप्रमाणे त्याच्या मनामध्ये शिरलेले सर्व विषय गडप होतात – नाहीसे होतात. ते विषय त्याच्या मनाची चलबिचल करू शकत नाहीत. तो अगदी स्थिरचित्त रहातो. त्याच्या मनात काहीही विकार उत्पन्न होत नाहीत. अशा पुरुषालाच शांतीसुखाचा लाभ होतो. हे सुख कामी माणसाला कधीही मिळू शकत नाही. जो पुरुष सर्व प्रकारची आसक्ती सोडून या संसारात वावरतो व ज्याचे मी आणि माझे नाहीसे झाले आहे त्यालाच अखंड शांती मिळते. ममत्व गळून पडणे व अहंकार नाहीसा होणे या दोन गोष्टी अक्षय्य सुखाची प्राप्ती करून देतात. एकदा अक्षय्य सुखाची स्थिती प्राप्त झाली की कसलाही मोह निर्माण होत नाही. ही अक्षय्य सुखाची स्थिती म्हणजेच ब्राह्मी स्थिती होय. अशा या स्थितीत राहिल्यावर, हे अर्जुना, तू परमपदाला पोहोचशील.



**प्रश्न ५१ दुसऱ्या अध्यायाबद्दल सारांशरूपाने काय सांगता येईल ?**

**उत्तर** – ७२ श्लोक असलेल्या गीतेच्या दुसऱ्या अध्यायात जे तत्त्वज्ञान सांगितले आहे त्याचाच विस्तार गीतेमध्ये इतर अध्यायांत केला आहे. या अर्थाने दुसरा अध्याय म्हणजे गीतेतील तत्त्वज्ञानाचा सारांश होय. या अध्यायाचे नाव जरी 'सांख्ययोग' असले तरी या अध्यायामध्ये विविध विषय हाताळले आहेत.

श्रीकृष्णाने अर्जुनाला कर्तव्यकर्माचा उपदेश केला आहे. आत्म्याचे अमरत्व आणि देहाचे अनित्यत्व विस्तृतपणे या अध्यायात सांगितले आहे. जो जन्मला त्याला नक्की मृत्यू आहे व जो मरण पावला त्याला परत जन्म नक्की आहे हे शाश्वत सत्य याच अध्यायात निःसंदिग्धपणे सांगितले आहे. प्रत्येकाने स्वधर्माचे म्हणजे कर्तव्याचे आचरण केले पाहिजे.

परमेश्वरप्राप्तीसाठी सुरू केलेल्या कर्माचा कधीही नाश होत नाही व त्यात सहसा अडथळाही येत नाही. **'कर्मण्येवाधिकारस्ते'** हा ४७ वा श्लोक या अध्यायातील सर्वात महत्त्वाचा आहे. कर्मयोगाची चतुःसूत्री या श्लोकात आली आहे. जो समत्वबुद्धीने आपले कर्म करतो तो पाप आणि पुण्य या दोहोंपासून अलिप्त राहतो आणि अशाप्रकारे काम करण्याचे कौशल्य म्हणजेच योग होय.

जो वासनारहित होऊन स्वतःच्याच ठायी समाधानी होऊन रहातो त्याला स्थितप्रज्ञ म्हणतात. सुखदुःख, शुभ-अशुभ इ. द्वंद्वांच्या तो पलीकडे असतो. कासव ज्याप्रमाणे आपले अवयव आवरून घेते त्याप्रमाणे स्थितप्रज्ञ आपली इंद्रिये विषयांपासून आवरून धरतो. ज्या सर्वसाधारण सुखात सामान्य माणसे रमतात तेथे त्याला रस वाटत नाही. इंद्रिये ही अतिशय बलवान आहेत. ती शहाण्या माणसालासुद्धा भलतीकडे ओढून घेऊन जातात. म्हणून त्यांच्यावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करावा. जो मी आणि माझे सोडून निःस्पृह होऊन वागतो त्यालाच अखंड शांती मिळते.

# ८. कर्मयोग (श्लोकसंख्या ४३)

## अध्याय तिसरा

**प्रश्न ५२ कर्मापेक्षा समत्वबुद्धी श्रेष्ठ असताना श्रीकृष्णाने अर्जुनाला युद्धासारखे घोर कर्म करायला का प्रवृत्त केले ?**

**उत्तर** – कोणतीही व्यक्ती क्षणभरसुद्धा काहीतरी कर्म केल्याशिवाय राहू शकत नाही. याचे कारण असे की प्रत्येक व्यक्तीच्या प्रकृतीप्रमाणे कर्म केलेच जाते. प्रकृतिजन्य गुण व्यक्तीला स्वस्थ बसूनच देत नाहीत. असे असताना जो कोणी बळेच आपली कर्मेंद्रिये आवरून घेऊन जर मनाने विषयांचे अगर भलत्याच गोष्टींचे चिंतन करीत राहील तर त्याला ढोंगीच म्हटले पाहिजे. याउलट जो मनाने आपल्या ज्ञानेंद्रियांचे संयमन करून आसक्तीरहित कर्म करतो तोच श्रेष्ठ पुरुष होय. असे असताना कर्माचा आरंभच करायचा नाही असे जो कोणी म्हणेल किंवा कर्माचा जो संपूर्ण त्याग करील त्याला नैष्कर्म्य प्राप्त होणार नाही.

अर्जुन क्षत्रिय होता. त्याच्या क्षात्रस्वभावाने आज ना उद्या कधीतरी उचल खाल्ली असती आणि त्याने युद्ध केलेच असते. म्हणून या युद्धाच्या प्रवृत्तीमागील आसक्ती श्रीकृष्णाने आपल्या उपदेशाने काढून घेतली आणि तू तुझे नियत कर्म म्हणजे युद्ध अवश्य कर असा उपदेश करून युद्धासारख्या घोर कर्मास अर्जुनास प्रवृत्त केले.

**प्रश्न ५३ नियत कर्म म्हणजे काय ?**

**उत्तर – नियतं कुरु कर्म त्वम् (३.८)** – तू तुझे नियत कर्म अवश्य कर हा उपदेश सर्वांनाच फार मोलाचा आहे. प्रत्येकाने आपले नियत कर्म आजन्म करीत राहिले पाहिजे. हा गीतेचा फार मोठा संदेश आहे. जर आपापले कर्म केले नाही तर आपली जीवनयात्रासुद्धा चालणार नाही.

नियत म्हणजे नेमलेले किंवा नेमून दिलेले. नियत कर्म म्हणजे स्वधर्मांप्रमाणे नित्य करावे लागणारे कर्म. प्रत्येकाचे नियत कर्म निरनिराळे असते. अभ्यास करणे हे विद्यार्थ्याचे नियत कर्म तर अध्यापन करणे हे अध्यापकाचे नियत कर्म होय. नियत कर्म म्हणजे स्वीकृत कर्मसुद्धा होऊ शकेल. जे कर्म एकदा स्वीकारले आहे, जे आपले कर्तव्यकर्म आहे त्या नियतकर्मात कुचराई करून चालणार नाही.

श्री. ज. स. करंदीकर यांनी आपल्या गीतातत्त्वमंजरीमध्ये पुढीलप्रमाणे नियतकर्माचे पाच प्रकार दिले आहेत.



१) शरीरयात्रा चालण्यासाठी अपरिहार्य असे कर्म.
२) स्ववर्णाश्रमधर्मविहित नित्यनैमित्तिक कर्म.
३) स्वभावज कर्म.
४) यज्ञदानतपादि पावनकर्मे.
५) लोकसंग्रहार्थ प्रसंगप्राप्त करावे लागणारे कर्म.

नियत कर्मात जर वरील पाच प्रकारांचा समावेश केला तर नियतकर्माची व्याप्ती फारच व्यापक होते.

**प्रश्न ५४ नैष्कर्म्य म्हणजे काय ?**

**उत्तर** – कर्म करूनसुद्धा ते न केल्यासारखे होणे म्हणजे नैष्कर्म्य होय. नैष्कर्म्य म्हणजे कर्म न करणे नव्हे किंवा कर्माचा आरंभच न करणे किंवा सर्वकर्मपरित्याग करणे असेही नव्हे. नैष्कर्म्य म्हणजे कर्माचे बंधकत्व म्हणजे फलासक्ती सोडून कर्म करणे होय. एकदा कर्माच्या फळाची चटक सोडली म्हणजे कर्म कर्त्याला अडकवूच शकत नाही. ज्याप्रमाणे निर्विष केलेल्या विंचवाने कितीही वेळा नांगी मारली तरी त्याचा माणसावर परिणाम होत नाही, त्याप्रमाणे फलासक्तीरूपी विष काढून टाकल्यावर कर्माचा त्रास होत नाही व कर्माच्या फळरूपी कुंपणात अडकायला होत नाही. निष्काम कर्म केल्याने पापपुण्याचे बंधन कर्म करणाऱ्यास लागत नाही आणि कौशल्याने कर्मे करण्याची अशी स्थिती म्हणजे नैष्कर्म्य होय. नैष्कर्म्य शब्दाचा अर्थ मोक्ष असाही आहे. निष्काम कर्म केल्याने नैष्कर्म्य प्राप्त होते.

**प्रश्न ५५ यज्ञाबद्दल या अध्यायात काय सांगितले आहे ?**

**उत्तर** – यज्ञासाठी जे कर्म केले जाते ते कर्म बंधनकारक होत नाही. परंतु असे कर्मसुद्धा आसक्ती सोडून करायला पाहिजे असे गीतेत स्पष्ट म्हटले आहे. (३.९)

उपनिषदकाली यज्ञसंस्थेचे महत्त्व फारच कमी झाले. परंतु यज्ञसंस्था चालू राहिली आणि गीतेच्या काळीही अस्तित्वात होती. त्यामुळे गीतेला यज्ञसंस्थेला डावलता आले नाही. यज्ञ करावे अशी श्रुतींचीच आज्ञा असल्यामुळे ती टाळता येणे शक्य नव्हते. म्हणून गीतेने त्या आज्ञेत भर घालून यज्ञाकरता कराव्या लागणाऱ्या कर्माचे बंधकत्व काढून घेतले व ते कर्म फलाशा सोडून करावे असे सांगितले.

''यज्ञो वै विष्णुः'' अशी श्रुती आहे. यज्ञ म्हणजे विष्णू. परमेश्वराच्या अनुग्रहासाठी जे कर्म करावयाचे त्याला यज्ञार्थ कर्म म्हणता येते. म्हणून परमेश्वरप्राप्तीसाठी केलेल्या कर्माशिवाय इतर सर्व कर्मे बंधनकारक होतात.

या अध्यायात असे म्हटले आहे की ब्रह्मदेवाने पूर्वी यज्ञासह प्रजा उत्पन्न केल्या आणि या यज्ञाच्या योगाने तुम्ही समृद्ध व्हा असे तो म्हणाला. यज्ञ म्हणजे तुमची कामधेनूच

होवो. यज्ञ करून तुम्ही देवांना संतुष्ट करा आणि अशा रीतीने संतुष्ट झालेले देव तुम्हाला संतुष्ट करतील. अशाप्रकारे एकमेकांची संभावना करून कल्याण प्राप्त करून घ्या. यज्ञ करून शिल्लक राहिलेल्या भागाचा उपभोग घेणारे सर्व पातकांपासून मुक्त होतात. परंतु जे केवळ स्वतःसाठीच अन्न शिजवून भक्षण करतात ते एकप्रकारे पापाचेच सेवन करतात.

यज्ञतत्त्व फार प्राचीन आहे. माणसाच्या प्रथम निर्मितीएवढे ते पूर्वकालीन आहे. यज्ञासह प्रजा उत्पन्न झाल्या असे म्हणून गीतेने यज्ञसंस्था एका उच्च स्तरावर नेली आहे. हुषार ब्राह्मणांनी आपल्यासाठी यज्ञसंस्था निर्माण केली असे जे चार्वाक वगैरे लोकांचे म्हणणे आहे त्याचे गीतेने अशाप्रकारे खंडन केले आहे. यज्ञाचा शोध काही ब्राह्मणांनी आपल्या पोटासाठी लावला नाही.

यज् (१ उ. प.) या धातूपासून यज्ञ शब्द सिद्ध झाला आहे. या धातूचे अर्थ पूजा करणे, यज्ञ करणे, आहुती देणे असे आहेत. यज्ञामध्ये देवतांना उद्देशून अग्नीत आहुती दिल्या जातात, परंतु या प्रचलित यज्ञाच्या अर्थापेक्षा गीतेमधील यज्ञाचा अर्थ वरच्या दर्जाचा आहे. गीतेमध्ये द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ, योगयज्ञ, स्वाध्याययज्ञ यांचा चौथ्या अध्यायात (४.२८) उल्लेख आला आहे. जपयज्ञाचा उल्लेख दहाव्या अध्यायात आला आहे (१०.२५) ज्ञानयज्ञाचा उल्लेख चौथ्या अध्यायात (४.३३), नवव्या अध्यायात (९.१५) व अठराव्या अध्यायात (१८.७०) आला आहे. याशिवाय सतराव्या अध्यायात (श्लोक ११-१३) सात्त्विक, राजस आणि तामस असे यज्ञाचे तीन प्रकार सांगितले आहेत. अशाप्रकारे गीतेतील यज्ञाची संकल्पना पारंपारिक अर्थापेक्षा निराळी आहे आणि व्यापक आहे. कोणत्याही यज्ञाने आपले ईप्सित म्हणजे परमेश्वरप्राप्ती साध्य करून घेता येते. अशाप्रकारे यज्ञ म्हणजे केवळ कोण्या एका देवतेला अगर अनेक देवतांना उद्देशून अग्नीत आहुती देणे एवढाच संकुचित अर्थ गीतेला अभिप्रेत नाही.

**प्रश्न ५६ यज्ञरूपी चक्र कोणते ?**

**उत्तर –** अन्नापासून प्राणिमात्र उत्पन्न होतात. अशा या अन्नाची उत्पत्ती पर्जन्यापासून होते. पर्जन्य यज्ञयागादिकांच्या योगाने उत्पन्न होतो. यज्ञ कर्मापासून निर्माण होतो. कर्माच्या आचरणानेच यज्ञयाग सिद्ध होतात. कर्माचा उद्‌भव (सगुण) ब्रह्मापासून होतो आणि हे (सगुण) ब्रह्म, जे अक्षर आहे, जे परब्रह्म आहे त्याच्यापासून निर्माण झाले आणि हेच सर्वगत ब्रह्म यज्ञात अधिष्ठित असते. अक्षर (ब्रह्म), ब्रह्म, कर्म, यज्ञ, पर्जन्य, अन्न आणि प्राणिमात्र असे हे सात दुव्यांचे यज्ञचक्र आहे. एकावर एक आधारित ही यज्ञसाखळी अनादिकालापासून चालत आली आहे. अशी ही जगरहाटी जो पुढे चालवीत नाही त्याचे आयुष्य पापरूप असून त्याचे जिणे व्यर्थ होय.



**प्रश्न ५७ हे यज्ञचक्र कोणी चालवले नाही तर चालेल ?**

**उत्तर –** वेदोक्त आणि वर्णाश्रमविहित कर्म करणे म्हणजे यज्ञचक्र चालविणे होय. परंतु जो माणूस अंतरंगात रमला आहे, जो माणूस आत्मतृप्त आहे आणि जो आत्म्याचे ठायी संतुष्ट झाला आहे म्हणजे थोडक्यात जो आत्मज्ञानी आहे त्याला स्वतःचे म्हणून करायचे काही शिल्लक राहिलेले नसते. त्याला या जगात एखादी गोष्ट करून काही मिळवायचे नसते अगर न करून काही गमवायचे नसते. कोणत्याही प्राणिमात्रात त्याचा स्वार्थ गुंतून राहिलेला नसतो. अपवादात्मक म्हणून अशा कृतकृत्य माणसाने यज्ञचक्र चालवले नाही तरी चालेल. परंतु कोणीही कर्मापासून दूर जाणे योग्य नाही. नेहमी आसक्तीरहित कर्म करीत राहिले पाहिजे. आणि असे केल्यानेच परमपुरुषार्थ म्हणजे मोक्ष प्राप्त होतो. जनक वगैरे राजांनीही कर्मानेच सिद्धी मिळवली. जनक हा राजा असूनही ब्रह्मवेत्ता होता. लोकसंग्रहासाठी ज्ञानी माणसाने सुद्धा कर्म करणे उचितच होय.

**प्रश्न ५८ लोकसंग्रह म्हणजे काय ?**

**उत्तर –** लोकसंग्रह म्हणजे लोककल्याण किंवा जगाचे धारणपोषण. याशिवाय लोकसंग्रह म्हणजे विश्व असाही अर्थ आहे. लोकांनी भलत्याच मार्गाला जाऊ नये म्हणून ज्ञानी माणसाने कर्म करणे आवश्यक आहे. त्याने जर कर्म केले नाही तर इतर माणसे कर्म करणार नाहीत व लोककल्याण होणार नाही किंवा जगाच्या धारणपोषणाला अडथळा येईल. शंकराचार्यांनी आपल्या गीतेवरील भाष्यात (३.२०) "**लोकस्य उन्मार्गप्रवृत्तिनिवारणं लोकसंग्रहः।**" असे स्पष्टीकरण केले आहे. लोकांच्या उन्मार्ग प्रवृत्तीचे निवारण करणे म्हणजे लोकसंग्रह होय. सिद्धी मिळविलेल्या ज्ञानी जनकराजानेसुद्धा कर्माचा त्याग केला नाही. साक्षात् श्रीकृष्णही शेवटपर्यंत कर्म करीत राहिला. मोठी माणसे कर्म करीत राहिल्याने इतर सामान्य माणसेही कर्म करीत राहतात आणि त्यामुळे ती माणसे भलत्याच मार्गाला जात नाहीत. लोकांना सन्मार्गाला लावणे हे ज्ञानी माणसाचे एक प्रकारे कर्तव्यच आहे. याच कारणास्तव श्रीकृष्णाने अर्जुनाला कर्म करण्याचा उपदेश केला आहे आणि लोकसंग्रहाकडे लक्ष ठेवावयास सांगितले आहे.

**प्रश्न ५९ श्रीकृष्णाने म्हटले आहे की हे पार्था, या त्रैलोक्यात मला काहीच करायचे उरलेले नाही किंवा मला काही मिळवायचे नाही. तरीसुद्धा मी कर्मे करीत आहे. या विधानाच्या संदर्भात कर्मे करण्यापाठीमागचा श्रीकृष्णाचा उद्देश काय ?**

**उत्तर –** श्रेष्ठ माणूस जसे आचरण करतो तसेच इतर सामान्य माणसे आचरण करतात. श्रेष्ठ माणूस त्यांचा आदर्श असतो आणि त्याचे अनुकरण ते करीत राहतात. श्रेष्ठ माणूस जे जे काही प्रमाणभूत ठरवतो तेच स्वीकारण्यात त्यांना धन्यता वाटते. म्हणून श्रीकृष्णाने म्हटले आहे की मीच जर कर्मे केली नाहीत तर इतर लोकही माझेच अनुकरण करून

कर्मे करणार नाहीत आणि जगाची व्यवस्थाच कोलमडून पडेल. प्रजेमध्ये संकर होईल आणि अशानेच प्रजेचा घातही होईल. विद्वान माणसाने इतर माणसे कर्मे करतात तशीच कर्मे केली पाहिजेत परंतु आसक्ती सोडून. जी अज्ञ माणसे कर्मासक्त झाली आहेत त्यांचा बुद्धिभेद करू नये. त्यांना त्यांची कर्मे करण्यास प्रतिबंध करू नये. कालांतराने त्यांची आसक्ती नाहीशी होईल. परंतु विद्वान माणसाने मात्र योगयुक्त होऊन निष्काम कर्म करीत राहिलेच पाहिजे.

श्रीकृष्णाने स्वतः कर्म करीत राहून लोकांपुढे आदर्श ठेवला आहे. कर्मे करण्यापाठीमागचा त्याचा उद्देश हाच आहे.

**प्रश्न ६० कर्मे करण्यामागे प्रकृतीचा हातभार आहे का ?**

**उत्तर** – सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांनी युक्त अशी प्रकृतीच सगळ्या कर्मांच्या पाठीमागची प्रवृत्ती आहे. कर्मे करण्यात प्रकृतीचा फार मोठा हातभार आहे. प्रकृतीच्या गुणांनी जरी कर्मे केली जात असली तरी अहंकारामुळे अज्ञानी पुरुष स्वतःलाच कर्माचा कर्ता समजतो. परंतु जो ज्ञानी आहे तो प्रकृतीचे गुण आणि कर्म यांचा आपापसातील खेळ पाहू शकतो व तो कोणाचीच बाजू घेत नाही. तो केवळ अनासक्त कर्मे करीत राहतो.

श्रीकृष्णाने म्हटले आहे की जे माझ्या उपरोक्त मताप्रमाणे श्रद्धायुक्त अंतःकरणाने कर्मे करीत राहतात ते कर्मबंधनापासून मुक्त होतात. परंतु याउलट जे वागतात ते अधोगतीस जातात. इंद्रिये आणि त्यांचे विषय यांची एकमेकांविषयी प्रीती आणि द्वेष ठरलेले आहेत. इंद्रियांना काही विषय आवडतात तर काही आवडत नाहीत. म्हणून इंद्रिये आणि विषय यांच्या एकमेकांच्या प्रीती आणि द्वेषाच्या खेळात आपण पडू नये. राग आणि द्वेष हे मनुष्याच्या उन्नतीच्या मार्गावरील फार मोठे वाटमारे(शत्रू) आहेत. आपले जे विहित कर्तव्यकर्म आहे त्याचे आचरण करीत रहावे. दुसऱ्याचे कर्म जरी सोपे दिसले तरी ते स्वीकारू नये. आपले स्वीकृत कर्म करण्यातच कल्याण सामावलेले आहे.

**प्रश्न ६१ स्वतःची इच्छा नसतानासुद्धा मनुष्य बळजबरी केल्याप्रमाणे पाप करतो ते कोणाच्या प्रेरणेने करतो ?**

**उत्तर** – प्रकृतीच्या रजोगुणापासून उत्पन्न झालेला काम हा मोठा शत्रू आहे. हा क्रोधरूपीही आहे. हा शत्रू फार आधाशी आणि पापी आहे. त्याची विषयतृप्ती कधीही होत नाही. धुराने अग्नी किंवा धुळीने आरसा जसा झाकाळला जावा किंवा गर्भ जसा वारेने वेढलेला असतो त्याप्रमाणे याने सर्व काही गुरफटून टाकले आहे. या कामरूपी शत्रूची तृप्ती कधीही होत नाही. हा नित्य शत्रू आहे. ज्ञानी लोकांचे ज्ञान यानेच झाकून टाकले आहे. एवढा हा प्रभावी शत्रू आहे. इंद्रिये, मन आणि बुद्धी ही याची अधिष्ठाने आहेत. यांच्या



ठिकाणी हा रहातो व यांच्याच सहाय्याने ज्ञानाला गुंडाळून टाकतो व माणसाला सतत भुरळ पाडतो. शिवाय ज्ञानाचा तसेच विज्ञानाचा (विशिष्ट ज्ञानाचा, उच्च ज्ञानाचा) नाश करतो. म्हणून आपले कल्याण इच्छिणाऱ्या माणसाने प्रथम या पापी कामाचा नाश केला पाहिजे. अशा प्रकारे स्वतःची इच्छा नसतानासुद्धा कामाने प्रेरित केल्यामुळे मनुष्य पाप करतो.

इंद्रिये ही बाह्य जगतातील स्थूल पदार्थांच्या मानाने श्रेष्ठ आहेत. परंतु या इंद्रियांपेक्षाही मन श्रेष्ठ आहे. मनापेक्षा बुद्धी श्रेष्ठ आहे. या बुद्धिपेक्षाही जो श्रेष्ठ आत्मा आहे त्याचा आश्रय करून व स्वतःच स्वतःला सावरून, हे अर्जुना, तू कामरूपी शत्रूला मारून टाक असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

**प्रश्न ६२ कर्मयोग म्हणजे काय ?**

**उत्तर** – गीतेच्या तिसऱ्या अध्यायाचे नाव कर्मयोग आहे. परंतु कर्मयोग फक्त तिसऱ्या अध्यायात आला आहे असे नव्हे. तर तो गीतेत इतरत्रही आला आहे. दुसऱ्या, चौथ्या व पाचव्या अध्यायातही तो आला आहे. दुसऱ्या अध्यायातील **कर्मण्येवाधिकारस्ते (२.४७)** या श्लोकापासून कर्मयोगाची सुरवात झाली आहे असे म्हटले जाते. लोकमान्य टिळकांनी तर या श्लोकाला कर्मयोगाची चतुःसूत्री म्हटले आहे हे मागे आले आहे (प्रश्न ४४). परंतु या श्लोकात अभिप्रेत असलेले कर्म प्रामुख्याने श्रौत कर्म होय हे येथे अवश्य नमूद केले पाहिजे.

**''कर्म एव योगः कर्मयोगः''** अशी शंकराचार्यांनी कर्मयोगाची व्याख्या केली आहे. कर्म हाच योग म्हणजे कर्मयोग असा या व्याख्येचा अर्थ आहे. परंतु या कर्मयोगातील कर्म म्हणजे कोणते कर्म असा प्रश्न उपस्थित होतो.

कृ या अष्टमगणी उभयपदी धातूपासून कर्म शब्द सिद्ध झाला आहे. कृ या धातूचा उपयोग संस्कृत वाङ्मयात असंख्य अर्थांने केला गेला आहे. परंतु कृ या धातूचे प्रामुख्याने ३६ अर्थ आहेत. तरीपण कृ धातूचा 'करणे' हाच अर्थ प्रमुख आहे. म्हणून कृ या धातूपासून निघालेल्या कर्म या शब्दाचा अर्थ कृती असा आहे. कर्म या शब्दाचे काही इतर अर्थ - धार्मिक कार्य (नित्य, नैमित्तिक अगर काम्य), कर्तव्य, नैतिक कर्तव्य, हालचाल, निर्मिती, विशिष्ट कार्य इत्यादी आहेत. कर्म हा शब्द गीतेमध्ये एकाच अर्थाने योजलेला नाही. विविध ठिकाणी विविध अर्थाने तो योजला आहे. ते जर सर्व अर्थ लक्षात घ्यायचे म्हटले तर कर्मयोगातील कर्म या शब्दाचा अर्थच करणे दुरापास्त होऊन बसेल. खाणे, पिणे इत्यादि क्रियासुद्धा कर्म शब्दाच्या अर्थात अंतर्भूत होतील आणि प्रत्येक हालचाल म्हणजेच कर्म होऊन बसेल. एवढ्या प्रचंड प्रमाणात कर्म शब्दाचा व्यापक अर्थ करणे हास्यास्पद होईल. कारण कर्मयोगातील कर्म परमेश्वराकडे घेऊन

जाणारा एक मार्ग आहे, एक साधन आहे.

शंकराचार्यांनी कर्मयोगातील कर्म शब्दाचा अर्थ वर्णाश्रमविहित कर्म असा केला आहे(गीताभाष्य ३.३). ज्ञानेश्वरीतही (३.४४) विहित कर्म असाच अर्थ दिला आहे. वामनपंडितांनी गीतेतील ३.३ या श्लोकावर भाष्य करताना निष्काम बुद्धीने कर्म करावे असे म्हटले आहे. परंतु कर्म शब्दाचा अर्थ स्पष्ट केला नाही.

जे आपले नियत कर्म आहे म्हणजे थोडक्यात जे आपले स्वीकृत कर्म आणि कर्तव्य कर्म आहे ते अहंकाररहित वृत्तीने व फळाची आसक्ती सोडून परंतु ईश्वरार्पण बुद्धीने करणे म्हणजे कर्मयोग होय. कर्माची ईश्वराशी सांगड घातल्याशिवाय कर्मयोग हा ईश्वराकडे घेऊन जाणारा मार्ग होणार नाही.

प्रस्तुत प्रश्नाच्या सुरवातीस म्हटल्याप्रमाणे गीतेच्या तिसऱ्या अध्यायाचे नावच मुळी कर्मयोग असल्याने कर्मयोग म्हणजे काय हे स्पष्ट करण्यात आले आहे. पुढेही वेळोवेळी जेथे जेथे कर्मयोग शब्द येईल तेथे तेथे अर्थ समजण्याकरता या स्पष्टीकरणाचा उपयोग होईल.

**तिसऱ्या अध्यायाचे समालोचन**

या अध्यायात नियतकर्म, नैष्कर्म्य आणि लोकसंग्रह याविषयी विशेष माहिती आहे. याशिवाय गीतेला अभिप्रेत असलेला यज्ञाबद्दलचा दृष्टिकोनही येथे विशद केला आहे. यज्ञासाठी केलेले कर्म कर्त्याला बंधनात टाकत नाही. गीतेला अपेक्षित असलेले यज्ञचक्र यथाशक्ति चालवले पाहिजे. ज्ञानी माणसांनी केवळ स्वतःपुरते न बघता लोकसंग्रहसुद्धा केला पाहिजे असा गीतेचा कटाक्ष आहे. श्रीकृष्णाला या जगात काहीही मिळवायचे नव्हते तरी तो शेवटपर्यंत कर्म करीत राहिला आणि इतरांपुढे कर्म करीत राहण्याचा त्याने आदर्श ठेवला.



# ९. ज्ञानकर्मसंन्यासयोग (श्लोकसंख्या ४२)

**अध्याय चौथा**

**प्रश्न ६३ कर्मयोग हा प्रथम कोणी कोणाला सांगितला ?**

उत्तर – कर्मयोग हा प्रथम मी विवस्वानाला म्हणजे सूर्याला सांगितला. त्याने आपला पुत्र मनु यास सांगितला. पुढे मनूने आपला पुत्र ईक्ष्वाकु यास सांगितला, असे श्रीकृष्णाने अर्जुनास सांगितले. विवस्वान-मनु-ईक्ष्वाकु अशी ही प्राचीन परंपरा आहे. हा कर्मयोग प्रथम राजर्षींना माहित झाला. पुष्कळ काळपर्यंत हा योग चालू राहिला. परंतु दीर्घ काळानंतर या कर्मयोगाची महती उत्तरोत्तर कमी झाली आणि शेवटी हा योग लुप्त झाला.

साक्षात् परमेश्वराने सुरू केलेला हा कर्मयोग नाहीसा व्हावा याचे कदाचित् कोणाला आश्चर्य वाटेल. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की परंपरा टिकवण्यासाठी उत्तमोत्तम माणसे निर्माण व्हावी लागतात. ती होत नाहीत. म्हणून उज्ज्वल परंपरा नाहीशी होण्याची वेळ येते. परंतु याचवेळी परमेश्वर योग्य ती काळजी घेतो आणि अवतार घेऊन किंवा योग्य माणसाला उपदेश करून परंपरा पुढे जाईल असे बघतो.

**प्रश्न ६४ हे कृष्णा ! तुझा जन्म तर अलीकडचा असताना तुझ्या अगोदर होऊन गेलेल्या विवस्वानास तू कर्मयोगाचा उपदेश करणे कसे शक्य आहे ? असा अर्जुनाने प्रश्न केला.**

उत्तर – अर्जुनाला पडलेला प्रश्न कोणालाही पडण्यासारखा आहे. जर श्रीकृष्णाचा जन्मच मुळी अगदी अलीकडचा आहे तर सृष्टीच्या पूर्वी उत्पन्न झालेल्या सूर्यास तो योग सांगणे कसे शक्य आहे ? कारण त्यावेळी श्रीकृष्णाचा जन्मही झाला नव्हता. शिवाय सूर्य म्हणजे काही इक्ष्वाकु राजासारखा मनुष्यही नव्हे की ज्याच्याशी बोलणे संभवनीय आहे व ज्याला कर्मयोगाचा उपदेश करणे शक्य आहे.

माझे पुष्कळ जन्म झाले आहेत. तसेच हे अर्जुना, तुझेही पुष्कळ झाले आहेत. परंतु फरक एवढाच की मला माझ्या सर्व जन्मांचे स्मरण आहे आणि तुला मात्र नाही. असे श्रीकृष्णाने अर्जुनास सांगितले.

वस्तुतः परमेश्वराला जन्मही नाही आणि मृत्यूही नाही. तोच सर्व प्राणिमात्रांचा नियामक आहे आणि स्वामी आहे. तरीसुद्धा तो आत्ममायेने जन्म घेतो. जेव्हा तो जन्म घेत नाही तेव्हा तो योग्य व्यक्तीस प्रेरणा देतो व त्याच्याकडून कार्य करवून घेतो. श्रीकृष्ण हा तर परमेश्वर आणि या नात्याने सूर्यही त्याचाच अंश. मनू हा सूर्योपासक आणि त्याच्यानंतर झालेले रघुवंशातील ईक्ष्वाकूपासून सर्वच राजे सूर्यवंशी व सूर्याचे उपासक होते. त्यामुळे सूर्याच्या उपासनेने त्या राजांस कर्मयोगाची प्राप्ती झाली असणे असंभवनीय

नाही आणि अशी प्राप्ती होण्याकरिता मनुष्यवत् व्यवहाराची आवश्यकता नाही.

**प्रश्न ६५ केव्हा आणि कशाकरिता परमेश्वर अवतार धारण करतो ?**
**उत्तर** – या प्रश्नाचे उत्तर ''यदा यदा हि धर्मस्य'' आणि ''परित्राणाय साधूनां'' या सातव्या आणि आठव्या श्लोकात फार सुंदर दिले आहे.

जेव्हा जेव्हा धर्म ऱ्हास पावतो आणि अधर्माचा उदय होतो, तेव्हा तेव्हा परमेश्वर अवतार धारण करतो. धर्म म्हणजे अमुक एक धर्म नव्हे. धर्म म्हणजे समाजधारणेची व्यवस्था. समाजाची व्यवस्थाच कोलमडून पडली आणि सर्वत्र अनागोंदी निर्माण झाली की परत नीट व्यवस्था लावण्याकरिता परमेश्वर अवतार घेतो. धर्म शब्दाची एकच व्याख्या करणे केवळ अशक्य आहे. म्हणून **''धारणात् धर्ममित्याहुः''** ही व्याख्या सर्वसाधारणतः स्वीकारली जाते. ज्या व्यवस्थेने समाजाचे धारणपोषण होते ती व्यवस्था म्हणजे धर्म होय.

सज्जनांचे संरक्षण करणे आणि दुर्जनांचा निःपात करणे या दोन कार्यासाठीही परमेश्वर अवतार धारण करतो.

परमेश्वराचे सर्वच काही दिव्य आहे. परंतु त्याला जो तत्त्वतः जाणतो त्याला पुर्नजन्म प्राप्त होत नाही. ज्यांना ईश्वराच्या अवताराचे रहस्य समजले त्यांना जन्ममरणाच्या फेऱ्याची काळजी करण्याचे कारण नाही. जे लोक भय, क्रोध इत्यादि विकारांपासून मुक्त झाले आहेत आणि ज्यांनी काम वगैरे रिपूंना जिंकले आहे ते लोक उपासनामार्गाने आणि ज्ञानरूपी तपश्चर्येने परमेश्वरासच पोचतात. परंतु कोणत्याही मार्गाने गेले तरी शेवटी सगळे मार्ग परमेश्वरातच विलीन होतात. काही मार्ग जवळचे तर काही दूरचे, काही सोपे तर काही कठीण एवढाच फरक आहे.

**प्रश्न ६६ चातुर्वर्ण्याबद्दल या अध्यायात काय म्हटले आहे ?**
**उत्तर** – गुण आणि कर्म या विभागानुसार समाजामध्ये चातुर्वर्ण्यव्यवस्था मी निर्माण केली आहे आणि जसा मी या व्यवस्थेचा कर्ता आहे तसा अकर्ताही आहे असे समज – असे श्रीकृष्णाने स्पष्ट म्हटले आहे.

चार वर्ण म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र. या वर्णव्यवस्थेवर फार टीका झाली आहे, होत आहे आणि कदाचित होतही राहील. वर्ण हा शब्द वृ धातुपासून सिद्ध झाला आहे. पंचम आणि दशम गणातील या उभयपदी धातूचा अर्थ निवड करणे, पसंत करणे असा आहे. समाजाच्या सुरवातीच्या काळात प्रत्येकाला आपापले काम निवडण्याचे स्वातंत्र्य होते. सामान्यतः ज्यांनी अध्ययन, अध्यापनाचे काम स्वीकारले ते ब्राह्मण झाले, ज्यांनी समाजाच्या रक्षणाचे कार्य स्वीकारले त्यांना क्षत्रिय म्हणण्यात येऊ लागले, ज्यांनी व्यापार वगैरे स्वीकारला ते वैश्य झाले आणि ज्यांनी सेवा करण्याचे स्वीकारले ते शूद्र झाले. प्रत्येकाला आपापल्या आवडीप्रमाणे वर्ण निवडण्याचे स्वातंत्र्य सुरवातीला नक्कीच होते. परंतु दुर्दैवाने व कालांतराने ही वर्णव्यवस्था जन्मनिष्ठ झाली



आणि फार कडक झाली. परंतु आता ही परिस्थिती पार बदलली आहे. वर्णव्यवस्था नाहीशी झाली आहे आणि हे फार चांगले झाले आहे. सध्या कोणालाही कोणताही व्यवसाय करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे आणि निवडण्याचेही आहे. आता या वर्णव्यवस्थेला दोष देण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. समाज चालण्यासाठी काहीतरी व्यवस्था असावीच लागते. व्यवस्था नसेल तर सर्वत्र गोंधळ, गडबड होईल. पूर्वीच्या काळी समाजधारणेकरिता केवळ गुणवत्तेवर आधारित चातुर्वर्ण्य व्यवस्था होती. वर्ण या शब्दाचा वृ या धातूपासून निघालेला अर्थ लक्षात घेतल्यावर आणि चातुर्वर्ण्य व्यवस्थेच्या पाठीमागे असलेली संकल्पना नीट लक्षात घेतल्यावर कोणताही मनुष्य त्या व्यवस्थेला नावे ठेवणार नाही. ही व्यवस्थाच मुळी आता कालबाह्य झाली आहे, नामशेष झाली आहे. सर्व प्राणिमात्र परमेश्वराचीच लेकरे आहेत आणि त्यांच्यामध्ये मूलतः भेद नाही हे अवश्य लक्षात घेतले पाहिजे.

**प्रश्न ६७ कर्म, विकर्म आणि अकर्म म्हणजे काय ?**
**उत्तर** – प्रस्तुत चौथ्या अध्यायाच्या १७ व्या श्लोकात हे शब्द आले आहेत. या तीन शब्दांच्या अर्थाबद्दल भाष्यकारांत एकमत नाही.

कर्म म्हणजे शास्त्रविहित कर्म आणि नियत कर्मसुद्धा. (नियत कर्माचे स्पष्टीकरण ५३ व्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये केले आहे.) विकर्म म्हणजे निषिद्ध कर्म आणि अकर्म म्हणजे कर्माचा अभाव किंवा कर्म न करणे. ज्या कर्मात आपण अडकून पडत नाही ते कर्म न केल्यासारखेच होय. ते अकर्मच होय.

कर्म आणि अकर्म याबद्दल शहाणी माणसे सुद्धा संभ्रमित होतात. म्हणूनच **''गहना कर्मणो गतिः।''** हे १७ व्या श्लोकातले वचन सुभाषित म्हणून प्रसिद्ध पावले आहे. जो मनुष्य कर्माच्या ठिकाणी अकर्म आणि अकर्माच्या ठिकाणी कर्म पाहतो, तोच खरा ज्ञानी मनुष्य होय. ज्याला कर्माचे स्वरूप नीट समजले त्याच्याच बाबतीत हे शक्य आहे.

**प्रश्न ६८ खरा पंडित कोण ?**
**उत्तर** – ज्याचे सर्व समारंभ म्हणजे उद्योग निष्काम असतात व ज्ञानरूपी अग्नीने ज्याच्या कर्माचे बंधकत्व नाहीसे झालेले असते त्यालाच गीतेने पंडित म्हटले आहे. जो आपले कर्म योग्य रीतीने करू शकतो तोच पंडित. निष्क्रिय माणसाला गीतेने पंडित म्हटले नाही. असा मनुष्य नित्यतृप्त असतो आणि कर्मफलाचा विचारही करत नाही. हा सर्वसंगमुक्त असल्याने याने कर्म केले तरी आणि न केले तरी फरक पडत नाही. त्याला कोणतेही पाप लागत नाही. केवळ जे यदृच्छेने मिळेल त्यात तो संतुष्ट असतो. समत्वबुद्धी प्राप्त झाल्यामुळे पंडित मनुष्य कर्म करूनसुद्धा कर्मात अडकत नाही.

**प्रश्न ६९ कोणकोणते यज्ञ या अध्यायात सांगितले आहेत ?**

**उत्तर -** या अध्यायात पुढील यज्ञ सांगितले आहेत :-

१) द्रव्ययज्ञ - आपल्या द्रव्याचा विनियोग यज्ञबुद्धीने करणे म्हणजे द्रव्ययज्ञ होय.

२) तपोयज्ञ - यज्ञबुद्धीने तप करणे म्हणजे तपोयज्ञ होय.

३) योगयज्ञ - योगाचा अभ्यास करणे व योगाचे आचरण करणे म्हणजे योगयज्ञ होय.

४) स्वाध्याययज्ञ - ऋग्वेद वगैरेंचे यथाविधि अध्ययन करणे म्हणजे स्वाध्याययज्ञ होय.

५) ज्ञानयज्ञ - शास्त्रांचा अभ्यास करून शास्त्रार्थज्ञान संपादन करणे म्हणजे ज्ञानयज्ञ होय.

याशिवाय आत्मसंयमन करणारे, प्राणायाम करणारे, आहारावर नियंत्रण करणारे व विविध व्रताचरण करणारे लोकसुद्धा आपापल्या परीने यज्ञच करीत असतात असे म्हटले आहे.

**प्रश्न ७० कोणता यज्ञ श्रेष्ठ आणि का ?**

**उत्तर -** सर्व यज्ञांमध्ये ज्ञानयज्ञ हा श्रेष्ठ आहे. परमेश्वरप्राप्तीसाठी परमेश्वराच्या स्वरूपाचे ज्ञान होणे आवश्यक आहे. स्वरूपाचे ज्ञान करून घेतल्यावर त्या ज्ञानाला अनुरूप असे आचरण ठेवले की साधक आपल्या ध्येयाकडे लवकर पोहोचू शकतो. कोणत्याही कर्माचे पर्यवसान ज्ञानामध्येच होते. म्हणून ज्ञानयज्ञ सर्व यज्ञांत श्रेष्ठ आहे.

**प्रश्न ७१ ज्ञान संपादन करण्याकरिता काय केले पाहिजे ?**

**उत्तर -** ज्ञान संपादन करण्याकरिता ज्ञानी गुरूंकडे गेले पाहिजे. येथे अपेक्षित असलेले ज्ञान म्हणजे अध्यात्मज्ञान होय. त्यांना प्रणिपात करून आपल्या अडीअडचणी सांगितल्या पाहिजेत व त्या दूर करण्याचा मार्ग विचारला पाहिजे. त्यांची सेवाही केली पाहिजे. असे केल्याने ज्ञानी तत्त्ववेत्ते तुला उपदेश करतील असे श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितले आहे.

**प्रश्न ७२ ज्ञानाचे महत्त्व काय ?**

**उत्तर -** एकदा अध्यात्मज्ञान प्राप्त झाले की हे अर्जुना, तू मोह पावणार नाहीस. या यज्ञामुळे तुला सर्व प्राणिमात्र स्वतःच्या ठिकाणीच आहेत आणि पर्यायाने सर्व काही माझ्या ठायीच आहेत असे समजेल. कितीही पापी असलास तरी ज्ञानरूपी नौकेने सर्व पापे तू तरून जाशील असे श्रीकृष्णाने अर्जुनास म्हटले आहे. ज्याप्रमाणे प्रज्वलित झालेला अग्नि सर्व इंधन भस्मसात करून टाकतो त्याप्रमाणे एकदा ज्ञानाग्नि प्रज्वलित झाला की तो सर्व पापे भस्मसात करतो. काहीही शिल्लक ठेवत नाही. एकदा ज्ञान प्राप्त झाल्यावर त्या माणसाच्या हातून पाप होतच नाही. असे हे अध्यात्मज्ञानाचे महत्त्व आहे. ज्ञानासारखे पवित्र असे या जगात काहीही नाही. म्हणूनच **'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह वर्तते ।''** हे सुभाषित प्रसिद्ध पावले आहे.

**प्रश्न ७३ ज्ञान कोणाला प्राप्त होते ?**

**उत्तर -** ज्ञान संपादन करण्याकरिता काय करायला पाहिजे हे अगोदर येऊन गेले आहे.



(प्रश्न ७१) परंतु ज्ञान संपादन करीत असताना आपल्या गुरूवर आणि आपण शिकत असलेल्या शास्त्रावर श्रद्धा पाहिजे आणि जो श्रद्धावान आहे त्यालाच ज्ञान प्राप्त होते. म्हणूनच म्हटले आहे की, **'श्रद्धावान् लभते ज्ञानम् ।'** शिवाय ज्ञान संपादन करीत असताना इंद्रियसंयम राखणे अत्यावश्यक आहे.

ज्याला स्वतःची बुद्धी नाही, ज्याला काही समजत नाही व ज्याची श्रद्धाही नाही व जो संशयखोर आहे अशा माणसाला ज्ञान प्राप्त होत नाही. एवढेच नव्हे तर अशा माणसाला या जगातही काही लाभ होत नाही, सुख मिळत नाही आणि परलोकही मिळत नाही. त्याचा नाश होतो - **'संशयात्मा विनश्यति ।'**

एकदा ज्ञान प्राप्त झाले की सर्व संशय नाहीसे होतात. त्यामुळे कर्म करणे सोपे जाते. कर्म करून सुद्धा कर्मबंधनात अडकायला होत नाही. जो आत्मज्ञानी आहे त्याला कर्माचे बंधन नाही.

**प्रश्न ७४ चौथ्या अध्यायाचे थोडक्यात समालोचन कसे करता येईल ?**

**उत्तर -** अध्यायाच्या सुरवातीस कर्मयोगाची परंपरा सांगितली आहे. परमेश्वर अवतार धारण करतो. तो धर्माची पुनःप्रतिष्ठापना करतो आणि सज्जन लोकांचे रक्षण करतो. गुण आणि कर्म या विभागावर अवलंबून असलेली चातुर्वर्ण्यव्यवस्था मी स्वतः निर्माण केली आहे असे श्रीकृष्णाने स्पष्ट म्हटले आहे. कर्म, विकर्म आणि अकर्म याच्या संकल्पना विशद करण्यात आल्या आहेत. खरा पंडित कोणाला म्हणायचे हे थोडक्यात सांगितले आहे. द्रव्ययज्ञ, तपोयज्ञ इ. विविध यज्ञ सांगून त्या सर्वांमध्ये ज्ञानयज्ञ हा सर्वश्रेष्ठ आहे असे सुस्पष्ट म्हटले आहे. ज्ञान संपादन करण्याकरिता काय केले पाहिजे हे या अध्यायात सांगितले आहे आणि त्याचबरोबर ज्ञानाचे महत्त्वही सांगितले आहे. एकदा ज्ञानरूपी अग्नि प्रज्वलित झाला की, त्यात सर्व पापे भस्मसात होतात. **'गहना कर्मणो गतिः'। 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह वर्तते'। 'श्रद्धावान् लभते ज्ञानम्'। 'संशयात्मा विनश्यति'।** इत्यादि सुभाषितेही या अध्यायात आहेत.

# १०. कर्मसंन्यासयोग (श्लोकसंख्या २९)

**अध्याय पाचवा**

**प्रश्न ७५ कर्मसंन्यास आणि कर्मयोग यांतील श्रेयस्कर मार्ग कोणता ?**

**उत्तर** – कर्मसंन्यास म्हणजे कर्मे सोडणे म्हणजे कर्मे न करणे. कर्मयोग म्हणजे फलेच्छा सोडून ईश्वरार्पणबुद्धीने आजन्म कर्मे करीत राहणे.

जो ब्रह्मज्ञानी आहे, ज्याला आत्मसाक्षात्कार झाला आहे, त्याने कर्मे केली काय किंवा न केली काय सारखेच. त्याच्याच बाबतीत कर्मसंन्यास संभवतो. पूर्णावस्था प्राप्त झाल्यावर कर्माचे बंधन रहात नाही आणि कर्मे केली तरी ती साहजिकच निष्काम बुद्धीने होत असल्याने कर्मामध्ये अडकायला होत नाही.

कर्मयोगामध्ये देह असेपर्यंत निष्कामबुद्धीने कर्मे केली जातात. कर्मे निष्कामबुद्धीने केली जात असल्यामुळे कर्माच्या फळांविषयी आसक्ती नसते आणि त्यामुळे कर्माचे बंधकत्व नसते.

कर्मसंन्यास आणि कर्मयोग हे दोन्हीही मार्ग नक्की श्रेयस्कर आहेत असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. दोन्हीही मार्ग मोक्षप्राप्ती करून देणारे आहेत. परंतु त्यातल्यात्यात कर्मसंन्यासापेक्षा कर्मयोगाची योग्यता अधिक आहे.

**प्रश्न ७६ नित्यसंन्यासी कोणाला म्हटले आहे ?**

**उत्तर** – जो पुरुष कोणाचाही द्वेष करीत नाही किंवा कशाचीही इच्छा करीत नाही त्याला नित्यसंन्यासी म्हटले आहे. असा संन्यासी सुखदुःखादि द्वंद्वाच्या पलीकडे असतो आणि त्यामुळे निसर्गतःच त्याचा कर्मबंधनाशी संबंध येत नाही. कर्मयोगी माणसाला सुद्धा नित्यसंन्यासी म्हणायला हरकत नाही.

**प्रश्न ७७ सांख्य आणि योग हे दोन मार्ग भिन्न आहेत असे अज्ञानी माणसे जे म्हणतात त्यात कितपत तथ्य आहे ?**

**उत्तर** – येथे सांख्य म्हणजे ज्ञानी लोकांचा कर्मसंन्यास व योग म्हणजे कर्मयोग. सकृतदर्शनी हे दोन मार्ग जरी भिन्न वाटले तरी परमार्थदृष्ट्या हे मार्ग भिन्न नाहीत असे पंडित माणसे म्हणतात. या दोन मार्गांपैकी कोणताही मार्ग स्वीकारला तरी दोन्हीही मार्गांचे फल प्राप्त होते. हे फल म्हणजे मोक्षप्राप्ती. दोन्ही मार्गांचे अंतिम उद्दिष्ट मोक्ष हे असल्याने त्यांमध्ये फरक नाही असे म्हटले आहे. जो दोन्ही मार्गांना अशाप्रकारे जाणतो तोच खरा जाणकार



आणि तोच खरा ज्ञानी होय. कर्मसंन्यासाला कर्मयोगाची जोड पाहिजे. कर्मयोगाच्या जोडीशिवाय कर्मसंन्यास करणे कठीण आहे.

**प्रश्न ७८ योगयुक्त माणसाने कसे आचरण ठेवावे ?**

**उत्तर** – जो कर्मयोगाचे आचरण करतो असा योगयुक्त माणूस जितेन्द्रिय असतो. तसेच तो शुद्ध आणि पवित्र असल्यामुळे तो काहीही करीत असला तरी तो कशातही लुब्ध न झाल्यामुळे अडकत नाही. तो सर्व भूतांच्या ठिकाणी आत्मरूपच पहातो.

योगयुक्त माणसाने ''मी स्वतः काहीच करीत नाही'' अशी धारणा ठेवावी. पहाताना ऐकताना, स्पर्श करताना, वास घेताना, खाताना, चालताना, झोपताना, श्वासोच्छ्वास करताना, बोलताना वगैरे शरीराच्या सर्व क्रिया करताना किंवा त्या होत असताना त्या क्रिया केवळ इंद्रिये करीत आहेत अशी भावना ठेवावी. इंद्रिये आपापल्या विषयांशी व्यवहार करीत आहेत आणि त्या व्यवहाराशी माझा काहीही संबंध नाही अशी बुद्धी ठेवून योगयुक्त माणसाने आचरण ठेवावे.

जो आपली सर्व कर्मे फलेच्छा सोडून करतो व ब्रह्मार्पण करतो त्याला कोणत्याही प्रकारचे पाप लागत नाही. कमलपत्राला ज्याप्रमाणे पाणी चिकटत नाही त्याप्रमाणे त्याला पाप चिकटत नाही. तो शुद्ध आणि पवित्र रहातो. योगी लोक जे शरीराने, मनाने अगर बुद्धीने कर्म करतात ते केवळ आत्मशुद्धीसाठी करतात. अशाप्रकारे कर्म केल्याने त्यांना चिरंतन शांतीचा लाभ होतो.

**प्रश्न ७९ आपल्या शरीराला नऊ द्वारे आहेत असे म्हणतात ती कोणती ?**

**उत्तर** – देहामध्ये जो रहातो त्याला देही म्हणतात. दोन डोळे, दोन कान, दोन नाकपुड्या व तोंड ही सात द्वारे आणि मूत्र व पुरीष विसर्जन करणारी दोन द्वारे मिळून या शरीराची नऊ द्वारे आहेत. अशा या शहरामध्ये आत्मा सुखाने वास करतो. आत्मा हा असा आहे. तो अकर्ता आहे. तो काही करीत नसल्याने कशाचेही कर्तृत्व व भोक्तृत्व त्याच्याकडे जात नाही.

**प्रश्न ८० परमेश्वराचा लोकांच्या कर्तृत्वाशी अगर कर्माशी संबंध आहे का ?**

**उत्तर** – या अध्यायाच्या १४ व्या आणि १५ व्या श्लोकात परमेश्वराला प्रभु आणि विभु असे म्हटले आहे. परमेश्वर सर्वव्यापी आहे. तो लोकांचे कर्तृत्व निर्माण करीत नाही अगर त्यांची कर्मेही उत्पन्न करीत नाही किंवा त्यांनी केलेल्या कर्माची फळेही तो देत नाही अगर घेत नाही. हे सर्व काही स्व-भावामुळे होते. स्वभाव शब्दाचा अर्थ शंकराचार्यांनी अविद्यारूप प्रकृती माया असा केला आहे.

परमेश्वर कोणाचे पाप घेत नाही अगर पुण्यही घेत नाही. जो तो आपापल्या कर्माचा धनी आहे. परंतु हे न समजल्याने मनुष्यप्राणी मोह पावतात आणि परमेश्वरावर कर्तृत्वाचा

भोक्तृत्वाचा अगर कसलाही आरोप करतात. त्यांचे अज्ञानाचे पांघरूण जेव्हा दूर होते तेव्हा त्यांना परमेश्वराच्या रूपाची कल्पना येते. अज्ञान जेव्हा नष्ट होते तेव्हा ज्ञान उत्पन्न होते व ते स्वयंपरमतत्व प्रकाशित करते. परमतत्त्वाशी ज्यांचा परिचय झाला ते परमतत्त्वात रंगून जातात. अध्यात्माची किमया ही अशी आहे. एकदा त्या तत्त्वाशी रममाण झाले की दुसरीकडे कोठेही गोडी वाटत नाही आणि अशाप्रकारे जे त्या परमतत्त्वाशी समरस होतात म्हणजे तत्परायण होतात त्यांना अर्थातच पुनर्जन्म नाही. ते या संसाराच्या चक्रातून सुटतात.

**प्रश्न ८१ ज्ञानी लोकांचे वैशिष्ट्य काय ?**

**उत्तर –** ज्यांना परमतत्त्वाचे ज्ञान झाले आहे त्यांनाच खरे ज्ञानी अथवा पंडित असे म्हणतात. अशा ज्ञानी माणसांची समदृष्टी असते. ते विद्या व विनय संपन्न ब्राह्मण, गाय, हत्ती, कुत्रा तसेच चांडाल यांच्या ठिकाणी सारखाच भाव ठेवतात. त्यांच्याकडे सारख्याच भावनेने पहातात. त्यांच्याकडे दोषदृष्टी नसते. इतकी उच्चावस्था त्यांनी साधली असल्यामुळे त्यांचे मनही नित्य साम्यावस्थेमध्ये असते. ते मरणाच्या अगोदरच हा मृत्युलोक जिंकतात. मृत्युमुळे त्यांच्यात काही बदल होत नाही. कारण त्यांना मृत्यु म्हणजे काय याचे ज्ञान झालेले असते. त्यामुळे ते जीवन जगत असतानाच मुक्त झालेले असतात. ते जीवन्मुक्त असतात. हीच अध्यात्मज्ञानाची पराकाष्ठा होय.

**प्रश्न ८२ अक्षय सुख कोणाला प्राप्त होते ?**

**उत्तर –** आपली आवडती वस्तू मिळाली म्हणून आनंद होता कामा नये किंवा न आवडणारी वस्तू प्राप्त झाली म्हणून दुःख होता कामा नये. जो मनाच्या अशा अवस्थेला येऊन पोचला त्याची बुद्धि स्थिर झाली असे म्हणायला हरकत नाही. बुद्धि स्थिर झाल्यामुळे तो मोह पावत नाही व परब्रह्माच्या ठिकाणी तो निरंतर रममाण होतो. अशा माणसाचा विषयोपभोगाशी संबंधच नसल्यामुळे तो आत्मसुखातच रमतो व शेवटी ब्रह्माशी एकरूप होऊन अक्षयसुख मिळवतो. ब्रह्मानंदाचे सुख कायम टिकणारे असते. ते कधीही कमी होत नाही. त्याचा कधीही क्षय होत नाही म्हणूनच त्याला अक्षय सुख म्हटले आहे.

**प्रश्न ८३ सदामुक्त कोणाला म्हणायचे ?**

**उत्तर –** जो सुखदुःखांची अपेक्षा ठेवत नाही व आत्मतृप्त झाला आहे, ज्याची द्वंद्वबुद्धी नाहीशी झाली आहे व ज्याची सर्व पापे नाहीशी झाली आहेत, असा मनुष्य सर्व प्राणिमात्रांचे हित करण्यात रमतो. काम, क्रोध वगैरे रिपू याच्यावर आक्रमण करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. जवळच असलेली वस्तू ज्याप्रमाणे आपल्याला सहज मिळते त्याप्रमाणे याला सहजगत्या मोक्ष प्राप्त होतो. असा मनुष्य बाहेरच्या पदार्थांना बाहेरच ठेऊन आपली दृष्टी दोन भुवयांच्या मध्ये स्थिर करतो व प्राण आणि अपान वायू सारखे



करून तसेच इंद्रिये, बुद्धी आणि मन यांचे संयमन करून भय आणि क्रोध यांना पार करून पुढे जातो. अशा मनुष्याला सदामुक्त म्हणता येते. यालाच जीवनमुक्त असेही म्हणतात. अशा ज्ञानी माणसाची काही लक्षणे ८१ व्या प्रश्नाच्या उत्तरात आली आहेत.

**प्रश्न ८४ पाचव्या अध्यायाबद्दल संक्षेपाने काय म्हणता येईल ?**

**उत्तर –** पाचव्या अध्यायात फक्त २९ श्लोक आहेत. कर्मसंन्यास आणि कर्मयोग हे दोन्हीही मार्ग मोक्षप्राप्ती करून देणारे आहेत. यापैकी कोणत्याही मार्गाचे अनुसरण केले तरी दोन्ही मार्गांचे फल मिळते. परंतु त्यातल्यात्यात डावे-उजवे करायचे झाल्यास कर्मयोगाची योग्यता अधिक आहे. कर्मयोगाचे जो आचरण करतो त्याला नित्यसंन्यासी म्हणायला हरकत नाही. सांख्य आणि योग हे दोन मार्ग म्हणजे ज्ञानी लोकांचा कर्मसंन्यास व कर्मयोग. हे मार्ग परमार्थदृष्ट्या भिन्न नाहीत. दोन्ही मार्गांचे अंतिम उद्दिष्ट मोक्ष हेच आहे. योगयुक्त मनुष्य सर्व प्राणिमात्रांच्या ठायी स्वतःला पाहतो व इंद्रिये आणि त्यांचा विषयांशी चाललेला व्यवहार यांच्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करतो. तो केवळ फक्त आत्मशुद्धीकरताच कर्मे करीत रहातो. देही म्हणजे आत्मा नऊ द्वारे असलेल्या देहात सुखाने वास करतो. त्याचाच म्हणजे पर्यायाने परमेश्वराचा कर्तृत्व, भोक्तृत्व वगैरेंशी काहीही संबंध नाही. तो कोणाच्याही पापपुण्याची देवाणघेवाण करीत नाही. तो संपूर्णपणे निःसंग आहे. जे काही जगात घडते ते सर्व काही प्रकृतीमुळे होय. जो तो आपल्याच कर्माचा धनी आहे आणि त्यामुळे दुसऱ्या कोणालाही दोष लावणे अयोग्य होय. जेव्हा अज्ञानरूपी आवरण दूर होते तेव्हा ज्ञानाचा उदय होतो व परमेश्वराच्या रूपाची कल्पना येते. ज्यांना परमतत्त्वाचे ज्ञान झाले आहे अशांनाच पंडित म्हणतात. यांचा सर्वत्र समभाव असल्याने, तसेच सुखदुःखादि द्वंद्वाच्या पलीकडे गेले असल्यामुळे ते निष्पाप पुण्यात्मे ब्रह्मानंदात रमतात. यांनाच जीवन्मुक्त असेही म्हणतात.

❀❀❀

# ११. आत्मसंयमयोग (श्लोकसंख्या ४७)

**अध्याय सहावा**

**प्रश्न ८५ या अध्यायाच्या सुरवातीला संन्यासी आणि योगी यांचा समानार्थी (एकाच अर्थाने) उल्लेख आहे हे कसे ?**

**उत्तर –** फलाची इच्छा धरून जो कर्म करतो तो कर्मफलाचा आश्रित होय. याच्याविरूद्ध जो फलाची इच्छा सोडून कर्म करतो तो अनाश्रित होय. संन्यासी असो अगर योगी असो त्याने फलाची इच्छा सोडूनच कर्म केले पाहिजे. केवळ विहित कर्मे टाकून दिली किंवा अग्निसेवाही सोडून दिली म्हणून कोणी संन्यासी होऊ शकत नाही. संन्यास ही त्यागाची एक मानसिक अवस्था आहे. ती खरोखर बाह्य अवस्था नसून आंतरीक अवस्था आहे. ज्याने ही त्यागाची आंतरीक अवस्था साधली तो योगी असू शकेल किंवा संन्यासीसुद्धा असेल. संन्यास म्हणजे तृष्णेचा परित्याग. या अर्थाने संन्यासी आणि योगी सारखे आहेत. योगी असो अथवा संन्यासी असो दोघांना संकल्पाचा त्याग करावाच लागतो.

**प्रश्न ८६ योगारूढ कोणाला म्हटले आहे ?**

**उत्तर –** सहाव्या अध्यायाचे नाव ध्यानयोग अथवा आत्मसंयमयोग असे आहे. ज्याला या योगावर म्हणजे ध्यानयोगरूपी पर्वतावर आरूढ व्हायचे आहे त्यालासुद्धा कर्म हे करायलाच पाहिजे. कर्मयोग हे त्याचे साधन आहे. पण एकदा तो ध्यानयोगात प्रवीण झाला की कर्मनिवृत्ती हे त्याचे साधन होते. त्याचे चित्त स्थिर झाले की त्याला निष्काम कर्म करण्याचे कारण रहात नाही. त्याने कर्मापासून परावृत्त होणे हेच इष्ट आहे. चित्ताचा समतोल साधल्यावर इंद्रियांच्या विषयोपभोगात त्याचे मन रमत नाही आणि अर्थात आसक्तही होऊन रहात नाही. तो सर्व संकल्पांचा त्याग करतो. अशाप्रकारे सर्व संकल्पांचा संन्यास करणाऱ्यास योगारूढ असे म्हणतात.

**प्रश्न ८७ स्वतःचा उद्धार स्वतःच करावा म्हणजे काय ?**

**उत्तर –** या अध्यायाच्या पाचव्या श्लोकात असे म्हटले आहे की **''उद्धरेत् आत्मना आत्मानम्''** म्हणजे आपल्या आत्म्याच्या सहाय्याने आपल्या आत्म्याचा उद्धार करावा आणि आपण आपल्या आत्म्याला कधीही अधोगतीला जाऊ देऊ नये. आपला आत्मा हाच आपला खरा बंधू आहे आणि आपल्याला जर हे समजले नाही तर तोच आत्मा आपला शत्रू होईल.

स्वतःचा उद्धार स्वतः करावा म्हणजे आपल्या उद्धारासाठी आपणच प्रयत्न करायला पाहिजेत. दुसरा कोणी येऊन तुम्हाला उचलून उद्धार करणार नाही. आत्मज्ञान



मिळविण्यासाठी प्रयत्न करावा. आत्मज्ञानामुळे उद्धार होईल पण याउलट जर आपण आत्म्याच्या अज्ञानात राहिलो तर आपणच आपला ऱ्हास करतो असे होईल. आपल्या आत्म्याचा उद्धार करणे अगर न करणे हे आपल्याच हाती आहे.

ज्याने आत्मज्ञानाच्या सहाय्याने आत्मा जिंकला त्याचा तो आत्मा बंधू होतो. परंतु असे जिंकता आले नाही तर तोच आत्मा शत्रू होतो. ज्याने आपल्या इंद्रियांवर वर्चस्व मिळवले आहे त्याला समाधान मिळते. परंतु जो विषयासक्त आहे त्याला समाधान कधीच मिळत नाही. ज्याला आत्मसंयमन करायला जमले व जो शांत झाला आहे त्याला सुखदुःख, मानापमान इत्यादी द्वंद्वांचा संसर्ग पाहोचत नाही. अशा समाधानी माणसाच्या चित्ताचा क्षोभ होत नसल्यामुळे मातीचे ढेकूळ, दगड अगर सोने त्याला सारख्याच किंमतीची वाटतात. असा निर्विकारी मनुष्य म्हणजे योगारूढ मनुष्य होय. त्याला ज्याप्रमाणे निर्जीव वस्तू सारख्याच वाटतात त्याप्रमाणे सजीवांबद्दलही त्याची स्थिती तशीच होते. मग तो सुहृद असो (कारण नसतानाही उपकार करणारा), मित्र असो (प्रेमामुळे मदत करणारा) किंवा तटस्थ असो अगर मध्यस्थ असो किंवा यांच्याही पुढे जाऊन द्वेष करणारा असो, साधू असो अगर पापी असो, त्याला सगळे सारखेच वाटतात. खरोखर अशी स्थिती प्राप्त होणे फार कठीण आहे. म्हणूनच अशा माणसाला योगी किंवा योगारूढ असे म्हणतात.

**प्रश्न ८८ योगी माणसाने कसे रहावे ?**

**उत्तर –** योगी माणसाने एकांतात रहावे. जास्तीत जास्त एकांत मिळवून आपले चित्त ब्रह्माच्या ठिकाणी लावावे. सदोदित ब्रह्मविचार मनात घोळवावे. इंद्रियदमन करून तृष्णारहित स्थितीत रहावे. कशाची म्हणून आशा करू नये. शिवाय कसलाही संग्रह करू नये. संग्रह केला की लोभ निर्माण होतो व संग्रह सांभाळण्याची जबाबदारी येते व बधनात पडायला होते.

**प्रश्न ८९ योग्याने कशाप्रकारे साधना करावी ?**

**उत्तर –** योग्याने पवित्र ठिकाण निवडून, अतिशय उंच नाही अगर सखल नाही अशा जागेवर कुश (दर्भ) पसरून त्यावर मृगचर्म घालून त्यावर चैल म्हणजे मऊ वस्त्र पसरावे व स्थिर दृष्टी ठेऊन आसनस्थ व्हावे. आसनस्थ झाल्यावर मन एकाग्र करून स्वतःच्या उन्नतीकरता ब्रह्मविचार करावा.

आपले शरीर, शिर आणि मान सरळ एका रेषेत स्थिर ठेऊन स्वतःच्या नासिकेकडे लक्ष केंद्रित करावे. अशा रीतीने शांतचित्त होऊन, निर्भय होऊन, ब्रह्मचर्य व्रताचे पालन करीत, दुसरीकडे कोठेही न पहाता ब्रह्मचिंतन करावे. योग्याने अशाप्रकारे 'ध्यानस्थ होऊन साधना करावी.'

**प्रश्न ९० योगी माणसाला साधनेचे काय फळ मिळते ?**

**उत्तर** – जो योगी शास्त्रशुद्ध साधना करतो व मनाचे संयमन करीत सतत आत्मचिंतनात म्हणजे पर्यायाने ब्रह्मचिंतनात मग्न राहतो, त्याला विलक्षण शांती मिळते आणि मोक्षस्थिती प्राप्त होते. मोक्षस्थिती प्राप्त करून घेणे हाच परमपुरुषार्थ होय. ब्रह्मचिंतनात सतत राहिल्यावर शांती तर मिळणारच परंतु अखेर या शांतीचे पर्यवसान मोक्षस्थितीत होते. योगी माणूस एवढा ऐश्वर्यसंपन्न होतो की तो ब्रह्मस्थितीस पोचतो. जीवनात जर काही साध्य करायचे असेल तर हेच.

**प्रश्न ९१ योगी माणसाचा आहार विहार कसा असावा ?**

**उत्तर** – योगी माणसाने खादाडपणाने अन्न खाऊ नये. अगदी आवश्यक तेवढे अन्न खावे. पण त्याने उपाशीही राहू नये. जर त्याने अन्न जास्त घेतले अगर अजिबात घेतले नाही तर त्याला योग साध्य होणार नाही. त्याने अन्न प्रमाणात घेतले पाहिजे. त्याचे अन्न नियमाच्या मापाने मोजलेले असावे. त्याचप्रमाणे त्याने झोपेच्या बाबतीतही सावध राहिले पाहिजे. अतिशय जास्त झोप किंवा अगदी कमी झोप त्याने घेऊ नये. ही दोन्ही टोके त्याने टाळावी. योग्य तेवढीच झोप घ्यावी. अन्न आणि झोप यांच्यात अतिरेक झाला किंवा यांचा विपरीत त्याग केला तर योग साध्य होणार नाही. अन्न आणि झोप या दोघांना त्यांचा त्यांचा योग्य तो मान द्यावा.

ज्याचा आहारविहार योग्य प्रमाणात असतो व जो झोप आणि जाग यांच्याबाबतीत सावध रहातो त्या योगी पुरुषाच्या दुःखांचा नाश होतो.

**प्रश्न ९२ योगी माणसाचे चित्त कसे असते ?**

**उत्तर** – योगी माणसाचे चित्त नियंत्रित असल्यामुळे तो निस्पृह असतो. कोणतीही इच्छा त्याला स्पर्श करीत नाही. वारा नसलेल्या ठिकाणी दिव्याची ज्योत जशी संथपणे तेवते, त्याप्रमाणे योगी पुरुषाचे चित्त स्थिर असते. योगी माणसाच्या चित्ताला निर्वात ठिकाणी मंद आणि स्थिर तेवणाऱ्या ज्योतीची उपमा देतात. या उपमेवरून योग्याच्या चित्ताची कल्पना येऊ शकते.

**प्रश्न ९३ योगी पुरुषाच्या स्थितीबद्दल काय सांगता येईल ?**

**उत्तर** – योगाभ्यासाने स्थिरचित्त झालेला योगी संपूर्ण संतुष्ट होऊन राहातो. त्याला मिळालेले सुख केवळ स्वसंवेद्य असते, त्याच्याच बुद्धीला त्याची संवेदना होते, ते अतींद्रिय असते. आणि असे परमश्रेष्ठ सुख एकदा प्राप्त झाले की तो योगी आपल्या उच्च स्थितीपासून अजिबात विचलित होत नाही. या उच्चस्थितीचा लाभ झाल्यावर तो अर्थातच त्या लाभाहून अधिक काही आहे असे समजत नाही. अशा स्थितीचा अनुभव घेत असताना त्याच्यावर कोणतेही दुःख कोसळले तरी त्या दुःखाचा आघात त्याच्यावर



होत नाही. योगी पुरुषाने निश्चयपूर्वक, श्रद्धेने आणि अपार उत्साहाने योगसाधना करीत रहावे.

**प्रश्न ९४ योगी पुरुषाने साधनेत कशी प्रगती करावी ?**

**उत्तर** – योगी पुरुषाने कोणतेही संकल्प करू नयेत आणि संकल्पांच्या मुळांत असलेल्या वासनांचा समूळ त्याग करावा. सर्व बाजूने आपले मन आत ओढून घेऊन अतिशय धैर्याने आणि सावधगिरीने ते आत्म्याच्या ठिकाणी स्थिर करावे. आत्मचिंतनाशिवाय दुसरे कोठचेही चिंतन करू नये. मनाला अशी शिस्त प्रथम रुचणार नाही. ते सतत बाहेर जायचा प्रयत्न करील परंतु त्याला परत खेचून आणून आत्मस्वरूपाकडे वळवावे. ज्याचे मन अशाप्रकारे शांत आणि स्थिर झाले आहे तो योगी केवळ ब्रह्मसुखाचाच अनुभव घेत नाही तर तो स्वतः ब्रह्मच होतो. योगी पुरुषाने मनावर ताबा मिळवून साधनेत प्रगती करावी.

**प्रश्न ९५ योगी पुरुषाची जगाकडे पहायची दृष्टी कशी असते ?**

**उत्तर** – योगी पुरुष आपल्याला सर्व प्राणिमात्रांमध्ये पाहतो आणि आपल्यामध्ये त्यांना पहातो. सर्वत्र एकच आत्मा आहे या दृष्टीनेच तो जगाकडे पहातो. सर्व प्राणिमात्रे जरी वेगवेगळी असली तरी त्यांच्यामध्ये एकच आत्मा वास करीत आहे अशी त्याची ठाम श्रद्धा असते. तो समदर्शी असतो.

श्रीकृष्णाने असे म्हटले आहे की, जो मला सर्वत्र पहातो आणि माझ्यामध्ये सर्व काही पहातो असा योगी पुरुष माझ्यापासून कधीही वियोग पावत नाही आणि मीही त्याच्यापासून वियुक्त होत नाही. ज्याला अशी दृष्टी प्राप्त झाली तो योगी कर्मे करीत असून सुद्धा माझ्याच ठिकाणी नित्य वास करीत असतो. सुख किंवा दुःख हे जसे स्वतःस होते तसेच इतर माणसांना होते किंवा स्वतःच्या व इतरांच्या सुख दुःखाकडे जो सारख्याच भावनेने पहातो तोच खरा श्रेष्ठ योगी होय. योगी पुरुषाची अखिल जगाकडे पहायची समदृष्टी असते.

**प्रश्न ९६ मन हे अतिशय चंचल असल्यामुळे योगासाठी लागणारे त्याचे स्थैर्य कसे मिळवता येईल ?**

**उत्तर** – मन हे फार चपल, उसळ्या मारणारे आणि दांडगट आहे. त्याला ताब्यात ठेवणे म्हणजे वाऱ्याची मोट बांधण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे वाऱ्याला ताब्यात ठेवता येत नाही त्याप्रमाणे मनालाही ताब्यात ठेवणे शक्य नाही. म्हणून अशा मनाची स्थिरता कशी मिळवावी अशा अर्थाचा वरील प्रश्न अर्जुनाने श्रीकृष्णाला विचारला आहे.

हे मन चंचल आहे आणि दुराग्रही आणि हट्टी आहे यात वाद नाही असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. परंतु असे असले तरी हे मन दृढ प्रयत्न करून आणि वैराग्याच्या मदतीने

काबूत ठेवता येते असे स्पष्ट केले आहे. ज्याला मनावर ताबा ठेवता येत नाही त्याला योग साध्य होणे कठीण आहे. परंतु सतत अभ्यासाने आणि वैराग्याच्या सहाय्याने मनावर नियंत्रण मिळवता येते आणि त्याला स्थिर करता येते यात शंका नाही.

**प्रश्न ९७ प्रयत्न करूनसुद्धा ज्याला योगाची सिद्धी प्राप्त झाली नाही अशा योग्याला कोणती गती मिळते ?**

**उत्तर** – अर्जुनाने हा प्रश्न श्रीकृष्णास विचारला आहे. त्याने पुढे असेही विचारले आहे की, तुकडे तुकडे झालेल्या ढगाप्रमाणे योगभ्रष्टाचा नाश तर होत नाही ना ? अर्जुनाचा हा संशय दूर करण्यास फक्त श्रीकृष्णच समर्थ होता.

जो एकदा योगारूढ झाला त्याचा कधीही इहलोकी किंवा परलोकी नाश होत नाही. याचे मूळ कारण असे आहे की, जो सत्कृत्य करतो तो कधीही दुर्गतीस जात नाही. कल्याणकारक गोष्टी करणाऱ्यास कल्याणच प्राप्त होते. जो चांगल्या मार्गाने जात आहे त्याला चांगलेच फळ मिळते. तो कधीही अधोगतीस जात नाही. योगमार्गावर असलेला मनुष्य पुढे पुढेच जातो.

त्याने केलेल्या पुण्यकर्मामुळे तो स्वर्गामध्ये पुष्कळ काळपर्यंत राहतो. आणि नियमाप्रमाणे पुण्यकर्मांची फळे संपल्यावर तो पृथ्वीतलावर पवित्र आणि भाग्यवंत लोकांच्या घरी जन्म घेतो किंवा एखाद्या योग्याच्या कुळात जन्म घेतो. खरोखरच असा जन्म लाभणे फार भाग्याचे आहे.

योग्याच्या कुळात जन्म झाल्यावर त्याने पूर्वजन्मी केलेल्या साधनेचा ठेवा त्याला प्राप्त होतो. पूर्वजन्मीच्या अभ्यासाने तो योगाकडेच ओढला जातो आणि पाठीमागच्या जन्मात केलेल्या साधनेच्या टप्प्यापासून पुढे सुरवात करून निष्पाप आणि निर्मळ झालेला तो योगी अखेरीस ब्रह्मपदी लीन होतो. साधना केलेली कधीही फुकट जात नाही. ती जशीच्या तशी पुढच्या जन्मात प्राप्त होते व तेथून परत पुढे वाटचाल सुरू होते असे हे साधनेचे वैशिष्ट्य आहे.

तपस्वी आणि ज्ञानी लोकांपेक्षाही योगी श्रेष्ठ आहे. तसेच तो केवळ कर्म करणाऱ्यांपेक्षाही मोठा आहे. म्हणून अर्जुना, तू योगी हो असे श्रीकृष्णाने बजावले आहे. असे असून सुद्धा जो योगी श्रद्धायुक्त अंतःकरणाने माझी उपासना करतो तोच सर्वश्रेष्ठ योगी होय असे श्रीकृष्णाने आपले निःसंदिग्ध मत मांडले आहे.

**प्रश्न ९८ या अध्यायात कुंडलिनीचा कोठेही उल्लेख नसताना ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीचा सबंध सहावा अध्याय कुंडलिनीच्या भोवती कसा विणला ?**

**उत्तर** – गीतेमध्ये कोठेही कुंडलिनीचा उल्लेख नाही हे खरे आहे. एवढेच काय



भाष्यकारांनीही कुंडलिनीला कोठे अपेक्षित धरले नाही. परंतु ज्ञानेश्वरांची स्थिती थोडी निराळी आहे.

ज्ञानेश्वर नाथसंप्रदायातले होते. या ध्यानयोग अध्यायाच्या निमित्ताने त्यांनी आपल्या संप्रदायाचे रहस्य सांगण्याची संधी घेतली आणि या संधीचा इतका पुरेपूर फायदा करून घेतला की ज्ञानेश्वरी ग्रंथ स्वतंत्र रीतीने वाचताना कुंडलिनी हा विषय परका वाटत नाही.

कुंडलिनी हा विषय गीतेत नाही याची ज्ञानेश्वरांना पूर्ण कल्पना होती. या संदर्भात त्यांच्या या अध्यायावरील २९१ व २९२ या ओव्या पाहिल्यावर लक्षात येईल. ज्ञानेश्वरांनी नाथसंप्रदायातील गुह्य या अध्यायात प्रकट केले आहे. कुंडलिनीयोग हा तंत्रमार्गातील एक महत्त्वाचा भाग आहे. शक्तीची उपासना म्हणजे तंत्रमार्ग. या मार्गमध्ये वाममार्ग आहेत. परंतु तंत्रमार्गातील उपासनेचा एक शुद्ध भागही आहे आणि तो म्हणजे कुंडलिनीयोग.

ज्ञानेश्वर नुसते ज्ञानी होते असे नाही तर ते फार मोठे योगी होते. आपल्या गुरूंकडून म्हणजे निवृत्तिनाथांकडून मिळालेली कुंडलिनीयोगविद्या ज्ञानेश्वरांनी गीतेच्या ध्यानयोगात सांप्रदायिकतेच्या अभिनिवेशामुळे घातली व विस्तारून सांगितली व सबंध अध्याय कुंडलिनीभोवती नाजुक धाग्यांनी विणला. असे असले तरी गीतेच्या अभ्यासकाला मात्र कुंडलिनी ''परकी वस्तु'' असल्याचे जाणवल्याशिवाय रहात नाही.

## सहाव्या अध्यायाचे समालोचन

या अध्यायात साधना कशी करावी याविषयी प्राथमिक मार्गदर्शन आहे. योगी माणसाचा आहार व विहार कसा असावा हेही येथे सांगितले आहे. योगी माणसाची साधना कधीही फुकट जात नाही. अर्जुनाने मन ताब्यात रहात नाही अशी जेव्हा श्रीकृष्णाकडे तक्रार केली तेव्हा अभ्यासाने आणि वैराग्याने मन ताब्यात ठेवता येते असे श्रीकृष्णाने सुस्पष्ट केले आहे. स्वतःचा उद्धार स्वतःच करावा असा फार मोठा संदेश या अध्यायात आहे.

❁ ❁ ❁

# १२. ज्ञानविज्ञानयोग (श्लोकसंख्या ३०)

**अध्याय सातवा**

**प्रश्न ९९ पहिल्याच श्लोकात उल्लेखिलेले ज्ञान म्हणजे काय आणि विज्ञान म्हणजे काय ?**

**उत्तर** – या अध्यायात सुरवातीलाच श्रीकृष्णाने अर्जुनास म्हटले आहे की तुझे माझ्या ठिकाणी मन जडले आहे. म्हणून तुला माझे संपूर्ण ज्ञान कसे होईल हे मी स्वतः सांगतो. हे ज्ञान मी तुला विज्ञानासहित सांगतो.

या अध्यायाचे नाव ज्ञानविज्ञानयोग असे आहे. या कारणास्तवही ज्ञान आणि विज्ञान यांतील फरक लक्षात घेणे अगत्याचे आहे.

ज्ञान या शब्दाने अध्यात्मज्ञान म्हणजे आत्म्यासंबंधीचे ज्ञान अर्थात् पर्यायाने ब्रह्मस्वरूपाचे तात्त्विक ज्ञान अपेक्षित आहे. या तात्त्विक ज्ञानाबरोबर अनुभवजन्य ज्ञानही पाहिजे आणि हे अनुभवजन्य ज्ञान म्हणजे विज्ञान होय. परमेश्वराचे विज्ञानासहित ज्ञान झाले तरच आणखी काही जाणावयाचे शिल्लक राहणार नाही. ज्ञान आणि विज्ञान या शब्दांचा असा अर्थ घेतल्यावरच ''परमेश्वराचे ज्ञान झाल्यावर दुसरे काही जाणून घ्यायचे शिल्लक रहात नाही'' ही दुसऱ्या श्लोकातील प्रतिज्ञा सिद्ध होते.

ज्ञान आणि विज्ञान या शब्दांचे अर्थ ठिकठिकाणी निरनिराळे केलेले दिसून येतात. उदा. ज्ञान म्हणजे परमेश्वराचे ज्ञान तर विज्ञान म्हणजे सृष्टीचे ज्ञान. विज्ञान शब्दाचा अर्थ ज्ञानेश्वरांनी प्रपंच असा केला आहे. काही ठिकाणी ज्ञान या शब्दाचा अर्थ ज्ञान असाच दिला आहे. ज्ञान म्हणजे निर्गुण निराकाराचे ज्ञान तर विज्ञान म्हणजे सगुण साकाराचे ज्ञान असे काहींना वाटते. परंतु प्रस्तुत लेखकास असे वाटते की, या अगोदरच्या परिच्छेदात दिलेला अर्थ स्वीकारणे योग्य आहे. परमेश्वराचे तात्त्विक आणि अनुभवजन्य साक्षात्काररूपी ज्ञान झाल्यावर दुसरे काही ज्ञेय शिल्लकच रहात नाही. परमेश्वराच्या ज्ञानात सर्वकाही अंतर्भूत आहे.

**प्रश्न १०० ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न किती माणसे करतात ?**

**उत्तर** – हजारो मनुष्यांमध्ये एखाद्याला परमेश्वराविषयी ज्ञान करून घेण्याची इच्छा होते व तो प्रयत्न करतो. अन्यथा सर्वसाधारण माणसे या अध्यात्मज्ञानाबद्दल उदासीन असलेली दिसून येतात. ज्ञानासाठी प्रयत्न करणाऱ्या अशा अनेक माणसांमध्ये एखाद्यालाच परमेश्वराचे यथार्थ ज्ञान होते. ज्ञानासाठी अखंडित प्रयत्न करणे आवश्यक



आहे. म्हणून जो सातत्याने प्रयत्न करतो त्या साधकालाच ज्ञान होते. प्रयत्न करणाऱ्या अशा विरळ साधकालाच मोठेपणा देऊन सिद्ध असे म्हटले आहे.

**प्रश्न १०१ अष्टधा प्रकृती कोणती की जिला अपरा प्रकृती असेही म्हणतात ?**

**उत्तर** – परमेश्वरापासून सर्व सृष्टी निर्माण झाली आहे. या सृष्टीचे सचेतन आणि अचेतन असे विभाग आहेत. अचेतन सृष्टीला अष्टधा ऊर्फ अपरा प्रकृती म्हटले आहे. ही सृष्टी १) पृथ्वी २) आप ३) तेज ४) वायू ५) आकाश ६) मन ७) बुद्धी आणि ८) अहंकार या आठ तत्त्वांमिळून होते. या आठ तत्त्वांमध्ये पहिली पाच पंचमहाभूते आहेत.

**प्रश्न १०२ परा प्रकृती कोणती ?**

**उत्तर** – परा प्रकृती म्हणजे सचेतन सृष्टी. सर्व जीवसृष्टी म्हणजे परा प्रकृती होय. अचेतन आणि सचेतन या दोन्ही सृष्टी परमेश्वराच्याच परंतु जीव सृष्टीमध्ये चैतन्य प्रकर्षाने जाणवते. परमेश्वराच्या शक्तीमुळेच सजीव सृष्टीचे धारणपोषण होते. परमेश्वराची ही जीवसृष्टी म्हणजे परा प्रकृती. अपरा प्रकृती म्हणजे अचेतन सृष्टी.

**प्रश्न १०३ श्रीकृष्णाने जगाच्या संदर्भात स्वतःविषयी काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – सर्व प्राणिमात्र या दोन प्रकृतींपासून उत्पन्न झाली आहेत आणि या दोन्ही प्रकृतींचे कारण मीच आहे. माझ्यापासूनच हे सर्व जग निर्माण झाले आहे आणि माझ्यातच ते लय पावणार आहे. माझ्यापासून निराळे असे काहीच नाही. जगाला माझ्यापासून निराळे असे अस्तित्व नाही. मी सर्व जग व्यापून राहिलो आहे. ज्याप्रमाणे एखाद्या दोऱ्यात मणी ओवावे त्याप्रमाणे हे चराचर जग माझ्यात ओवलेले आहे.

**प्रश्न १०४ या विश्वात श्रीकृष्ण कोठे कोठे कोणत्या कोणत्या रूपात आहे असे त्याने सांगितले आहे ?**

**उत्तर** – श्रीकृष्ण म्हणजेच परमेश्वर होय. परमेश्वर विविध स्वरूपात ठिकठिकाणी आहे. त्यापैकी काही स्वरूपांचा या अध्यायात पुढीलप्रमाणे उल्लेख आला आहे :-
१) जलामध्ये रसतत्त्व २) चंद्र आणि सूर्य यांच्यामधील प्रभा म्हणजे तेज ३) सर्व वेदांमधील प्रणव म्हणजे ओंकार ४) आकाशामधील शब्द ५) पुरुषांमध्ये पौरुषत्व (पराक्रम) ६) पृथ्वीमध्ये सुवास ७) अग्नीमधील तेज ८) सर्व प्राणिमात्रांमधील जीवनशक्ती ९) तपस्वी लोकांतले तप १०) सर्व प्राणिमात्रांचे सनातन बीज ११) बुद्धिवान लोकांमध्ये बुद्धी १२) तेजस्वी लोकांचे तेज १३) बलवान लोकांचे लोभ व आसक्तीविरहित सामर्थ्य १४) सर्व प्राणिमात्रांत वास करीत असलेली सुखाची इच्छा - परंतु जी धर्माधिष्ठित आहे ती. याशिवाय सात्त्विक, राजस आणि तामस हे तीनही भाव माझ्यापासूनच निर्माण झाले आहेत असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. परंतु या तिघांमध्ये माझे अस्तित्व नाही, तर ते माझ्या आधीन आहेत असे स्पष्ट केले आहे.

**प्रश्न १०५ मायेला कोण तरून जातात ?**

**उत्तर –** हे सर्व जग सत्त्व, रज आणि तम या गुणांनी मोहित झाले आहे. जगातील प्राणिमात्र या तीन गुणांनी व्यापले असल्यामुळे त्यांना माझे खरे आणि शाश्वत रूप समजत नाही. ही माझी त्रिगुणात्मक शक्ती म्हणजे अलौकिक माया होय. या मायेचे उल्लंघन फार मोठ्या कष्टाने करता येते. या मायेचे स्वरूप समजणे कठीण आहे. परंतु जे कोणी मला (म्हणजे परमात्म्याला) शरण येतात त्यांना मायेचे स्वरूप समजते व ते माया तरून जातात असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. माया तरून जाण्याकरिता मला शरण येणे म्हणजे माझी उपासना करणे आवश्यक आहे. परंतु मायेचे स्वरूप न ओळखल्यामुळे ज्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे अशी अविवेकी आणि अनाचारी माणसे माझी उपासना करीत नाहीत असे परत श्रीकृष्णाने सांगितले आहे.

**प्रश्न १०६ चार प्रकारचे भक्त कोणते ?**

**उत्तर –** ईश्वराची भक्ती निरनिराळ्या कारणांकरिता करण्यात येते. जे भक्ती करतात त्यांना भक्त म्हणतात. या अध्यायाच्या १६ व्या श्लोकात उत्तम कार्ये करणाऱ्या अशा चार प्रकारच्या भक्तांचा उल्लेख आला आहे. त्यांचे चार प्रकार पुढीलप्रमाणे आहेत -

**१) आर्त –** जो नानाप्रकारच्या व्याधींमुळे, भयाने वा अन्य कारणाने व्याकुळ झाला आहे आणि केवळ आपत्तीपासून सुटका व्हावी या हेतूने जो भक्ती करतो त्याला आर्त भक्त म्हणतात.

**२) जिज्ञासू –** परमेश्वरी तत्त्व काय आहे हे जाणून घेण्याच्या इच्छेने जो उपासना करतो त्या भक्ताला जिज्ञासू भक्त म्हटले आहे.

**३) अर्थार्थी –** जो भक्त केवळ प्रापंचिक प्राप्तीकरिता परमेश्वराला भजतो त्याला अर्थार्थी भक्त म्हणतात.

**४) ज्ञानी –** ज्ञानी भक्त म्हणजे परमतत्त्वाचे ज्याला ज्ञान झाले आहे असा. वास्तविक पहाता ज्ञानी भक्ताला भक्ती करण्याची काही आवश्यकता नाही. परंतु ज्ञान मिळविण्याकरिता केलेली भक्ती त्याचा स्थायीभावच बनतो. म्हणून तो ज्ञानोत्तरसुद्धा भक्ती करीतच रहातो.

**प्रश्न १०७ या चार प्रकारच्या भक्तांपैकी श्रेष्ठ भक्त कोण ?**

**उत्तर –** चारही प्रकारचे भक्त परमेश्वराला प्रिय आहेत. कारण ते कोणत्यातरी इच्छेने का होईना भक्ती करतात. सामान्य माणसापेक्षा हे भक्त नक्कीच उत्कृष्ट होत. परंतु या सर्वांमध्ये ज्ञानी भक्त श्रेष्ठ आहे. याचे कारण असे आहे की त्याचे चित्त परमेश्वराच्या ठायी स्थिर झालेले असते आणि कोणताही स्वार्थी हेतू त्याच्या भक्तीबरोबर नसतो.

अनेक जन्म भक्ती करीत करीत ज्ञानी भक्त परिपक्व होतो व शेवटी त्याला हे सर्व जग वासुदेवमय (परमेश्वरस्वरूप) आहे याचा अनुभव येतो व तो परमेश्वरासच जाऊन



मिळतो. असा हा ज्ञानी महात्मा फार दुर्मिळ असतो. सर्व भक्तांमध्ये ज्ञानी भक्त श्रेष्ठ असल्यामुळे ज्ञानपूर्वक भक्ती हीच सर्वश्रेष्ठ भक्ती होय.

**प्रश्न १०८ देवदेवतांची सकाम भक्ती करणाऱ्यांबद्दल काय म्हटले आहे ?**

**उत्तर –** सर्वसाधारण माणूस सकाम भक्ती करतो व आपल्या इच्छेच्या पूर्तीसाठी आपल्या जन्मजात स्वभावानुसार विशिष्ट उपासना अथवा उपवास, प्रदक्षिणा, नमस्कार इत्यादि प्रकारांनी आपल्या आवडीच्या देवतेची भक्ती करतो. जो भक्त ज्या देवतास्वरूपाची श्रद्धायुक्त भक्ती करतो त्याची त्या देवतेवरील श्रद्धा मीच दृढ करतो. त्याने केलेल्या स्थिर भक्तीमुळे ती देवता प्रसन्न होऊन त्याची कामना पूर्ण होते. पण खरे पाहता त्याला त्याच्या भक्तीचे फळ मीच त्या देवतेच्या रूपाने दिलेले असते. एखाद्या सामान्य इच्छेच्या पूर्तीसाठी केलेल्या उपासनेचे फळही सामान्य असते व अल्पकाळ टिकणारे असते. ते मोक्षासारखे चिरकाल टिकणारे नसते. जो भक्त ज्या देवतेची उपासना करतो तो त्या देवतेच्या लोकाप्रत जातो. परंतु जो माझी म्हणजे परब्रह्माची उपासना करतो तो मात्र माझ्या श्रेष्ठ आणि अविनाशी पदाला प्राप्त होतो असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

**प्रश्न १०९ सर्वसाधारण माणसाची परमेश्वराबद्दल काय समजूत असते ?**

**उत्तर –** सर्वसाधारण मनुष्यास परमेश्वराचे अविकारी (कधीही न बदलणारे) आणि अनुपमेय असे श्रेष्ठ रूप समजणे कठीण असते. वास्तविक परमेश्वर अव्यक्त असून त्याला मात्र तो व्यक्त झालेला आहे असे वाटते. माझ्या योगमायेमुळे मी सर्वांना सहजपणे आकलन होणारा नाही. मात्र जे ज्ञानी भक्त आहेत त्यांना माझ्या स्वरूपाचे ज्ञान होते असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

हे अर्जुना, मी भूतकाळातील, वर्तमानकाळातील आणि भविष्यकाळातही होणाऱ्या प्राणिमात्रांना जाणतो. परंतु मला कोणीही जाणत नाही. जन्मजात इच्छा, द्वेष यांपासून निर्माण होणाऱ्या सुखदुःखादि द्वंद्वाच्या मोहाने आकर्षित होऊन सामान्य मनुष्य अज्ञानाच्या भोवऱ्यात सापडतो. परंतु ज्यांचे पाप नाहीसे झाले आहे असे सदाचरणी भक्त मोहापासून मुक्त होऊन वार्धक्य आणि मृत्यू यांपासून सुटका व्हावी म्हणून माझी दृढ भक्ती करतात. असे ते ज्ञानी भक्त कर्म, अध्यात्म आणि ब्रह्म यथार्थरूपाने जाणणारे होतात. जे मला अधिभूत, अधिदैवत आणि अधियज्ञ या तिघांसह जाणतात ते अंतकाली सुद्धा स्थिरचित्त राहतात व माझ्यापासून कधीही, वियोग पावत नाहीत असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. (अधिभूत, अधिदैवत आणि अधियज्ञ म्हणजे काय असे प्रश्न आठव्या अध्यायाच्या सुरवातीस अर्जुनाने विचारले आहेत. तेथे या प्रश्नांची उत्तरे देण्यात आली आहेत.)

**प्रश्न ११० सातव्या अध्यायाचे थोडक्यात समालोचन कसे करता येईल.**

**उत्तर** – हा सबंध अध्याय श्रीकृष्णाच्या वचनांनी व्यापला आहे. या अध्यायात अर्जुनाचे श्लोक नाहीत आणि प्रश्नही नाहीत. श्रीकृष्णाने स्वतःहून ज्ञान म्हणजे काय आणि विज्ञान म्हणजे काय हे सांगावयास सुरवात केली आहे. परमेश्वराचे विज्ञानासहित ज्ञान झाले की जाणावयाचे असे काहीही शिल्लक रहात नाही.

परमेश्वराचे ज्ञान मिळविण्यासाठी हजारांत एखादा मनुष्य प्रयत्न करतो आणि अशा असंख्य माणसांपैकी एखाद्याला त्याचे ज्ञान होते. परमेश्वराची परा आणि अपरा म्हणजे अनुक्रमे सचेतन आणि अचेतन अशी दोन प्रकारची प्रकृती आहे. या दोन प्रकृतींमध्ये परा प्रकृती श्रेष्ठ आहे. हे सर्व जग परमेश्वरापासून निर्माण झाले आहे आणि त्याच्यातच ते लय पावणार आहे.

परमेश्वर या विश्वामध्ये निरनिराळ्या रूपात आहे. त्यांपैकी विविध अशा १४ ठिकाणी असलेल्या त्याचे वर्णन या अध्यायात आले आहे. परमेश्वराची भक्ती केल्यामुळे माया तरून जाणे शक्य होते. परमेश्वराची भक्ती करणारे आर्त, जिज्ञासू, अर्थार्थी आणि ज्ञानी असे चार प्रकारचे भक्त असतात. या सर्वांमध्ये ज्ञानी भक्त श्रेष्ठ आहे.

माणसाने कोणत्याही देवतेची उपासना केली तरी त्या उपासनेचे फळ परमेश्वरच देत असतो. परंतु क्षुल्लक गोष्टीसाठी केलेली सकाम उपासना खालच्या दर्जाची आहे आणि तिचे फळ अल्पकाळ टिकणारे असते. मोक्षासारखे शाश्वत टिकणारे नसते. सर्वसाधारण मनुष्य परमेश्वर हा व्यक्त आहे असे समजून उपासना करतो. परंतु ज्ञानी भक्त मात्र त्याहून श्रेष्ठ असे परमेश्वराचे यथार्थ रूप जाणतो व त्याच्यापासून कधीही वियोग पावत नाही.

❀❀❀



# १३.अक्षरब्रह्मयोग (श्लोकसंख्या २८)

**अध्याय आठवा**

या अध्यायाच्या सुरवातीला अर्जुनाने सात प्रश्न विचारले आहेत. तेच प्रश्न येथे घेतले आहेत. त्यांची उत्तरे गीतेमध्ये अगदीच त्रोटक आहेत. परंतु प्रस्तुत लेखकाने ती थोड्या विस्ताराने द्यायचा प्रयत्न केला आहे.

**प्रश्न १११ ब्रह्म म्हणजे काय ?**

**उत्तर** – ब्रह्म म्हणजे अविनाशी श्रेष्ठ तत्त्व एवढेच उत्तर या अध्यायात दिले आहे. ब्रह्मन् या शब्दाची व्युत्पत्ती 'बृंहणात् ब्रह्म' अशी आहे. जे अपरिमित वाढलेले आहे आणि ज्याची वाढ यापुढे उरलीच नाही असे अमर्यादित सर्वत्र पसरलेले चेतन तत्त्व म्हणजे ब्रह्म होय. ज्याच्यापासून सर्व प्राणिमात्रे उत्पन्न होतात, ज्याच्यामुळे ती जिवंत राहतात व ज्यामध्ये ती लय पावतात असे ते तत्त्व म्हणजे ब्रह्म होय. (तैत्ति. उप. ३.१) उपनिषदांचा मुख्य प्रतिपाद्य विषय ब्रह्म हाच आहे.

**प्रश्न ११२ अध्यात्म म्हणजे काय ?**

**उत्तर** – अध्यात्म म्हणजे प्रत्येक वस्तूचा मूळचा स्वतःचा (स्व + भाव) भाव. अध्यात्म शब्दात अधि हा उपसर्ग आहे. अधि हा उपसर्ग ज्या शब्दाच्या संदर्भात वापरला असेल त्यासंबंधी किंवा त्याचे ठायी असणारे, असा अर्थ होतो. अध्यात्म शब्दाचा अर्थ आत्म्यासंबंधीचे शास्त्र असा आहे. अध्यात्म शब्दामध्ये आत्मविषयक सर्व ज्ञानाचा समावेश होतो.

अधि या उपसर्गाचा अर्थ श्रेष्ठ, स्वामी असाही आहे. उदा. अधिपति, अधिराजा इत्यादि.

**प्रश्न ११३ कर्म म्हणजे काय ?**

**उत्तर** – कर्म शब्द येथे परमेश्वराच्या संदर्भात आला आहे. कर्म म्हणजे सर्वसाधारण मनुष्य जे काही कृत्य करतो ते येथे अपेक्षित नाही.

चराचर सृष्टीचे आदिकारण निर्गुण निराकार ब्रह्म आहे. या ब्रह्माच्या सोपाधिक स्वरूपास सगुण ब्रह्म म्हणतात. परमेश्वराने निर्माण केलेली विविध प्राणिमात्रादि चराचर सृष्टी म्हणजे कर्म होय.

**प्रश्न ११४ अधिभूत कोणाला म्हणायचे ?**

उत्तर – सर्व उत्पन्न झालेल्या भूतांची (प्राणिमात्रांची) जी नाशिवंत स्थिती त्या स्थितीस अधिभूत असे म्हणतात. उत्पन्न झालेल्या भूतांचा अधिपति असाही अर्थ करता येईल.

**प्रश्न ११५ अधिदैवत कोणाला म्हणतात ?**

**उत्तर** – सर्व सृष्ट पदार्थांतील सचेतन अधिष्ठाता म्हणजे अधिदैवत होय. हाच शरीरांतर्गत इंद्रियांवर अनुग्रह करणारा होय.

**प्रश्न ११६ अधियज्ञ म्हणजे काय ?**

**उत्तर** – सर्व प्रकारच्या यज्ञांची अभिमानिनी देवता म्हणजे अधियज्ञ होय. अधियज्ञ म्हणजे सर्व यज्ञांचा अधिपति म्हणजे परमेश्वर होय. अधिभूत, अधिदैवत आणि अधियज्ञ ही परमेश्वराची भिन्न रूपे आहेत.

**प्रश्न ११७ अंतकाली कोणाचे स्मरण करावे ?**

**उत्तर** – अंतकाली परमेश्वराचे स्मरण करावे. जो माझे स्मरण करीत देह सोडतो तो निःसंशय मलाच येऊन मिळतो असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. परंतु शेवटच्या वेळी परमेश्वराचे नाव तोंडात येण्यासाठी त्याचे नाव घेण्याची आयुष्यभराची सवय पाहिजे. जर कोणी असे म्हणेल की आम्ही देह सोडताना शेवटच्या क्षणी परमेश्वराचे नाव घेऊ, दररोज घ्यायची काय आवश्यकता ? तर असे होणार नाही. जी गोष्ट आपण कधी केली नाही ती शेवटी अचानक होणे शक्य नाही. याकरिता सदोदित परमेश्वराचे स्मरण केले पाहिजे. अभ्यासाच्या सहाय्याने चित्त स्थिर करून परमेश्वराचे ध्यान केले असता अंतकाळी त्याचे नाव तोंडात येईलच. जो मनुष्य शेवटी त्याची इच्छा करतो त्याला तो जाऊन मिळतो. म्हणून जर शेवटी परमेश्वराची इच्छा केली तर परमेश्वरप्राप्ती होईल.

**प्रश्न ११८ या अध्यायातील कोणत्या श्लोकास ''एकश्लोकी गीता'' म्हणतात व का ?**

**उत्तर** – या अध्यायातील पुढील सातव्या श्लोकास ''एकश्लोकी गीता'' म्हणतात –

**तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युध्य च ।**
**मय्यर्पितमनो बुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ।।**

दोन्ही पक्षांची सैन्ये एकमेकांसमोर जेव्हा युद्धासाठी उभी राहिली तेव्हा अर्जुनास संदेह निर्माण झाला की युद्ध करावे की करू नये. तू युद्ध कर असा स्पष्ट आदेश या श्लोकात कृष्णाने अर्जुनास दिला आहे. आपल्या नातेवाईकांना युद्धात मारल्यावर पाप लागेल या शंकेचेही निरसन माझे स्मरण कर या वचनाने सांगितले आहे. हे स्मरण नित्य कर असे कृष्णाने सांगितले आहे. फक्त युद्धाच्या वेळी किंवा संकटकाळी नव्हे. शिवाय तू मला मन आणि बुद्धी अर्पण कर व कर्म कर म्हणजे तू निःसंशय मला येऊन मिळशील असे श्रीकृष्णाने अर्जुनास अगदी स्पष्ट सांगितले आहे. या वचनामुळे अर्जुनाची पुढची काळजीही दूर झाली. परमेश्वरास जाऊन मिळाल्यावर जन्ममृत्यूच्या फेऱ्यातून सुटका होते व आणखी काहीही करावे लागत नाही.



अर्जुनाला युद्धारंभी ज्या अनेक शंका आल्या होत्या त्यांतील महत्त्वाच्या शंकांचे उत्तर आणि सुस्पष्ट दिलासा या श्लोकात असल्यामुळे या श्लोकास ''एकश्लोकी गीता'' म्हणतात.

**प्रश्न ११९ परमपुरुषाचे वर्णन कसे केले आहे ?**

**उत्तर** – परमपुरुष सर्वज्ञ आहे, पुरातन आहे आणि सर्वांचा शास्ताही आहे. तो अणुपेक्षाही लहान आहे व असे असून तो सर्वांचा आधार आहे. त्याचे स्वरूप नीट न समजण्यासारखे आहे. तो दैदीप्यमान आहे. योगी माणसे अंतकाळी योगबलाने मन स्थिर करून दोन्ही भुवयांच्या मध्ये प्राणशक्ती निश्चल करून परमपुरुषाचे ध्यान करीत त्यास जाऊन पोचतात. याच परमपुरुषास ॐ असेही म्हटले आहे. ॐ हे एकाक्षर ब्रह्म आहे. याचा जप करीत जो देह सोडतो त्यालाही उत्तम गती प्राप्त होते.

**प्रश्न १२० परमेश्वरप्राप्ती कशाने सुलभ होते व नंतर काय होते ?**

**उत्तर** – जो माझे नित्य स्मरण करतो त्यालाच माझी प्राप्ती सुलभतेने होते असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. कधी काळी स्मरण करणाऱ्यास माझी आठवण शेवटी येणार नाही आणि त्यामुळे त्यास उत्तम गती प्राप्त होणार नाही.

मला येऊन मिळाल्यावर पुनर्जन्म प्राप्त होत नाही असे श्रीकृष्णाने अगदी स्पष्ट सांगितले आहे. पुनर्जन्म म्हणजे दुःखाचे घरच होय. एवढेच काय जे लोक स्वर्ग मिळवतात त्यांनासुद्धा परत यावेच लागते. एकदा पुण्य संपले की त्यांचे स्वर्गातील स्थान संपते व त्यांना जन्म घ्यावाच लागतो. परंतु जे परमेश्वरस्वरूप होतात त्यांना पुर्नजन्म नाही व अर्थातच मृत्यूही नाही.

**प्रश्न १२१ ब्रह्मदेवाच्या दिवसाबद्दल काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – ब्रह्मदेवाचा दिवस हा २४ तासांच्या दिवसाहून अगदी भिन्न आहे. तशीच त्याची रात्रही निराळी आहे.

कृत, त्रेता, द्वापर आणि कलि अशा चार युगांमिळून एक महायुग होते व अशी एक हजार महायुगे म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस होतो. अशा दिवसानंतर येणाऱ्या एक हजार महायुगांची एक रात्र होते.

ब्रह्मदेवाचे कार्य सृष्टी निर्माण करणे हे होय. दिवस सुरू झाला असताना सर्व सृष्टीची निर्मिती होते आणि रात्र सुरू झाली की, निर्मिलेल्या सृष्टीचा लय सुरू होतो. अशाप्रकारे सृष्टीची उत्पत्ती आणि लय सारखा चालू असतो.

**प्रश्न १२२ सृष्टीतील घडामोडीच्या पलीकडे असलेले परमस्थान कोणते ?**

**उत्तर** – ज्याला अक्षर म्हणतात असे एक अविनाशी तत्त्व आहे. ते सांख्यांच्या

प्रकृतीपलिकडचे आहे. ते सनातन आहे. सर्व काही नाहीसे झाले तरी ते नाहीसे होत नाही. या विश्वात कितीही बदल झाला तरी त्याच्यात काहीही बदल होत नाही. सर्व प्राणिमात्र ज्याच्यामध्ये आहेत आणि ज्याने हे अखिल जग व्यापले आहे असे ते तत्त्व म्हणजे ब्रह्म होय. हेच परमस्थान होय. ब्रह्मस्वरूपास प्राप्त झाल्यावर पुढे प्राप्तव्य काहीही रहात नाही. हे स्थान अनन्यभक्तीने प्राप्त होते.

**प्रश्न १२३ शुक्ल व कृष्ण या दोन गतींविषयी या अध्यायात काय म्हटले आहे ?**
**उत्तर –** मृत्यूनंतर प्राप्त होणाऱ्या या दोन गती फार प्रसिद्ध आहेत. शुक्ल गतीला देवयान वा अर्चिरादि मार्ग असे म्हणतात. कृष्ण गतीला पितृयाण अथवा धूम्रादि मार्ग असे म्हणण्याचा प्रघात आहे.

शुक्ल गतीने गेलेला योगी परत मृत्युलोकात येत नाही. ही गती म्हणजे अग्नी, ज्योति म्हणजे ज्वाला, दिवस, शुक्लपक्ष व उत्तरायणाचे सहा महिने. या गतीने गेलेला मनुष्य ब्रह्मलोकास पोहोचतो. त्याला क्रममुक्ती मिळते व तो जन्ममृत्यूच्या येरझाऱ्यांतून सुटतो. शुक्लगती म्हणजे प्रकाशमय मार्ग होय.

देवयान मार्गाचे वर्णन कौषीतकी, छांदोग्य आणि बृहदारण्यक उपनिषदांमध्ये आहे. या तीनही उपनिषदांत वर्णिलेल्या मार्गावरील स्थानांमध्ये फरक आहे. परंतु सगळ्यांचे गन्तव्य स्थान मात्र एकच आहे आणि ते म्हणजे ब्रह्मलोक. गीतेमध्ये वर्णिलेला मार्ग सविस्तर दिलेला नाही. उपनिषदांतील तीनही मार्गामध्ये तसेच गीतेमध्ये वर्णिलेल्या मार्गामध्ये स्थानांविषयी एकवाक्यता नाही.

पितृयाण मार्गाने गेलेला मनुष्य मृत्युलोकी परत येतो. अग्नि, धूर, रात्र, कृष्णपक्ष व दक्षिणायनाचे सहा महिने ही या मार्गावरील स्थाने होत. या मार्गाने गेलेला मनुष्य चंद्रलोकात जातो व तेथे पुण्य संपेपर्यंत रहातो. पुण्य संपल्यावर परत मृत्युलोकी येतो. कृष्णगती म्हणजे अंधकारमय मार्ग होय.

योगी मनुष्य व सगुण ब्रह्माचा उपासक देवयान मार्गाने जातो व केवळ कर्म करण्यातच गुंतलेला मनुष्य पितृयाण मार्गाने जातो. या दोन्ही मार्गांतील काल दाखविणारी स्थाने म्हणजे त्या त्या कालाच्या अभिमानी देवता असे प्रतिपादन ब्रह्मसूत्रात केले आहे (४.३.४). असा अर्थ जर घेतला नाही तर दोन्ही गतीतील टप्प्यांचा सुसंगत अर्थ लागणार नाही. याशिवाय ज्याला जीवन्मुक्ती मिळाली आहे त्याने अमुक एक मार्गाने जाण्याचा प्रश्नच येत नाही. तो येथेच आणि या जन्मीच मुक्त झाल्यामुळे त्याला कोठेच जायचे नसते आणि त्याच्याकरिता हे मार्ग नाहीत.



भारतीय युद्धामध्ये भीष्माचार्य शरपंजरी पडले होते व ते देह सोडण्याकरिता उत्तरायणाची वाट पहात होते. त्याकाळी उत्तरायणात देह सोडणे प्रशस्त मानीत असल्यामुळे ते प्रसिद्ध असलेल्या रूढीचे पालन करीत होते. ते इच्छामरणी होते हे सर्वविश्रुत आहेच.

शुक्ल आणि कृष्ण गती अथवा देवयान व पितृयाण मार्ग हे अनुक्रमे योगी व सगुण ब्रह्माच्या उपासकांस तसेच कर्मकांड करणाऱ्यांना मिळतात. परंतु जो यापैकी कोणीही नाही,जो दुराचरणी आहे त्यास तिसरा मार्ग मिळतो. तो मेल्यावर पशु, पक्षी वगैरे तिर्यक् योनीत जन्माला येतो किंवा यमलोकासही जातो व परत परत जन्म घेतो (ब्रह्मसूत्रे - ३.१.१२-२१).

**प्रश्न १२४ आठव्या अध्यायाचे समालोचन कसे करता येईल ?**
**उत्तर –** ८ व्या अध्यायात फक्त २८ श्लोक आहेत व अध्यायाचे नाव अक्षरब्रह्मयोग असे आहे. अध्यायाच्या सुरवातीसच ब्रह्म, अध्यात्म, कर्म, अधिभूत, अधिदैवत आणि अधियज्ञ याविषयी अर्जुनाचे २ श्लोक आहेत. या २ श्लोकांत अर्जुनाने फार मोठ्या विषयांबद्दल प्रश्न विचारले आहेत. मात्र त्यांची उत्तरे अगदी त्रोटक रूपात दिली आहेत.

मृत्युकाळी ज्या देवतेचे आपण स्मरण करतो त्या देवतेस आपण जाऊन मिळतो. परंतु शेवटच्या क्षणी तोंडात परमेश्वराचे नाव येण्यासाठी आयुष्यभर उपासना केली पाहिजे. तरच ते शक्य होईल. जे नित्य भगवंताचे स्मरण करतात त्यांना परमेश्वरप्राप्ती सुलभतेने होते. परमेश्वरप्राप्तीनंतर पुर्नजन्म नाही.

ॐ हे एकाक्षर ब्रह्म आहे. याचा जप करीत जो देह सोडतो त्यास उत्तम गती प्राप्त होते.

ब्रह्मदेवाचा दिवस सुरू झाल्यावर सृष्टी निर्माण होते व रात्र सुरू झाल्यावर सृष्टीचा लय होतो. परंतु या सृष्टीच्या घडामोडी पलीकडे ज्याला अक्षर म्हणतात ते अविनाशी तत्त्व आहे. हेच ब्रह्म होय. हेच सर्वांचे परमस्थान आहे. या स्थानास प्राप्त झाल्यावर पुढे काही मिळवायचे शिल्लक रहात नाही.

मृत्यूनंतर माणसांना शुक्ल आणि कृष्ण गती प्राप्त होतात. योगी माणसे आणि उपासक शुक्ल गतीने जातात. जे केवळ कर्मकांडच करीत राहतात ते कृष्णगतीने चंद्रलोकी जातात व तेथे पुण्य संपेपर्यंत राहून परत मृत्युलोकी जन्म पावतात.

# १४. राजविद्याराजगुह्ययोग (श्लोकसंख्या ३४)

**अध्याय नववा**

**प्रश्न १२५ काय जाणिले असता पापमुक्त होता येईल ?**

**उत्तर** – या अध्यायातील सर्वच्या सर्व ३४ श्लोक श्रीकृष्णाच्या मुखी आहेत आणि त्याने स्वतःहून अर्जुनाला गुप्त ज्ञान मी तुला विज्ञानासहित सांगतो असे म्हटले आहे. ज्ञान आणि विज्ञान हे शब्द पूर्वी (९९ व्या प्रश्नामध्ये) येऊन गेले आहेत. तेथे त्यांचे विवेचन केले आहे. ते अवश्य पहावे. ज्ञान या शब्दाचा अर्थ डॉ. राधाकृष्णन् यांनी येथे सूज्ञपणा असा घेतला आहे तर विज्ञान म्हणजे तपशिलासह अथवा सविस्तर ज्ञान असा केला आहे. परमेश्वराविषयीचे सविस्तर ज्ञान जाणून घेतले असता पापमुक्त होता येईल.

**प्रश्न १२६ राजविद्या म्हणजे कोणती विद्या ?**

**उत्तर** – राजविद्या म्हणजे सर्व विद्यांमधील श्रेष्ठ विद्या. विद्या या शब्दाचा अर्थ उपनिषदांमध्ये परमेश्वरप्राप्तीचा एक मार्ग अथवा उपाय असा आहे. उपनिषदांमध्ये शांडिल्य विद्या, मधुविद्या, उद्गीथविद्या, पंचाग्निविद्या वगैरे विद्या आल्या आहेत. राजविद्या म्हणजे भक्तिमार्ग किंवा व्यक्ताची उपासना असा अर्थ लोकमान्य टिळकांनी केला आहे.

शंकराचार्यांनी राजविद्या म्हणजे ब्रह्मविद्या असे म्हटले आहे. ही विद्या सर्व विद्यांची विद्या आहे आणि श्रेष्ठतम आहे. या विद्येपासून प्राप्त होणारे ज्ञान अर्थात ब्रह्मज्ञान अत्यंत पवित्र, उत्तम आणि धर्मानुसारी आहे. या ज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव येतो. ते कर्मफलाप्रमाणे क्षीण होत नाही. शिवाय हे ज्ञान संपादन करण्यास सुलभ आहे.

**प्रश्न १२७ राजविद्येवर श्रद्धा न ठेवणाऱ्यांची काय गती आहे ?**

**उत्तर** – राजविद्येवर ज्यांची श्रद्धा नाही अथवा विश्वास नाही ते मला येऊन मिळत नाहीत असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. जीवनाची इतिकर्तव्यता म्हणजे शेवटी परमेश्वरास मिळून परमेश्वरस्वरूप होणे अथवा परमेश्वरच होणे होय. जे अश्रद्ध आहेत ते या परमलाभापासून पारखे होतात आणि या संसारचक्रात (परत जन्म आणि परत मृत्यू या दोघांमध्ये) अडकून पडतात.

**प्रश्न १२८ श्रीकृष्णाने प्राणिमात्रांच्या उत्पत्तीविषयी काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – प्राणिमात्र असलेले हे सर्व जग मी माझ्या अव्यक्तरूपाने व्यापले आहे. ही सर्व प्राणिमात्रे माझ्यामध्ये आहेत पण मी फक्त त्यांच्यामध्ये आहे असे नाही. म्हणजे त्यांना



व्यापून मी उरलो आहे, संपलो नाही. म्हटले तर माझ्यामध्ये सर्व प्राणिमात्रे आहेत आणि नाहीतही. सर्वांचा मी पोषणकर्ता आहे. माझे असे हे योगसामर्थ्य तू पहा असे श्रीकृष्णाने अर्जुनास म्हटले आहे.

ज्याप्रमाणे आकाशात नेहमी वायू असतो आणि तो सर्वसंचारी असतो त्याप्रमाणे माझ्यामध्ये सर्व प्राणिमात्रे आहेत. ज्या माझ्या मूळ प्रकृतीपासून त्यांची उत्पत्ती झाली तिच्यामध्ये ती कल्पान्ताच्या वेळी विलीन होतात व परत सृष्टीच्या उत्पत्तीकाळी निर्माण होतात. हे सर्व माझ्याच प्रेरणेने होत असते. सर्व प्राणिमात्रांची उत्पत्ती आणि लय अशाप्रकारे सतत चालू असतो, असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

**प्रश्न १२९ सृष्टीच्या निर्माण आणि लय या कर्मामध्ये परमेश्वर आसक्त होतो का ?**

**उत्तर** – परमेश्वराचे हे कर्म उदासीनपणे चालू असते. तो कोणत्याही प्रकारे उत्पत्ती आणि लय या उभयविध कर्मामध्ये अडकून पडत नाही व आसक्त होत नाही. तो पूर्णपणे अलिप्त राहतो. त्याच्या अध्यक्षतेखाली प्रकृती ही घडामोड करीत असते. प्रकृतीचा अर्थ शंकराचार्यांनी माया असा येथे केला आहे.

**प्रश्न १३० परमेश्वराचे स्वरूप न जाणणारे काय करतात ?**

**उत्तर** – परमेश्वराची लीला मूढ माणसास समजत नाही. त्याने मनुष्यदेह धारण केला की त्याला ते सर्वसामान्य मनुष्य समजतात आणि त्याची अवज्ञा करतात. ज्यांना परमेश्वराचे स्वरूप समजत नाही ते विवेकशून्य लोक राक्षसी स्वभावाचा आश्रय करून कर्मे करतात. म्हणून त्यांची कर्मे निष्फळ होतात. त्यांचा सर्व खटाटोप सत्प्रवृत्तीने प्रेरित झाला नसल्यामुळे व्यर्थ होतो, फुकट जातो.

**प्रश्न १३१ परमेश्वरास जाणणारे महात्मे काय करतात ?**

**उत्तर** – परमेश्वरास जाणणारे महात्मे सत्प्रवृत्त असतात म्हणजे नेहमी त्यांची सत्कार्याकडेच प्रवृत्ती असते. मी सृष्टीचे आदिकारण आहे हे त्यांना माहित असते. ते सदासर्वदा माझ्याच गुणांचे संकीर्तन करतात. ते आपल्या चित्तवृत्तींवर पूर्णपणे नियंत्रण मिळवून मला शरण येतात व माझीच अनन्यभावाने नेहमी उपासना करतात. काही महात्मे माझी एकत्वाने म्हणजे मी एकमेवाद्वितीय आहे या भावनेने उपासना करतात तर काही माझी विविध स्वरूपात उपासना करतात. याशिवाय काही ज्ञानयज्ञानेही मी प्राप्त व्हावा म्हणून उपासना करतात. (ज्ञानयज्ञ म्हणजे परमेश्वराचे ज्ञानाने आकलन करणे) काही झाले तरी सर्व महात्मे माझीच उपासना करतात असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

**प्रश्न १३२ परमेश्वर ठिकठिकाणी कोणत्या स्वरूपांत आहे ?**

**उत्तर** – या अध्यायाच्या १६ ते १९ या चार श्लोकांमध्ये परमेश्वर कोठे कोणत्या स्वरूपात आहे याचे वर्णन आले आहे. श्रीकृष्णाने आपले विविध स्वरूपातील अस्तित्व

पुढीलप्रमाणे सांगितले आहे.

१) मी क्रतु आहे. (क्रतु म्हणजे श्रौत यज्ञ) (इंद्राला शतक्रतु म्हणतात).
२) मी यज्ञ आहे. (स्मार्त यज्ञ)
३) मी स्वधा आहे. (श्राद्धामध्ये पितरांना अर्पण केलेले अन्न)
४) मी औषध आहे. (यज्ञासाठी वनस्पतींपासून उत्पन्न केलेले अन्न)
५) मी मंत्र आहे. (मंत्र यज्ञात म्हटले जातात)
६) मी आज्य आहे. (आज्य म्हणजे तूप, यज्ञामध्ये तुपाची आवश्यकता असते.)
७) मी अग्नि आहे. (यज्ञासाठी अग्नि तर पाहिजेच)
८) मी हुत आहे. (यज्ञात अर्पण केलेल्या आहुति)
९) मी या जगाचा पिता, माता, धाता (आधार) आणि पितामह आहे.
१०) मी पवित्र ओंकार आहे.
११) मी ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद आहे.
१२) मी गति आहे म्हणजे सर्व शेवटी माझ्याकडेच येतात, मी सर्वांचा पोषक, प्रभु, साक्षी, निवास, शरण, मित्र, उत्पत्ति, लय, स्थिति, निधान (कर्मफलांचा निधि) व या जगाचे अव्यय असे बीज मी आहे.
१३) मी ऊन पाडतो.
१४) मी पाऊस पाडतो व आवरतो.
१५) मी अमृत (कधीही मृत न होणारा) आहे व मी मृत्यूही आहे.
१६) मी सत् आहे आणि असत् पण आहे.

परमेश्वर अशा प्रकारे विविध स्वरूपांत आहे.

**प्रश्न १३३ यज्ञ करणाऱ्यांना काय फळ मिळते ?**

**उत्तर** – जे वेदवेत्ते परमेश्वराची यज्ञाद्वारे उपासना करतात ते स्वर्गाच्या प्राप्तीच्या इच्छा करतात व त्यांना स्वर्ग मिळतो. स्वर्गात गेल्यावर त्यांना स्वर्गातल्या देवांप्रमाणे उपभोग प्राप्त होतात. विस्तीर्ण पसरलेल्या स्वर्गात यथेच्छ विहार केल्यावर जेव्हा त्यांचे पुण्य संपते तेव्हा परत ते मृत्युलोकात जन्माला येतात. हे कर्मठ लोक परत यज्ञयाग करून परत स्वर्गात जातात व परत येतात. अशाप्रकारे त्यांचा येरझारा चालू रहातो.

**प्रश्न १३४ उपासना करतात त्यांना काय लाभ होतो ?**

**उत्तर** – अनन्य उपासनेमुळे मी प्रसन्न होतो. जे असे भक्त आहेत त्यांच्या एकनिष्ठ प्रेमाने मी त्यांच्यावर कृपा करतो व त्यांचा योगक्षेम मीच चालवतो. (योग म्हणजे न मिळालेली वस्तु मिळवणे व क्षेम म्हणजे त्या मिळालेल्या वस्तूचे रक्षण करणे. परंतु योगक्षेम याचा सर्वसाधारण अर्थ संसाराबद्दल घ्यावयाची काळजी असा केला जातो.) जे माझे भक्त आहेत त्यांच्या संसाराची काळजी मीच वहातो असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. जे भक्त



श्रद्धायुक्त अंतःकरणाने इतर देवदेवतांची उपासना करतात तेसुद्धा पर्यायाने माझीच उपासना करतात. परंतु ते त्यांना माहिती नसते एवढेच. कोणीही कोणत्याही देवतेकरता यज्ञ केला तरी त्या यज्ञाचा फलदाताच नव्हे तर फलभोक्ताही मीच आहे. मीच परमेश्वर सर्व यज्ञांचा अधिष्ठाता आहे. परंतु सर्वसाधारण माणसे हे जाणीत नसल्याने ते निरनिराळ्या देवदेवतांना उद्देशून यज्ञ करतात व त्यांच्यापासून फळाची अपेक्षा धरतात. त्यांना परमेश्वराचे यथार्थ स्वरूप न समजल्यामुळे त्यांची घसरगुंडी होते असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

**प्रश्न १३५ भक्तिभावाने जे काही परमेश्वरास अर्पण करण्यात येते त्याबद्दल काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – श्रीकृष्णाने असे स्पष्ट केले आहे की, जो कोणी मला पान, एखादे फूल अथवा फळ पण एवढेच काय साधे पाणीही भक्तिभावाने अर्पण करतो ते सर्व काही मी आनंदाने स्वीकारतो. मनोभावाने केलेल्या समर्पणाने मी संतुष्ट होतो. (ईश्वराच्या पूजनाची अगदी सोपी पद्धत येथे सांगितली आहे असे म्हटल्यास वावगे होणार नाही.) म्हणून हे अर्जुना, तू जे जे काही करतोस, जे जे काही भक्षण करतोस, जे काही हवन करतोस, जे काही तप आचरितोस ते सर्व काही मला समर्पण कर. तू असे केल्याने कर्माच्या शुभ आणि अशुभ अशा दोन्ही फलांपासून मुक्त होशील आणि अशाप्रकारे कर्मबंधनातून मुक्त झालेला तू मलाच येऊन मिळशील, असे श्रीकृष्णाने अर्जुनास निश्चयपूर्वक सांगितले आहे.

सर्व काही परमेश्वरास अर्पण करण्याचा आपण निश्चय केला की सर्वसाधारणतः आपल्याकडून सत्कर्मेच होतील. जर का आपल्या हातून एखादे वाईट कर्म घडले तर ते आपण परमेश्वरास कसे अर्पण करणार ? ते अर्पण करण्यात आपल्याला लाज वाटेल. म्हणून उत्तरोत्तर आपल्याकडून वाईट कर्मे होणार नाहीत.

आपण सर्व कर्मे परमेश्वरास अर्पण केल्यावर आपल्याला निश्चिंत रहायला हरकत नाही. कारण त्या कर्मांना अनुरूप अशी फळे तोच देणार आहे. कर्म करून त्या परमेश्वराला अर्पण करून मोकळे व्हावे म्हणजे आपल्यालासुद्धा फार मोकळे वाटेल आणि यायोगे आपल्याला जीवनात फार मोठे सुख प्राप्त होईल. सर्व काही एकदा भगवंताला दिल्यावर आपल्याला कोणत्याही कर्मात अडकायचा प्रश्न येत नाही. परमेश्वर सर्व काही बघून घेईल. जर आपण निश्चयपूर्वक केलेले प्रत्येक कर्म परमेश्वराला अर्पण केले तर आपल्या जीवनात फार बहार येईल असे प्रस्तुत लेखकास वाटते.

**प्रश्न १३६ परमेश्वराची भक्ती करणाऱ्या निरनिराळ्या प्रकारच्या लोकांबद्दल या अध्यायात काय कथन केले आहे ?**

**उत्तर** – एखादा दुराचारी मनुष्य सुद्धा जर काही उपरती होऊन माझी अनन्यभक्ती करू लागला तर त्याला सदाचारी म्हणायला हरकत नाही. कारण सतत भक्ती केल्यामुळे

तो पुढे धर्मात्मा होईल आणि त्याला अक्षय सुख प्राप्त होईल. हे अर्जुना, माझा कोणताही भक्त अधोगतीला जात नाही हे मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो असे श्रीकृष्णाचे वचन आहे. **''न मे भक्तः प्रणश्यति''** या वचनाने सर्व भक्तांना श्रीकृष्णाने फार मोठा दिलासा दिला आहे. परमेश्वराची भक्ती करायला सुरवात केल्यावर साधकाचे पाऊल पुढेच पडते. त्याला मागे परतावे लागत नाही.

श्रीकृष्णाने पुढे म्हटले आहे की स्त्रिया, वैश्य, शूद्र किंवा पापयोनीत जन्मलेली माणसे यांनी माझा आश्रय घेतला, माझी भक्ती केली, तर ते सुद्धा परमगतीला पोहोचतात तर मग जे पुण्यवान् ब्राह्मण आहेत किंवा राजर्षी आहेत त्यांच्याबद्दल काही सांगावयास पाहिजे का ?

स्त्रिया, वैश्य, शूद्र आणि पापयोनीत जन्मलेली माणसे यांना एकाच ओळीत घालून एकाच पारड्यात जोखल्यासारखे वाटेल आणि ते साहजिकच आहे. हल्लीच्या काळी हे पटण्यासारखे नाही. परंतु महाभारतकालीन समाजव्यवस्था पाहिली तर असे दिसून येईल की, वेद किंवा वैदिक वाङ्मय हे सगळ्यांना उपलब्ध नव्हते. परंतु भक्तिमार्ग कोणालाही सहजसाध्य होता आणि तो आचरण्यात कोणतीही आडकाठी नव्हती. वर्णाश्रमधर्माचा येथे निर्बंध नव्हता. तसे इतर मार्गांबद्दल नव्हते. म्हणून श्रीकृष्णाने म्हटले आहे की कोणीही माझी अनन्यचित्ताने भक्ती केली की त्याला परमगती प्राप्त होईल. या अध्यायाच्या ३२ व्या श्लोकात ज्याप्रमाणे स्त्रिया, वैश्य, शूद्र आणि पापयोनीतील माणसे यांचा एकत्रच उल्लेख आहे त्याप्रमाणे पाणिनीच्या एका सूत्रात सुद्धा श्वान, युवान आणि मघवन् (इंद्र) यांचा एकत्र उल्लेख आहे.

**प्रश्न १३७ श्रीकृष्णाने या अध्यायाच्या शेवटी काय उपदेश केला आहे ?**

**उत्तर** - श्रीकृष्णाने अर्जुनास जणुकाही चतुःसूत्रात्मक पुढील उपदेश शेवटच्या ३४ व्या श्लोकात केला आहे -

१) तू माझ्या ठिकाणी मन ठेव.

२) तू माझा भक्त हो.

३) तू मला उद्देशून भजन-पूजन कर आणि

४) तू मला नमस्कार कर.

याप्रमाणे तू मत्परायण झालास की तू मलाच येऊन मिळशील असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. अर्जुनास केलेला हा उपदेश सर्वांसाठी उपकारक आहे. याच अर्थाचा उपदेश पुढे अठराव्या अध्यायात (१८.६५) आला आहे. दोन्ही ठिकाणी श्लोकांची पहिली ओळ सारखीच आहे.



**प्रश्न १३८ या अध्यायाचा सारांश काय आहे ?**

**उत्तर** - या अध्यायाचे नाव राजविद्याराजगुह्ययोग असे आहे. या अध्यायात एकूण ३४ श्लोक आहेत. राजविद्या म्हणजे काय हे प्रथम सांगितले आहे. जे या विद्येवर श्रद्धा ठेवतात ते परमेश्वरासच जाऊन मिळतात.

सर्व जग परमेश्वराच्या अव्यक्त रूपाने व्यापले आहे. असे असले तरी परमेश्वर जग व्यापूनही उरला आहे. सृष्टीच्या निर्माण आणि लय या कर्मामध्ये तो आसक्त होत नाही. तो पूर्णपणे अलिप्त रहातो. परमेश्वराचे स्वरूप सर्वसाधारण माणसास समजत नाही. परमेश्वराने मनुष्यरूप धारण केले की त्याला परमेश्वर मनुष्यच वाटतो व वेळप्रसंगी त्याची अवज्ञाही करतो. परंतु जे महात्मे त्याचे स्वरूप जाणतात त्यांची नेहमी सत्कार्याकडे प्रवृत्ती रहाते व ते सदासर्वदा परमेश्वराचे गुणसंकीर्तन करीत राहतात. परमेश्वर कोणत्या स्वरूपात कोठे आहे याचे वर्णन १६ ते १९ या चार श्लोकांत आले आहे.

यज्ञ करणारे स्वर्गात जातात तर उपासना करणारे परमेश्वरास जाऊन मिळतात. भक्तांचा योगक्षेम परमेश्वर चालवतो. पान, फूल, फळ किंवा साधे पाणीसुद्धा जर परमेश्वराला भक्तिभावाने अर्पण केले तर त्याचा तो आनंदाने स्वीकार करतो. जो कोणी त्याची भक्ती करील तो त्याला जाऊन मिळेल. माझा भक्त कधीही अधोगतीला जात नाही. **(न मे भक्तः प्रणश्यति ।)** असा फार मोठा दिलासा श्रीकृष्णाने सगळ्या भक्तांना दिला आहे. श्रीकृष्णाने शेवटच्या श्लोकात केलेला चतुःसूत्रात्मक उपदेश सर्वांसाठी उपकारक आहे.

❀❀❀

# १५. विभूतियोग (श्लोकसंख्या ४२)

**अध्याय दहावा**

**प्रश्न १३९ श्रीकृष्णाच्या उपदेशाने आनंदित होणाऱ्या अर्जुनाला त्याने परत एकदा काय सांगितले आहे ?**

**उत्तर –** हे अर्जुना, माझी उत्पत्ति देवांनाही माहीत नाही तसेच महर्षींनाही ज्ञात नाही. याचे कारण असे आहे की मीच सर्वांचे आदिकारण आहे. मी अजन्मा आहे आणि मी सर्व विश्वाचा अधिपति आहे. जो मनुष्य मला अशा प्रकारे जाणतो तो मोहाला पार करून जातो व सर्व प्रकारच्या पापांपासून मुक्त होतो.

**प्रश्न १४० परमेश्वरापासून कोणकोणते भाव निर्माण होतात ?**

**उत्तर –** मनुष्यामात्रांच्या ठायी निरनिराळे भाव वास करीत असतात. मनुष्याला निरनिराळ्या भावना वेगवेगळ्या काळी उत्पन्न होत असतात. श्रीकृष्णाने असे म्हटले आहे की हे सर्व भाव, भावना किंबहुना कर्मेही माझ्यापासून उत्पन्न होतात. ती पुढीलप्रमाणे आहेत – १) बुद्धि २) ज्ञान ३) जागरुकता (असंमोह) ४) क्षमा ५) सत्य ६) इंद्रियनिग्रह (दम) ७) शम (मनःशांति) ८) सुख ९) दुःख १०) उत्पत्ति ११) लय १२) भय १३) अभय १४) अहिंसा १५) समत्वबुद्धि १६) संतोष १७) तप १८) दान १९) यश आणि २०) अपयश.

**प्रश्न १४१ सात महर्षि आणि चार मनु परमेश्वरापासून निर्माण झाले, ते कोणते ?**

**उत्तर –** या अध्यायाच्या सहाव्या श्लोकात महर्षींचा आणि मनूंचा उल्लेख आहे. परंतु तेथे नावे दिलेली नाहीत. शंकराचार्यांनी आपल्या भाष्यात भृग्वादि सात महर्षि असे म्हटले आहे. हे सात महर्षि पुढीलप्रमाणे होत – १) भृगु (अंगिरस) २) मरीचि ३) अत्रि ४) पुलस्त्य ५) पुलह ६) क्रतु आणि ७) वसिष्ठ. या सात महर्षींच्या नावांबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आहेत.

गीतेच्या काळापर्यंत चार मनू होऊन गेले होते. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत १) स्वायंभुव २) स्वारोचिष ३) औत्तम आणि ४) तामस.

प्रत्येक सृष्टीच्या आरंभकाली मनु उत्पन्न होतो व त्याच्यापासून सर्व प्राणिमात्रे निर्माण होतात. म्हणूनच माणसाला सुद्धा मनूपासून जन्मलेला म्हणजे मनुज असे म्हणतात.



**प्रश्न १४२ बुद्धियोग कोणाला प्राप्त होतो ?**

**उत्तर –** माझे स्वरूप जाणणारे भक्त फक्त माझ्याच ठिकाणी सदोदित चित्त ठेवतात. ते त्यांचे सारे जीवनच मला अर्पण करतात. त्यांना झालेले माझे ज्ञान ते इतरांना देत असतात आणि माझ्या गुणवर्णनात ते रमून जातात व नेहमी आनंदी रहातात. ते अत्यंत प्रेमपूर्वक माझी उपासना करतात. अशा भक्तांचा मी स्वतःहून उद्धार करतो आणि ते मजप्रत येऊन पोहोचतील अशी बुद्धी त्यांना मी प्रदान करतो. एवढेच नव्हे तर अनुकंपेमुळे व त्यांच्यावरील प्रेमामुळे मी त्यांचे सर्वप्रकारचे अज्ञान नाहीसे करतो. आणि त्यांच्या हृदयात ज्ञानदीप प्रज्वलित करतो, असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

**प्रश्न १४३ विभूति म्हणजे काय ?**

**उत्तर –** या अध्यायाचे नाव विभूतियोग आहे. विभूति म्हणजे परमेश्वराचे अलौकिक सामर्थ्य, विस्तार, त्याचे वास्तव्य असलेले स्थान आणि स्वरूप. परमेश्वर सर्वत्र वास करतो. परंतु त्यापैकी काही महत्त्वाच्या निवासस्थानांविषयी येथे विशेष उल्लेख आहे. विभूति शब्दाचे अर्थ प्रभाव, बळ, कल्याण, भस्म, राख आणि संपत्ति असेही आहेत. या अगोदर सातव्या आणि नवव्या अध्यायांत परमेश्वराच्या विभूतींविषयी (स्वरूपाविषयी) वर्णन आले आहे. जिज्ञासूंनी प्रश्न १०४ व प्रश्न १३२ पहावेत.

**प्रश्न १४४ अर्जुनाने श्रीकृष्णाला त्याच्या विभूति सांगण्याचा आग्रह का धरला ?**

**उत्तर –** अर्जुनाला माहित होते की श्रीकृष्णच परब्रह्म आहे. तोच सर्वश्रेष्ठ आहे. सर्व देवांचा अग्रणी आणि सर्वव्यापक असा तोच आहे. देवर्षि, नारद, असित, देवल आणि व्यास हे सुद्धा श्रीकृष्णालाच पुरुषोत्तम मानतात, हेही अर्जुनाला अवगत होते. असे असले तरी श्रीकृष्णाने स्वतःविषयी स्वतःच सांगणे आणि इतरांनी त्याच्याविषयी सांगणे यात फरक आहे. म्हणून अर्जुनाला श्रीकृष्णाच्या तोंडून त्याच्या विभूति जाणण्याची इच्छा झाली. तो म्हणाला, हे कृष्णा, तुझ्या विभूतींचे वर्णन करण्यास तूच खऱ्या अर्थाने समर्थ आहेस. तुझे चिंतन करण्यासाठी तू कोठे कोठे आहेस आणि कोणकोणत्या स्वरूपात आहेस हे तूच मला स्वतः विस्तारपूर्वक सांग.

**प्रश्न १४५ श्रीकृष्णाने कोणत्या आत्मविभूति सांगितल्या आहेत ?**

**उत्तर –** अर्जुनाची विनंती श्रीकृष्णाने मान्य केली आणि स्वतःच्या निवडक दिव्य विभूति त्याला सांगितल्या. सर्व विभूति सांगणे शक्य नाही कारण त्याच्या विभूतींना अंतच नाही. श्रीकृष्णाने आपल्या पुढील विभूति सांगितल्या आहेत.

१) सर्व प्राणिमात्रांच्या अंतर्यामी असलेला आत्मा.

२) सर्व भूतांचा आदि (उत्पत्ति), मध्य (स्थिती) आणि अंत (लय).

३) आदित्यांमधील विष्णु (आदित्य वैदिक देवता आहेत. तैत्तिरीय आरण्यकात

(१-१३) दिलेल्या बारा आदित्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

१) अंशुमान २) अर्यमा ३) इंद्र ४) विष्णु ५) त्वष्टा ६) धाता
७) पूषन् ८) भग ९) मित्र १०) वरुण ११) विवस्वान् १२) सविता)

४) तीन वेदांमधील सामवेद. (ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद हे तीन वेद होत. चौथ्या अथर्ववेदाला पुष्कळ कालपर्यंत मान्यता मिळाली नव्हती.)

५) देवांमधील इंद्र

६) इंद्रियांमधील मन

७) प्राणिमात्रांतील चेतना

८) रुद्रांमधील शंकर (शिव)

एकूण रुद्र अकरा आहेत.

एकादश रुद्रांची नावे - १) अजैकपाद २) अहिर्बुध्य ३) ईश्वर ४) कपाली ५) कपर्दी ६) त्र्यंबक ७) महेश्वर ८) पिनाकी ९) मृगव्याध १०) वृषाकपि ११) शंकर (शंभु, भव, शर्व इ.)

कलियुगातील रुद्रांची नावे - १) भूतेश २) नीलरुद्र ३) कपाली ४) वृषवाहन ५) त्र्यंबक ६) महाकाल ७) भैरव ८) मृत्युंजय ९) कामेश १०) योगेश ११) शंकर.

अकरा रुद्र असल्यामुळे रुद्राची एकादशिनी म्हणजे रुद्राचे अकरा वेळा आवर्तन करण्याची प्रथा असावी. गणपतीवर एकादशिनी करताना अथर्वशीर्षाची एकवीस वेळा आवर्तने करतात.

९) यक्ष आणि राक्षस यांच्यामधील कुबेर.

१०) वसूंमधील पावक वसू आठ आहेत. त्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत - १) अनल (पावक) २) अनिल ३) आप ४) धर ५) ध्रुव ६) प्रत्यूष ७) प्रभास ८) सोम.

११) शिखरे असलेल्या पर्वतांमधील मेरू पर्वत.

१२) पुरोहितांमधील बृहस्पति

१३) सेनाध्यक्षांमध्ये स्कंद (कार्तिकस्वामी)

१४) जलाशयांमधील सागर

१५) महर्षींमध्ये भृगु

१६) वाणीमधील एकाक्षर ओंकार

१७) यज्ञांमधील जपयज्ञ

१८) स्थावर म्हणजे स्थिर पदार्थांतील हिमालय

१९) सर्व वृक्षांमधील अश्वत्थ वृक्ष (पिंपळ)



२०) देवर्षींमधील नारद

२१) गंधर्वांमधील चित्ररथ

२२) सिद्ध पुरुषांमधील कपिल मुनि

२३) अश्वांमधील उच्चैःश्रवा (समुद्रमंथनातून हा वर आला.)

२४) गजेंद्रांमध्ये इंद्राचा ऐरावत

२५) मनुष्यांमधील नृप(राजा)

२६) आयुधांमधील इंद्राचे वज्र

२७) धेनूंमधील कामधेनू

२८) प्रजोत्पादन करणाऱ्यांमधील मदन

२९) सर्पांमधील वासुकी(सर्पांचा राजा) (सर्प विषारी असतो व त्याला एकच फणा असतो असे म्हणतात.)

३०) नागांमधील अनंत (शेषनाग) (नाग हा विषारी नसतो. त्याला एकाहून अधिक फणा असतात असे म्हणतात.)

३१) जलदेवतांमधील वरुण

३२) पितरांमधील अर्यमा

३३) नियमन करणाऱ्यांमधील यम (प्राणिमात्रांच्या पापपुण्याप्रमाणे फलांचे नियमन करणारा)

३४) दैत्यांमधील प्रल्हाद

३५) ग्रासणाऱ्यांमधील काल

३६) पशूंमधील सिंह

३७) पक्षांमधील गरुड

३८) वेगवानांत वायु

३९) शस्त्र धारण करणाऱ्यांमधील राम (दाशरथी राम)

४०) जलचर प्राण्यांमधील मगर

४१) नद्यांमधील गंगा नदी

४२) सृष्टीमात्रांतील (उत्पन्न झालेल्या वस्तुंमधील) आदि, मध्य व अंत

४३) विद्यांमधील अध्यात्मविद्या

४४) वाद करणाऱ्यांमधील वाद

४५) अक्षरांमधील अकार

४६) समासांमधील द्वंद्व समास

४७) अनादिकालापासून पुढे चालणारा काल

४८) सृष्टीचे धारणपोषण करणारा

४९) सर्व काही हरण करणारा मृत्यु
५०) भविष्यकाळी उत्पन्न होणाऱ्यांचे उत्पत्तिकारण
५१) स्त्रीसमूहांपैकी कीर्ती, सौंदर्य, वाणी, स्मृति, मेधा (धारणाशक्ति), धृति आणि क्षमा.
५२) सामसूक्तांमधील बृहत्साम
५३) वैदिक छंदांमधील गायत्री छंद
५४) बारा महिन्यांमधील मार्गशीर्ष महिना (फार पूर्वी नववर्षाची सुरवात मार्गशीर्ष महिन्यापासून होत असावी.)
५५) ऋतूंमधील वसंत ऋतु
५६) कपटाने खेळणाऱ्यांचे द्यूत
५७) तेजस्वी लोकांचे तेज
५८) जय (विजय)
५९) निश्चयी पुरुषांचा निश्चय (व्यवसाय)
६०) सत्त्वशीलांचे सत्त्व
६१) यादवांमध्ये वासुदेव
६२) पांडवांमध्ये धनंजय (अर्जुन)
६३) मुनींमधील व्यास
६४) कवींमध्ये उशना कवि (शुक्राचार्य)
६५) शासन करणाऱ्यांचा दंड
६६) प्रतिपक्षावर विजय मिळविणाऱ्यांचे विजयसाधन (राजनीतिशास्त्र)
६७) गुह्य गोष्टींमधील गौप्य
६८) ज्ञानी लोकांमधील ज्ञान
६९) सर्व प्राणिमात्रांचे आदिबीज

अशाप्रकारे श्रीकृष्णाने अर्जुनाला आपल्या विभूति सांगितल्या आणि म्हटले की माझ्या दिव्य विभूतींना अंतच नाही. परंतु केवळ तुझ्याकरिता मी माझ्या विभूतींचा विस्तार सांगितला. थोडक्यात कोणतीही वस्तू किंवा प्राणी की जी वैभव, लक्ष्मी आणि बलयुक्त आहे ती माझ्याच तेजाच्या अंशापासून निर्माण झाली आहे असे समज. श्रीकृष्ण पुढे म्हणाला की, हे अर्जुना,तू माझ्या विभूति याहून अधिक विस्ताराने ऐकल्यास तरी त्याचा तुला काय उपयोग ? याचे कारण असे आहे की मी हे सर्व जगच मुळी माझ्या दैवी शक्तीच्या अंशाने धारण करून राहिलो आहे. (ती सगळीकडे असल्याने माझ्या विभूतींची यादी कधीही न संपणारी आहे.)



**प्रश्न १४६ या विभूतियोग अध्यायाचे समालोचन कसे करता येईल ?**

**उत्तर** – श्रीकृष्णाने सुरवातीलाच मी सर्वांचे आदिकारण आहे असे सांगितले. तसेच त्याच्यापासून उत्पन्न होणारे वीस भावही सांगितले. सर्व प्राणिमात्रांच्या ठायी विविध भावनां परमेश्वरच उत्पन्न करतो. सात महर्षि आणि चार मनु पण माझ्यापासूनच उत्पन्न झाले आहेत, असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

जे परमेश्वराच्या गुणवर्णनात रमून जातात त्यांचा स्वतःहून परमेश्वर उद्धार करतो. त्यांच्या हृदयात तोच ज्ञानदीप प्रज्वलित करतो की जेणे करून ते त्यालाच जाऊन पोहोचतात.

विभूति म्हणजे परमेश्वराचे अलौकिक रूप. अर्जुनाला माहित होते की श्रीकृष्ण हाच सर्व काही आहे. परंतु त्याने त्याला स्वतःच्या तोंडून स्वतःच्या विभूति सांगण्याचा आग्रह केला आणि त्याने तो पुरवला. विभूतींची यादी लांबलचक आहे. या विभूती मधून परमेश्वर कोठे कोठे आहे याची कल्पना येते. जे जे काही उत्तम आणि उदात्त आहे ते सर्व काही परमेश्वराच्या दिव्य अंशाचेच प्रतीक आहे. परमेश्वराच्या विभूतींना अंत नाही. थोडक्यात सर्व जगच मुळी त्याच्या दैवी शक्तीच्या अंशाने भरून राहिले आहे.

# १६. विश्वरूपदर्शनयोग (श्लोकसंख्या ५५)

अध्याय अकरावा

**प्रश्न १४७ अर्जुनाने या अध्यायाच्या सुरवातीस श्रीकृष्णास काय विनंती केली आहे ?**
**उत्तर** – श्रीकृष्णाने अर्जुनास दुसऱ्या अध्यायापासून उपदेशास सुरवात केली आहे. हा उपदेश अध्यात्मशास्त्रातीलच होय. या उपदेशामध्ये श्रीकृष्णाने आत्म्याचे स्वरूप, ब्रह्म, कर्मयोग, स्वतःच्या विविध विभूती इत्यादि अनेक विषय हाताळले. परमेश्वराचे सर्वस्पर्शी वर्णन ऐकून अर्जुनाला ते रूप पहाण्याची इच्छा झाली. तो म्हणाला हे श्रीकृष्णा, माझ्यावर कृपा करण्यासाठी तू मला ज्याला अध्यात्म म्हणतात त्याविषयी उपदेश केलास आणि त्यामुळे माझा मोह नाहीसा झाला आहे. प्राणिमात्रांची उत्पत्ती आणि त्यांचा लय याविषयीही मी तुझ्यापासून सर्व काही ऐकले. परंतु हे सर्व जरी ऐकले असले तरी हे तुझे अतर्क्य आणि अद्भुत रूप कसे आहे हे मला प्रत्यक्ष पहाण्याची इच्छा झाली आहे आणि तुला जर शक्य असेल तर तुझे रूप मला दाखव अशी अर्जुनाने श्रीकृष्णास विनंती केली.

हा अध्याय गीतेच्या १८ अध्यायांपैकी फार लोभस आहे कारण यामध्ये परमेश्वराच्या विश्वरूपाचे वर्णन आहे. परमेश्वराचे हे रूप अर्जुनाने प्रत्यक्ष पाहिले. परमेश्वराच्या रूपाचा स्पर्श या अध्यायास झाला आहे आणि साहजिकच हा अध्याय म्हणजे श्रीकृष्णाच्या भक्तांना एक अमोल ठेवा वाटतो. हा अध्याय वाचताना मन मोहून जाते. परमेश्वराच्या अद्भुत रूपाचे वर्णन चित्त थरारून टाकते. लोकमान्य टिळकांनी गीतारहस्यात म्हटले आहे की – ''हे वर्णन इतके सरस आहे की गीतेच्या उत्तम भागात याची गणना होत असून इतर गीता रचणाऱ्यांनी त्याचेच अनुकरण केले आहे.''

अर्जुनाची श्रीकृष्णावर जशी भक्ती होती तशीच श्रीकृष्णाचीही अर्जुनावर अपरंपार प्रीती होती. त्याच्या प्रीतीचे फळ म्हणजेच त्याने अर्जुनाला दिलेले विश्वरूपदर्शन. तो पांडवांमधील धनंजय होता.

**प्रश्न १४८ श्रीकृष्ण आपल्या विविध रूपांबद्दल काय म्हणाला व ती रूपे अर्जुनास पहाता यावी म्हणून त्याने काय व्यवस्था केली ?**
**उत्तर** – माझी नाना प्रकारची रूपे आहेत. विविध रंगांची आणि ढंगांची शेकडो काय पण हजारो आकारांची दिव्य स्वरूपे तू पहा. माझ्या या रूपामध्ये आदित्य, वसू, रुद्र,



अश्विनीकुमार त्याचप्रमाणे मरुद्‌गण आहेत. हे भारता, तू कधीही अजूनपर्यंत पाहिली नसशील अशी अपूर्व आश्चर्ये पहा. हे पार्था, माझ्या ठिकाणी हे सर्व चराचर विश्व एकवटले आहे. तुला जे जे काही पहायची इच्छा झाली असेल ते सर्वकाही माझ्या देहात तू पाहून घे, असे श्रीकृष्ण अर्जुनास म्हणाला.

आपले हे ईश्वरी रूप अर्जुनाला चर्मचक्षूने पहाता येणार नाही हे श्रीकृष्णास माहित होते म्हणून त्याने स्वतःहून त्यास दिव्य दृष्टी दिली आणि त्या दृष्टीने त्याचे विराट रूप त्याने पहावयास सांगितले.

श्रीकृष्णाने अर्जुनास दिव्य दृष्टी दिली म्हणूनच त्याला ईश्वरी रूप पहाता आले. दिव्य दृष्टी दिल्याचा उल्लेख असलेला श्लोक पुढीलप्रमाणे आहे –

**न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ।**
**दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ।।११.८**

या श्लोकातील ''दिव्य चक्षु'' या शब्दांच्या अर्थाची काहींनी ओढाताण केलेली दिसते. विशेषतः शक्तिपात मार्गावर श्रद्धा असलेल्यांना असे वाटते की ''मी तुला दिव्य दृष्टी देतो'' असे म्हणून श्रीकृष्णाने अर्जुनाच्या ठायी शक्तिपात केला आणि म्हणूनच अर्जुन श्रीकृष्णाचे विराट रूप पाहू शकला. परंतु अशा प्रकारचा अर्थ श्रीमद्‌आद्यशंकराचार्यांनी घेतलेला नाही. त्यांनी त्याचा शक्तिपाताशी संबंध जोडलेला नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे. दिव्य दृष्टी देण्याची परंपरा महाभारतकाळी अस्तित्वात होती. महाभारत युद्धाच्या सुरवातीस व्यास धृतराष्ट्राकडे गेले होते व त्यांनी तुला युद्ध पहायची इच्छा असल्यास मी दिव्य दृष्टी देतो असे म्हटले होते. परंतु स्वतःच्या कुलाचा नाश पहाणे शक्य होणार नाही म्हणून त्यांनी ती दिव्य दृष्टी आपल्या संजय नावाच्या सूतास देण्यास सांगितली. त्याप्रमाणे व्यासांनी ती दृष्टी संजयास दिली व त्याने राजवाड्यात बसल्या बसल्याच युद्धाची हकीकत धृतराष्ट्रास सांगितली असे भीष्मपर्वात म्हटले आहे. म्हणून दिव्य दृष्टीचा शक्तिपाताशी काही संबंध नाही असे म्हणता येते.

**प्रश्न १४९ श्रीकृष्णाने अर्जुनाला दाखवलेले श्रेष्ठ ईश्वरी रूप कसे होते ?**
**उत्तर** – श्रीकृष्णाने दिलेल्या दिव्य दृष्टीच्या द्वारे अर्जुनाने ईश्वरी रूप पहाण्यास सुरवात केली. परमेश्वराचे हे रूप अतिशय अद्भुत होते. कारण या रूपाला विशिष्ट असा आकार नव्हता. अनेक मुखे आणि अनेक डोळे त्याला होते. त्या आकारावर अनेक दिव्य अलंकार होते. दिव्य आयुधांची रेलचेल होती. कितीतरी पुष्पहार होते आणि अमर्याद अशा त्या रूपावर विविध वर्णांची आणि आकारांची वस्त्रे होती. नाना प्रकारची आश्चर्ये या रूपातच दिसून येत होती. सुगंधी उटी त्या शरीराला लावलेली होती. तेज तर असे

भारी होते की आकाशात एका वेळी जर हजारो सूर्य प्रकट झाले तर त्यांची जेवढी प्रभा सगळीकडे फाकेल तसे होते. जिकडे पहावे तिकडे त्या रूपास तोंडे होती. सगळीकडे तोंडेच तोंडे होती. ते रूप अमर्यादपणे पसरले होते. ते इतके अतिविशाल होते की ज्याची कल्पनाच करता येणे शक्य नाही कारण जे कधी कोणी पाहिले नाही किंवा यापुढे कोणाला कधी पहायला मिळणार नाही अशा त्या रूपाकडे पाहिल्यावर क्षणोक्षणी आश्चर्य वाटावे असे ते ईश्वरी रूप होते. त्या देवदेवाच्या शरीरात अनेक ठिकाणी विभागले गेलेले जग एकाच ठिकाणी संयुक्त झालेले होते. जगातले सर्व भेदाभेद एकत्र जणुकाही तेथे आले होते. या रूपाची अर्जुनाला नीट कल्पनाच करता आली नाही. तो विस्मयचकित झाला. त्याच्या अंगावर रोमांच उभे राहिले आणि अशा भयचकित अवस्थेमध्ये सर्वसाधारण मनुष्य जे करतो तेच अर्जुनाने केले. त्याने हात जोडून अतिशय नम्रतेने श्रीकृष्णास नमस्कार केला.

**प्रश्न १५० अर्जुनाने श्रीकृष्णाच्या ईश्वरी देहात काय काय पाहिले ?**

**उत्तर** - अर्जुनाने श्रीकृष्णास नमस्कार करून त्यास स्वतःहून त्याने काय काय पाहिले हे सांगावयास सुरवात केली. अर्जुन म्हणाला, ''हे श्रीकृष्णा तुझ्या या विशाल विश्वरूप देहामध्ये मला सगळे देव एकत्र दिसत आहेत. अर्थात ब्रह्मदेवही आहे. सगळ्या प्राणिमात्रांचे समूह आहेत. कितीतरी ऋषी आणि सर्पसुद्धा दृष्टिपथात येत आहेत. हे जगदीशा, तुझ्या या विराट रूपास अनेक हात आहेत, अनेक उदरे आहेत, अनेक मुखे आणि अनेक नेत्र आहेत. हे विश्वेश्वरा, तुझ्या या रूपाचा मला आरंभ, मध्य आणि शेवट दिसत नाही. मात्र तू किरीट, गदा आणि चक्र धारण केले आहेस असे मला समजते आहे. तरी पण तुझ्या या शरीराच्या सर्व बाजू तळपणाऱ्या अग्नीने प्रज्वलित झाल्या आहेत. त्यामुळे तुझे हे रूप नीट निरखून पहाता येत नाही.

हे अनंतमूर्ते, तूच सर्वांनी जाणावयाचे असे अविनाशी तत्त्व आहेस. या विश्वाचे आश्रयस्थान तूच आहेस, तूच आधार आहेस, तूच निर्विकार आहेस, तूच धर्माचे पालन करतोस, तूच सनातन परमात्मा आहेस, अपरंपार सामर्थ्य तुझ्या ठिकाणी भासमान होत आहे. तुझ्या शरीराचाच पसारा अफाट आहे. चंद्र व सूर्य म्हणजे तुझे उज्ज्वल डोळे आहेत असे वाटते. तुझ्या अग्निमय मुखाने सगळे काही तापून निघत आहे. सगळ्या दिशा तुझ्या या रूपाने भरून गेल्या आहेत. हे महात्मन्, तुझ्या या उग्र रूपाने त्रैलोक्याची धांदल उडाली आहे. तुझे हे रूप केवळ अलौकिक परंतु रौद्र आहे.

हे श्रीकृष्णा, तुझ्या रूपामध्ये देवांचे समूह प्रवेश करीत आहेत. त्यातले तर काहीजण घाबरलेले आहेत व त्यांनी तुला दोन्ही हात जोडले आहेत व तुझे गुणगान करण्यास प्रारंभ केला आहे. मांगल्यगीतांनी ते परोपरीने तुला आळवत आहेत. महर्षींचे



संघसुद्धा 'स्वस्ति स्वस्ति' असे म्हणून तुझी स्तुतिगीते गात आहेत. तुझ्या रूपाकडे विस्मयचकीत होऊन जे पहात आहेत त्यांमध्ये रुद्र, आदित्य, वसु, साध्य, विश्वेदेव, अश्विनीकुमार, मरुद्गण, गंधर्व, यक्ष, असुर व सिद्ध आहेत.

हे महाबाहो, तुझे रूप फार मोठे आहे. अनेक मुखे, डोळे, हात, पाय, मांड्या, उदर आणि दाढा असल्यामुळे तुझे रूप फारच अक्राळविक्राळ दिसत आहे. असे हे विराट आणि भयानक रूप पाहून त्रैलोक्य भ्यायले आहे, व्याकुळ झाले आहे. माझी तर पार त्रेधा तिरपीट उडाली आहे.

हे श्रीकृष्णा, तुझे रूप आकाशाला जाऊन भिडले आहे. ते अनेकरंगी आहे. त्यामध्ये अनेक उघडलेले जबडे आहेत. डोळे तर विशाल आहेत आणि प्रदीप्त अग्नीप्रमाणे आहेत. या सगळ्या चित्रविचित्र रूपाने माझी धारणाशक्तीच नाहीशी झाली आहे. मी माझा राहिलो नाही. माझी मनःशांती तर पार पळून गेली आहे. हे जगन्निवासा, तुझे हे अक्राळविक्राळ रूप भीतिदायक आहे. केवळ कल्पांताचीच उपमा त्याला देता येईल. सर्वांचा विनाश अगदी समीप आला आहे असे वाटते. मी संपूर्ण दिङ्मूढ झालो आहे. माझे सुख दूर निघून गेले आहे. मी अशांत झालो आहे. माझे चित्त सैरभैर झाले आहे.हे देवेशा, तू प्रसन्न हो, अशी अर्जुनाने श्रीकृष्णास अगदी अगतिक होऊन विनंती केली.

**प्रश्न १५१ अर्जुनाने श्रीकृष्णाच्या ईश्वरी रूपामध्ये आणखी काय पाहिले ?**

**उत्तर** - देव, गंधर्व, यक्ष, राक्षस इत्यादि विविध योनी अर्जुनाने श्रीकृष्णाच्या ईश्वरी रूपात पाहिल्याच परंतु त्याला विविध मानवी रूपेही दिसली. आपले सगेसोयरेही दिसले. अर्जुन म्हणाला, हे श्रीकृष्णा, तुझ्या या ग्रासणाऱ्या मुखामध्ये धृतराष्ट्राचे सर्वच्या सर्व पुत्र प्रवेश करीत आहेत. एवढेच नाहीतर माझ्या पक्षातीलही अनेक राजे तुझ्या मुखामध्ये अंतिम प्रवेश करीत आहेत. तुझ्या या भयंकर मुखामध्ये पितामह भीष्मसुद्धा शिरत आहेत. त्यांच्याबरोबर द्रोणाचार्य आहेत आणि कर्णही आहे. काहींची तर फारच दुरवस्था झाली आहे. काही वीर तुझ्या दातांच्या फटीतच अकडून पडल्याने त्यांची मस्तके विदीर्ण झाली आहेत. ज्याप्रमाणे वेगाने वाहणाऱ्या नद्या शेवटी समुद्राकडेच झेपावतात त्याप्रमाणे हे सगळे शूर वीर, योद्धे, रथी, महारथी तुझ्या धगधगणाऱ्या मुखामध्ये शिरत आहेत. ज्याप्रमाणे पेटणाऱ्या ज्योतीमध्ये पतंग आवेगाने उड्या घेतात व मरून जातात, अगदी त्याचप्रमाणे हे सगळे योद्धे तुझ्या मुखामध्ये स्वतःची आहुती देत आहेत आणि तू सुद्धा त्यांना गिळण्याकरिता अगदी जिभा चाटीत आहेस. तुझ्या ज्वालांच्या उष्णतेने हे श्रीकृष्णा, सर्व काही भाजून निघत आहे. हे श्रेष्ठ देवा, आता मी माझा राहिलो नाही. माझी धारणाशक्ती संपली. मी तुला नमस्कार करतो. तू माझ्यावर कृपा कर. एकाएकी भयाण रूप धारण केलेला तू कोण आहेस ? तू असे रूप का धारण केलेस ? मला सत्वर सांग. मला काहीच कळत नाहीसे झाले आहे. मी हतबुद्ध झालो आहे. हे देवाधिदेवा,

तू माझी विनंती लवकर स्वीकार आणि तू कोण आहेस हे मला सांग.

**प्रश्न १५२ तू कोण आहेस ? या अर्जुनाच्या प्रश्नास श्रीकृष्णाने काय उत्तर दिले ?**

**उत्तर -** श्रीकृष्ण म्हणाला, हे अर्जुना, मी सगळ्यांचा अंत करणारा पुरातन काळ आहे. सगळ्यांचे भक्षण करण्यास मी सिद्ध झालो आहे. तुझ्या शत्रुपक्षातील जे योद्धे आहेत ते सर्व मृत्युमुखी पडणारच आहेत. तू युद्ध कर अगर करू नकोस, त्यांचा मृत्यू हा ठरलेलाच आहे. याकरिता हे अर्जुना, तू ऊठ, तुझी गर्भगळित अवस्था झिडकारून टाक. तू युद्धाला सज्ज हो आणि यशाचा धनी हो. तू त्यांना मारण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. कारण मी त्यांना अगोदरच मारले आहे. म्हणून तू त्यांना मारून निष्कंटक पृथ्वीचे राज्य उपभोग. हे सव्यसाची, तू युद्ध कर. द्रोण, भीष्म, जयद्रथ, कर्ण वगैरे जे प्रतिपक्षात वीर आहेत व जे अन्य वीर आहेत त्यांना मी अगोदरच मारले आहे. त्यांना तू फिरून मार. हे अर्जुना, तू दुःखी होऊ नकोस, त्यांना मारण्यास तू केवळ निमित्तमात्र हो. तू युद्ध कर आणि विजयी हो.

**प्रश्न १५३ श्रीकृष्णाचे उत्तर ऐकून अर्जुन त्यास परत काय म्हणाला ?**

**उत्तर -** श्रीकृष्णाने जरी अर्जुनाला वस्तुस्थिती समजावून सांगितली होती तरी त्याची भीती पळाली नव्हती. तो थरथर कापत होता. त्याचा कंठ भरून आला होता. तो विनम्र स्वराने म्हणाला, हे श्रीकृष्णा, तुझ्या गुणगौरवाने केवळ सर्व जग आनंदित होत नाही तर ते तुझ्यावर अनुरागाने आसक्त होते. राक्षस तर पळून जातात आणि सिद्धसमूह तुला वंदन करतात आणि हे योग्यच आहे कारण हे वासुदेवा, तुझ्यासारख्या सर्वसमर्थास कोण बरे वंदन करणार नाही ? तू गुरूंचा गुरू आहेस. तू ब्रह्मदेवाचेही आदिकारण आहेस. हे जगन्निवासा, तू व्यक्त आणि अव्यक्ताच्या पलीकडे आहेस. तू अक्षर आहेस, अविनाशी आहेस. तू आदिदेव आहेस. तू पुरातन आत्मा आहेस. या जगाचा अंतिम आसरा (आश्रयस्थान) तू आहेस. हे अनंतरूपा, तूच सर्वज्ञ आहेस. जे काही जाणावयाचे आहे म्हणजे ज्ञेय ते तूच आहेस. तूच अंतिम विश्रामधाम आहेस. तू विश्वव्यापी आहेस. वायू, यम, अग्नि, वरूण व चंद्र इत्यादि समस्त देव तूच आहेस. तू प्रजापति आहेस आणि त्याचाही जनक आहेस. हे अनंतमूर्ते, तुला हजारवेळा नमस्कार असो. तुला पुनरपि नमस्कार आणि नमस्कार असो. हे सर्वात्मका, तुला पुढून नमस्कार असो आणि पाठीमागूनही नमस्कार असो. तुझा उत्साह आणि सामर्थ्य अपरंपार आहे. हे बलशाली देवा, तूच रे सर्व काही आहेस. तुझ्याच पोटात सर्व काही सामावलेले आहे. हे थोरल्या देवा, तुला पुन्हा पुन्हा नमस्कार असो.

**प्रश्न १५४ अर्जुनाने श्रीकृष्णास काय विनंती केली ?**

**उत्तर -** श्रीकृष्ण अर्जुनाचा मित्र होता. परंतु श्रीकृष्णाचे विश्वरूप पाहिल्यावर अर्जुनाला त्याची चूक कळून आली. त्याच्यामध्ये आणि श्रीकृष्णामध्ये केवढे अंतर होते याची त्याला जाणीव झाली आणि अर्जुन म्हणाला, हे कृष्णा, तुझा महिमा मला समजला



नव्हता, मी तुला माझा केवळ मित्र समजून तुझ्याशी बरोबरीच्या नात्याने वागलो. 'हे यादवा', 'हे मित्रा' असे मी हाक मारून वेळप्रसंगी प्रमादाने पुष्कळ बोललो. हे अच्युता, क्रीडा, शयन, गप्पागोष्टींच्या वेळी आणि भोजनसमयी तुला मी समान मानून जी काही थट्टा केली, चेष्टा केली असेल किंवा प्रसंगी जर काही अनादर केला असेल तर त्या सर्व अपराधांबद्दल तू मला मोठ्या मनाने क्षमा कर. तू सगळ्यांचा पिता आहेस. तूच गुरुदेवता आहेस. तूच परम गुरू आहेस. तूच एकमेव वंद्य आहेस. तुझ्यासारखा कोणीही नाही, तुझ्या बरोबरीचा कोणी नाही, मग या लोकत्रयामध्ये तुझ्याहून मोठा कोण असणार ?

हे परमेश्वरा, तुला मी साष्टांग नमस्कार करतो. प्रेमळ वडील आपल्या मुलाचा कोणताही अपराध सहन करतात, मित्रही आपल्या मित्राचा अपराध सहन करतो. खरोखर याच भावनेने हे श्रीकृष्णा, तू माझे सर्व अपराध सहन कर, मला क्षमा कर. हे श्रीकृष्णा, पूर्वी कधीही न पाहिलेले तुझे रूप पाहून मी आनंदित झालो. परंतु त्याचबरोबर फार घाबरलोही. मी व्याकुळ झालो आहे. म्हणून हे जगदीश्वरा, हे देवा, हे वासुदेवा, तू विलंब लावू नकोस. तुझे नेहमीचे प्रेमळ रूप तू मला दाखव. हे सहस्रबाहो, तू तुझ्या मस्तकावर किरीट धारण कर, तुझ्या हातात गदा असू दे, तू चक्र धारण कर. हे विश्वमूर्ते, तू तुझे सौम्य रूप दाखव अशी अर्जुनाने श्रीकृष्णास काकुळतीने विनंती केली.

**प्रश्न १५५ श्रीकृष्णाने अर्जुनाची विनंती ऐकून त्यास काय सांगितले ?**

**उत्तर -** हे अर्जुना, तुझ्यावर प्रसन्न होऊन मी तुला हे माझे तेजोमय अनंत, आद्य,थोर आणि अपूर्व असे रूप माझ्या योगसामर्थ्याने दाखवले, माझे असे रूप आजवर कोणीही पाहिले नव्हते. वेदांची घोकंपट्टी करून माझे असे हे रूप पहायला मिळणार नाही किंवा यज्ञ, स्वाध्याय, दान, कर्म किंबहुना उग्र तपाने सुद्धा माझे हे रूप तुझ्याखेरीज कोणाला पहायला मिळणे शक्य नाही. तू आता तुझी व्याकुळता टाकून दे. माझ्या रूपाच्या भीषणतेने तू आता भिऊ नकोस. तू प्रसन्नचित्त हो. तुला मी माझे नेहमीचे परिचित रूप दाखवतो. असे म्हणून कृष्णाने अर्जुनाला स्वतःचे सौम्य रूप दाखवले व त्याला धीर दिला.

**प्रश्न १५६ श्रीकृष्णाचे नेहमीचे रूप पाहून अर्जुन काय म्हणाला ?**

**उत्तर -** श्रीकृष्णाने अर्जुनास किरीटधारी, गदाधारी व चक्रपाणी अशा स्वरूपात दर्शन दिले. त्यामुळे अर्जुनास परमानंद झाला. कारण श्रीकृष्णाचे तेच मानुष रूप त्यास नित्यपरिचित होते. ते रूप पाहून तो निर्भय झाला आणि पूर्व स्थितीला आला. पूज्य विनोबाजींनी अर्जुनाच्या या स्थितीचे पुढीलप्रमाणे फार सुंदर वर्णन केले आहे.

**''पाहुनि हे तुझे सौम्य मानुषी रूप माधवा ।**
**झालो प्रसन्न मी आता आलो भानावरी पुन्हा ।।''**

**- गीताई ११.५१**

**प्रश्न १५७ श्रीकृष्णाने आपल्या रूपाविषयी काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – अर्जुनास आपले नित्याचे सौम्य रूप दाखवून झाल्यावर श्रीकृष्ण त्यास म्हणाला – माझे जे रूप तू पाहिलेस ते अतिशय दुर्मिळ आहे. प्रत्यक्ष देवसुद्धा ते रूप पाहण्यासाठी इच्छुक असतात. यज्ञ, दानधर्म, तपश्चर्या किंवा पुष्कळ वेदाभ्यास यांनी माझे असे रूप पहाणे शक्य नाही. परंतु हे परंतप अर्जुना, केवळ माझ्यावरील अनन्य भक्तीने माझे अशा प्रकारचे दर्शन होणे शक्य आहे आणि अंतिमतः माझ्यामध्येच एकरूप होणे संभव आहे. हे पांडवा, माझा भक्त सर्वकाही माझ्याकरिता करतो. तो निरासक्त होत्साता सर्व प्राणिमात्रांशी निर्वैर होऊन शेवटी मलाच येऊन मिळतो. अशाप्रकारे भक्तीनेच ईश्वरी रूप पहाणे शक्य होते अशा सिद्धान्ताने हा अध्याय समाप्त झाला आहे.

**प्रश्न १५८ या अध्यायाचे समालोचन कसे करता येईल ?**

**उत्तर** – हा अध्याय भक्तांना अतिशय प्रिय वाटतो. याचे कारण या अध्यायास श्रीकृष्णाच्या दिव्य स्वरूपाचा शब्दरूपाने स्पर्श झाला आहे. गीतेच्या उत्तम भागात या अध्यायाची गणना होते.

प्रारंभी अर्जुनाने श्रीकृष्णास त्याला त्याचे स्वरूप दाखविण्याची विनंती केली. परंतु असे रूप दाखवणे शक्य असेल तरच तू दाखव असे त्याने सांगितले. अजूनपर्यंत त्याने परमेश्वराच्या रूपाबद्दल पुष्कळ ऐकले होते म्हणून त्याला फार उत्सुकता निर्माण झाली होती. श्रीकृष्णाची अर्जुनावर फार प्रीती होती. त्याची विनंती त्याला झिडकारणे शक्य नव्हते. परंतु असे दिव्य भव्य रूप चर्मचक्षूने पहाणे इष्ट होणार नाही म्हणून श्रीकृष्णाने त्यास दिव्यदृष्टी दिली आणि त्या दिव्यदृष्टीने अर्जुनाने श्रीकृष्णाचे ईश्वरी रूप पाहिले.

ईश्वरीरूप अतिशय अक्राळविक्राळ होते. अनंत हात, पाय, मस्तके, नेत्र असलेले असे ते होते. त्याचा आदि, मध्य आणि अंत दिसत नव्हता. ते रूप डोळ्याने सामावून घेण्यासारखे नव्हते. सगळ्या देवयोनि त्या रूपामध्ये होत्या. एवढेच नव्हे तर पार्थाचे नातेवाईक सुद्धा होते. भीष्म, द्रोण, धृतराष्ट्राचे सर्व पुत्र, जयद्रथ इत्यादि प्रतिपक्षातील योद्धेही अर्जुनाने त्या विश्वरूपात पाहिले. श्रीकृष्णाच्या विश्वरूपाने अर्जुन पूर्णपणे घाबरला व गांगरून गेला. तो व्याकुळ झाला, गर्भगळीत झाला, त्याला ते रूप पहावेनासे झाले. त्याची मनःशांती पूर्णपणे ढळून गेली. श्रीकृष्णाने त्यास बजावले की तू पहात असलेल्या सर्व वीरांना मी अगोदर मारले आहे म्हणून तू निःशंक युद्ध कर आणि त्यांना मार, तू केवळ निमित्तमात्र हो.

घाबरलेल्या अर्जुनास शेवटी श्रीकृष्णाने आपले सौम्य रूप दाखवले. ते रूप पाहिल्यावर अर्जुन भानावर आला. अर्जुनाने जे विश्वरूप पाहिले ते वेदाध्ययनाने, यज्ञाने,



तपाने अगर पुष्कळ दानधर्म करूनसुद्धा पहाणे शक्य नाही. परंतु जे श्रीकृष्णाची अनन्य भक्ती करतात त्यांनाच हे शक्य आहे.

विश्वरूपदर्शनाच्या वर्णनामध्ये काहीवेळा पुनरुक्ती झाली आहे. परंतु भव्यदिव्य वर्णनाची महती या पुनरुक्तीने दृढ होते. विश्वरूपदर्शनामुळे अर्जुन युद्धास तयार झाला. त्याला फक्त निमित्तमात्र हो असे श्रीकृष्णाने बजावले. या अध्यायाच्या शेवटी भक्तीला प्राधान्य दिलेले दिसते. केवळ अनन्य भक्तीनेच परमेश्वरदर्शन शक्य आहे असे म्हटले आहे.

# १७. भक्तियोग (श्लोकसंख्या २०)

## अध्याय बारावा

**प्रश्न १५९ हे श्रीकृष्णा, तुझ्या सगुण रूपाची उपासना करणारे आणि तुझ्या अव्यक्ताची म्हणजे निर्गुण स्वरूपाची उपासना करणारे भक्त यांच्यामध्ये श्रेष्ठ कोण ?**

**उत्तर –** या अध्यायाची सुरवात **''एवं सततयुक्ता ये''** या शब्दांनी झाली आहे. म्हणजे अशाप्रकारे योगयुक्त असलेले. पण अशाप्रकारे हा शब्द योजल्यावर कशाप्रकारे अशी आकांक्षा उत्पन्न होते. या आकांक्षेचे उत्तर पूर्वीच्या अध्यायाच्या शेवटच्या श्लोकात आहे. तेथे श्रीकृष्णाने असे म्हटले आहे की जो भक्त मत्परायण आहे आणि आसक्ती रहित आहे व जो सर्व प्राणिमात्रांविषयी समभाव ठेवतो तो मलाच येऊन मिळतो. सगुण रूपाची उपासना करणारा भक्त व निर्गुणाची उपासना करणारा भक्त यांच्यामधील खरा योगवित्तम भक्त कोण असा अर्जुनाचा प्रश्न आहे.

जे माझ्या ठिकाणी मन लावून श्रद्धायुक्त अंतःकरणाने माझे नित्य भजन पूजन करतात तेच योगी थोर आहेत असे मला वाटते असे श्रीकृष्ण म्हणाला. सगुणोपासक हा निर्गुणोपासकापेक्षा श्रेष्ठ आहे असे श्रीकृष्णाने प्रथम स्पष्ट केले. परंतु ताबडतोब त्याने निर्गुणोपासकांविषयीही सांगितले की तेही भक्त मलाच येऊन मिळतात. जे भक्त आपल्या इंद्रियांवर संयम ठेवतात, जे प्रत्यक्ष दाखवता येत नाही, जे सर्वगामी आहे, अचिंत्य आहे, अविकारी आहे अशा अव्यक्ताची उपासना करतात ते निर्गुणोपासक होत. परंतु निर्गुणाची उपासना करणाऱ्यांना साहजिकच कष्ट फार पडतात. मनुष्य हा देहवान् आहे त्यामुळे त्याला देहधारी म्हणजे सगुण ब्रह्माची उपासना करणे सोपे जाते. त्याला निर्गुणाची उपासना करणे सुखासुखी जमत नाही.

**प्रश्न १६० भक्तांना श्रीकृष्णाने काय आश्वासन दिले आहे ?**

**उत्तर –** भक्त उपासना करीत असतो आणि आपल्या उपास्य देवतेने आपला उद्धार करावा अशी प्रत्येक भक्ताची मनोमन इच्छा असते. श्रीकृष्णाने म्हटले आहे की जे भक्त आपली सर्व कर्मे मला अर्पण करतात आणि अतिशय एकाग्र होऊन केवळ माझ्या ठिकाणीच अंतःकरण स्थिर करतात त्या भक्तांचा मी मृत्यूरूपी संसारसागरातून विनाविलंब उद्धार करतो.

आपल्या जीविताचे ध्येय हेच आहे की परत परत जन्माला येऊन आणि परत



परत मृत्यू पावून आपण या भवसागरात गटांगळ्या खाऊ नये. जर मृत्यूपासून सुटका झाली तर जन्मापासूनही झाली. जन्म नाही तर मृत्यूही नाही. म्हणून सर्वसामान्य मनुष्यसुद्धा देवळात गेल्यावर असे म्हणतो की ''देवाच्या दारी विसावा आणि पुनर्जन्म नसावा.'' संसारसागरातून सुटका करण्याचे निश्चित आश्वासन श्रीकृष्णाने त्याच्या भक्तांना दिले आहे.

श्रीकृष्णाने अर्जुनास बजावले आहे की तू माझ्या स्वरूपावर मन केंद्रित कर, तुझी बुद्धीपण माझ्या ठिकाणी समर्पण कर. तू निःशंकपणे असे केले असता तू सर्वस्वी माझाच होशील. एवढेच नव्हे तर तुझ्यात आणि माझ्यात काही फरक राहणार नाही. तूच 'मी' होऊन जाशील. सतत तू माझेच चिंतन आणि मनन कर.

**प्रश्न १६१ चित्त स्थिर होण्यासाठी काय करावे ?**

**उत्तर –** परमेश्वराच्या ठिकाणी भक्ताचे चित्त स्थिर व्हायला पाहिजे. सहाव्या अध्यायात मनोनिग्रह कसा करावा या अर्जुनाच्या प्रश्नास, अभ्यास आणि वैराग्य या दोन साधनांनी मनावर ताबा मिळवावा असे त्याने उत्तर दिले आहे. येथेही अभ्यासाच्या सहाय्याने चित्तावर विजय मिळविण्यास सांगितले आहे. चित्तावर ताबा मिळवण्यासाठी वारंवार प्रयत्न (अभ्यास) करायला पाहिजे. आपल्या प्रयत्नांची सातत्याने मालिका उभी केली पाहिजे. अशा प्रयत्नरूपी मालिकेने चित्ताला अडकवता येईल व स्थिर करता येईल. परंतु अभ्यासाच्या योगाने चित्त स्थिर झाले नाही तर श्रीकृष्णाने असे सांगितले आहे की तू अधिक काही न करता, तू जी जी काही कर्मे करशील ती माझ्यासाठीच आहेत, किंबहुना ती माझीच आहेत असा विश्वास ठेव. माझेच कर्म तू करीत असल्यामुळे तुला त्रास होणार नाही. तू स्वतःहून काही करीत आहेस अशी भावनाच ठेऊ नकोस. केवळ तू माझ्याकरिता कर्मे करीत रहा आणि असे केल्याने तुझे चित्त स्थिर होईल आणि लवकरच सिद्धी मिळेल.

सगळी कर्मे माझीच आहेत आणि माझ्यासाठीच आहेत या भावनेने तुला कर्म करणे जमले नाही तर तू सगळ्या कर्मांच्या फलांचा त्याग कर आणि असा त्याग करण्याचा प्रयत्नपूर्वक सराव कर असे श्रीकृष्णाने सांगितले आहे. कर्माच्या फळांविषयी थोडीशी जरी आसक्ती निर्माण झाली तरी कर्त्याला अडकायला होतेच. फळांच्या इच्छेचा त्याग केला की कर्मापासून कर्त्याची सुटका होते. कर्म करून तो हात झटकून मोकळा होऊ शकतो व निःसंग होतो.

**प्रश्न १६२ अभ्यास, ज्ञान आणि ध्यान इत्यादींमध्ये विशेष महत्त्व कोणास आहे ?**

**उत्तर –** प्रत्येक साधकाने अभ्यास केला पाहिजे, ज्ञान मिळवले पाहिजे आणि ध्यानही केले पाहिजेच. या तिन्ही गोष्टी साधकाशी अगदी निगडीत आहेत. येथे अभ्यास म्हणजे

ज्ञानासाठी केलेले वारंवार प्रयत्न. प्रयत्नांपेक्षा ज्ञान अधिक श्रेष्ठ आहे हे अगदी उघड आहे. परमेश्वराच्या रूपाचे ज्ञान होणे अत्यावश्यक आहे. ज्ञान जर झाले नाही तर सगळे प्रयत्न फुकटच होत. ज्ञानाशिवाय साधकाला समाधान मिळणार नाही. अभ्यासाची परिणती ज्ञानातच झाली पाहिजे नाही तर त्याचे सारे प्रयत्न अधांतरी राहिल्यासारखे होतील.

परंतु ज्ञानापेक्षा ध्यान श्रेयस्कर आहे असे येथे म्हटले आहे. परमेश्वराचे तात्त्विक ज्ञान झाले तरी ते अपुरे आहे. केवळ शाब्दिक ज्ञान होऊन चालणार नाही. तर या ज्ञानाच्या सहाय्याने परमेश्वराच्या ध्यानामध्ये मग्न होऊन रहाणे अधिक चांगले आहे. परमेश्वराच्या रूपातच गुंतून राहिले की आणखी काय मिळवायला पाहिजे ? परंतु असे ध्यान करणे कठीण आहे. सगळ्यांनाच जमण्यासारखे नाही. परमेश्वराच्या ध्यानापेक्षा आपण करीत असलेल्या सर्व कर्मांच्या फळांचा त्याग करणे सर्वश्रेष्ठ होय. फलत्यागामुळे निरंतर शांती प्राप्त होते. कसलीच कटकट कर्त्याला चिकटत नाही. अभ्यास, ज्ञान, ध्यान आणि कर्मफलत्याग या चार गोष्टींमध्ये उत्तरोत्तर एकापेक्षा दुसरी गोष्ट श्रेयस्कर आहे असे बाराव्या श्लोकात म्हटले आहे. कर्मफलत्यागास सर्वात विशेष महत्त्व दिले आहे. त्यागामुळे निरंतर शांती मिळते.

**प्रश्न १६३ ज्ञानापेक्षा ध्यान हे महत्त्वाचे कसे ?**

**उत्तर** – ज्ञानापेक्षा ध्यान महत्त्वाचे आहे असे अगदी स्पष्ट बाराव्या श्लोकात म्हटले आहे. यामुळे ज्ञानाचे महत्त्व कमी आहे असे पुष्कळांना वाटण्याचा दाट संभव आहे. परंतु असा समज करून घेण्याच्या अगोदर पुढील गोष्टी लक्षात घेतल्या म्हणजे चुकीचा समज होणार नाही.

या अध्यायाचे नाव भक्तियोग असे आहे. भक्तियोगाचे समर्थन करताना ध्यानापेक्षा ज्ञानाला गौणत्व देणे अपरिहार्य आहे. जे ज्या संदर्भात महत्त्वाचे असते त्यालाच महत्त्व दिले जाते. भक्तियोगाचे विवेचन करीत असताना ज्ञानाचे समर्थन करणे अप्रस्तुत झाले असते. गीतेमध्ये प्रसंगाप्रमाणे कधी कर्माला, तर कधी ध्यानाला, तर कधी भक्तीला तर कधी ज्ञानाला महत्त्व दिले आहे. गीता ही सर्वसंग्राहक आहे. गीतेने विविध मार्गांचा समन्वय केला आहे. त्यामुळे ज्या संदर्भात जे आले आहे ते प्रसंगोपात्त महत्त्वाचे ठरले आहे. भक्तियोग अध्यायात ध्यानाला आणि भक्तीलाच महत्त्व दिले आहे.

या संदर्भात ऋग्वेदामध्ये वर्णिलेल्या निरनिराळ्या देवतांविषयीच्या श्रेष्ठत्वासंबंधी कसा निर्णय करण्यात येतो हे लक्षात घेण्यासारखे आहे. ऋग्वेदामध्ये विविध देवतांची सूक्ते आहेत. परंतु देवता जरी अनेक असल्या तरी ज्यावेळेस ज्या देवतेचे वर्णन प्रस्तुत असेल तेव्हा तेथे ती देवता श्रेष्ठ समजली जाते. तेव्हा इतर देवतांचा विचार करण्यात येत



नाही. ज्या देवतेची स्तुती केली जात आहे तीच देवता सर्वकाही, सर्वगुणसंपन्न आणि सर्वश्रेष्ठ होय. अशा प्रकारच्या विचारप्रवृत्तीस ''प्रस्तुत देवतावाद'' (henotheism) असे नाव मॅक्सम्यूलरने दिले आहे. म्हणून भक्तियोगाच्या अध्यायात ज्ञानापेक्षा ध्यान महत्त्वाचे आहे असे म्हटले आहे.

**प्रश्न १६४ ''स मे प्रियः'' म्हणजे तो (भक्त) मला प्रिय आहे असे वारंवार श्रीकृष्णाने म्हटले आहे. त्याला प्रिय असलेला भक्त कोण ?**

**उत्तर** – भक्त कसा असावा याचे सुंदर मार्गदर्शन या अध्यायात आले आहे. भक्ताकडे विविध गुण असले पाहिजेत आणि असा केवळ गुणी भक्तच परमेश्वराला प्रिय असतो. श्रीकृष्णाने तर अशा आदर्श भक्ताने आपल्या अंगी कोणकोणते गुण वाढवावे व अंगी बाणवावे हे सांगितले आहे.

प्रथम भक्ताने कोणत्याही प्राणिमात्राचा द्वेष करता कामा नये. तर त्याने प्रत्येकाशी मैत्री साधली पाहिजे. तो करुणासंपन्न असला पाहिजे, दयार्द्र पाहिजे. 'मी' आणि 'माझे' या दोन शब्दांपासून त्याचा वियोग झाला पाहिजे. अहंकाराचा वारा त्याला शिवता कामा नये. सुखात आणि दुःखात तो सारख्याच चित्तवृत्तीचा असला पाहिजे आणि नेहमी त्याने क्षमायुक्त असले पाहिजे. क्षमाशीलता हा त्याचा स्थायीभाव बनला पाहिजे.

भक्ताने नित्यसंतुष्ट राहिले पाहिजे. त्याच्या मनात कोणत्याही गोष्टीची हाव हाव असता कामा नये. तो संयमी पाहिजे, जितेंद्रिय पाहिजे, तो दृढनिश्चयी पण पाहिजे, त्याने माझ्याच ठिकाणी मन आणि बुद्धी स्थिर केली पाहिजे. केवळ असाच भक्त मला प्रिय आहे, असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

भक्ताचा कोणालाही त्रास होता कामा नये. तो जे काही करीत असेल त्याचा कोणत्याही प्रकारे लोकांना संसर्ग होता कामा नये. लोकांपासून त्रास होतो अशीही त्याची धारणा असता कामा नये. त्याचे एकूण वर्तन असे पाहिजे की लोक त्याला कंटाळता कामा नयेत व त्यानेही लोकांना कंटाळू नये. आनंद, राग, शांती अशा विविध भावनांपासून त्याने पूर्णतया अलिप्त राहिले पाहिजे. कोणतीही भावना निर्माण झाली की भक्ताची साम्यावस्था बिघडून जाते. जो भक्त अशा विकारी भावनांपासून अलिप्त रहातो तो भक्त मला आवडतो असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

भक्ताने सतत निरपेक्ष राहिले पाहिजे. त्याने कोणापासून कसलीही अपेक्षा ठेवता कामा नये. त्याने पूर्णपणे निःस्पृह होणे आवश्यक आहे. त्याने नित्य पवित्र राहिले पाहिजे. पावित्र्य हा तर त्याच्या आचरणाचा केंद्रबिंदू असला पाहिजे. त्याने आपल्या कर्तव्याविषयी जागरूक राहिले पाहिजे. कधीही कर्तव्यच्युती होऊ देता कामा नये. त्याने उदासीन राहिले पाहिजे म्हणजे कर्मफलाविषयी अनासक्त राहिले पाहिजे. कोणतीही

व्यथा त्याला दुःख देण्यास असमर्थ झाली पाहिजे म्हणजे कोणत्याही अनिष्ट गोष्टीने त्याची चलबिचल होता कामा नये, त्याने दुःखी होता कामा नये. त्याने स्वार्थी अगर काम्य फलांचे सर्व खटाटोप सोडून दिले पाहिजेत. त्याने खटाटोपाचा प्रारंभच करू नये. एकदा आरंभ केला की तो खटाटोप त्याच्या बंधनाला कारणीभूत होईल. म्हणून त्याने सर्वारंभपरित्यागी व्हावे. असा भक्त माझा लाडका होय असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

भक्ताने शत्रू आणि मित्र यांच्यामध्ये अंतर करता कामा नये. हा भेद त्याला दिसता कामा नये. मान आणि अपमान याबाबतीतही त्याने सारखेच असले पाहिजे. मानासाठी त्याने हपापून जाऊ नये किंवा एखाद्या अपमानाने उद्विग्न होऊ नये. थंडी, ऊन, पाऊस, वारा ही त्याच्या दृष्टीने सारखीच असली पाहिजेत. याचप्रमाणे सुख आणि दुःख यांच्या ठिकाणीसुद्धा त्याने समभाव ठेवावा. निंदा आणि स्तुती ही सारखीच आहेत असे त्याला वाटावे. जे काही यदृच्छेने मिळेल त्यात त्याने संतुष्ट रहावे. घरादाराविषयी आसक्ती नसलेला म्हणजे त्याने अनिकेत असावे. सदोदित स्थिरचित्त राहून त्याने माझी भक्ती करावी. असा संयमी भक्त मला अतिशय प्रिय आहे असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. शिवाय जे कोणी भक्त गीतेत सांगितलेला धर्म श्रद्धेने आचरितात ते तर मला फार फार आवडतात असे श्रीकृष्णाने अध्यायाच्या शेवटी म्हटले आहे.

श्रीकृष्णाने सांगितलेल्या भक्ताविषयीच्या अपेक्षा सर्वच भक्तांनी लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. भक्त कसा असावा या प्रश्नाचे मार्मिक उत्तर कोणता भक्त मला प्रिय आहे या विवेचनाच्या अनुरोधाने सविस्तर आले आहे. ज्यांना भक्त ही पदवी प्राप्त करून घ्यायची आहे त्यांनी या अध्यायाचा विशेष अभ्यास केला पाहिजे व येथे वर्णिलेले सर्व गुण अंगी स्थिर केले पाहिजेत. भक्त होणे सोपे नाही. ते फार फार कठीण आहे. स्वतःला एखाद्या देवतेचा भक्त म्हणवून घेताना आपण खरोखरच भक्त या संज्ञेस पात्र आहोत का याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे.

**प्रश्न १६५ या अध्यायाची महती कशी सांगता येईल ?**

**उत्तर** – गीतेमध्ये एकूण १८ अध्यायांमध्ये बारावा आणि पंधरावा हे दोन अध्याय लहान आहेत. या दोन्ही अध्यायांमध्ये प्रत्येकी फक्त २०च श्लोक आहेत. हे दोन्ही अध्याय पुष्कळ लोकांच्या नित्यपठणात आहेत. बारावा अध्याय लहान पण कीर्तीने महान आहे.

सगुणोपासक आणि निर्गुणोपासक यांच्यामध्ये मोठा कोण या महत्त्वाच्या प्रश्नाने अध्यायाची सुरवात झाली आहे. सगुणाची उपासना करणारा भक्त श्रेष्ठ होय असे येथे उत्तर दिले आहे.

श्रीकृष्णाने असे म्हटले आहे की जो भक्त माझी उपासना करतो त्याला मी मृत्युरूपी संसारसागरातून वर काढतो. त्याचा मी उद्धार करतो. श्रीकृष्णाने हा फार मोठा विश्वास



आपल्या भक्तांना दिला आहे.

भक्तिमध्ये चित्त स्थिर होण्यासाठी अभ्यास आणि वैराग्य यांची जोड पाहिजे. अभ्यास, ज्ञान आणि ध्यान यांपेक्षाही कर्मफलत्याग श्रेष्ठ आहे. सर्वप्रकारच्या कर्माच्या फळांचा त्याग केल्याने निरंतर शांती मिळते. ''त्यागाच्छान्तिरनंतरम्'' असे हे शांतीचे सूत्र आहे.

भक्ताने कोणते कोणते गुण आपल्या अंगी बाणवावे याचे बहारीचे दीर्घ वर्णन या अध्यायात आले आहे. नुसती भक्ती करायला सुरवात केली की भक्त परमेश्वराचा लाडका होतो असे नाही. परमेश्वराला आपण प्रिय होण्यासाठी कितीतरी गोष्टी कराव्या लागतात. भक्ताने ''मी'' आणि ''माझे'' सोडले पाहिजे. अहंकारापासून दूरदूर गेले पाहिजे. नित्यतृप्त व संयमी राहिले पाहिजे. सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो सगळ्यांचा आवडता व्हायला पाहिजे. त्याच्यापासून कोणालाही त्रास होता कामा नये. राग, द्वेष, भीती इत्यादींच्या पलीकडे जाऊन तो निःस्पृह आणि पवित्र झाला पाहिजे. सतत आनंदी वृत्तीने राहून त्याने रिपू आणि मित्र यांच्याशी सुद्धा समभावाने वागले पाहिजे. लाडका भक्त होण्यासाठी लागणाऱ्या गुणांचे निर्देशन फारच सुंदर रीतीने या अध्यायात केले आहे.

''गीता आरंभापासून अंतापर्यंत सर्वच पवित्र आहे. परंतु मध्यंतरी काही अध्याय तीर्थक्षेत्रे झाली आहेत. त्यापैकी बारावा अध्याय एक तीर्थक्षेत्र आहे.'' असे विनोबाजींनी गीताप्रवचने या आपल्या पुस्तकात म्हटले आहे. त्यांनी या लहानश्या वीस श्लोकांच्या अध्यायाला अमृताच्या धारेची उपमा दिली आहे. सगुणाची उपासना करणारा आणि निर्गुणाची उपासना करणारा यांपैकी श्रेष्ठ कोण असा जेव्हा प्रश्न निर्माण होतो तेव्हा विनोबाजींनी त्या दोघांना एका आईच्या दोन मुलांची उपमा दिली आहे. आईला दोन्ही मुले प्रिय असतात. पण त्यांतून एकच निवडायची वेळ तिच्यावर आली तर ती लहान मुलाला जवळ करते. सगुणाची उपासना करणारा भक्त तसा आहे. निर्गुणाची उपासना करणारा भक्त मोठा आहे. दोन्ही भक्त परमेश्वराचे लाडके आहेत. विनोबाजींनी सगुण आणि निर्गुण उपासकांची जोडी फार सुंदर रंगविली आहे. जिज्ञासूंनी गीताप्रवचनांतील बाराव्या अध्यायावरील प्रवचन अवश्य वाचावे.

❀❀❀

# १८. क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग (श्लोकसंख्या ३४)

**अध्याय तेरावा**

**प्रश्न १६६ क्षेत्र कोणाला म्हणतात आणि क्षेत्रज्ञ कोणाला म्हणतात ?**

**उत्तर** – या अध्यायाच्या सुरवातीस श्रीकृष्णाने स्वतःहून क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्याविषयी सांगण्यास सुरवात केली आहे. परंतु असे प्रश्न अर्जुनाने विचारले होते व ते प्रश्न असलेला एक श्लोक गीतेच्या काही प्रतींमध्ये पूर्वी आढळून येत असे. परंतु अशा श्लोकाचे अस्तित्व मान्य केल्यास गीतेतील श्लोकसंख्या ७०१ होईल आणि हे परंपरेस सोडून होईल. शंकराचार्यांनी गीतेची श्लोकसंख्या ७०० मानली आहे आणि ही संख्या आता सर्वमान्य झाली आहे. (या संदर्भात प्रश्न ९ वा पहावा)

आपल्या शरीराला क्षेत्र म्हणतात. ''क्षतापासून रक्षण करीत असल्यामुळे, स्वतः क्षय म्हणजे नाश पावते म्हणून, हळूहळू क्षय होतो म्हणून आणि क्षेत्राप्रमाणे असल्यामुळे म्हणजे शेतात पेरलेले बी जसे फळ देते त्याप्रमाणे या शरीरात कर्मफलाची निष्पत्ती होत असल्यामुळे या शरीरास क्षेत्र असे म्हणतात'' असे शंकराचार्यांनी क्षेत्र शब्दाचे विवरण केले आहे.

या शरीरास जो यथार्थपणे जाणतो तो क्षेत्रज्ञ होय असे (अध्यात्म) शास्त्रातील ज्ञानी मंडळी म्हणतात. जेवढी शरीरे तेवढी क्षेत्रे आहेत. या सर्व क्षेत्रांमध्ये क्षेत्रज्ञ मीच आहे असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्यामध्ये जो भेद आहे, जो फरक आहे त्याचे पूर्ण ज्ञान म्हणजे माझे ज्ञान होय. क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचे ज्ञान म्हणजेच परमेश्वराचे ज्ञान होय असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

प्रत्येक शरीरात परमेश्वर आहे. तो एका शरीरात एक तर दुसऱ्या शरीरात दुसरा अशा भिन्नरूपाने नाही. सर्व शरीरांमध्ये एकच परमेश्वर भरून राहिला आहे. परमेश्वराच्या ऐक्यरूपाचे जे ज्ञान तेच ज्ञान होय.

**प्रश्न १६७ चौथ्या श्लोकात ''ब्रह्मसूत्रपदैः' या शब्दांनी सध्याची ब्रह्मसूत्रे अपेक्षित आहेत काय ?**

**उत्तर** – क्षेत्र आणि क्षेत्रज्ञाचा विचार वेदांतील ऋषींनी विविध सूक्तांतून चर्चिला आहे. या विचाराला उपनिषदांमध्ये सुव्यवस्थित रूप दिले गेले आहे. किंबहुना हाच उपनिषदांचा प्रधान विषय आहे. उपनिषदांमध्येच वेदांतील विचारांची परिणती झाली. येथेच क्षेत्र-क्षेत्रज्ञ विचार पक्का झाला आणि पदोपदी ब्रह्मैक्यप्रतिपादक सुनिश्चित वाक्यांनी व्यक्त



झाला. तर्काचे निर्णायक अधिष्ठानही त्याला येथेच लाभले.

चौथ्या श्लोकातील ''ब्रह्मसूत्रपदैः'' या शब्दांच्या उल्लेखावरून गीतेमध्ये बादरायणांच्या ब्रह्मसूत्रांचा उल्लेख आहे असे काही विद्वानांनी अनुमान केले आहे. एवढेच नव्हे तर खुद्द ब्रह्मसूत्रांमध्ये आत्रेय, आश्मरथ्य, कार्ष्णाजिनि, बादरि, औडुलोमि, काशकृत्स्न आणि जैमिनी या सात आचार्यांचा उल्लेख असल्यामुळे त्या आचार्यांनीही निरनिराळी ब्रह्मसूत्रे रचली होती असा कयास केला गेला आहे. परंतु नुसत्या त्यांच्या नावाच्या उल्लेखावरून प्रत्येक आचार्याने आपापली स्वतंत्र ब्रह्मसूत्रे रचली होती असे म्हणता येत नाही. या आचार्यांच्या नावावर आज ब्रह्मसूत्रे उपलब्ध नाहीत. परंतु यांच्यापैकी काही आचार्यांचा उल्लेख जैमिनीच्या पूर्वमीमांसा सूत्रांमध्येही असल्यामुळे कदाचित् असे म्हणता येईल की यांच्यापैकी काही आचार्यांनी सध्याची ब्रह्मसूत्रे अस्तित्वात यायच्या अगोदर ब्रह्माविषयी सुसूत्र विचार करण्याचा प्रयत्न केला असावा. म्हणून गीतेमधील ''ब्रह्मसूत्रपदैः'' या शब्दांनी सध्याच्या ब्रह्मसूत्रांचा निर्देश होतो हे म्हणणे फार धाडसाचे होय. या शब्दांनी फक्त उपनिषदांत केल्या गेलेल्या ब्रह्मविषयक सुनिश्चित वाक्यांचा निर्देश होतो असे प्रस्तुत लेखकास वाटते. शंकराचार्यांनी ब्रह्मसूत्रपदांचा अर्थ ब्रह्माची जी सूचक वाक्ये ती ब्रह्मसूत्रे असा केला आहे. त्यांच्या योगाने ब्रह्म जाणले जाते म्हणून त्यांना पदे म्हणतात. म्हणून 'ब्रह्मसूत्रपदैः' या शब्दांनी सध्याची ब्रह्मसूत्रे अपेक्षित नाहीत.

**प्रश्न १६८ क्षेत्रासंबंधी विस्ताराने काय सांगितले आहे ?**

**उत्तर** – क्षेत्र म्हणजे काय, ते कसे असते, त्याचे स्वरूप काय, ते विकार कसे पावते, त्याचे सामर्थ्य काय इत्यादि सर्व काही क्षेत्राविषयी मी सांगतो असे श्रीकृष्ण म्हणाला. क्षेत्राच्या व्याख्येमध्ये ३१ तत्त्वांचा समावेश आहे. ती पुढीलप्रमाणे आहेत.

पंचमहाभूते – १) पृथ्वी २) आप ३) तेज ४) वायू ५) आकाश आणि ६) अहंकार ७) बुद्धी ८) अव्यक्त प्रकृति.

पाच कर्मेंद्रिये – ९) वाणी १०) हस्त ११) पाद १२) पायु १३) उपस्थ.

पाच ज्ञानेंद्रिये – १४) कर्ण १५) त्वचा १६) घ्राण १७) नेत्र १८)जिह्वा
१९) मन (अंतरिंद्रिय)

पाच ज्ञानेंद्रियांचे पाच विषय – २०) शब्द २१) स्पर्श २२) रूप २३) रस २४) गंध आणि २५) इच्छा २६) द्वेष २७) सुख २८) दुःख २९) संघात (देह व इंद्रिये यांचा संयोग) ३०) प्राणशक्ती (चेतना) ३१) धारणाशक्ती (धृति)

अशाप्रकारे ३१ तत्त्वे मिळून क्षेत्र तयार होते. वरील ३१ तत्त्वांमध्ये पाच ज्ञानेंद्रियांचे पाच ज्ञानविषय आले आहेत. परंतु वाणी इत्यादि पाच कर्मेंद्रियांचे पाच कर्मविषय आलेले नाहीत. ते अनुक्रमे भाषण, आकर्षण, गमन, विष्टा आणि मूत्र यांचा त्याग असे

आहेत. ज्ञानेश्वरांनी ही पाच तत्त्वे आपल्या विवरणात घेतली आहेत.

वैशेषिकांनी द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय आणि अभाव असे सात पदार्थ मानले आहेत. पदार्थ म्हणजे सर्व ज्ञेय वस्तू. वैशेषिक दर्शनात गुण २४ प्रकारचे आहेत. शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध, इच्छा, द्वेष, सुख, दुःख हे गुण आहेत आणि गीतेमध्ये या गुणांचा समावेश क्षेत्राच्या ३१ तत्त्वांत केला आहे. या तत्त्वांमध्ये वर उल्लेखिलेल्या ३१ तत्त्वांपैकी पहिली २४ तत्त्वे सांख्यदर्शनात आहेत. त्यातील पुरुष हे तत्त्व येथे आलेले नाही.

**प्रश्न १६९ या अध्यायात ज्ञान कशाला म्हटले आहे ?**

**उत्तर** – ज्ञान या संकल्पनेत विविध प्रकारचे गुण आले आहेत. केवळ तात्त्विक ज्ञान म्हणजे ज्ञान नव्हे तर निरनिराळे सद्‌गुण प्रत्यक्ष आचरणात आणणे म्हणजे ज्ञान अशी निराळ्या प्रकारची व्याख्या येथे केली आहे. ७ ते ११ या पाच श्लोकांत २० गुणांची मोठी यादीच दिली आहे. ती पुढीलप्रमाणे आहे –
१) अभिमान नसणे २) दांभिकता नसणे ३) अहिंसा ४) क्षमा(क्षांति) ५) वागणुकीत सरळपणा(आर्जव) ६) गुरुजनांची सेवा ७) अंतर्बाह्य पावित्र्य ८) बुद्धीची स्थिरता ९) आत्मसंयमन (मनोनिग्रह) १०) इंद्रियांच्या विषयोपभोगाविषयी विरक्ती ११) अहंकार नसणे १२) जन्म, मृत्यू, वार्धक्य, रोग व दुःख हे आपल्या पाठीमागे लागलेले दोष (भोग आहेत) अशी जाणीव १३) सर्वत्र अनासक्ति १४) कांता, पुत्र, घरदार इत्यादींमध्ये लंपट न होणे १५) प्रिय आणि अप्रिय गोष्टींच्या बाबतीत चित्ताची अखंड समता १६) परमेश्वराच्या ठिकाणी निश्चल भक्ती १७) एकांताविषयी प्रीति १८) जनसमूहाचा गोतावळा गोळा न करणे (लोकांचा अनावश्यक संग टाळणे) १९) अध्यात्मज्ञान नित्य आहे अशी धारणा आणि २०) तत्त्वज्ञानाच्या सिद्धांताचे परिशीलन.

हे सर्व गुण म्हणजे ज्ञान. याचाच अर्थ असा की हे सर्व गुण ज्ञानाची साधने आहेत. याच्या विपरीत जे सर्व काही ते अज्ञान होय. ज्ञानाची वरील व्याख्या पाहिली की ''सद्‌गुण म्हणजे ज्ञान'' या सॉक्रेटीसच्या वचनाची आठवण होते.

**प्रश्न १७० क्षेत्रज्ञाचे सविस्तर वर्णन कसे केले आहे ?**

**उत्तर** – अगोदर क्षेत्र म्हणजे काय ते सांगितले. नंतर क्षेत्रज्ञाची त्रोटक व्याख्या सांगितली गेली. तदनंतर ज्ञान म्हणजे काय किंबहुना ज्ञानाची साधने सांगण्यात आली. ही साधने क्षेत्रज्ञ जाणण्यासाठी निर्दिष्ट केली गेली. आता ज्याला जाणावयाचे ते ज्ञेय म्हणजे क्षेत्रज्ञ होय. या क्षेत्रज्ञाचे वर्णन उपनिषदांतील वर्णनाच्या आधारे गीतेत केले आहे.

जे जाणल्याने मनुष्य अमरत्वास पोहोचतो किंवा मोक्ष मिळवतो असे ते ज्ञेय मी स्वतःहून तुला समजावून सांगतो असे श्रीकृष्ण अर्जुनास म्हणाला. ज्याला सत् (व्यक्त)



किंवा असत् (अव्यक्त) असे नक्की म्हणता येत नाही असे अनादि तत्त्व म्हणजे ब्रह्म होय. हे ब्रह्म सर्व बाजूंनी हातापायांनी युक्त आहे. त्याला सगळीकडे डोळे आहेत, मुखे आहेत आणि कान आहेत. तेच या जगाला संपूर्णपणे व्यापून राहिले आहे.

या ब्रह्माच्या ठिकाणी सर्व इंद्रियांचे गुण भासमान होतात. परंतु वस्तुतः हे इंद्रियरहित आहे, इंद्रियातीत आहे. हे अलिप्त असूनही सर्व यच्चयावत् गोष्टींचे अधिष्ठान आहे. हे ब्रह्म निर्गुण आहे आणि तसेच गुणांचे उपभोग घेणारेही आहे.

हे ब्रह्म सर्व भूतमात्रांच्या बाहेर आहे आणि अंतर्यामी आहे. ते चल आहे तसेच अचलही आहे. हे ब्रह्म अतिशय सूक्ष्म आहे आणि त्यामुळे ते जाणण्यासही कठीण आहे. म्हटले तर ते दूर आहे, म्हटले तर जवळही आहे. हे ब्रह्म एकरूप, अखंड, एकसंध असूनही सगळ्या भूतमात्रांमध्ये विभागल्यासारखे वाटते. ते सगळ्यांचे उत्पत्ति, स्थिती आणि लयकारण आहे. तेजोमय पदार्थांचे ते तेज आहे आणि म्हणून साहजिकच ते अंधकाराच्या पलीकडे आहे. ते ज्ञेय आहे, ज्ञान आहे आणि ज्ञानगम्य (ज्ञानाने कळणारे) आहे. सर्वांच्या हृदयामध्ये याच ब्रह्माचे अधिष्ठान आहे. जो कोणी क्षेत्र, ज्ञान तसेच ज्ञेय जाणतो तो नक्की माझ्याच स्वरूपाला येऊन मिळतो असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

येथे आलेले ब्रह्माचे वर्णन परस्परभिन्न आहे. सगुण आणि निर्गुण ही जशी ब्रह्माची रूपे तसेच येथील वर्णन दोन प्रकाराने केले आहे. सगळ्या बाजूंनी हात, पाय, डोळे इत्यादि केलेले ब्रह्माचे वर्णन विश्वरूप अध्यायात श्रीकृष्णाने अर्जुनास दाखवलेल्या रूपाची आठवण करून देते. ब्रह्माचे कोणत्याही एका प्रकारच्या गुणविशेषाने वर्णन करणे शक्य नाही. कारण जेथे गुण आले तेथे मर्यादा आल्या. ब्रह्म तर सगळ्या मर्यादांच्या पलीकडे आहे. अमर्याद आहे. म्हणूनच शेवटी उपनिषदांनी त्याचे वर्णन ''नेति नेति'' असे केले.

**प्रश्न १७१ प्रकृति आणि पुरुष यांच्याबद्दल या अध्यायात काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – प्रकृति आणि पुरुष या दोन संज्ञा प्राचीन आहेत आणि या सर्वांच्या परिचयाच्या आहेत. या दोन्ही संज्ञा सांख्यदर्शनातील आहेत. परंतु येथे त्यांचे विवरण सांख्यदर्शनाप्रमाणे नाही.

प्रकृति आणि पुरुष ही दोन्हीही अनादि आहेत. सगळ्या प्रकारची कार्ये (विकार) आणि गुण हे प्रकृतीपासून निर्माण होतात. कार्य म्हणजे देह आणि करण म्हणजे इंद्रिय. यांच्या कर्तृत्वाच्या पाठीमागे प्रकृति हे कारण आहे. सुख आणि दुःख यांच्या उपभोगाविषयी पुरुष हा निमित्त म्हणून सांगितला जातो. वास्तविक तो कशाचाही उपभोग घेत नाही. पुरुष हा प्रकृतीशी संयुक्त झाला की त्याला प्रकृतीची साथ सोडता येत नाही.

प्रकृतीच्या सर्व गुणांचा उपभोग (चांगला आणि वाईट) त्याला घ्यावाच लागतो आणि त्यामुळे त्याला चांगल्या किंवा वाईट योनीमध्ये जन्महीघ्यावा लागतो.

हा पुरुष केवळ उपद्रष्टा म्हणजे जवळ (उप) बसून पहाणारा आहे. हा प्रकृतीस अनुमोदन देणारा आणि तिचे गुणसंवर्धन करणारा आहे. हा भोक्ताही आहे. सर्व सूत्रे संचालन करणारा हा फार मोठा ईश्वर आहे, महेश्वर आहे. देहात असलेल्या याला परमात्मा असेही म्हणतात. जो कोणी पुरुष आणि प्रकृति यांना सम्यक्प्रकारे जाणतो तो सर्व कर्मे करीत असूनही जगाकडे तटस्थपणे पाहू शकतो. तो परत जन्म पावत नाही. जन्म नसल्यामुळे मृत्यूही पावत नाही.

सांख्य तत्त्वज्ञानात पुरुष अनेक आहेत. पुरुष चेतन आहे परंतु निर्गुण आणि निष्क्रिय आहे. सृष्टीतील विविध वस्तूंचे व अखिल घडामोडीचे आदिकारण प्रकृति आहे. परंतु ही प्रकृति जड आहे. सांख्यांची प्रकृति आणि पुरुष येथे अपेक्षित नाही.

गीतेतील पुरुष हा परमात्माच होय. परंतु देहाच्या उपाधीमुळे त्याला जीवात्मा ही संज्ञा प्राप्त होते व तो सगळी सुखदुःखे अनुभवतो असे मानले जाते. गीतेच्या दृष्टीने पुरुष आणि प्रकृती सांख्यांप्रमाणे दोन भिन्न तत्त्वे नाहीत तर एकाच पुरुषोत्तमाची वा परमतत्त्वाची अनुक्रमे श्रेष्ठ व कनिष्ठ रूपे आहेत असे म्हणता येईल.

**प्रश्न १७२ आत्म्यास जाणण्यासाठी कोणकोणते मार्ग सांगितले आहेत ?**

**उत्तर** – या आत्म्याला जाणण्याचे अनेक मार्ग आहेत. कोणी योगी ध्यानधारणा इत्यादि योगमार्गात सांगितलेल्या साधनांच्या सहाय्याने आत्मदर्शनाचे अधिकारी होतात. तर कोणी ज्ञानमार्गाने (सांख्यमार्गाने) आत्म्यास जाणू शकतात. याशिवाय कर्मयोग हाही एक मार्ग आहे. या मार्गानेही आत्मसाक्षात्कार होतो. ज्यांना यापैकी कोणताही मार्ग अनुसरता येत नाही ते अधिकारी गुरूंकडून आत्म्याचे स्वरूप समजावून घेतात व उपासनेच्या सहाय्याने शेवटी आपले ध्येय साध्य करून घेतात. तेही श्रद्धायुक्त उपासना करून मृत्यूला तरून जातात.

अशाप्रकारे आत्म्यास म्हणजे पर्यायाने परमात्म्यास जाणण्याचे अनेक मार्ग आहेत. कोणत्याही मार्गाने गेले तरी एकाच ठिकाणी पोहोचता येते. भारतीय तत्त्वज्ञानाची ही भव्यता आहे. ज्याप्रमाणे सर्व नद्या शेवटी समुद्राला जाऊन मिळतात त्याप्रमाणे सर्व मार्ग शेवटी परमेश्वराकडेच जातात. ज्याला जो जमेल तो मार्ग त्याने निवडावा. अमक्याच मार्गाने जा असे कोणी कोणाला म्हणू नये. ज्याने त्याने आपल्या प्रकृतीच्या गुणधर्माप्रमाणे मार्ग निवडावा आणि अंतिम ध्येयाकडे वाटचाल सुरू करावी.



**प्रश्न १७३ या अध्यायाच्या शेवटी श्रीकृष्णाने अर्जुनास काय सांगितले आहे ?**

**उत्तर** – क्षेत्र-क्षेत्रज्ञ यांच्या ज्ञानासंबंधी २६ ते ३४ या श्लोकांत उपसंहार केला आहे. जे सर्व काही या जगात उत्पन्न होते ते क्षेत्र व क्षेत्रज्ञ यांच्या संयोगामुळे होते. परमेश्वर सगळ्या प्राणिमात्रांच्या ठिकाणी सारखाच भरून राहिला आहे. हे जो जाणतो तोच खरा ज्ञाता होय. समत्वबुद्धी प्राप्त झाली की तो मनुष्य कोणालाही इजा करीत नाही. सगळीकडे एकच परमात्मा पहाणारा तो परमगतीस जातो. आपण काहीच करीत नाही. सर्व काही प्रकृतीकडून केले जाते अशी त्याची धारणा असते. असा जाणकार हाच खरा तत्त्वज्ञ होय.

सर्व प्राणिमात्रांत एकत्व पहाणारा ज्ञानी पुरुष शेवटी ब्रह्मचिंतनातून स्वतःच ब्रह्म होतो. हे अर्जुना, परमात्म्याचा जरी जीवात्मा म्हणून शरीराशी संबंध आला तरी तो कशानेही लिप्त होत नाही. परमात्मा हा अनादि आहे, अव्यय आहे, अविकारी आहे व गुणातीतही आहे. आकाश हे सगळीकडे पसरले आहे. परंतु ते सूक्ष्मस्वरूपी असल्यामुळे कशानेही जसे लिप्त होत नाही त्याचप्रमाणे सर्वांच्या देहांत रहाणारा आत्मा देहाच्या कर्मांनी लिप्त होत नाही. सूर्य ज्याप्रमाणे संपूर्ण जगतास प्रकाशित करतो त्याप्रमाणे क्षेत्री म्हणजे आत्मा सर्व शरीरास (क्षेत्रास) प्रकाशित करतो.

क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांचे ज्ञान करून घेणे हेच खरे जीवितध्येय असायला पाहिजे. या ज्ञानाने मुक्ती मिळते म्हणजेच श्रेष्ठ पदाला जाऊन पोहोचता येते.

**प्रश्न १७४ या अध्यायाचा सारांश म्हणून काय सांगता येईल ?**

**उत्तर** – या अध्यायाचे नाव ''क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग'' असे आहे. काही ठिकाणी ''प्रकृतिपुरुषविवेकयोग'' असेही नाव आढळून येते. दोन्हीही नावे समर्पक आहेत.

अध्यायाच्या नावाप्रमाणे अगदी सुरवातीपासून विषयाची थेट सुरवात झाली आहे. श्रीकृष्णाने स्वतःहून क्षेत्र आणि क्षेत्रज्ञ यांच्याविषयी सांगण्यास प्रारंभ केला आहे. थोडक्यात क्षेत्र म्हणजे देह व क्षेत्रज्ञ म्हणजे देही. क्षेत्र म्हणजे प्रकृती आणि क्षेत्रज्ञ म्हणजे पुरुष म्हणजे परमपुरुष हाही अर्थ व्यापक दृष्टीने आहे. प्रत्येक शरीरात मीच क्षेत्रज्ञ आहे असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. या अध्यायातील सर्व ३४ श्लोक श्रीकृष्णाच्या मुखी आहेत.

या अध्यायात ब्रह्मसूत्रांचा अप्रत्यक्ष उल्लेख आहे. परंतु या उल्लेखावरून ब्रह्मसूत्रे म्हणजे बादरायणांचीच ब्रह्मसूत्रे असे म्हणता येत नाही.

क्षेत्राची व्याख्या विस्तृत स्वरूपात येथे दिली आहे. या व्याख्येमध्ये ३१ तत्त्वांचा समावेश आहे. या तत्त्वांमध्ये सांख्यांची आणि वैशेषिकांची तत्त्वे आहेत. ज्ञानाची

व्याख्याही २० गुणांनी केली आहे. गुण म्हणजे ज्ञान व त्याहून सर्व विपरीत म्हणजे अज्ञान होय. ब्रह्म म्हणजे काय हेही विस्ताराने येथे सांगितले आहे. ब्रह्माचे वर्णन उपनिषदांतील वर्णनावर आधारित आहे. श्वेताश्वतर, मुंडक, ईशावास्य, बृहदारण्यक ही या संदर्भातील काही उपनिषदे आहेत. या अध्यायातील प्रकृति आणि पुरुष सांख्य दर्शनातील नाहीत हे लक्षात ठेवणे अगत्याचे आहे.

आत्म्यास जाणण्याचे अनेक मार्ग आहेत असे अगदी सुस्पष्टपणे येथे म्हटले आहे. कोणत्याही एका मार्गाची मिरासदारी आत्मज्ञानाच्या बाबतीत नाही. ज्याला जो रुचेल तो मार्ग त्याने निवडावा. शेवटी गन्तव्य एकच आहे. एकच परमेश्वर सर्व प्राणिमात्रांच्या ठायी भरून राहिला आहे. सर्वांच्या ठिकाणी परमेश्वर पहाणारा माणूस स्वतः शेवटी परमेश्वरच होतो.

❀❀❀



# १९. गुणत्रयविभागयोग (श्लोकसंख्या २७)

**अध्याय चौदावा**

**प्रश्न १७५ या अध्यायाच्या सुरवातीस सर्व प्राणिमात्रांच्या उत्पत्तीविषयी श्रीकृष्णाने काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – मी तुला परत उत्तमातले उत्तम ज्ञान सांगतो की जे जाणून सर्व मुनि सर्वोत्तम सिद्धीला प्राप्त झाले. हे ज्ञान मिळवून अनेक ज्ञानी माणसे माझ्या स्वरूपाला प्राप्त झाली. या ज्ञानाचा विशेष असा आहे की हे प्राप्त झाले असताना ज्ञात्याला सृष्टीच्या उत्पत्ती वेळी जन्म येत नाही तसेच त्याचा प्रलयकाळीही नाश होत नाही असे श्रीकृष्ण म्हणाला. हे पार्था, माझ्या महद्ब्रह्मरूपी योनीत मी सर्व प्राणिमात्रांच्या उत्पत्तीचे बीजारोपण करतो व त्यामुळे सृष्टीच्या उत्पत्तीची प्रक्रिया सुरू होते. सर्व योनींमध्ये जी जी शरीरे निर्माण होतात ती महद्ब्रह्म या योनीपासूनच होतात आणि त्यांना बीज देणारा मीच जनक आहे असे श्रीकृष्ण म्हणाला.

प्राणिमात्रांच्या उत्पत्तीचे कारण परमेश्वर आहे. तोच महद्ब्रह्मरूपी योनीमध्ये बीज स्थापितो व पुढे सर्व काही सुरू होते. परमेश्वर स्वतःहून स्वतःपासून एकाचा अनेक होतो. महद्ब्रह्म याचा अर्थ परमेश्वराची माया म्हणजे त्रिगुणात्मिका प्रकृति असा शंकराचार्यांनी केला आहे. प्रकृति ही संकल्पना सांख्यांची आहे. सांख्यांच्या सृष्टिप्रक्रियेमध्ये सुद्धा प्रकृति आणि पुरूष एकत्र यावेच लागतात. अन्यथा सृष्टीची उत्पत्ति होत नाही. येथे सांख्य तत्त्वज्ञान स्वीकारलेले नाही. सांख्यांचे द्वैत गीतेला मान्य नाही. सर्व काही कर्ता करविता एकच परमेश्वर आहे. त्याला उत्पत्तीसाठी आणखी कोणत्या निराळ्या तत्त्वाची मदत घ्यावी लागत नाही. ''मायां तु प्रकृतिं विद्यात्'' असे श्वेताश्वतरोपनिषदामध्ये म्हटले आहे. याचा अर्थ असा की मायेलाच प्रकृति म्हणून जाणावे.

सुरवातीला श्रीकृष्णाने असे म्हटले आहे की मी तुला उत्तमातले उत्तम ज्ञान सांगतो. याचा अर्थ असा नव्हे की या गुणत्रयविभागयोगात सांगितलेलेच ज्ञान उत्तम आहे. असे धरले तर पूर्वीचे सांगितलेले सर्व काही गौण होईल अथवा अनुत्तम होईल. गीतेच्या नेहमीच्या सवयीप्रमाणे पुष्कळवेळा जे प्रस्तुत असेल ते उत्तम म्हटले जाते एवढेच.

**प्रश्न १७६ सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचा शरीरावर काय प्रभाव पडतो ? हे तीन गुण काय कार्य करतात ?**

**उत्तर –** प्रकृतीपासून सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण उत्पन्न होतात. हे तीन गुण शरीरात असलेल्या जीवात्म्याला बद्ध करून ठेवतात. जीवात्म्याला शरीराच्या उपाधीमुळे या गुणांची बाधा होते आणि जणुकाही तो बंधनात पडतो. या तीन गुणांचे निरनिराळ्या प्रकारचे वैशिष्ट्य आहे. हे तीनही गुण आपापले प्रभाव शरीरावर पाडतात.

या तीनही गुणांत सत्त्वगुण श्रेष्ठ आहे. हा निर्दोष आहे. हा प्रकाशक आहे. हा गुण सुख आणि ज्ञान यांच्या सहाय्याने जीवात्म्यास बद्ध करतो. सत्त्वगुण झाला तरी तो गुणच. त्याचे स्वभावजन्य कार्य म्हणजे बंधनात टाकणे. या गुणामुळे चांगल्या प्रकारच्या का होईना पण जीवात्मा बंधनात पडतो. मोक्ष संपादन करण्यासाठी प्रकृतीच्या तीनही गुणांना पार करून निस्त्रैगुण्य व्हावे लागते. ज्ञान आणि सुखाची लालसा उत्पन्न करणे हे सत्त्वगुणाचे कार्य होय.

रज हा गुण सत्त्वगुणापेक्षा कनिष्ठ दर्जाचा होय. हा गुण रागात्मक आहे. म्हणजे या गुणामुळे दृश्य वस्तूशी संबंध जोडला जातो. हा गुण तृष्णा (अप्राप्त वस्तूची अभिलाषा) व मिळालेल्या वस्तूमध्ये आकंठ आसक्ती यांच्या जोडीतून निर्माण होतो. हा गुण जीवात्म्याला कर्मे करण्याची चटक लावतो व त्यामुळे जीवात्मा कर्मासक्त होतो. काम व क्रोध रजोगुणापासून निर्माण होतात असे पूर्वी म्हटले आहे. (अध्याय ३.३७)

तम हा गुण तीनही गुणांमध्ये निकृष्ट दर्जाचा होय. हा गुण अज्ञानापासून निर्माण होतो. हा जीवात्म्याला भुलवतो व नाना प्रकारच्या मोहात पाडतो. या गुणापासून अविवेक, आळस आणि निद्रा उत्पन्न होऊन जीवात्मा फार मोठ्या बंधनात पडतो. हा गुण इतर दोन गुणांपेक्षा वाईट कर्मांमध्ये फार प्रभावी आहे.

सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांचे समालोचन करावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की सत्त्वगुण सुखाची इच्छा उत्पन्न करतो. रजोगुण कर्माविषयी चटक लावतो तर तमोगुण ज्ञान झाकाळून अविवेकाच्या मार्गावर घेऊन जातो.

**प्रश्न १७७ आपल्या शरीरात केव्हा कोणता गुण प्रबळ झाला आहे असे समजावे ?**

**उत्तर –** कफ, पित्त आणि वात हे तीन विकार जसे आपल्या शरीरात असतात त्याप्रमाणे सत्त्व, रज आणि तम हे गुण आपल्या शरीरात वास करतात. हे तीन गुण एकमेकांना सोडून कधीच रहात नाहीत. म्हणजे यांच्यापैकी कोणाचाही संपूर्ण नाश होत नाही. फक्त यांचे प्राबल्य कमी अधिक होते एवढेच. या तीन गुणांची जणुकाही लढाई चालू असते. रजोगुण आणि तमोगुण यांना पराभूत करून सत्त्वगुण वरचढ होतो. तमोगुण आणि



सत्त्वगुण यांचा प्रभाव कमी झाला की रजोगुण डोके वर काढतो. रजोगुण आणि सत्त्वगुण जेव्हा निष्प्रभ होतात तेव्हा तमोगुण बलशाली होतो.

जेव्हा शरीरामध्ये सर्व द्वारांमध्ये म्हणजे विशेषतः ज्ञानेंद्रियांमध्ये तेजस्वीपणा उत्पन्न होतो म्हणजे ज्ञान उत्पन्न होते तेव्हा सत्त्वगुणाची वाढ झाली आहे असे समजावे. ज्ञानाची भूक सत्त्वगुण निर्माण करतो. त्याचे ते कार्य आहे म्हणून ज्ञानाची जाणीव व्हायला लागली की सत्त्वगुण वृद्धिंगत झाला आहे असे नक्की समजायला हरकत नाही.

शरीरामध्ये जेव्हा लोभाकडे लालसा निर्माण होते तसेच कर्माकडे प्रवृत्ति व कर्मामध्ये आसक्ती आणि मनाची अशांति उत्पन्न होते तेव्हा ही लक्षणे रजोगुण वाढल्याची आहेत असे समजावे. याचप्रमाणे काम आणि क्रोध यांची वृद्धी झाली असता रजोगुण बराच उंचावला असल्याची ते ग्वाही देतात.

अविवेक, अज्ञान, आळस, निद्रा, अनवधान, मोह इत्यादि दुर्गुण जेव्हा शरीरावर ताबा मिळवतात तेव्हा तमोगुण अगदी उच्च स्थानावर आरूढ झाला आहे असे समजावे. या तमोगुणाच्या वृद्धीमुळे जीवात्म्याचे फार नुकसान होते.

सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण शरीरामध्ये निरनिराळ्या पातळीवर असतात. त्यांचे प्रमाण कमी अधिक होत असते. त्यांचे जसे जेव्हा प्राबल्य असेल तसे त्यावेळी मनुष्य चांगले अगर वाईट वर्तन करतो.

**प्रश्न १७८ शरीर सोडताना कोणता गुण सर्वाधिक असताना कोणते फळ मिळते ?**

**उत्तर –** सत्त्वगुण शरीरात प्रामुख्याने असताना जर मृत्यू आला तर त्या माणसास उत्तम लोकांची प्राप्ती होते. सत्त्वगुण आधिक्याने असताना नैसर्गिक प्रवृत्ती ज्ञानाकडे असते. तो मनुष्य चांगल्या विचारांतच असतो. चांगलेच चिंतन त्याच्याकडून होत असते. आणि शेवटी ज्याचा ध्यास लागलेला असतो त्याप्रमाणे गती मिळते. सत्त्वगुणाचे प्राबल्य झाले असता जर कालवश व्हायची वेळ आली तर तो मनुष्य ज्या देवदेवतांची उपासना करीत असेल त्या देवदेवतांच्या उत्तमलोकांस तो जातो.

शरीरामध्ये रजोगुण वृद्धिंगत झाला असताना दिवंगत व्हायची वेळ आली तर तो मनुष्य अशा कुळात जन्माला येतो की तेथे त्याला कर्माचरण करणे सोपे जाते. रजोगुणी मनुष्य कर्मासक्त असतो म्हणून त्यास त्याला अनुकूल असणाऱ्या ठिकाणी जन्म येतो. मात्र तमोगुण शरीरामध्ये प्रबळ असताना मरण आले तर तो मनुष्य मूढयोनीमध्ये म्हणजे पशुपक्ष्यादि वर्गात जन्म पावतो. मरणसमयी एखाद्या गुणाचे प्राबल्य अचानकपणे होत नसते. जो गुण नेहमी प्रबळ असतो तोच तेव्हा प्रबळ असण्याची शक्यता अधिक असते. एकाएकी भलतेच घडण्याची शक्यता नसते.

मृत्युकाळी जो गुण प्रामुख्याने शरीरात असतो त्याप्रमाणे त्याला नंतरची गती मिळते. परंतु असे असले तरी नेहमी जे सात्त्विक आचरणाचे लोक आहेत त्यांना उत्तमगती मिळते. ते देवलोकात जातात, जे रजोगुणी असतात ते पुनः जन्म घेऊन मनुष्यलोकात येतात. जे तमोगुणी आहेत ते मृत्यूनंतर अधोगतीला जातात.

चांगल्या कर्माचे सात्त्विक फळ मिळते म्हणजे सत्त्वगुण वाढीस लागतो. रजोगुणाचे फळ दुःख तर तमोगुणाचे फळ अज्ञान हे आहे.

**प्रश्न १७९ त्रिगुणातीत झाल्याने काय होते ?**

**उत्तर** – सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांमुळेच निरनिराळे खेळ शरीरात होत असतात. परंतु या तीन गुणांना पार करून पुढे जायचे असते. त्रिगुणांच्या पलीकडे असलेल्या परमेश्वरास जाणणे हेच नरजन्माचे इतिकर्तव्य होय. जेव्हा देही (क्षेत्रज्ञ) प्रकृतीपासून उद्‌भवलेल्या सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांना पार करून पुढे जातो तेव्हा तो सर्व दुःखापासून मुक्त होतो व मोक्षाचा अधिकारी होतो. त्रिगुणांच्या खेळात न अडकता त्यांना दूर करून साधकाने पुढे जायचे असते. त्रिगुणातीत झाल्याने जन्म, मृत्यु, जरा, व्याधी, दुःख इत्यादींपासून सुटका होते व साधकास अमृतत्त्व प्राप्त होते.

**प्रश्न १८० त्रिगुणातीत झालेल्या माणसास कसे ओळखावे ? त्याचे आचरण कसे असते व तो त्रिगुणातीत कसा होतो ?**

**उत्तर** – वरील तीन प्रश्न अर्जुनाने २१ व्या श्लोकात विचारले आहेत. त्यांची उत्तरेही अनुक्रमे श्रीकृष्णाने दिली आहेत.

प्रकाश (ज्ञान), कर्मप्रवृत्ति आणि मोह ही अनुक्रमे सत्त्व, रज आणि तम यांच्या कार्यांना आलेली फळे आहेत. जो मनुष्य ही फळे प्राप्त झाली असताना आनंदून डोलत नाही किंवा दुःखीही होत नाही तो त्रिगुणातीत झाला असे ओळखावे.

त्रिगुणातीत झालेला मनुष्य उदासीन माणसासारखा असतो, तटस्थ असतो. गुणांच्या खेळांकडे तो साक्षीरूपाने पहातो. त्यांच्या खेळांत रस घेत नाही आणि अडकतही नाही. तो चाळवला जात नाही. त्याला साम्यावस्था प्राप्त झाल्याने तो कधीही स्वस्थितीपासून विचलित होत नाही. असे त्याचे आचरण असते.

त्रिगुणातीत मनुष्य मातीचे ढेकूळ, दगड व सुवर्ण यांच्याकडे समदृष्टीने पहातो. तो आत्मरूपी रहात असल्यामुळे मानापमान तो जाणत नाही. आवडती व नावडती गोष्ट त्याला सारखीच वाटते. तो धैर्यशाली असतो. शत्रू व मित्र त्याला सारखेच जवळचे वाटतात. किंबहुना हा मित्र व हा शत्रू असा भेदभाव त्याच्याकडून होऊच शकत नाही. कोठेलेही काम तो फळाच्या इच्छेने प्रारंभ करीत नाही. समत्वबुद्धीमुळे मनुष्य त्रिगुणातीत होतो.



श्रीकृष्णाने असे म्हटले आहे की जो माझी मनोभावे भक्ती करतो तो त्रिगुणातीत होतो व ब्रह्मरूप होण्याची पात्रता त्याच्या अंगी येते. एकनिष्ठ व अखंड भक्तीचा महिमा हा असा आहे. ब्रह्म हे अव्यय आहे. शाश्वत आहे आणि सनातन आहे, ते सुखाचे परम निधान आहे. अशा या ब्रह्माचे अधिष्ठान मीच आहे असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

येथे त्रिगुणातीत माणसाची लक्षणे वाचताना दुसऱ्या अध्यायातील स्थितप्रज्ञाच्या लक्षणांची आठवण होते. त्याचप्रमाणे बाराव्या अध्यायातील भक्तिमान् पुरुषही डोळ्यांसमोर येतो.

**प्रश्न १८१ या अध्यायाचा सारांश काय आहे ?**

**उत्तर** – या अध्यायाचे नाव गुणत्रयविभागयोग असे आहे. या अध्यायात सांगितलेले ज्ञान उत्तमातले उत्तम ज्ञान आहे असे म्हटले आहे. परंतु ही प्रस्तुत ज्ञानाची प्रशंसा आहे.

परमेश्वर स्वतःहून महद्‌ब्रह्मरूपी योनीमध्ये गर्भ ठेवतो व सकल प्राणिमात्रांची उत्पत्ती करतो. महद्‌ब्रह्म म्हणजे परमेश्वराची माया होय. पुढे या मायेलाच प्रकृती म्हटले आहे. एकच परमेश्वर स्वतःहून अनेक होतो.

सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण शरीरात राहून भिन्न भिन्न स्वरूपाचे कार्य करतात. हे गुण उत्तरोत्तर कनिष्ठ स्वरूपाचे आहेत. साधारणतः सत्त्वगुणापासून ज्ञान, रजोगुणापासून कर्मासक्ती व तमोगुणापासून मोह, अविवेक इत्यादी उत्पन्न होतात. कफ, पित्त, वात हे जसे शरीरामध्ये असतात तसेच सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण शरीरात असतात व आपापले कार्य करतात. या तीनही गुणांचे शरीरातील प्रमाण विषम असते. जेव्हा जो गुण प्रबळ होतो तेव्हा मनुष्य त्या गुणाला अनुसरून कार्य करतो.

मृत्यूकाळी सत्त्वगुणाचे प्राबल्य असता उत्तम लोकांची प्राप्ती होते, रजोगुण असता मनुष्यलोकात कर्माचरण करण्यासाठी जन्म येतो, परंतु तमोगुण असता पशुपक्ष्यांच्या योनीत जन्म येतो.

त्रिगुणातीत होणे हे मनुष्याच्या आयुष्याचे इतिकर्तव्य आहे. त्रिगुणातीत झाल्याने जन्म, मृत्यू, जरा,व्याधी इत्यादींपासून कायमची सुटका होते व मोक्ष प्राप्त होतो. त्रिगुणातीत झालेला मनुष्य सगळीकडे समत्वबुद्धीने पहातो. त्याला ओळखण्याचे हेच फार मोठे गमक आहे. मानापमान तो जाणीत नाही किंवा शत्रू मित्र असे भेदभाव त्याच्याकडे नसतात. प्रिय व अप्रिय त्याला सारखेच. परमेश्वराच्या एकनिष्ठ व अखंड भक्तीने त्रिगुणातीत होता येते.

# २०. पुरुषोत्तमयोग (श्लोकसंख्या २०)

## अध्याय पंधरावा

**प्रश्न १८२ अश्वत्थ वृक्ष म्हणजे काय ?**

**उत्तर** – अश्वत्थ वृक्ष म्हणजे संसारवृक्ष. पण संसार म्हणजे मनुष्यमात्र जो करतात तो नव्हे. तर संसार म्हणजे परमेश्वराने उत्पन्न केलेले सर्व विश्व. याला ब्रह्मवृक्ष असेही म्हणतात.

अश्वत्थ वृक्ष हा एक विलक्षण वृक्ष आहे. याचे कारण असे की या वृक्षाचे जे मूळ आहे ते वरती आहे आणि त्याच्या फांद्या वरून खाली येऊन फोफावल्या आहेत. या वृक्षाची पाने म्हणजे वेद. येथे छंद म्हणून त्यांचा उल्लेख केला आहे. शिवाय हा वृक्ष अव्यय म्हणजे कधीही नाश पावणारा नाही. जो मनुष्य हा वृक्ष जाणतो तोच खरा वेदवेत्ता होय. असे वर्णन या अध्यायाच्या पहिल्या श्लोकात केले आहे.

कोणाला असे वाटेल की, या वृक्षाचे मूळ वरती कसे ? तर याचे उत्तर आहे की परमेश्वराचे स्थान वर कल्पिल्यामुळे आणि मूळ एकच असल्यामुळे हा वृक्ष वरून खाली असा आला आहे आणि वाढला आहे. हा वृक्ष अविनाशी आहे कारण तो परमेश्वराने निर्माण केला आहे. या सर्व सृष्टीच्या पसाऱ्याच्या पाठीमागे तोच एक कर्ता आणि करविता आहे.

अश्वत्थ वृक्षाचा अर्थ पिंपळ वृक्ष असा आहे. अश्वत्थ शब्दाची व्युत्पत्ति – अ म्हणजे नाही, श्व म्हणजे उद्या आणि त्थ म्हणजे टिकणारा – म्हणजे उद्यापर्यंत न टिकणारा वृक्ष अशी देतात. परंतु ही व्युत्पत्ति अव्यय शब्दाच्या अगदी विरुद्ध आहे. पण जेव्हा या वृक्षाचे मूळ म्हणजे परमेश्वर जाणला जातो तेव्हा हा वृक्ष ताबडतोब असून नसल्यासारखा होतो. उद्याच काय पण तो तात्काळ नाहीसा होतो. हा सर्व मायेचा पसारा परमेश्वर जाणल्यानंतर त्या माणसापुरता अंतर्धान पावतो. या अर्थाने अश्वत्थ वृक्ष हा उद्यापर्यंत न टिकणारा असा आहे. याला संसारवृक्ष व ब्रह्मवृक्ष असेही म्हणतात.

या अध्यायाच्या दुसऱ्या श्लोकात अश्वत्थ वृक्षाचे वर्णन थोडे निराळे केले आहे. या वृक्षाच्या शाखा विस्तार पावून त्या खाली आणि वर अशाही पसरल्या आहेत. या वृक्षाच्या शाखा सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांच्या सामर्थ्याने फोफावल्या आहेत आणि रूप, रस, स्पर्श, गंध आणि शब्द या पाच विषयांनी सुरेख अंकुरल्या आहेत. शिवाय कर्माचे रूप धारण करणाऱ्या या वृक्षाच्या मुळ्या मनुष्यलोकामध्ये दूरवर पसरल्या आहेत.



हे वर्णन सांख्य तत्त्वज्ञानाशी थोडेसे जुळते आहे. त्रिगुण म्हणजे प्रकृतीचा पसारा आणि तिच्या पाठीशी असलेला पुरुष म्हणजे परमेश्वर. पुरुष आणि प्रकृती मिळून या सर्व विश्वाचा पसारा उत्पन्न होतो असे सांख्य मानतात.

अशाप्रकारे अश्वत्थ वृक्ष सगळीकडे पसरला आहे. याचे मूळ परमेश्वर आहे आणि तो परमेश्वर जाणावा. गीतेतील अश्वत्थ वृक्षाची संकल्पना कठोपनिषदाच्या सहाव्या वल्लीच्या पहिल्या श्लोकातून घेतलेली दिसते. तेथेही हा वृक्ष ऊर्ध्वमूल आहे आणि त्याच्या शाखा खाली आहेत असे म्हटले आहे. हा अश्वत्थ वृक्ष सनातन आहे. हा शुद्ध आहे आणि अमृतमय आहे. हाच वृक्ष सर्व जगताचा आधार आहे आणि त्याला उल्लंघून कोणाला जाता येत नाही असे तेथे म्हटले आहे.

**प्रश्न १८३ अश्वत्थ वृक्ष कशाने तोडायचा आणि कशासाठी तोडायचा ?**

**उत्तर** – अश्वत्थ वृक्ष कोठे सुरू झाला आहे, त्याचा मध्य कोठे आहे, तो कोठपर्यंत आणि कसा वाढला आहे याचा थांगपत्ता मनुष्यलोकात लागत नाही. हा वृक्ष अफाट पसरला आहे. त्याची पाळेमुळे अतिशय दूरवर आणि खोल पसरली आहेत. असा हा प्रचंड अश्वत्थ म्हणजे संसारवृक्ष आपल्या ज्ञानाच्या आड येतो. हा मायावी अश्वत्थ वृक्ष तोडल्याशिवाय या अश्वत्थ वृक्षाचे मूळ जे ब्रह्म त्याच्याकडे जाता येणार नाही. हा वृक्ष इतर वृक्षांसारखा साधारण नसल्याने याला तोडण्यासाठी जे शस्त्र वापरायचे तेही फार भक्कम असायला पाहिजे. हा वृक्ष तोडण्यासाठी ''असंग'' हे शस्त्र वापरावे असे सांगितले आहे. असंग म्हणजे अनासक्ति. आपल्या कर्मानुसार हा वृक्ष पोसला जात असल्यामुळे प्रत्येक कर्म आसक्तिविरहित केले पाहिजे. अनासक्तिरूप शस्त्र फार धारदार पाहिजे. या अनासक्तिरूप शस्त्राने हा संसारवृक्ष छेदावा.

हा संसारवृक्ष तोडण्याचा प्रयत्न करीत असताना या वृक्षाच्या मुळाशी सनातन पुरुष आहे, तिकडे मी जाईन असे चिंतन करावे. कारण शेवटी सर्वांचे गन्तव्य तेच आहे. त्या परमपुरुषाच्या स्थानाला पोचल्यावर परत मागे यावे लागत नाही. जन्म-मृत्यूच्या चक्रातून सुटका होते. संसारवृक्ष तोडल्याशिवाय त्या आदिकारणाकडे जाता येणार नाही. त्या मूळ कारणाकडे जाण्यासाठी अश्वत्थ म्हणजेच संसारवृक्ष तोडायला सांगितले आहे.

**प्रश्न १८४ परमेश्वराच्या अव्यय स्थानाकडे कोण जाऊ शकतात आणि त्या स्थानाबद्दल काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – परमेश्वराच्या अव्यय स्थानाकडे म्हणजे ब्रह्मपदाकडे जाण्यासाठी अधिकार प्राप्त व्हावा लागतो. तो अधिकार मिळावा म्हणून सुख, दुःख इत्यादी द्वंद्वापासून मुक्त व्हायला पाहिजे. आसक्ती वगैरे दोष जिंकून पवित्र होणे आवश्यक आहे. तसेच अध्यात्म हा जीवनाचा स्थायीभाव व्हायला पाहिजे. याशिवाय मुख्य म्हणजे वासनारहित होणे अगत्याचे आहे. मान, अपमान आणि मोह यांच्यापासूनसुद्धा दूर राहिले पाहिजे. एवढे

सर्व ज्याला जमेल त्याला ब्रह्मपदाकडे जायला अधिकार प्राप्त होतो आणि असे अधिकारी साधक त्या अव्यय स्थानाकडे जाऊ शकतात.

या अव्यय स्थानाला ''परम धाम'' असे म्हटले आहे. ते स्थान एवढे स्वयंप्रभावी आहे की सूर्य त्या स्थानाला प्रकाशित करू शकत नाही. चंद्राचेही काही चालत नाही. साक्षात् अग्निसुद्धा काही करण्यास समर्थ नाही. कोणीही त्याला प्रकाशित करू शकत नाही. ते अशा प्रकारचे स्थान आहे की तेथे गेल्यावर परत संसारात यावे लागत नाही. तेथे गेल्यावर जन्म-मृत्यूच्या येरझाऱ्याचा शेवट होतो. तेथे गेल्यावर अढळ स्थान प्राप्त होते. येण्याचा आणि जाण्याचा प्रश्न रहात नाही. परमेश्वराच्या परमधामाकडेच सर्व साधकांचे लक्ष लागलेले असते.

**प्रश्न १८५ या अध्यायाच्या सातव्या श्लोकात म्हटल्याप्रमाणे जीव हा परमेश्वराचा अंश आहे काय ?**

**उत्तर** – ''माझाच (परमेश्वराचा) अंश या जीवलोकात जीवात्मा झाला आहे'' असे सातव्या श्लोकात स्पष्ट म्हटले आहे. परंतु येथे असा प्रश्न येतो की तो परमेश्वर किंवा परमात्मा असा आहे का की, ज्याचे भाग होऊ शकतात किंवा अंश होऊ शकतात ? परमात्मा हा अखंड आहे. शिवाय जी वस्तु सावयव असते किंवा ज्या वस्तूचे विभाजन होऊ शकते ती वस्तु अनित्य असते. परमात्मा तर नित्य आहे. असे जर आहे तर जीव हा परमेश्वराचा अंश कसा ?

शंकराचार्यांनी याचे स्पष्टीकरण सुंदर दिले आहे. घटाकाश हे महाकाशाचाच भाग असते. जेव्हा घट नाहीसा होतो तेव्हा ते आकाश महाकाशामध्ये विलीन होते. त्याचप्रमाणे जीव हा सुद्धा परमेश्वराशी एकरूपता पावतो. सूर्याचे प्रतिबिंब जसे पाण्यात पडते आणि पाण्याच्या अभावी जसे सूर्यात विलीन होते त्याचप्रमाणे परमात्मा आणि जीवात्मा यांचा संबंध आहे. हे दोन्ही वस्तुतः भिन्न नाहीत.

प्रत्येक जीवात जर परमेश्वराचा अंश खऱ्या अर्थाने आहे असे धरले तर परमेश्वराचे असंख्य अंश कल्पावे लागतील. जेवढे प्राणिमात्र तेवढे परमेश्वराचे अंश किंवा तुकडे आहेत असे होईल. सबंध विश्व व्यापून राहिलेल्या त्या एकसंध तत्त्वाचे असे विभाजन फक्त ज्यांना परमेश्वराच्या रूपाची तात्त्विकसुद्धा माहिती नाही तेच केवळ करू शकतील असे म्हणावे लागते.

जीवात्म्याला परमेश्वराचा अंश म्हणणे म्हणजे त्याचे परमेश्वराशी अगदीच अल्प नाते आहे असे म्हणण्यासारखे आहे. त्याचे नाते अल्प नसून फार मोठे आहे. जीव हाच परमात्मा आहे. परंतु केवळ शरीराच्या उपाधीमुळे तो भिन्न वाटतो. त्याचे परमेश्वराशी नाते घटाकाश -महाकाशाप्रमाणे आहे. जीव हा परमेश्वराचा वस्तुतः अंश किंवा तुकडा नव्हे. तो परमेश्वराप्रमाणेच सनातन आहे. तो परमेश्वरच आहे.



**प्रश्न १८६ जीव शरीरामध्ये विषयांचा उपभोग कोणत्या इंद्रियांद्वारे घेतो ?**

**उत्तर** – कान, डोळे, त्वचा, जीभ, नाक आणि सहावे मन या इंद्रियांद्वारे शरीराच्या ठिकाणी जीव निरनिराळ्या विषयांचा उपभोग घेत असतो. ज्याप्रमाणे वारा आपल्याबरोबर पुष्पांचा सुगंध सहजपणे घेऊन जातो त्याप्रमाणे जीव शरीरातून बाहेर पडताना सहजपणे सहा सूक्ष्म इंद्रिये घेउन बाहेर पडतो. ही सहा सूक्ष्म इंद्रिये आणि जीव यांमिळून लिंग शरीर तयार होते. हेच लिंग शरीर जन्माच्यावेळी जीवाच्या शरीरात शिरते व मृत्यूच्यावेळी बाहेर पडते.

**प्रश्न १८७ शरीरात असलेल्या आत्मतत्त्वास कोण ओळखू शकतात ?**

**उत्तर** – शरीरात असलेल्या आत्मस्वरूपास ओळखण्यासाठी ज्ञानचक्षू असावा लागतो आणि ज्यांच्याकडे ज्ञानचक्षू आहे असेच लोक आत्मतत्त्वास ओळखू शकतात. शिवाय जे योगी आहेत तेही प्रयत्न करून स्वतःच्या ठिकाणी असलेल्या आत्मतत्त्वास ओळखतात. परंतु ज्यांची बुद्धी सुसंस्कृत नाही अशा माणसांनी कितीही प्रयत्न केला तरी त्यांना याबाबतीत यश मिळत नाही. थोडक्यात योगी आणि ज्ञानी लोक आत्मस्वरूपास ओळखतात. दुसरे कोणीही नाही.

**प्रश्न १८८ सूर्य आणि चंद्र यांच्या तेजाविषयी काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – सूर्य आणि चंद्र यांचे तेज म्हणजे साक्षात् त्या परमात्म्याचेच तेज होय. परमात्म्यामुळेच सूर्य आणि चंद्र प्रकाशमान आहेत. म्हणूनच या अगोदर असे म्हटले आहे की त्या परमात्म्याच्या परमधामास सूर्य आणि चंद्र प्रकाशित करू शकत नाहीत. याशिवाय परमात्मा सगळ्या पृथ्वीमध्ये शिरून जी जी प्राणिमात्रे आहेत त्यांनासुद्धा आपल्या तेजानेच धारण करतो. प्राणिमात्रांत असलेले तेज त्या परमात्म्याचेच आहे. चंद्राचा जो वनस्पतिपोषक गुणधर्म आहे तोही परमात्म्याचाच आहे. चंद्रकिरणांनी वनस्पतींचे पोषण होते असे म्हणतात. सगळ्यांना प्रेरणा देणारा, धारण करणारा आणि सगळ्यांचे तेज असलेला असा तो परमात्मा आहे.

**प्रश्न १८९ परमेश्वर प्राणिमात्रांच्या शरीरात राहून काय काय करतो ?**

**उत्तर** – प्रत्येक प्राणिमात्राच्या शरीरात परमेश्वर अथवा परमात्मा वैश्वानररूप अग्नि होऊन राहिला आहे. प्राण आणि अपान या वायूंनी युक्त असलेला हा परमात्मा चार प्रकारच्या अन्नाचे पचन करतो. चार प्रकारचे अन्न म्हणजे भक्ष्य (खाण्याचे), चोष्य (चोखण्याचे), लेह्य (चाटण्याचे) आणि पेय (पिण्याचे) होय. शरीरामध्ये अशाप्रकारे परमात्मा वैश्वानर अग्नि (जठराग्नि) होऊन सर्व प्रकारच्या अन्नाचे पचन करतो.

शिवाय हा परमात्मा सर्वांच्या हृदयामध्येही रहातो आणि त्याच्या अधिष्ठानामुळेच मनुष्याला स्मृति प्राप्त होते, ज्ञान प्राप्त होते आणि त्या ज्ञानाचे अपोहन म्हणजे लयही होतो. सर्व वेदांनी जे काही जाणावयाचे ते परमतत्त्व मीच आहे असे श्रीकृष्णाने म्हटले

आहे. वेदांताचा कर्ताही मीच आहे आणि सर्व वेदांना यथार्थ जाणणाराही मीच आहे असे त्याने म्हटले आहे.

**प्रश्न १९० क्षर, अक्षर, परमात्मा आणि पुरुषोत्तम यांच्याविषयी काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – या लोकांमध्ये पुरुष दोन प्रकारचे आहेत. क्षर म्हणजे विनाशी - ज्यांचा नाश होतो ते म्हणजे सर्व प्राणिमात्र. अक्षर म्हणजे ज्याचा कधीही नाश होत नाही ते. क्षर याच्या विरूद्ध अक्षर तत्त्व होय. अक्षर पुरुष म्हणजे सर्व प्राणिमात्रांच्या मुळाशी (कूटाशी) असलेले तत्त्व होय. याला प्रकृतिरूपी अव्यक्त तत्त्व म्हणता येईल. क्षर आणि अक्षर यांच्याहून श्रेष्ठ पुरुष म्हणजे परमात्मा होय. हाच परमात्मा त्रैलोक्याला व्यापून राहिला आहे आणि हाच परमात्मा त्रैलोक्याचे पोषणही करतो. हा परमात्मा क्षर आणि अक्षर या दोन पुरुषांहून श्रेष्ठ आहे म्हणून याला पुरुषोत्तम असे म्हणतात. परमात्मा म्हणजे पुरुषोत्तम होय. व्यवहारामध्ये पुरुषोत्तम याच शब्दाचा प्रयोग केला जातो आणि परमेश्वराचे हेच नाव प्रसिद्ध आहे.

**प्रश्न १९१ पुरुषोत्तमास जाणल्याने काय प्राप्त होते ?**

**उत्तर** – जो कोणी मला पुरुषोत्तम म्हणून जाणतो तो माझीच भक्ती करतो हे नक्की असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. हे निष्पाप अर्जुना, तुला मी गुह्यातले गुह्य असे शास्त्र सांगितले आहे. मी पुरुषोत्तम आहे हे जाणल्याने मनुष्य माझ्याशी सायुज्यता पावेल आणि तो कृतकृत्य होईल. त्याला या जगात काही करायचे शिल्लक राहणार नाही असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

पुरुषोत्तमास जाणल्याने मनुष्यजन्माची इतिकर्तव्यता होते आणि नरदेह सार्थकी लागतो. जीवनात जर काही कमवायचे असेल तर हेच ज्ञान होय. हेच परमार्थतत्त्वज्ञान होय. त्याला जाणल्याने पुरुष पुरुषोत्तम होतो.

**प्रश्न १९२ पंधराव्या अध्यायाचा सारांश काय ?**

**उत्तर** – या अध्यायात फक्त वीस श्लोक आहेत. परंतु हा अध्याय लहान असूनही महत्त्वाचा आहे. विनोबाजींनी म्हटले आहे की, ''पंधराव्या अध्यायात सर्व विचारांची परिपूर्णता झालेली आहे. सोळावा, सतरावा अध्याय हे परिशिष्टरूप आहेत व अठराव्यात उपसंहार आहे. म्हणून भगवंतांनी या अध्यायाचे अखेरीस शास्त्र ही संज्ञा या अध्यायाला दिली.''

या अध्यायाची सुरवात अश्वत्थ वृक्षाच्या वर्णनापासून झाली आहे. अश्वत्थ वृक्ष म्हणजे संसारवृक्ष अथवा ब्रह्मवृक्ष होय. हा विलक्षण वृक्ष आहे. या वृक्षाच्या पसाऱ्यात अडकता कामा नये. हा वृक्ष असंगरूप दृढ शस्त्राने तोडला पाहिजे आणि त्याच्या मुळाशी जो परमेश्वर आहे त्याच्याकडे गेले पाहिजे. परमेश्वराच्या अव्यय स्थानाकडे जाण्यासाठी काही अधिकार प्राप्त करून घ्यावा लागतो. अध्यात्म हा जीवनाचा स्थायीभाव पाहिजे



आणि वासनारहित होणे हे प्रधान कार्य होय.

जीव हा परमेश्वराचा अंश आहे. परंतु तो त्याच्यापासून तोडून बाहेर काढलेला तुकडा नव्हे. जीव हा परमेश्वर आहे. घटाकाश आणि महाकाश यांच्या संबंधाप्रमाणे जीवाचा आणि परमेश्वराचा संबंध आहे.परमेश्वर हाच सगळ्यांच्या शरीरात वैश्वानर होऊन राहिला आहे. तोच सगळ्यांच्या हृदयात निवास करतो. याला ओळखण्यासाठी ज्ञानचक्षूची आवश्यकता आहे.

परमात्मा हा सगळ्यांना प्रकाशित करतो. त्याला प्रकाशित करणे कोणालाही शक्य नाही. तो प्रकाशांचा प्रकाश आणि तेजांचे तेज आहे. क्षर आणि अक्षर यांच्या पलीकडे असलेला तो पुरुषोत्तम आहे. पुरुषोत्तमाला जाणणे हीच नरजन्माची इतिकर्तव्यता आहे. जो पुरुषोत्तमाला जाणतो तो कृतकृत्य होतो.

# २१. दैवासुरसंपद्‌विभागयोग (श्लोकसंख्या २४)

**अध्याय सोळावा**

**प्रश्न १९३ दैवी संपत्ती म्हणजे काय ?**

**उत्तर** – श्रीकृष्णाने या अध्यायात दैवी आणि आसुरी संपत्तीचे वर्णन केले आहे. आपण आपल्यातल्या दैवी संपत्तीचा विकास केला पाहिजे. या दैवी संपत्तीचे २६ गुण येथे पुढीलप्रमाणे वर्णिले आहेत. १) निर्भयता २) सात्त्विक वृत्ती ३) ज्ञान व योग यांच्यावर निष्ठा ४) दातृत्व ५) दम (बाह्येंद्रियनिग्रह) ६) यज्ञाविषयी श्रद्धा ७) स्वाध्याय (आपल्या धर्मानुकूल आचरण) ८) तपश्चर्या ९) सरळपणा १०) अहिंसा ११) सत्य भाषण १२) अक्रोध (राग न येणे) १३) त्यागवृत्ती १४) शांतवृत्ती १५) अपैशुन (मनामध्ये दुष्ट बुद्धी न बाळगणे, उदार बुद्धी ठेवणे) १६) दया (सर्व प्राणिमात्रांवर दया करणे) १७) निर्लोभीपणा १८) मार्दव (मृदुपणा) १९) दुराचरणाची लाज वाटणे २०) स्थिरबुद्धी २१) तेजस्विता २२) क्षमा २३) धृति(धैर्य) २४) अंतर्बाह्य पावित्र्य २५) अद्रोह (कोणाचाही द्रोह न करणे) आणि २६) नम्रता (अतिशय मान न धरणे)

या अध्यायाच्या सुरवातीच्या तीन श्लोकात दैवी संपत्तीचे वरील २६ गुण दिले आहेत. अर्जुन दैवी संपत्ती घेऊन जन्माला आला होता. दैवी संपत्ती असलेल्या मनुष्यास मोक्षाचा मार्ग सुकर होतो.

**प्रश्न १९४ आसुरी संपत्ती म्हणजे काय ?**

**उत्तर** – आसुरी संपत्ती ही दैवी संपत्तीच्या विरुद्ध होय. ही संपत्ती घेऊन जन्माला येणाऱ्या माणसांमध्ये स्वभावतःच दुर्गुण दिसून येतात. दांभिकपणा व उद्धटपणा यांच्या अंगी असतो. स्वतःला ते फार मोठे समजतात. ते अहंमन्य असतात. या लोकांना राग लवकर येतो. दया म्हणजे काय हे त्यांना माहितच नसते. ते अत्यंत निष्ठुर असतात. कोणतेही कार्य करताना ते सारासार विचार करू शकत नाहीत. कारण अविवेक हाच त्यांचा स्थायीभाव असतो. ते अज्ञानी असतात.

**प्रश्न १९५ दैवी आणि आसुरी संपत्ती यांचा काय परिणाम होतो ?**

**उत्तर** – दैवी संपत्ती घेऊन जे जन्माला येतात ते दैवीगुणांनी आपली प्रगति करून घेतात आणि मोक्ष संपादन करतात. मोक्ष संपादन केल्यामुळे सर्व प्रकारच्या बंधनातून ते मुक्त होतात. दैवी संपत्ती ही मोक्षदायक आहे.



आसुरी संपत्ती ही दुर्गुणांनी भरलेली असल्यामुळे ही संपत्ती घेऊन जन्माला येणारे आपल्या आयुष्यात प्रगति करू शकत नाहीत. ते दुर्गुणांनी अधिकाधिक बंधनात अडकत जातात आणि दुर्गतीकडेच वाटचाल करीत राहतात. ते अनैतिक वर्तणुकीचे आणि अहंकारी असल्यामुळे अध्यात्माकडे वळतच नाहीत.

दैवी संपत्तीपासून मोक्षाचा लाभ होतो तर आसुरी संपत्तीपासून सर्व प्रकारच्या बंधनांमध्ये अडकायला होते. अर्जुन हा दैवी संपत्ती घेऊन जन्माला आला होता. म्हणून तू कोठच्याही प्रकारची काळजी करू नकोस असे श्रीकृष्णाने त्यास सांगितले.

**प्रश्न १९६ आसुरी प्रवृत्तीचे लोक कसे वागतात ?**

**उत्तर** – आसुरी प्रवृत्तीच्या लोकांचे विस्तृत वर्णन ७ ते २० या १४ श्लोकांत केलेले आहे.

आसुरी प्रवृत्तीच्या लोकांना प्रवृत्ति आणि निवृत्ति (कार्य आणि अकार्य) म्हणजे काय हे समजत नाही. त्यांच्या अंगी पावित्र्य नसते. सदाचार आणि सत्य यांच्याशी त्यांची फारकत झालेली असते.

जगाबद्दलचे या आसुरी लोकांचे विचार परंपरेने चालत आलेल्या समजुतींच्या विरुद्ध असतात. हे जग असत्य आहे असे ते मानतात. या जगाला आधार नाही. परमेश्वराच्या आधारावाचूनच ते आहे. अर्थातच तो त्याचा नियंता नाही. शिवाय हे जग अपरस्परसंभूत म्हणजे एकमेकांपासून निर्माण झालेले नाही असे त्यांचे मत असते. या जगात कोणाचाही एकमेकांशी संबंध नाही. हे जग म्हणजे केवळ भोगभूमि आहे, विषयभोगासाठीच हे जग आहे असे मानतात.

आसुरी प्रवृत्तीच्या लोकांची ही विचारसरणी चार्वाक मताशी मिळतीजुळती आहे. चार्वाक ईश्वर वगैरे काही मानत नाहीत. शिवाय एकदा देह नष्ट झाला की पुढे काही नाही असे त्यांचे मत आहे. म्हणून या जगात मजा करून घ्यावी. मग ती कोणत्याही पद्धतीने का असो, त्याचा ते विचार करीत नाहीत.

जगाकडे पहायची दृष्टी विकृत असली म्हणजे कोणतेही विधायक कार्य घडू शकत नाही. आसुरी प्रवृत्तीचे लोक क्रूरकर्म करणारे असतात. त्यांच्या बुद्धीचा विकास न झाल्यामुळे ज्या जगात ते वावरतात त्याच जगाचा नाश करण्याकडे त्यांची वृत्ती असते.

आसुरी प्रवृत्तीच्या लोकांच्या योजनाही काही विचित्र असतात. ज्या अशक्यप्राय गोष्टी आहेत त्यांचाच ते मनात विचार करतात. दांभिकपणा, गर्विष्ठपणा आणि स्वतःबद्दलच्या फार मोठ्या कल्पना यांनी ग्रासले गेल्यामुळे त्यांना सरळ असे काही दिसतच नाही. वासनेने भरलेले आसुरी लोक जगाचा अंत होईपर्यंत कामेच्छा बाळगतात.

परमेश्वरपरायण व्हायच्याऐवजी कामक्रोधपरायण असलेले आसुरी लोक शेकडो आशा-आकांक्षानी स्वतःलाच जखडून टाकतात. त्यांचा प्रत्येक उद्योग, प्रत्येक संकल्प कामोपभोगासाठी असतो. त्यांच्या सर्व कार्याचा केंद्रबिंदू कामोपभोग हाच असतो.

त्यांनी स्वतःहून मिळविलेल्या कोणत्याही गोष्टींनी त्यांचे समाधान होत नाही. आज हे मिळवले, उद्या ते मिळवीन अशा प्रकारची हाव त्यांची चालू रहाते. दुसऱ्याच्या धनाकडे डोळा ठेवून ते वागतात. शत्रूंना लोळवून सर्व जगाचा स्वामी होण्याची इच्छा ते मनात बाळगतात आणि या जगाचा सर्व काही मीच आहे असे त्यांना वाटते.

आसुरी माणसे नाना प्रकारच्या अज्ञानयुक्त कल्पनांनी भारलेली असतात. त्यामुळे ते विविध यज्ञ करण्याच्या कल्पना करतात, दान देण्याविषयीही बोलतात. परंतु प्रत्यक्षात तसे काही न करता विषयातच लोळत रहातात आणि शेवटी अमंगळ नरकात जाऊन पडतात.

आसुरी माणसांनी यज्ञ केलाच तर तो केवळ स्वतःच्या मोठेपणाचा दिमाख मिरविण्यासाठी असतो. गर्विष्ठ आणि धुंद असलेले आसुरी लोक केवळ नावाचाच यज्ञ करतात आणि तो सुद्धा संपूर्ण अशास्त्रीय. सर्व प्रकारच्या दुर्गुणांनी पुरेपुर भरलेल्या आसुरी लोकांना सर्व माणसांच्यामध्ये एकच असलेले आत्मतत्त्व ओळखता येत नाही. त्यामुळे ते सर्वांच्या देहांत वास करणाऱ्या माझाच पर्यायाने द्वेष करतात असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

आसुरी प्रवृत्तीचे लोक दुर्वर्तनी व विषयलंपट असल्यामुळे त्यांच्या वागण्यात काहीही ताळतंत्र नसते. ज्या जगात रहातात त्याचाच ते द्वेष करतात. त्यांचे वागणे स्वतःला हानिकारक असतेच पण इतरांनाही त्यांच्या वागण्यापासून फार त्रास होतो. स्वतःच्या बेताल वागण्यामुळे ते आत्मनाश ओढवून घेतात.

**प्रश्न १९७ आसुरी प्रवृत्तीच्या लोकांना कोणती गती प्राप्त होते ?**

**उत्तर** – आसुरी प्रवृत्तीचे लोक स्वतःच्या पापी आचरणाने दुर्गतीला जातात. हे नराधम लोक खालच्या लोकांत जन्माला येतात आणि अधोगतीला जातात. ईश्वरप्राप्ती ते कधीही करून घेऊ शकत नाहीत. त्यांच्या सातत्याच्या दुष्ट आणि क्रूर वागणुकीने ते आत्मज्ञानापासून वंचित रहातात. हे अधम लोक 'मला कधीच येऊन मिळत नाहीत.' असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. जन्मोजन्मी हे आसुरी योनींमध्ये जन्माला येऊन उत्तरोत्तर खाली खाली जातात आणि आपल्या दुष्कर्माचे धनी होऊन रहातात.

**प्रश्न १९८ नरकाचे त्रिविध द्वार कोणते ?**

**उत्तर** – नरकात जाणे म्हणजे अधोगतीला जाणे. अधःपाताचेच दुसरे नाव म्हणजे नरक असे म्हणावयास हरकत नाही. काम, क्रोध आणि लोभ हे नरकाचे दरवाजे आहेत. ही



नरकात जाण्याची महाद्वारे आहेत. काम, क्रोध आणि लोभ यांचा प्रत्येकाला अगदी जवळून परिचय आहे. आणि म्हणून यांना प्रत्येकाने टाळले पाहिजे. त्यांच्याजवळ असलेली आपली जवळीक सोडली पाहिजे. जो मनुष्य या तिघांपासून दूर जाण्याचा प्रयत्न करतो तो आत्मकल्याण्याच्या मार्गाला लागतो व शेवटी श्रेष्ठ गतीचा म्हणजे मोक्षाचा अधिकारी होतो.

आसुरी प्रवृत्तीचे लोक नरकात जातात आणि अशा नरकाची काम, क्रोध आणि लोभ ही तीन द्वारे आहेत असे गीतेत म्हटले आहे.

पुराणांमध्ये एकूण नरक सात आहेत असे सांगितले आहे. त्या नरकांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. १) रौरव २) महारौरव ३) वह्नि ४) वैतरणी ५) कुंभीपाक ६) तामिस्र आणि ७) अंधतामिस्र. या सर्व नरकांचा अधिपती यम आहे. दुराचरणी माणसे आपापल्या पापकर्माच्या प्रकारानुसार त्या त्या नरकाला जातात अशी समजूत आहे.

**प्रश्न १९९ शास्त्रविधींचे आचरण कशासाठी करायचे ?**

**उत्तर** – कोणते कार्य करावे आणि कोणते कार्य करू नये याबद्दल अर्जुना, तुला जेव्हा संदेह निर्माण होईल तेव्हा तू शास्त्रात सांगितल्याप्रमाणे आचरण कर, असे श्रीकृष्णाने सांगितले आहे. **'तस्मात् शास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ।'** असा हा संबंधित चरण आहे. जे शास्त्रात सांगितल्याप्रमाणे न वागता आपल्या मनाप्रमाणे वागतात त्यांच्या कार्याची सिद्धी होत नाही. त्यांना सुख मिळत नाही आणि उत्तम गतीही मिळत नाही.

शास्त्रात सांगितल्याप्रमाणे आचरण केल्यामुळे सुख, सिद्धी आणि सद्गती मिळते. म्हणून शास्त्रांचा आदर करून त्यात सांगितल्याप्रमाणे वागायचे.

शास्त्र म्हणजे काय याचे स्पष्टीकरण येथे केलेले नाही. शास्त्र म्हणजे काही एकच ग्रंथ नव्हे. शास्त्र म्हणजे विधि आणि प्रतिषेध सांगणारे ग्रंथ. विधि म्हणजे अमुक एक करावे आणि प्रतिषेध म्हणजे अमुक एक करू नये. गीतेला वैदिक धर्म संमत आहे. वेदांचा उल्लेख गीतेत आहे. त्यामुळे वेदांना अनुसरणारी आणि परंपरेने मान्य केलेली शास्त्रे यांना प्रमाण मानून कर्तव्य आणि अकर्तव्य यांबद्दल संदेह निर्माण झाला असताना निर्णय घ्यावा.

**प्रश्न २०० या अध्यायाचा सारांश काय आहे ?**

**उत्तर** – या अध्यायाला आणि सतराव्या अध्यायाला पुष्कळ ठिकाणी परिशिष्ट अध्याय असे म्हटले आहे. शंकराचार्यांच्या भाष्यात मात्र असे म्हटले नाही. वास्तविक पहाता या अध्यायात नवीन विषय आहेत. ते काही पूर्वी आलेल्या विषयांचा उर्वरित भाग किंवा पूरक भाग नव्हेत. नक्कीच ते नवीन आहेत आणि एकूण गीतेच्या तत्त्वज्ञानाचे ते

भाग आहेत, जसे इतर अध्यायात आलेले विषय आहेत तसे.

दैवी आणि आसुरी संपत्तीचे वर्णन या अध्यायामध्ये प्रामुख्याने आहे. दैवी संपत्तीचे एकूण २६ गुण आहेत. दैवी संपत्तीच्या विरुद्ध आसुरी संपत्ती आहे. दैवी गुणांनी आपली प्रगति करून घेता येते. आसुरी संपत्तीने अधोगती प्राप्त होते. दैवी संपत्ती मोक्षदायक आहे तर आसुरी संपत्ती बंधनकारक आहे. आसुरी प्रवृत्तीचे लोक कसे वागतात, ते कसे असतात, त्यांचे ध्येय काय असते, त्यांचा स्थायीभाव काय असतो याचे विस्तृत वर्णन या अध्यायात आहे. अध्यायाचा अर्ध्याहून अधिक भाग याच वर्णनासाठी खर्च पडला आहे.

दैवी आणि आसुरी प्रवृत्ती एकमेकांच्या विरुद्ध आहेत. आसुरी संपत्ती दुर्गुणांनी भरलेली आहे तर दैवी संपत्ती सद्गुणांचा संचय आहे. आसुरी संपत्तीचा त्याग करून दैवी संपत्ति मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

प्रत्येक प्राणिमात्राच्या ठिकाणी काम, क्रोध आणि लोभ असतो. ही त्रयी फार मोठा विनाश घडवून आणते. या तीन दुर्गुणांना येथे नरकाची द्वारे म्हणून म्हटले आहे. ज्यांच्याजवळ हे दुर्गुण आहेत त्यांना नरकात प्रवेश अगदी सोपा आहे. परंतु नरकात जाणे म्हणजे इतिकर्तव्य नसल्यामुळे या तिघांना दूर लोटले पाहिजे.

कोणते कार्य करावे आणि कोणते कार्य करू नये असा जेव्हा संदेह निर्माण होतो तेव्हा शास्त्राचा आधार घ्यावा. शास्त्र प्रमाण मानून तसे आचरण करावे असे अध्यायाच्या शेवटी सांगितले आहे.

❁❁❁



# २२. श्रद्धात्रयविभागयोग (श्लोकसंख्या २८)

**अध्याय सतरावा**

**प्रश्न २०१ श्रद्धा किती प्रकारची आहे ?**

**उत्तर** – जे शास्त्रविधी पाळत नाहीत पण जे श्रद्धायुक्त अंतःकरणाने यजन करतात त्यांची श्रद्धा कोणत्या प्रकारची असते असा अर्जुनाने प्रश्न विचारला आहे.

स्वभावतःच प्रत्येक माणसाची श्रद्धा तीन प्रकारची असते. सात्त्विक, राजस आणि तामस. जशी श्रद्धा तशी प्रकृती असते किंवा जशी प्रकृती तशी श्रद्धा असेही म्हणता येईल. हा मनुष्यच मुळी श्रद्धामय आहे. "**श्रद्धामयोऽयं पुरुषः**" असे म्हटले आहे. सात्त्विक श्रद्धा श्रेष्ठ होय. या श्रद्धेनंतर दुसरा क्रमांक राजस श्रद्धेचा आणि तिसरा क्रमांक तामस श्रद्धेचा लागतो. जेथे जेथे सत्त्व, रज आणि तम यांचा उल्लेख आहे, तेथे तेथे त्यांचा गुणवत्तेनुसार अनुक्रमे एक, दोन, तीन असाच क्रमांक लागतो. त्यांना अनुक्रमे श्रेष्ठ, मध्यम आणि कनिष्ठ असेही म्हणता येईल. अशा प्रकारे श्रद्धा तीन प्रकारची आहे. जसा स्वभाव तशी श्रद्धा असा सर्वसामान्य नियम आहे.

**प्रश्न २०२ सात्त्विक, राजस आणि तामस लोक कोणाचे यजन करतात ?**

**उत्तर** – जे सात्त्विक प्रवृत्तीचे लोक आहेत त्यांची देवावर श्रद्धा असते आणि साहजिकच ते देवादिकांचे यजन करतात. त्यांचीच पूजा अर्चा करतात. जे राजस आहेत ते यक्ष, राक्षस इत्यादींची पूजा करतात, त्यांचीच आराधना करतात. अशा प्रकारचे लोक पारमार्थिक कल्याणापेक्षा ऐहिक कल्याणाच्या मागे असतात. जे तामसी लोक आहेत त्यांची आराध्य दैवते म्हणजे प्रेते, भुते, खेतेइत्यादि. हे लोक कनिष्ठ प्रकारचे असल्यामुळे त्यांची दैवतेही कनिष्ठ प्रकारची होत. तामसी लोकांच्या इच्छा आकांक्षा अघोरी असतात. जे शास्त्रात सांगितल्याप्रमाणे तपाचरण करीत नाहीत व जे अहंकारी आहेत, ढोंगी आहेत व वासनेने बरबटलेले आहेत अशा लोकांचे तपाचरण म्हणजे केवळ आत्मपीडा होय. अशी विवेकहीन माणसे शरीरास पीडा देऊन तामसी श्रद्धेचे पोषण करतात. ही माणसे आसुरी प्रवृत्तीचीच होत.

**प्रश्न २०३ आहाराचे किती प्रकार आहेत ?**

**उत्तर** – या अध्यायात जवळ जवळ सर्वच विषयांचे तीन तीन प्रकार सांगितले आहेत. आहाराचेही तीन प्रकार आहेत. सात्त्विक, राजस आणि तामस.

आयुष्य, सत्प्रवृत्ति, सामर्थ्य, आरोग्य, सुख, स्वास्थ्य इत्यादि वाढविणारे रसाळ, मधुर, स्निग्ध, सुखपरिणामी व मन प्रसन्न करणारे पदार्थ सात्त्विक होत व हेंच पदार्थ सात्त्विक प्रवृत्तीच्या लोकांना आवडतात.

कटु म्हणजे तिखट, आंबट, खारट, अतिशय उष्ण, झणझणीत आणि चमचमीत, दाहक, नीरस, दुःखदायक असा अनारोग्य निर्माण करणारा आहार राजस होय आणि अर्थातच हा आहार राजस प्रवृत्तीच्या लोकांना आवडतो.

तामसी लोकांचा आहार अगदी निकृष्ट दर्जाचा असतो. त्यांना अन्नापेक्षा इतरत्र दुराचरणातच गोडी असल्यामुळे त्यांचा आहार विपरीत असतो. थंड झालेले, रसहीन शुष्क, वेळप्रसंगी वास येणारे, अपवित्र, शिळे आणि उष्टेसुद्धा अन्न त्यांना चालते. सुजाण माणसे उष्टे अन्न खात नाहीत. तामसी लोकांना कशाही प्रकारचे अन्न चालते, किंबहुना आवडते.

**प्रश्न २०४ तीन प्रकारचे यज्ञ कोणते ?**
**उत्तर** – कोणतीही अभिलाषा मनात न ठेवता केवळ कर्तव्यकर्म म्हणून जो यज्ञ केला जातो त्याला सात्त्विक यज्ञ म्हणतात. यज्ञ असो अगर कोणतेही कर्म असो ते जर फलाचा मोह न ठेवता केले तर श्रेष्ठच होय.

परंतु केवळ फलावरच सर्व लक्ष केंद्रित करून जो यज्ञाचा खटाटोप केला जातो व जो यज्ञ केवळ स्वतःची प्रौढी मिळविण्याकरिता केला जातो तो यज्ञ राजस होय. अशा प्रकारचा यज्ञ करीत असताना कर्त्याचे केवळ फलावर अनुसंधान असते.

यानंतरचा यज्ञ तामस होय. अशा प्रकारच्या यज्ञात शास्त्रविधींचे उल्लंघन केले जाते. नियम पाळले जात नाहीत. मंत्र नीट म्हटले जात नाहीत. अन्नदान होत नाही. एवढेच काय ब्राह्मणांना दक्षिणाही दिली जात नाही. त्यांना फसवले जाते. अशा प्रकारचा यज्ञ दोषयुक्त असतो.

सात्त्विक, राजस आणि तामस अशा प्रकारचे एकूण तीन यज्ञ आहेत.

**प्रश्न २०५ कायिक, वाचिक आणि मानसिक तप म्हणजे काय ?**
**उत्तर** – काया म्हणजे शरीर, कायिक म्हणजे शारीरिक. देव, ब्राह्मण, गुरुजन, विद्वान माणसे यांची सेवा करणे, पावित्र्य राखणे, ऋजुता (सरळपणाने वागणे), ब्रह्मचर्य पालन करणे, अहिंसा पाळणे या सर्वांना देहाचे तप म्हणजे कायिक तप म्हणतात.

दुसरे तप म्हणजे वाचिक. कोणाचेही मन न दुखवणारे, कोणालाही न खुपणारे परंतु सत्य आणि हितकारक असे बोलणे आणि स्वाध्याय करणे (आपापल्या वेदशास्त्रांच्या ग्रंथांचा अभ्यास करणे) या सर्वांमिळून वाचिक तप होते.

तिसरे तप म्हणजे मानस तप होय. मनाची प्रसन्नवृत्ती ठेवणे, सौम्यपणाने वागणे, मौन पाळणे, आत्मनिग्रह करणे (संयम पाळणे), मनामध्ये कायम पवित्र विचार जोपासणे इत्यादि सर्व आचरण मिळून मानस अथवा मानसिक तप होते.

कायिक, वाचिक आणि मानसिक या तीन तपांमध्ये मानसिक अथवा मानस तप सर्वश्रेष्ठ होय. मनानेच केलेले कर्म खरे होय. तेच जास्त प्रभावी असते. हे तप आचरणे



कठीण आहे. परंतु ज्याला आत्मोन्नती करून घ्यायची आहे त्याने हे आचरणे योग्य होय.

**प्रश्न २०६ सात्त्विक, राजस आणि तामस तप कोणते ?**
**उत्तर** – फळाची अभिलाषा मनात न धरता अतिशय श्रद्धेने कायिक, वाचिक आणि मानसिक अशा तीनही प्रकारे जे तप केले जाते त्याला सात्त्विक तप म्हणतात.

आपला सत्कार व्हावा, आपल्याला लोकांनी मान द्यावा, आपली पूजा व्हावी, आपले लोकांत नाव व्हावे अशा प्रकारे इच्छा ठेऊन केवळ आपला मोठेपणा प्रकट करण्यासाठी जे तप केले जाते त्यास राजस तप म्हणतात. हे तप अर्थातच अस्थिर आणि अल्पफलदायी असते.

तपाचा तिसरा प्रकार म्हणजे तामस तप होय. जे तप दुराग्रहाने केवळ स्वतःला पीडा होईल असे केले जाते किंवा दुसऱ्यांना त्रास देण्यासाठी किंवा त्यांच्या विनाशासाठी केले जाते ते तामस तप होय. अशा प्रकारच्या तपामध्ये जारणमारणादि कर्मे येऊ शकतात. तामस तप म्हणजे खरे तप नव्हेच. पण या अध्यायात सगळ्यांचे त्रिविध वर्गीकरण चालू असल्याने, सात्त्विक आणि राजस या दोन तपानंतर तामस तपाचे वर्णन केले आहे.

**प्रश्न २०७ दानाचे पण तीन प्रकार आहेत, ते कोणते ?**
**उत्तर** – जे दान केवळ कर्तव्यबुद्धीने व कोणत्याही परतफेडीची अपेक्षा मनात न ठेवता योग्य स्थळ, काळ व सत्पात्र यांचा विचार करून दिले जाते ते दान सात्त्विक होय. दान देताना ते सत्पात्र दान व्हावे असे स्पष्ट म्हटले आहे.

जे दान परतफेडीची अपेक्षा मनात धरून दिले जाते किंवा दिलेल्या दानाऐवजी दुसरे काहीतरी परत मिळावे अशी अपेक्षा धरली जाते व जे दान मनापासून दिले जात नाही, देताना त्रास होतो असे दान राजस दान होय. दान देताना मनःपूर्वक द्यावे.

तिसऱ्या प्रकारचे दान म्हणजे तामस दान होय. अयोग्य ठिकाणी, अवेळी आणि अपात्र माणसांना सत्काररहित व अवहेलनापूर्वक जे दान दिले जाते ते निकृष्ट दान म्हणजे तामस दान होय. अशा प्रकारचे दान देऊन काहीही लाभ होत नाही उलट असे दान देणे म्हणजे स्वतःचाच तोटा करून घेण्यासारखे आहे.

**प्रश्न २०८ ब्रह्माचा कोणत्या तीन शब्दांनी निर्देश करण्यात येतो ?**
**उत्तर** – ॐ, तत् आणि सत् या तीन शब्दांनी ब्रह्माचा निर्देश करण्यात येतो. हे तीनही शब्द ब्रह्मवाचक आहेत. या त्रिविध नामनिर्देशाने सृष्टीच्या आरंभी ब्रह्मदेवाने ब्राह्मण, वेद व यज्ञ यांना उत्पन्न केले. प्रथम ओंकाराचा उच्चार करूनच यज्ञ, दान आणि तप यांची सुरवात केली जाते. सर्व शास्त्रोक्त विधी ओंकाराच्या उच्चाराने सुरू होतात. ओंकाराचे महत्त्व सांगणारा पुढील एक श्लोक आहे –

**ओंकारश्चाथशब्दश्च द्वावेतौ ब्रह्मणः पुरा ।**
**कण्ठं भित्त्वा विनिर्यातौ तस्मात् मांगलिकावुभौ ॥**

ओंकार आणि अथ हे शब्द फार पूर्वी साक्षात् ब्रह्मदेवाच्या कंठातून बाहेर पडले म्हणून हे दोन्ही शब्द मांगलिक आहेत, मंगल आहेत.

आठव्या अध्यायात (८.१३) ॐ हे एकाक्षर ब्रह्म आहे असे म्हटलेच आहे. जो योगी या एकाक्षर ब्रह्माचा जप करीत देह सोडतो तो श्रेष्ठ गतीला जातो. ओंकाराचे माहात्म्य उपनिषदांतूनही फार वर्णन केले आहे.

**प्रश्न २०९ तत् शब्दाचे महत्त्व काय ?**

**उत्तर** – तत् शब्दाने पण परब्रह्माचा निर्देश केला जातो. मोक्षाची इच्छा धरणारे 'तत्'या शब्दाचा उच्चार करून फळाची इच्छा न धरता यज्ञ, तप वगैरे कर्म फक्त परमेश्वराला अर्पण करतात. तत्त्वज्ञान या शब्दातसुद्धा तत् हा शब्द आहे. तत् संबंधीचे जे ज्ञान ते तत्त्वज्ञान होय.

**प्रश्न २१० सत् शब्द कशासाठी योजला जातो ?**

**उत्तर** – सत् म्हणजे अस्तित्व, सत् म्हणजे साधुत्व, या दोन्ही गोष्टी दर्शविण्याकरिता सत् शब्द योजला जातो. त्याचप्रमाणे चांगल्या कर्मालाही सत् शब्द लावण्यात येतो. उदाहरणार्थ- सत्कर्म. सज्जन शब्दामध्येही सत् शब्द आहे. यज्ञ, दान व तप यांच्याविषयी श्रद्धा असणे, स्थिर भावना ठेवणे यालाही सत् म्हणतात व यांसाठी जे करावयाचे कर्म त्यालाही सत् असेच म्हणतात. असत् या शब्दाचा अर्थ सत्च्या विरुद्ध आहे. श्रद्धेशिवाय दिलेले दान, केलेले हवन अथवा आचरलेले तप असत् या शब्दामध्ये येते. अशा प्रकारच्या असत् दानाने, हवनाने अथवा तपाने या जगात फायदा होत नाही व परलोकातही होत नाही.

**प्रश्न २११ – या अध्यायाबद्दल काय विशेष सांगता येईल ?**

**उत्तर** – या अध्यायात सत्त्व, रज आणि तम या तीन गुणांवर आधारित निरनिराळ्या विषयांचे त्रिविध वर्गीकरण करण्यात आले आहे. श्रद्धा, माणसे, आहार, यज्ञ, तप व दान यांचे सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार वर्णिले आहेत. प्रत्येक प्रकाराची जणू काही व्याख्या दिली आहे. गीतेच्या काळी साधकासाठी वरील गोष्टी स्पष्ट करण्याची आवश्यकता भासली असेल. म्हणून गीताकारांनी त्यांचा समावेश शेवटी शेवटी केला. परंतु त्रिविध वर्गीकरण थोडेसे साचेबंद वाटते आणि त्यामुळे रुक्ष वाटते. नुसत्या व्याख्या आणि व्याख्याच असे त्याचे स्वरूप झाले आहे. या अध्यायावर सत्त्व, रज आणि तम यांच्यावर आधारित असलेल्या वर्गीकरणामुळे सांख्यांचा प्रभाव जाणवतो.

परब्रह्माचा निर्देश ॐ, तत् आणि सत् या शब्दांनी करण्यात येतो. हे तीन शब्द अत्यंत पवित्र आहेत. अजूनही कर्म ब्रह्मार्पण करताना "**ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु ।**" असे म्हणण्याचा प्रघात आहे.

❀ ❀ ❀



# २३. मोक्षसंन्यासयोग (श्लोकसंख्या ७८)

## अध्याय अठरावा

**प्रश्न २१२ संन्यास म्हणजे काय ?**

**उत्तर** – या अध्यायाच्या सुरवातीसच अर्जुनाने संन्यास या महत्त्वाच्या संकल्पनेचे तत्त्व जाणून घेण्याची इच्छा व्यक्त केली.

सर्व काम्य कर्मांचा त्याग म्हणजे संन्यास असे सुटसुटीत व स्पष्ट उत्तर संन्यास म्हणजे काय या प्रश्नाचे आहे. काम्य कर्मे म्हणजे अश्वमेधादि कर्मे असे शंकराचार्यांनी म्हटले आहे. काम्य कर्मे म्हणजे फलाशा धरून केलेली कर्मे असा नेहमीचा अर्थ आहे. मीमांसक कर्मे चार प्रकारची आहेत असे मानतात. ती पुढीलप्रमाणे आहेत. १) नित्य २) नैमित्तिक ३) काम्य व ४) निषिद्ध. गीतेत फक्त काम्य कर्मांचा त्याग म्हणजे संन्यास असे म्हटले आहे. इतर कर्मांचा समावेश संन्यास शब्दात केलेला नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.परंतु निषिद्ध कर्मे सर्वदा त्याज्य आहेत हे उघड आहे.

**प्रश्न २१३ त्यागाबद्दल काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – सर्व प्रकारच्या कर्मांच्या फलांचा त्याग करणे म्हणजे त्याग अशी पंडित लोकांनी त्याग शब्दाची व्याख्या केली आहे. कर्मे टाकायला सांगितली नाहीत. काही विद्वान लोकांचे मात्र असे म्हणणे आहे की कर्म म्हटले की ते दोषयुक्त असते म्हणून सर्व कर्मांचा त्याग करावा. आणखी काही विद्वान असे म्हणतात की यज्ञ, दान, तप इत्यादि कर्मसुद्धा त्याज्य आहेत. अशा प्रकारे त्यागाबद्दल तीन भिन्न भिन्न मते आहेत.

**प्रश्न २१४ त्यागाबद्दल श्रीकृष्णाने काय निर्णय दिला आहे ?**

**उत्तर** – यज्ञ, दान व तप ही कर्मे केलीच पाहिजेत. ही कर्मे टाकू नयेत असे श्रीकृष्णाने स्पष्ट म्हटले आहे. ही कर्मे चित्तशुद्धिकारक आहेत आणि कर्त्याला ती पवित्र करतात. मात्र ही कर्मे आसक्ती व फलाशा टाकून केली पाहिजेत असे श्रीकृष्णाने निर्णायक सांगितले आहे. **(कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ।)** त्यागाचे तामस, राजस आणि सात्त्विक असे तीन प्रकार आहेत.

प्रत्येकाला आपल्या धर्माप्रमाणे जे कर्म प्राप्त झाले आहे त्याचा त्याग कधी करू नये. जो मोहाने आपल्या नियत कर्माचा त्याग करतो त्याच्या कर्मत्यागास तामस म्हटले आहे. (नियत कर्माबद्दल अधिक माहितीसाठी प्रश्न ५३ पाहावा)

कर्म केल्यामुळे शरीराला त्रास होतो, पीडा होते म्हणून या भीतीने जर कोणी

कर्माचा स्वरूपतः त्याग करील तर तो त्याग राजस होय. अशा त्यागापासून काहीही फळ मिळत नाही, हा त्याग वांझ आहे.

आपले नियत कर्म कर्तव्य म्हणून करताना आसक्ती व फलाशा सोडून ममत्वरहित बुद्धीने केले जाते तेव्हा जो फलत्याग केला जातो त्यास सात्त्विक त्याग म्हणतात. ममत्व सोडलेला त्याग म्हणजे सात्त्विक त्याग असे थोडक्यात म्हणता येईल. हाच त्याग सर्वश्रेष्ठ होय.

**प्रश्न २१५ खरा त्यागी कोण ?**

**उत्तर** – जो कोणी आपल्या प्राप्त आणि नियत कर्माचा कंटाळा करीत नाही - मग ते क्लेशदायक का असेना किंवा सुखदायक कर्मात आसक्त होत नाही असा कर्मामध्ये राग व द्वेष न राखणारा मनुष्य सत्त्वशील, बुद्धिमान व संशयातीत होतो. देह धारण करणाऱ्या कोणत्याही मनुष्यास कर्मे संपूर्णपणे टाकणे कधीच शक्य नाही. **(न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः।)** म्हणून जो कर्मांच्या फळांचा त्याग करतो तोच खरा त्यागी होय, तोच खरा संन्यासी होय.

अनिष्ट, इष्ट आणि संमिश्र असे तीन प्रकारचे कर्माचे फळ असते. कर्म म्हटले म्हणजे फळ आलेच. जी माणसे फलाशा सोडून कर्म करीत नाहीत त्यांना फळांचा चांगला अगर वाईट उपभोग घ्यावाच लागतो. अशा अत्यागी माणसांना मेल्यानंतर आपापल्या कर्मांची फळे प्राप्त होतात आणि त्यांना ती भोगावीच लागतात. परंतु जो कोणी कर्माच्या फळांचा त्याग करून कर्मे करतो त्याच्या बाबतीत फळांच्या उपभोगाचा प्रश्नच येत नाही. कारण निष्काम कर्मे फळ धरतच नाहीत. अशा त्यागी माणसाला मरणोत्तर कर्मफळ भोगण्याचा प्रश्नच येत नाही. सर्वकर्मफलत्यागी हाच खरा संन्यासी होय, हाच खरा त्यागी होय.

**प्रश्न २१६ कोणतेही कर्म घडून येते तेव्हा त्यापाठीमागची कारणे कोणती ?**

**उत्तर** – कोणतेही कर्म जेव्हा घडून येते तेव्हा त्याच्या पाठीमागे पाच कारणे असतात. असे सांख्यांच्या सिद्धांतात सांगितले आहे. ती पुढीलप्रमाणे आहेत : १) अधिष्ठान म्हणजे कार्य जेथून घडावयाचे ते म्हणजे शरीर २) कर्ता म्हणजे कार्य करणारा मनुष्य ३) करण म्हणजे साधन (ज्ञानेंद्रिये ही साधने आहेत) ४) पृथक् चेष्टा म्हणजे कर्मेंद्रियांच्या विविध हालचाली आणि ५) दैव. दैव शब्दाच्या अर्थावरून बरीच वादावादी आहे. परंतु दैव शब्दाचा सर्वसाधारण अर्थ परमेश्वराची अनुकूलता असा धरावयास हरकत नाही. जर दैव नसेल तर कितीही परिश्रम केले तरी इष्ट फळ धरत नाही. कोणतेही कर्म घडून येण्यापाठीमागे मग ते कायिक, वाचिक व मानसिक असो किंवा चांगले अगर वाईट असो - त्याच्या पाठीमागे पाच कारणे असतात.



**प्रश्न २१७ कर्म करणारा कोणता कर्ता बंधनात अडकत नाही ?**

**उत्तर** – कर्म घडून येण्यामागे पाच कारणे आहेत. ज्याला ही पाच कारणे माहिती नसतात तो कर्माचे कर्तृत्व आत्म्याकडे जोडतो. अशा माणसाला संस्कारहीन आणि मूढ म्हणणेच योग्य होय. ज्याला कर्माच्या पाठीमागची कारणे समजतात व म्हणून जो केवळ मी कर्ता नाही अशी भावना ठेवतो व ज्याची बुद्धी आसक्तीने लपेटली जात नाही असा मनुष्य कर्म करूनही बंधनात अडकत नाही. कर्म करताना अहंभाव नसला म्हणजे कर्माचे बंधकत्व निर्माण होत नाही. अशा माणसाने योग्य कारणपरत्वे जरी सारे विश्व मारले तरी त्याला पाप लागत नाही व तो बंधनात पडत नाही.

**प्रश्न २१८ कर्मचोदना आणि कर्मसंग्रह म्हणजे काय ?**

**उत्तर** – हे दोन्ही शब्द १८ व्या श्लोकात आले आहेत. चोदना शब्दाचा येथे अर्थ प्रेरणा असा आहे. कोणतेही कर्म घडून यायच्या अगोदर त्याच्या पाठीमागे जी प्रेरणा असते तिची तीन अंगे असतात : १) ज्ञान २) ज्ञेय (जाणण्याचा विषय) आणि ३) परिज्ञाता म्हणजे जाणणारा. या तीन गोष्टी एकत्र आल्या म्हणजे कर्म करण्याची प्रवृत्ती होते. म्हणून कर्मचोदना म्हणजे कर्मप्रेरणा होय.

कर्मसंग्रह पण तीन अंगांनी युक्त आहे. १) करण म्हणजे साधन २) कर्म - करावयाचे कार्य ३) कर्ता - कार्य करणारा मनुष्य. कार्यनिष्पत्तीसाठी ही तीन अंगे आवश्यक आहेत.

कर्मचोदना म्हणजे मानसिक प्रेरणा व मानसिक योजना तर कर्मसंग्रह म्हणजे मानसिक योजनेचे प्रत्यक्ष कार्यात रूपांतर होय.

**प्रश्न २१९ तीन प्रकारचे ज्ञान कोणते ?**

**उत्तर** – सांख्यशास्त्रात ज्ञान, कर्म आणि कर्ता यांचे प्रत्येकी तीन भेद आहेत असे सांगितले आहे. हेच भेद येथे सांगितले आहेत.

ज्या ज्ञानामुळे आपल्याला सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी एकच अभिन्न व विकार न पावणारे तत्त्व आहे असे समजते ते ज्ञान सात्त्विक ज्ञान होय. परंतु ज्या ज्ञानामुळे सर्व भूतमात्रे खरोखरच निरनिराळी आहेत व त्यांना संपूर्णपणे निराळे अस्तित्व आहे असे वाटते ते ज्ञान दुसऱ्या प्रतीचे म्हणजे राजस होय. सात्त्विक आणि राजस ज्ञानाच्या विपरीत जे ज्ञान ते तामस होय. ज्यामुळे एकत्वाचेही ज्ञान होत नाही किंवा अनेकत्वाचेही ज्ञान होत नाही आणि ज्या ज्ञानामुळे देहातच सर्वकाही आहे अशी भावना होते ते ज्ञान तामस होय. खरे तत्त्व न समजता भ्रामक समजुतीने देहबुद्धी ज्यामुळे वाढते ते कनिष्ठ ज्ञान म्हणजे तामस ज्ञान होय.

**प्रश्न २२० कर्माचे तीन प्रकार कोणते ?**

**उत्तर** – कर्माचे सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार आहेत. कर्मासंबंधी अनुराग अथवा द्वेष न ठेवता जे निष्काम बुद्धीने कर्म केले जाते ते सात्त्विक कर्म होय. कर्म करताना कर्मफलाची आशा सोडा असे गीतेने वारंवार निरनिराळ्या शब्दांत सांगितले आहे. मनामध्ये फलाविषयी कामना धरून जे अहंकारवृत्तीने व मोठ्या खटाटोपाने कर्म केले जाते ते राजस कर्म होय. जे कर्म करताना, त्या कार्याशी आपला संबंध, त्या कार्यामध्ये होणारी हिंसा, आपले सामर्थ्य इत्यादींचा विचार केला जात नाही व जे मोहाने केले जाते ते कर्म तामस होय.

**प्रश्न २२१ कर्त्याचे पण तीन प्रकार आहेत ते कोणते ?**

**उत्तर** – निरनिराळ्या विषयांची त्रिविध विभागणी चालूच आहे. कर्त्याचे पण सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार आहेत.

कर्म करताना जो कर्ता मुक्तसंग, अनहंकारी व धैर्य आणि उत्साहाने ओसंडत असतो तो कर्ता सात्त्विक होय. हा कर्ता कर्मापासून मिळणारे यश किंवा अपयश यांच्या बाबतीत निर्विकारी असतो. यशापयशामुळे त्याची चलबिचल होत नाही. कर्माच्या फळाकडे आशा ठेऊन कर्म करणारा, उपभोगासक्त, लोभी, अस्वच्छ, हिंसक, यशापयशाने अनुक्रमे हर्षोत्फुल्ल होणारा व मनाने खचणारा असा कर्ता राजस होय. यानंतरचा तिसऱ्या प्रकारचा कर्ता म्हणजे तामस होय. हा अनेक दोषांनी युक्त असतो. जो कर्ता चंचल बुद्धीचा, असंयमी, अडाणी, गर्विष्ठ, कपटी, घातकी, आळशी, सदा दुर्मुखलेला आणि दीर्घसूत्री म्हणजे चेंगट असतो त्याला तामस कर्ता असे म्हणतात.

**प्रश्न २२२ बुद्धीचे किती प्रकार आहेत ?**

**उत्तर** – बुद्धीचे पण सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार आहेत. ज्या बुद्धीने कोणती गोष्ट धर्मास अनुसरून वा धर्माविरुद्ध आहे, करणे योग्य आहे किंवा अयोग्य, कशापासून भीती किंवा अभय आहे, कशामुळे बंधनात पडायला होईल व कशामुळे मुक्तता मिळेल हे समजते ती बुद्धी सात्त्विक होय. थोडक्यात सारासार विचार करून जी बुद्धी योग्य निर्णय घेते ती सात्त्विक होय. ज्या बुद्धीमुळे धर्म, अधर्म समजत नाही किंवा काय करावे वा करू नये हेही नीटपणे समजत नाही ती बुद्धी राजस बुद्धी होय. जी बुद्धी धर्मास अधर्म व अधर्मास धर्म म्हणजे ज्या बुद्धीला धर्म अधर्म कळत नाही, जी त्यांचे विपरीत अर्थ करते किंबहुना सगळ्याच गोष्टी उलटच्या पालटच्या करते ती बुद्धी तामसी होय.

**प्रश्न २२३ धृतीचे पण प्रकार सांगितले आहेत का ?**

**उत्तर** – धृतीचे पण सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार सांगितले आहेत. धृति शब्दाचा अर्थ धैर्य असा आहे. परंतु येथे धारणाशक्ती असा अर्थ अभिप्रेत आहे.



जी धृति स्थिर आहे व जिच्या योगाने मन, प्राण व इंद्रिये यांची कार्ये समत्वाने होतात ती धृति सात्त्विक होय. जिच्यामुळे फलाची इच्छा दृढ होते व धर्म, अर्थ आणि काम या तीन पुरुषार्थांमध्ये आसक्ती निर्माण होते ती धृति राजस होय. जिच्यामुळे मनुष्य दुर्बुद्ध होतो व निद्रा, भय, शोक, खिन्नता आणि उन्मत्तपणा हे दुर्गुण टाकून देत नाही म्हणजे त्यांना जवळ ठेवतो व जोपासतो ती धृती तामसी होय.

**प्रश्न २२४ सुखाचे तीन प्रकार कोणते ?**

**उत्तर** – सुखाचे पण सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार आहेत. जे सुरवातीस विषाप्रमाणे कडू वाटते पण शेवटी अमृतासारखे गोड लागते, ज्या सुखाच्या गोडीचा वीट येत नाही व ज्यामुळे सर्व दुःखांचा अंत होतो असे मन आणि बुद्धी यांच्या प्रसन्नतेपासून निर्माण होणारे सुख सात्त्विक होय. याच्या उलट जे सुरवातीस गोड वाटते व परिणामी मात्र मारक विषासारखे वाटते असे विषयसंयोगापासून निर्माण होणारे सुख राजस होय. जे सुख प्रारंभी तसेच नंतर परिणामीही म्हणजे शेवटी मोहात पाडते व जे निद्रा, आळस आणि दुर्लक्ष यांच्यापासून उत्पन्न होते ते कर्तव्याचा विसर पाडणारे निकृष्ट सुख तामस होय.

खरे सुख म्हणजे अध्यात्मिक सुख म्हणजे सात्त्विक सुख होय. या सुखाचा कधीही वीट येत नाही व वारंवार त्या सुखातच रहावे असे वाटते. प्रकृतीच्या गुणांपासून सर्व काही निर्माण होते. या पृथ्वीतलावर अथवा स्वर्गात किंवा आकाशातही असे काही नाही की ज्यांना प्रकृतीच्या गुणांनी स्पर्श केला नाही किंवा तिच्या गुणांच्या कचाट्यातून कोणी सुटले आहे.

**प्रश्न २२५ चार वर्णांची स्वाभाविक कर्मे कोणती ?**

**उत्तर** – ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र असे चार वर्ण आहेत आणि त्यांची कर्मे त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या गुणांप्रमाणे विभागली आहेत असे येथे म्हटले आहे. गीतेच्या काळी समाजव्यवस्था चार वर्णांमध्ये अस्तित्वात होती. म्हणून त्यांची कर्मेही चार प्रकारची सांगितली आहेत. चातुर्वर्ण्यासंबंधी प्रश्न क्रमांक ६६ पहावा.

शम (अंतरिंद्रियनिग्रह), दम (बाह्येंद्रियनिग्रह), तपश्चर्या, पावित्र्य, क्षमा, ऋजुता (सरळपणा), ज्ञान (तत्त्वज्ञान), विज्ञान (विविध प्रकारचे तत्त्वज्ञानाव्यतिरिक्त ज्ञान) आणि आस्तिक्य बुद्धी हे ब्राह्मणांचे स्वाभाविक कर्म होय.

शौर्य, तेजस्विता, धैर्य, कर्तव्यजागरूकता, युद्धातून पळून न जाणे, दातृत्व आणि प्रजेचे पालन करणे हे क्षत्रियांचे काम आहे. हे त्यांच्या गुणानुसार त्यांनी केले पाहिजे.

शेती, पशुपालन, व्यापार हे वैश्य लोकांचे स्वभावजन्य कर्म होय. हे लोक धनधान्य आणि एकूण राष्ट्राचे ऐश्वर्य राखण्यासाठी योग्य होत आणि त्यांनी ते अवश्य करावे.

पूर्वीच्या काळी वर्ण निवडण्याचे स्वातंत्र्य होते. ज्यांना पहिल्या तीन वर्णांसाठी सांगितलेली कर्मे करणे जमले नाही त्यांनी सेवाव्रत (परिचर्या) स्वीकारले व कालांतराने त्यांना शूद्र म्हटले जाऊ लागले.

**प्रश्न २२६ आपापली स्वाभाविक कर्मे केल्याने काय फळ मिळते ?**

**उत्तर** – आपल्या स्वभावजन्य गुणांमुळे जे कर्म आपल्याला प्राप्त झाले आहे तेच अवश्य करावे. तेच केल्याने परमसिद्धी प्राप्त होते. **(स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः।)** ज्याने हे सर्व जग व्यापले आहे, ज्याच्यापासून हे जग निर्माण झाले आहे व ज्याच्या प्रेरणेने सर्व प्राणिमात्र कार्य करण्यास प्रवृत्त होतात त्या जगन्नियंत्याची आपल्या धर्माप्रमाणे प्राप्त झालेल्या कर्तव्यकुसुमांनी पूजा करावी म्हणजे तो प्रसन्न होतो व मनुष्यजन्माची इतिकर्तव्यता साधली जाते. दुसऱ्याचा धर्म सोपा म्हणून तिकडे आकृष्ट होऊ नये व आपला धर्म टाकू नये. आपला धर्म दुसऱ्याच्या धर्माहून उणा असला तरी बरा **(श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।)** परंतु दुसऱ्याचा धर्म स्वीकारू नये. स्वकर्मकुसुमांनीच परमेश्वरास पुजावे कारण त्यानेच मोक्ष लाभतो.

आपल्याला प्राप्त झालेले कर्म सदोष असले तरी टाकू नये. कारण ज्याप्रमाणे अग्नीमध्ये धूर असतो त्याप्रमाणे प्रत्येक कर्मात थोड्याफार फरकाने दोष असतो. म्हणून आसक्ती न ठेवता निःस्पृह मनाने कर्म करावे की जेणे करून कर्मफलाच्या संन्यासाने नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त होते. कर्म करून सुद्धा ते न केल्यासारखे होणे म्हणजे नैष्कर्म्य होय. ही नैष्कर्म्याची अवस्था म्हणजे नैष्कर्म्यसिद्धी होय. अधिक विवेचनासाठी प्रश्न क्रमांक ५४ पहावा.

**प्रश्न २२७ नैष्कर्म्यसिद्धीनंतर ब्रह्मरूप होण्यासाठी काय करावे ?**

**उत्तर** – ब्रह्मस्वरूप होणे हेच सर्वश्रेष्ठ ध्येय होय. नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त झाल्यानंतर शुद्ध बुद्धीने युक्त होऊन, एकान्तात राहून, इंद्रियांचे विषय सोडून त्याचप्रमाणे राग, द्वेष दूर करून, मिताहारी राहून, काया, वाचा व मन यांना ताब्यात ठेवून, ध्यानयुक्त व विरक्त होऊन, अहंकार, बल, दर्प (मत्सर) व कामक्रोधादि सहा शत्रूंना जिंकून जेव्हा सर्वदृष्टीने मनुष्य ममत्वरहित होतो तेव्हा तो ब्रह्मस्वरूप होण्यास योग्य होतो, नव्हे तो ब्रह्मस्वरूप होतो. नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त होणे सुद्धा फार कठीण असते. ही सिद्धी प्राप्त झाल्यावर सुद्धा ब्रह्मस्वरूप होण्यासाठी कितीतरी गोष्टींची आवश्यकता सांगितली आहे. ब्रह्मस्वरूप होणे म्हणजेच मुक्त होणे. ही मुक्ती नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त झालेल्या माणसास या जन्मातसुद्धा मिळू शकते. अशा माणसांना जीवन्मुक्त म्हणतात. जो जीवन्मुक्त झाला त्याला काहीही मिळवायचे शिल्लक रहात नाही. तो साक्षात् परमात्माच व्हावयास पात्र होतो. फक्त देहपाताची तो वाट पहातो.



**प्रश्न २२८ ब्रह्मरूप झालेल्या माणसाची काय स्थिती होते ?**

**उत्तर** – ब्रह्मरूप झालेला मनुष्य म्हणजे जीवन्मुक्त मनुष्य होय. हा मनुष्य नेहमी प्रसन्नचित्त असतो. त्याला कशाचीही आकांक्षा नसते. त्याला शोक नसतो. तो कोणाचाही द्वेष करीत नाही. सगळ्या प्राणिमात्रांच्या ठिकाणी त्याची समबुद्धी असते आणि असा तो पर्यायाने ''माझीच श्रेष्ठ भक्ती करतो'' असे श्रीकृष्णाने म्हटले आहे. ''त्याने केलेल्या भक्तीमुळे मी कोण व केवढा आहे याचे त्याला ज्ञान होते व शेवटी तो माझ्यातच एकरूप होतो. तो मत्स्वरूप झाल्यामुळे त्याने कर्मे केली तरी तो त्या कर्मांमध्ये न अडकता माझ्या कृपेने त्याला शाश्वत व अढळपद प्राप्त होते'' असे श्रीकृष्णाने म्हटले आहे.

**प्रश्न २२९ ब्रह्मरूप माणसाची स्थिती वर्णन केल्यावर श्रीकृष्णाने अर्जुनास काय उपदेश केला ?**

**उत्तर** – अर्जुनास विविध प्रकारचा उपदेश करून झाल्यावर श्रीकृष्णाने त्याला अखेरचा उपदेश पुढीलप्रमाणे केला :

हे अर्जुना, तू मनाने सर्व कर्मे मला अर्पण कर. तू केवळ मत्परायण हो आणि माझ्यातच चित्त ठेव. तू असे केल्याने सर्व प्रकारची संकटे केवळ माझ्या अनुग्रहाने तरून जाशील. परंतु तू जर अहंकारामुळे मी सांगितलेले ऐकले नाहीस तर मात्र तू नाश पावशील.

अहंकाराचा आश्रय करून तू जर असे ठरवशील की मी युद्ध करणार नाही तर तसे होणार नाही. तुझा निश्चय खोटा ठरेल. प्रकृतीच्या गुणामुळे तुला युद्ध नक्कीच करावे लागेल हे लक्षात ठेव. तुला मोहामुळे जे युद्ध करू नये असे वाटते तेच तुझ्या वाट्याला येईल आणि युद्ध करावेच लागेल.

हे अर्जुना, ईश्वर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयप्रदेशात वास करतो. **(ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति।)** आणि तोच यंत्रावर चढविल्याप्रमाणे सगळ्या प्राणिमात्रांना फिरवतो आणि कार्य करण्यास प्रवृत्त करतो. तू आता हे भारता, त्यालाच शरण जा, सर्वभावाने शरण जा. केवळ त्याच्याच कृपाप्रसादाने तुला शांती मिळेल. अशा प्रकारे गुह्यांतले गुह्य असे ज्ञान मी तुला सांगितले. हे सर्व ध्यानी घेऊन तुझ्या स्वेच्छेने तुला जे योग्य वाटेल ते कर असे श्रीकृष्णाने अर्जुनास सांगितले.

**प्रश्न २३० सर्व गुह्यांतले गुह्य असे श्रीकृष्णाने अर्जुनास काय सांगितले ?**

**उत्तर** – सर्व गुह्यतम असा श्रीकृष्णाचा अर्जुनास उपदेश ६४ ते ७२ या नऊ श्लोकांत आला आहे. गीतेमधील श्रीकृष्णाच्या तोंडचे हे शेवटचे श्लोक आहेत. यानंतर अर्जुनाचा एक आणि संजयाचे पाच श्लोक येऊन गीता समाप्त झाली आहे.

हे अर्जुना, तू मला फार आवडतोस म्हणून मी तुला केवळ तुझ्या हितार्थ गुह्यतम असे महत्त्वाचे वचन सांगतो ते नीट ऐक.

हे अर्जुना, तू तुझे मन माझ्या ठिकाणी लाव. तू माझा भक्त हो, तू माझे पूजन कर आणि तू मला वंदन कर. असे केल्याने तू मलाच येऊन मिळशील. तू माझा लाडका आहेस म्हणून मी तुला हे प्रतिज्ञापूर्वक सांगत आहे.

हे अर्जुना, तू सगळे धर्म (मार्ग) सोडून केवळ मलाच शरण ये. **(सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।)** मी तुला नक्की सर्व पापांपासून मुक्त करीन. तुझ्या सगळ्या पापांचा नाश करीन. तू शोक करू नकोस. **(अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।)**

हे अर्जुना, हे गुह्य ज्ञान जो तपोहीन किंवा अभक्त आहे त्याला सांगू नकोस. तसेच ज्याला ऐकण्याची इच्छा नाही किंवा जो माझी निंदा करतो त्यालाही सांगू नकोस. मी सांगितलेले हे गुह्य ज्ञान जो कोणी माझ्या भक्तांपर्यंत पोहोचवील त्याची माझ्या ठिकाणी फार मोठी भक्ती उत्पन्न होईल व तो शेवटी मलाच येऊन मिळेल यात संशय नाही. हे जो कोणी करील तोच मला सर्व मनुष्यात प्रिय होईल आणि त्याच्यापेक्षा अधिक आवडणारा असा माझा कोणीही नसेल.

याशिवाय तुझ्या आणि माझ्यामध्ये झालेल्या या धर्मरूप संवादाचे जो कोणी अध्ययन करील त्याने माझी ज्ञानयज्ञाने पूजा केली असे होईल. आणखी असे की जो कोणी श्रद्धेने द्वेष सोडून हा धर्मसंवाद ऐकेल त्यालाही पुण्यवान लोकांना मिळणारे उत्तम लोक प्राप्त होतील, त्यांनाही उत्तम गती मिळेल. अशाप्रकारे श्रीकृष्णाने अर्जुनास सर्व गुह्यतम ज्ञान सांगितले व आपला उपदेश संपविला.

हे पार्था, मी सांगितलेले ज्ञान तू एकाग्र चित्ताने ऐकलेस का ? तुझा अज्ञानरूपी मोह नाहीसा झाला का ? असे शेवटी श्रीकृष्णाने अर्जुनास विचारले.

**प्रश्न २३१ श्रीकृष्णाच्या उपदेशामुळे अर्जुनात काय बदल झाला ?**

**उत्तर** – श्रीकृष्णाचे गीतेमध्ये एकूण ५४७ श्लोक आहेत. दुसऱ्या अध्यायापासून श्रीकृष्णाचा उपदेश सुरू झाला आणि त्याची समाप्ती अठराव्या अध्यायात झाली.

श्रीकृष्णाचा उपदेश ऐकल्यावर अर्जुनाने कबुली दिली की माझा मोह संपूर्ण नाहीसा झाला. हे अच्युता, तुझ्या कृपाप्रसादामुळे मला माझ्या कर्तव्याची जाण आली. माझ्या मनामध्ये आता कोठल्याही प्रकारची शंका नाही. मी संपूर्ण निःसंदेह झालो आहे आणि आता तू सांगितलेस तसेच मी करीन. **(करिष्ये वचनं तव ।)**

मी तुझ्या सांगण्याप्रमाणे करतो म्हणजे मी आता निःशंक युद्ध करतो असे अर्जुन म्हणाला. उभय पक्षांचे सैन्य पाहून मोहाने गर्भगळीत झालेला अर्जुन श्रीकृष्णाच्या उपदेशामुळे बलशाली झाला व युद्ध करण्यास प्रवृत्त झाला.



**प्रश्न २३२ गीतेच्या शेवटच्या पाच श्लोकांत संजयाने काय म्हटले आहे ?**

**उत्तर** – व्यासांनी दिव्य दृष्टी दिल्यामुळे संजयाने राजवाड्यात बसून युद्धभूमीवरील सर्व घटना पाहिल्या व धृतराष्ट्रास सांगितल्या. त्याने श्रीकृष्ण व अर्जुन यांच्यामधील अद्भुत आणि रोमहर्षक संवाद ऐकला. त्याने स्वतःच म्हटले आहे की, हे सर्व व्यासांच्या कृपेमुळे झाले. हे धृतराष्ट्रा, या दोघांचा पुण्यकारक आणि अद्भुत संवाद ऐकल्यामुळे मला त्याची आठवण येऊन पुनः पुनः आनंद होत आहे. श्रीकृष्णाचे ते विराट रूप मनात आले तरी मला फार मोठे आश्चर्य वाटते आणि हर्ष वाटतो, म्हणून हे धृतराष्ट्रा, मला असे वाटते की, ज्या पक्षामध्ये योगेश्वर श्रीकृष्ण आणि धर्नुधारी अर्जुन आहेत तेथेच श्री, विजय, चिरकाल टिकणारे ऐश्वर्य आणि नीतीपण आहे असे संजय म्हणाला.

**प्रश्न २३३ अठराव्या अध्यायाचे समालोचन कसे करता येईल ?**

**उत्तर** – गीतेचा अठरावा अध्याय सर्व अध्यायांत मोठा आहे. या अध्यायात एकूण ७८ श्लोक आहेत. ज्ञानेश्वरीमध्ये सुद्धा या अध्यायावर ३२९४ ओव्या आहेत. म्हणजे एक तृतीयांश ज्ञानेश्वरी या अध्यायावर लिहिली गेली आहे.

पुष्कळ टीकाकार हा अध्याय उपसंहारात्मक आहे असे मानतात. उपसंहार म्हणजे सारांश. उपसंहारामध्ये अगोदर लिहिलेल्या मजकुराचे समालोचन करण्यात येते. गीतेच्या अठराव्या अध्यायामध्ये अगोदर न आलेले असे नवीन विषय आले आहेत. फारच थोडे पूर्वी येऊन गेलेले आहेत. अठराव्या अध्यायाकडे नीट पाहिल्यावर असे दिसून येते की हा अध्याय उपसंहारात्मक नाही.

या अध्यायाची सुरवात संन्यास आणि त्याग म्हणजे काय या प्रश्नाने झाली आहे. काम्य कर्मांचा त्याग म्हणजे संन्यास हे उत्तर सुटसुटीत आणि समर्पक आहे. यज्ञ, दान, तप ही कर्मे केलीच पाहिजेत. यांचा त्याग करता कामा नये. त्यागाचे सात्त्विक, राजस आणि तामस असे तीन प्रकार आहेत. आपण जे कर्म करतो त्याचे अनिष्ट, इष्ट आणि संमिश्र असे तीन प्रकारचे फळ मिळते. कोणतेही कर्म जेव्हा घडते तेव्हा त्याच्या पाठीमागे पाच कारणे असतात. या संदर्भात कर्मचोदना आणि कर्मसंग्रह हे शब्द विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहेत.

सांख्यशास्त्रात ज्ञान, कर्म आणि कर्ता यांचे प्रत्येकी तीन तीन भेद आहेत. तेच येथे सांगितले आहेत. सात्त्विक, राजस आणि तामस असे त्यांचे भेद आहेत. त्रिगुणांवर आधारित बुद्धी, धृती आणि सुख यांचेही तीन तीन प्रकार येथे सांगितले आहेत.

गीतेच्या काळी वर्णाश्रमव्यवस्था अस्तित्वात होती. म्हणून गीतेने प्रत्येक वर्णाचे स्वाभाविक कर्म कोणते हे स्पष्टपणे सांगितले आहे. आपापली स्वाभाविक कर्मे केल्याने परमेश्वराचीच पूजा केल्यासारखे होते आणि त्यामुळे परमसिद्धी प्राप्त होते. आपल्या वाटणीला आलेले कर्म सदोष असले तरी टाकू नये. आपल्या धर्माप्रमाणे प्राप्त झालेल्या

कर्तव्यकुसुमांनी त्या जगन्नियंत्याची पूजा करावी आणि असे केल्याने मोक्ष मिळतो. आसक्ती न ठेवता कर्म करावे. कर्मफलाच्या संन्यासाने नैष्कर्म्यसिद्धी प्राप्त होते.

नैष्कर्म्यसिद्धीनंतरची पायरी म्हणजे ब्रह्मस्वरूप होणे. यासाठी काय करायला पाहिजे हे येथे सविस्तर सांगितले आहे. तसेच ब्रह्मस्वरूप झालेला मनुष्य कसा असतो हेही सांगितले आहे.

शेवटी श्रीकृष्णाने अर्जुनास विशिष्ट उपदेश केला आहे. तू मनाने मला सर्व कर्मे अर्पण कर. तू मत्परायण हो. तू माझा लाडका आहेस. मी तुला सर्व संकटातून पार करून नेईन. तू मलाच शरण ये. तू जर युद्ध करायचे नाही असे ठरविलेस तरी प्रकृतीच्या गुणांमुळे तुला युद्ध करावेच लागेल. मी सांगितलेले सर्व काही नीट ध्यानात घेऊन तुला जे योग्य वाटेल ते तू कर असे श्रीकृष्णाने अर्जुनास सांगितले.

मी सांगितलेले गुह्य ज्ञान वाटेल त्याला द्यायचे नाही. जो अभक्त आहे, ज्याला ऐकण्याची इच्छा नाही, जो माझी निंदा करतो त्याला हे ज्ञान द्यायचे नाही. जो कोणी हे ज्ञान माझ्या भक्तांपर्यंत पोहोचवील तो मला अतिशय प्रिय होईल. आपल्या या धर्मरूप संवादाचे जो अध्ययन करील त्याने माझीच पूजा केल्यासारखे होईल. जो कोणी ऐकेल त्याचेही कल्याण होईल. श्रीकृष्णाने अशाप्रकारे स्वतःच गीतेची फलश्रुति सांगितली आहे.

श्रीकृष्णाच्या उपदेशाने अर्जुनाचा मोह नाहीसा झाला. त्याला स्वकर्तव्याची जाणीव झाली आणि आता मी तुझ्या सांगण्याप्रमाणे युद्ध करीन असे अर्जुन श्रीकृष्णास म्हणाला.

व्यासांनी दिलेल्या दिव्यदृष्टीमुळे संजयाला श्रीकृष्णार्जुनसंवादाचा लाभ झाला. त्यामुळे त्याला पुनः पुनः आनंद होत राहिला. शेवटी संजय म्हणाला, हे धृतराष्ट्रा, ज्या पक्षामध्ये योगेश्वर श्रीकृष्ण आणि धर्नुधारी अर्जुन आहेत त्याच पक्षाचा विजय होईल असे माझे निश्चित मत आहे.

गीतेच्या आरंभी दोन्ही पक्षांतील सैन्य पाहून होणाऱ्या संभाव्य विनाशामुळे अर्जुन मोहग्रस्त झाला होता. परंतु श्रीकृष्णाच्या उपदेशामुळे त्याला स्वकर्तव्याची जाणीव झाली, तो युद्ध करण्यास प्रवृत्त झाला व गीतेचा अठरावा कळसाध्याय समाप्त झाला.

**वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ।**
**देवकीपरमानन्दं कृष्णं वन्दे जगद्गुरुम् ।।**

❁❁❁



# २४. उपसंहार

अर्जुनाचे निमित्त करून श्रीकृष्णाने सगळ्यांना कर्तव्याचरणाचा उपदेश केला आहे. गृहस्थाश्रमात राहूनसुद्धा गीतेतील तत्त्वज्ञानाचे आचरण करता येते. गीतेत सांगितलेला मार्ग सगळ्यांना खुला आहे.

गीता कोणीही वाचावी. त्याकरिता कसलेही बंधन नाही. गीतेचा मोठेपणा सगळ्यांनी मान्य केला आहे. गीता वाचणारा मनुष्य त्याचे कर्म सतत करीत राहतो, कारण गीता कर्म करायला प्रेरणा देते. गीता सगळ्या उपनिषदांचेच केवळ सार आहे असे नव्हे तर गीता सर्व शास्त्रांचे सार आहे - सर्वशास्त्रमयी गीता. गीता आत्म्याची ओळख करून देते.

गीता वाचायला वेळ नाही असे कोणी म्हणू नये. जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत वेळ कधीच मिळणार नाही. म्हणून वेळात वेळ काढावाच लागेल. गीतेच्या अभ्यासाने माणसाची सर्वांगीण प्रगती होते. गीतेच्या अभ्यासाने अनेक लोकांची व्यसने सुटली आहेत. गीतेच्या वाचनाने आपले उच्चार, विचार व आचार सुधारतात. गीता वाचण्याने जीवन बदलून जाते. काम, क्रोध आणि लोभ यांची हळूहळू फारकत होते.

जिज्ञासा जागवणारी, कर्तव्य आणि व्यवहार यांचा समन्वय साधणारी आणि मोक्षाप्रत नेणारी अशी ही गीता आहे. गीता सरळ, सोपी आणि सुबोध आहे. येथे बौद्धिक कसरत नाही. गीता संवादरूप असल्यामुळे आकर्षक आहे. गीतेशिवाय भारतीय तत्त्वज्ञानाची कल्पनाही करता येणार नाही. स्फूर्ति देणारी आणि बळ देणारी अशी ही गीता माउलीच आहे. ती अद्वैतरूपी अमृताचा वर्षाव करणारी आहे. त्या वर्षावात साधकाने चिंब ओले व्हावे. प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा सुरेख संगम साधणारी, ऐहिक आणि पारमार्थिक कल्याण करणारी, ''स्वकर्मकुसुमांची माला'' परमेश्वरास अर्पण करा असे ठामपणे सांगणारी गीता एकमेवाद्वितीया आहे. ''**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ।**'' जोपर्यंत शरीर आहे तोपर्यंत कर्म टाकता येत नाही म्हणून स्वकर्माने ''त्याची'' पूजा केल्याने माणसाला सिद्धि प्राप्त होते.

संतांची आणि राष्ट्रपुरुषांची जयंती साजरी करतात. सहसा ग्रंथांची जयंती साजरी केलेली दिसत नाही. परंतु गीता हा एकमेव ग्रंथ आहे की त्याची जयंती मार्गशीर्ष शुद्ध एकादशीला म्हणजे मोक्षदा एकादशीला साजरी करतात. अनेक ग्रंथांच्या गलबल्यात आपले गलबत भरकटून जाऊ नये म्हणून गीतेच्या १८ व्या अध्यायातील ६६ वा श्लोक

बदलून असे म्हणावेसे वाटते की,

सर्वग्रन्थान् परित्यज्य गीतां त्वं शरणं व्रज।
सैव त्वां सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यति मा शुचः ॥

सर्व ग्रंथ बाजूला ठेऊन गीतेलाच शरण जा. ती तुला सर्व पापांपासून मुक्त करील. तू काळजी करू नकोस.

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु। ॥

❁ ❁ ❁





# २५. गीतेतील पुष्पिका

गीतेतील प्रत्येक अध्यायाच्या शेवटी **''इति श्रीमद्भगवद्गीतासु उपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे...''** अशी ओळ आहे. गीता हा एक ग्रंथ असला तरी श्रीमद्भगवद्गीतासु आणि उपनिषत्सु हे बहुवचनी शब्द आदरार्थी योजिले आहेत. भगवंतांनी गाइलेल्या उपनिषदांतील ब्रह्मविद्येमधील योगशास्त्रातील श्रीकृष्ण आणि अर्जुन यांच्या संवादामधील योग समाप्त झाला असा या ओळीचा अर्थ आहे. पुष्कळ विद्वानांनी या ओळीला 'संकल्प' असे म्हटले आहे. परंतु समाप्तिदर्शक ओळीला संकल्प म्हणणे योग्य नाही. कारण संकल्प हा कार्यारंभी करायचा असतो. समाप्तिदर्शक ओळीला पुष्पिका म्हणणे हेच योग्य आहे.

गीतेच्या अठरा अध्यायांच्या अठरा पुष्पिका आहेत आणि या प्रत्येक पुष्पिकेमध्ये त्या त्या अध्यायाचे नाव आहे. काही अध्यायांच्या नावामध्ये विशेषतः अध्याय २, ५, ८ व १३ यांच्या नावामध्ये पाठभेद आहेत. वस्तुतः मूळ महाभारतामध्ये गीतेच्या अध्यायांना नावे नाहीत. गीता जेव्हा महाभारतातून धर्मग्रंथ म्हणून निवडली गेली तेव्हा प्रत्येक अध्यायाला पुष्पिका जोडण्यात आली. पण हे नक्की केव्हा झाले हे सांगता येत नाही. पुष्पिकेत असलेली अध्यायांची नावे बहुतांश समर्पक आहेत.

पुष्पिकेमध्ये गीतेला उपनिषद म्हटले आहे. त्याचप्रमाणे ब्रह्मविद्या म्हटले आहे. तसेच योगशास्त्र असेही म्हटले आहे. गीता, उपनिषद आणि ब्रह्मविद्या हे तीनही शब्द स्त्रीलिंगी आहेत. मराठीमध्ये मात्र उपनिषद शब्द नपुसकलिंगी आहे. उपनिषद या शब्दाची फोड उप + नि + सद् अशी आहे. उप म्हणजे जवळ, नि म्हणजे खाली आणि सद् म्हणजे बसणे. आपल्या गुरूजवळ एकांतात योग्य स्थानावर ज्ञान संपादन करण्यासाठी निष्ठापूर्वक बसणे म्हणजे उपनिषद. अशा तऱ्हेने संपादन केलेल्या अध्यात्मज्ञानाला, रहस्याला उपनिषद ही संज्ञा प्राप्त झाली. अर्जुनाने श्रीकृष्णाला असे म्हटले आहे की मी तुझा शिष्य आहे आणि तू मला उपदेश कर - **शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम्।** अर्जुन खरोखरच रथात श्रीकृष्णाजवळ खाली बसला होता. श्रीकृष्णाने त्याला अत्यंत प्रेमाने उपदेश केला आहे. उपनिषद शब्दाच्या अर्थाप्रमाणेसुद्धा गीतेचे उपनिषद हे नाव सार्थ आहे. उपनिषदांमध्ये ज्याप्रमाणे ब्रह्मविद्या आहे त्याप्रमाणे गीतेमध्येही प्रामुख्याने ब्रह्मविद्या आहे. यानंतर योगशास्त्र हा शब्द आला आहे तो सुद्धा अनुरूपच आहे. ज्या

मार्गाने आपले परमेश्वराशी ऐक्य होते त्या मार्गाला योग म्हणतात. गीतेमध्ये अठरा अध्यायांमध्ये अठरा योग आहेत. गीता सांगणारा श्रीकृष्ण हा योगेश्वर आहे.

संपूर्ण गीता संवादरूपी असल्यामुळे काहीवेळा विषयांची पुनरुक्ती झाली आहे आणि हे साहजिकच आहे. पुनरुक्ती संवादाच्या जिवंतपणाचे द्योतक आहे. सगळे अध्याय तर्कसंगत आणि सुसंगत आहेत असे नाही. पण संवादात असे घडणे अपरिहार्य आहे. गीता सर्व उपनिषदांचे सार आणि सर्व शास्त्रांचे माहेर आहे असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे.

❁❁❁





# २६. गीतेची दोन मोठी रूपे

गीतेने मराठीमध्ये दोन मोठी रूपे धारण केली आहेत. त्यापैकी पहिली ज्ञानेश्वरी म्हणजे भावार्थदीपिका१३ व्या शतकात प्रकट झाली. तदनंतर वामन पंडितांची यथार्थदीपिका सुमारे ३०० वर्षानंतर झाली. ही दोन्ही रूपे पद्यमय आहेत. येथे गीतेतील प्रत्येक अध्यायावरील ज्ञानेश्वरीतील आणि यथार्थदीपिकेतील श्लोकसंख्या अभ्यासकांसाठी मुद्दाम दिली आहे.

| अध्याय | गीता | (भावार्थदीपिका) ज्ञानेश्वरी | यथार्थदीपिका |
|---|---|---|---|
| १ | ४७ | २७५ | ३८८ |
| २ | ७२ | ३७५ | १७०३ |
| ३ | ४३ | २७६ | ९४७ |
| ४ | ४२ | २२५ | १४३९ |
| ५ | २९ | १८० | ९५१ |
| ६ | ४७ | ४९७ | ११९६ |
| ७ | ३० | २१० | ११८६ |
| ८ | २८ | २७१ | १२०१ |
| ९ | ३४ | ५३५ | १८२६ |
| १० | ४२ | ३३५ | ९१० |
| ११ | ५५ | ७०८ | ११४८ |
| १२ | २० | २४७ | १८४१ |
| १३ | ३४ | ११६९ | १४०० |
| १४ | २७ | ४१५ | ९४७ |
| १५ | २० | ५९९ | ११२४ |
| १६ | २४ | ४७३ | ४४७ |
| १७ | २८ | ४३३ | ३९९ |
| १८ | ७८ | १८१० | ३२१४ |
| एकूण श्लोक | ७०० | ९०३३ | २२,२६७ |

❁❁❁

# २७. गीता पारायण

वेळ मिळेल त्याप्रमाणे गीता वाचत रहावी. रोज कमीतकमी १२ वा किंवा १५ वा अध्याय एकदा वाचावा. परंतु ज्यांना गीतेचे पारायण (परत परत वाचन) करायचे असेल त्यांना पुढीलप्रमाणे कालबद्ध नियोजन करता येईल. गीता वाचताना प्रत्येक श्लोकाचा अर्थ लक्षात घ्यावा.

**एका सप्ताहात पूर्ण गीता**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम दिन | अध्याय १ व २ | एकूण श्लोक | ११९ |
| द्वितीय दिन | अध्याय ३, ४ व ५ | एकूण श्लोक | ११४ |
| तृतीय दिन | अध्याय ६, ७ व ८ | एकूण श्लोक | १०५ |
| चतुर्थ दिन | अध्याय ९ व १० | एकूण श्लोक | ७६ |
| पंचम दिन | अध्याय ११, १२ व १३ | एकूण श्लोक | १०९ |
| षष्ठ दिन | अध्याय १४, १५ व १६ | एकूण श्लोक | ७१ |
| सप्तम दिन | अध्याय १७ व १८ | एकूण श्लोक | १०६ |
| | | | ७०० |

**तीन दिवसात पूर्ण गीता**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम दिन | अध्याय १ ते ५ | एकूण श्लोक | २३३ |
| द्वितीय दिन | अध्याय ६ ते १० | एकूण श्लोक | २३६ |
| तृतीय दिन | अध्याय ११ ते १८ | एकूण श्लोक | २३१ |
| | | | ७०० |

**दोन दिवसात पूर्ण गीता**

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम दिन | अध्याय १ ते ८ | एकूण श्लोक | ३७२ |
| द्वितीय दिन | अध्याय ९ ते १८ | एकूण श्लोक | ३२८ |
| | | | ७०० |

ज्यांना रोज संपूर्ण गीता वाचायला जमेल त्यांनी अवश्य वाचावी. संपूर्ण गीता वाचायला साधारणतः दोन तास लागतात.





# २८. दहा वाक्यांत गीता

१. आत्मा कधीही जन्म पावत नाही अगर मृत्यूही पावत नाही.

२. तू सतत कर्म करीत रहा. कर्म केले नाही तर शरीरसुद्धा चालणार नाही.

३. ज्ञानासारखे पवित्र या जगात दुसरे काहीही नाही.

४. श्रद्धावान आणि जितेंद्रिय माणसाला ज्ञान प्राप्त होते.

५. स्वतःचा उद्धार स्वतःच करावा.

६. चंचल मनाला अभ्यासाने आणि वैराग्याने स्वाधीन ठेवता येते.

७. कल्याणकारक कर्म करणारा मनुष्य कधीही दुर्गतीस जात नाही.

८. परमेश्वराचा भक्त कधीही नाश पावत नाही.

९. कर्मफळाच्या त्यागापासून चिरंतन शांती प्राप्त होते.

१०. काम, क्रोध व लोभ ही नरकाची तीन द्वारे आहेत.

# २९. घरोघरी पार्थसारथी असावा

देवकीनंदन गोपाळाच्या अनंत रूपांनी भक्तांना मोहित केले आहे. कोणाला रांगणारा बाळकृष्ण आवडतो व तो पूजेत ठेवला जातो. कोणाला मुरलीमनोहर श्रीकृष्ण आवडतो. श्रीकृष्णाच्या मुरलीने अनेक गोपी मोहित झाल्या होत्या आणि तहानभूक विसरल्या होत्या. गोकुळात श्रीकृष्णाच्या बालमित्रांना गाईंचे पालन करणारा गोपाळकृष्ण प्रिय होता. अजूनही मुरली वाजवणारा आणि जवळ गो म्हणजे गाय असलेला गोपाळकृष्ण अनेकांचा लाडका आहे. काही भक्तांना राधाकृष्ण आवडतो. राधा म्हणजे श्रीकृष्णाची शक्ती. म्हणून शक्तीसह कृष्णाची उपासना करावी असे काहींना वाटते. काही रसिकांना रासलीला करणारा श्रीकृष्ण आवडतो. काहींना गिरिधारी श्रीकृष्ण आवडतो. खरोखर श्रीकृष्ण अनंत रूपांनी नटलेला आहे. अर्जुनालासुद्धा त्याचे रूप पहायचा मोह झाला. तेव्हा श्रीकृष्णाने त्याला गीतेच्या अकराव्या अध्यायात विश्वरूप दाखवले आणि शेवटी त्याच्या विनंतीवरून नेहमीचे सौम्य रूपही दाखविले.

गीतेच्या काळी श्रीकृष्ण प्रौढ होता. स्वतः परब्रह्म असूनही केवळ देह धारण केल्यामुळे त्याला जगातील सर्व अनुभव घ्यावे लागले व ते त्याने इतरांप्रमाणे घेतले. अशा तत्त्वज्ञ श्रीकृष्णाने विषादग्रस्त अर्जुनाला उपदेश केला. त्यामुळे त्याचा मोह नाहीसा झाला. मी आता युद्ध करतो असे अर्जुन ठामपणे म्हणाला आणि नंतर त्याने प्रत्यक्ष युद्ध केले. कर्म करायला प्रवृत्त करणे हाच गीतेचा प्रधान हेतू आहे. म्हणून गीतेच्या अभ्यासकाने आपल्या घरी खिन्न झालेल्या, डोळे अश्रूंनी भरलेल्या, गलितगात्र झालेल्या व हातपाय गाळून श्रीकृष्णापुढे बसलेल्या अर्जुनाचे चित्र लावणे उपयुक्त होणार नाही. श्रीकृष्णाचा उपदेश ऐकल्यावर धनुर्धारी अर्जुन शत्रूसैन्यावर जोषाने बाणांचा वर्षाव करीत आपले कर्म करीत आहे आणि त्याच्यापुढे त्याचा सारथी म्हणून योगेश्वर श्रीकृष्ण आहे असे श्रीकृष्ण व अर्जुन यांचे चित्र लावावे. यामुळे आपल्याला नेहमी कर्म करीत राहण्याची प्रेरणा मिळेल असे लेखकाला एका सत्पुरुषाने सांगितले आहे. जेथे श्रीकृष्ण आणि अर्जुन आहे तेथे संजयाने म्हटल्याप्रमाणे श्री, विजय, चिरंतन ऐश्वर्य आणि नीती नक्की असणार आहे.

**यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। गीता १८.७८**

❀❀❀





# ३०. भगवद्गीतेमधील निवडक सुभाषिते

१. **कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः ।**
**धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ।। १.४०**

कुलक्षय झाल्यावर पूर्वापार चालत आलेले कुलाचार नष्ट होतात व कुलाचाच धर्म सुटल्यावर सगळ्या कुलावर अधर्माचे स्वामित्व येते.

२. **देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ।**
**तथा देहान्तरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ।। २.१३**

देह धारण केलेल्या माणसास जसे त्याच्या देहात (अनुक्रमे) बालपण, तरुणपण आणि वार्धक्य प्राप्त होते त्याचप्रमाणे त्याला पुढचा दुसरा देहही प्राप्त होतो. या कारणास्तव ज्ञानी पुरुष याविषयी मोह पावत नाही.

३. **न जायते म्रियते वा कदाचि –**
**न्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।**
**अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो**
**न हन्यते हन्यमाने शरीरे ।। २.२०**

हा आत्मा कधीही जन्म पावत नाही अगर मृत्यूही पावत नाही. हा आत्मा एकदा होऊन गेल्यावर परत होत नाही असे नाही. हा आत्मा अज (कधीही जन्म न पावणारा), नित्य, शाश्वत आणि पुरातन आहे. शरीर जरी मारले गेले तरी हा कधीही मारला जात नाही.

४. **वासांसि जीर्णानि यथा विहाय**
**नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।**
**तथा शरीराणि विहाय जीर्णा –**
**न्यन्यानि संयाति नवानि देही ।। २.२२**

एखादा माणूस ज्याप्रमाणे जुनी झालेली वस्त्रे टाकून देऊन नवीन धारण करतो त्याप्रमाणे आत्मा जुनी शरीरे टाकून नवीन शरीरांशी संयोग पावतो.

५. **जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ।**
**तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ।। २.२७**

जो जन्मास आला त्याला मृत्यू हा नक्की आहे आणि जो मरण पावला त्याला जन्म हा नक्की आहे. म्हणून या अपरिहार्य गोष्टींसाठी शोक करणे तुला उचित नाही.

६. **कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ।**
**मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संङ्गोऽस्त्वकर्मणि ।। २.४७**

हे अर्जुना, कर्म करण्यापुरताच तुझा अधिकार आहे. कर्मांची फळे कधीही तुझ्या अधिकारात नाहीत. फळाच्या हेतूने तू कर्म करणारा होऊ नकोस. (त्याचप्रमाणे) कर्मच न करण्याचा तू आग्रह धरू नकोस. (कर्म करीत रहा)

७. **योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनंजय ।**
**सिध्द्यसिध्द्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ।। २.४८**

हे धनंजया, (कर्मफलाची) आसक्ती सोडून योगयुक्त होऊन कर्मे कर. कर्म सिद्ध होणे अगर न होणे याबाबतीत मनाची जी समतोल वृत्ती तिला योग म्हणतात.

८. **बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।**
**तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।। २.५०**

समत्वबुद्धीच्या योगाने युक्त झालेला मनुष्य या लोकीच पापपुण्याच्या द्विविध फलांचा त्याग करतो. म्हणून तू या योगाचा आश्रय कर. बंधनात न अडकता कर्मे करण्याचे जे कौशल्य त्यास योग म्हणतात.

९. **ध्यायतो विषयान्पुंसः संङ्गस्तेषूपजायते ।**
**संङ्गात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ।। २.६२**

विषयांचे चिंतन करणाऱ्या माणसाची त्यांच्या ठिकाणी आसक्ती निर्माण होते. आसक्तीमुळे कामवासना निर्माण होते. ती तृप्त झाली नाही की क्रोध निर्माण होतो.

१०. **क्रोधात्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।**
**स्मृतिभ्रंशाद्‌बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।। २.६३**

क्रोध निर्माण झाल्यावर संमोह (अविवेक) उत्पन्न होतो. संमोहापासून स्मृतिभ्रंश होतो. स्मृतिभ्रंश झाल्यावर बुद्धीचा नाश होतो (बुद्धी काम करीत नाहीशी होते) आणि एकदा बुद्धिनाश झाल्यावर मनुष्याचा अधःपात होतो, घात होतो.



११. **नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ।**
**शरीरयात्रापि च ते न प्रसिध्द्येदकर्मणः ।। ३.८**

तू तुझे नियत कर्म (नेहमीचे कर्म) करीत रहा. कारण केव्हाही कर्म न करण्यापेक्षा कर्म करणे हे अधिक चांगले आहे. जर तू कर्म केले नाहीस तर तुझे उदरभरणसुद्धा होणार नाही (तुझी शरीरयात्रा चालणार नाही).

१२. **न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंङ्गिनाम् ।**
**जोयषेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ।। ३.२६**

कर्मासक्त झालेल्या माणसांचा ज्ञानी पुरुषाने बुद्धिभेद करू नये. त्याने स्वतः योगयुक्त राहून सर्व कर्मे करावी व इतरांनाही करायला लावावी.

१३. **श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।। ३.३५**

दुसऱ्याचा धर्म सुखाने आचरणात आणणे शक्य असले तरीसुद्धा स्वतःचा धर्म सोडू नये. स्वतःच्या धर्मात काही वैगुण्य असले तरी तोच आचरणे श्रेयस्कर आहे. स्वधर्मानुसार वागत असताना मृत्यू आला तरी त्यात कल्याण आहे. परंतु दुसऱ्याच्या धर्माचे आचरण करणे नको, तो भयावह आहे.

१४. **यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।**
**अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।। ४.७**

हे अर्जुना जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते आणि अधर्माचा जोर वाढतो तेव्हा मी स्वतः जन्म घेतो.

१५. **परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ।**
**धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ।। ४.८**

सज्जनांचे रक्षण करण्याकरिता आणि दुर्जनांचा विनाश करण्याकरिता मी धर्मसंस्थापनेसाठी प्रत्येक युगात जन्म घेतो.

१६. **यस्य सर्वे समारम्भाः कामसंकल्पवर्जिताः ।**
**ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पण्डितं बुधाः ।। ४.१९**

ज्या माणसाचे सर्व समारंभ म्हणजे उद्योग फळाच्या इच्छेचा संकल्प न करता केलेले असतात व ज्याची कर्मे ज्ञानरूपी अग्नीने दग्ध झालेली असतात अशा माणसास ज्ञाते मंडळी पंडित असे म्हणतात.

१७. तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ।। ४.३४

तत्त्ववेत्ते ज्ञानी वंदन केल्याने, चौकसबुद्धीने प्रश्न विचारल्याने आणि सेवा केल्याने तुला ज्ञानाचा उपदेश करतील हे लक्षात ठेव.

१८. न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विन्दति ।। ४.३८

ज्ञानासारखे पवित्र खरोखरच या जगात दुसरे काहीही नाही. जो स्वतः योगाचरणाने सिद्ध झाला आहे त्याच्या अंतःकरणात हे ज्ञान योग्यवेळी उदय पावते.

१९. श्रद्धावांल्लभते ज्ञानं तत्परः संयतेन्द्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शान्तिमचिरेणाधिगच्छति ।। ४.३९

जितेंद्रिय, ज्ञानप्राप्तीविषयी अत्यंत उत्कंठित झालेल्या श्रद्धाळू माणसास ज्ञान प्राप्त होते. ज्ञान प्राप्त झाल्यावर लवकरच तो परमशांती प्राप्त करतो.

२०. अज्ञश्चाश्रद्धधानश्च संशयात्मा विनश्यति ।
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ।। ४.४०

अज्ञ, अश्रद्धाळू आणि संशयी मनुष्य नाश पावतो. संशयी मनुष्याला ना इहलोक मिळतो ना परलोक ना सुख.

२१. नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ।
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः ।।५.१५

परमेश्वर कोणाचे पापही घेत नाही अगर पुण्यही घेत नाही. अज्ञानाने ज्ञान झाकून गेल्यामुळे मनुष्यमात्र या बाबतीत मोह पावतात.

२२. उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नात्मानमवसादयेत् ।
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ।। ६.५

माणसाने स्वतःचा उद्धार स्वतःच करावा. त्याने स्वतःला कधीही अधोगतीला जाऊ देऊ नये. प्रत्येकजण स्वतः स्वतःचाच मित्र आहे तसाच शत्रूही आहे.



२३. असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ।
अभ्यासेन तु कौन्तेय वैराग्येण च गृह्यते ।। ६.३५

हे महाबाहो अर्जुना, मन हे चंचल आहे आणि ते आवरणे कठीण आहे याबाबत शंका नाही. परंतु हे कौन्तेया अभ्यासाने आणि वैराग्याने ते स्वाधीन ठेवता येते.

२४. पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।
न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ।। ६.४०

हे पार्था, त्याचा (योगापासून दूर गेलेल्याचा) विनाश या लोकी होत नाही. परलोकीही होत नाही. कारण हे लाडक्या (अर्जुना) कल्याणकारक कर्म करणारा कुणीही मनुष्य दुर्गतीस जात नाही.

२५. मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ।। ७.३

हजारो माणसात एखादा मनुष्य सिद्धी मिळविण्याचा प्रयत्न करतो आणि असा प्रयत्न करणाऱ्यांमध्ये एखाद्या मनुष्यास माझे खरे ज्ञान होते.

२६. अन्तकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ।
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ।। ८.५

अंतकाळी जो माझे स्मरण करून देह सोडतो तो नक्की माझ्या स्वरूपाला येऊन मिळतो यात संशय नाही.

२७. ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ।
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ।। ८.१३

जो मनुष्य शेवटी ॐ या एकाक्षरब्रह्माचा जप करीत व माझे स्मरण करीत देह सोडतो तो उत्तम गतीस प्राप्त होतो.

२८. अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ।। ९.२२

जे अनन्य भावाने माझे चिंतन करतात व मला भजतात त्या नित्य योगयुक्त लोकांचा योगक्षेम मी चालवितो.

२९. पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ।
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ।। ९.२६

जो कोणी मला पान, फूल, फळ वा पाणी प्रयत्नपूर्वक भक्तिभावाने अर्पण करतो, ते मी मोठ्या प्रेमाने सेवन करतो.

३०. यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।। ९.२७

हे अर्जुना जे काही कर्म करतोस, जे काही खातोस, जे काही हवन करतोस, जे काही दान देतोस, जे तप करतोस ते सर्व मला अर्पण कर.

३१. क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति ।
कौन्तेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ।। ९.३१

माझा भक्त लवकरच धर्मात्मा होतो. तो सतत टिकून रहाणारी परम शांती पावतो. हे अर्जुना, तू नक्की लक्षात ठेव की माझा भक्त कधीही नाश पावत नाही.

३२. मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ।
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ।। ९.३४

हे अर्जुना, केवळ माझ्या ठिकाणीच मन ठेवणारा हो. मलाच निरंतर भजणारा हो. माझ्यासाठीच यजन करणारा हो. मला वंदन कर. अशा प्रकारे तू आपले चित्त माझ्या ठिकाणी लावून मत्परायण झालास की मलाच येऊन मिळशील.

३३. श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाध्द्यानं विशिष्यते ।
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छान्तिरनन्तरम् ।। १२.१२

अभ्यासापेक्षा ज्ञान चांगले, ज्ञानापेक्षा ध्यान, ध्यानापेक्षा कर्मफलाचा त्याग अधिक चांगला आहे. कर्मफलाच्या त्यागापासून चिरंतन शांती प्राप्त होते.

३४. तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित् ।
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ।। १२.१९

ज्याला निंदा आणि स्तुती सारखीच वाटतात, जो मितभाषी आहे व जे काही मिळेल त्याने समाधानी रहातो, जो गृहासक्त नाही व जो स्थिरचित्त आहे असा भक्तिमान् पुरुष मला प्रिय आहे.



३५. ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।
मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ।। १५.७

माझाच सनातन अंश मनुष्यलोकामध्ये जीव होऊन राहिला आहे. तो प्रकृतीमध्ये असलेली पाच सूक्ष्म इंद्रिये आणि सहावे मन स्वतःकडे ओढून घेतो.

३६. त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ।
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ।। १६.२१

काम, क्रोध आणि लोभ यांनी युक्त असे नरकाचे त्रिविधद्वार आहे. हे आपला नाश करते. या कारणास्तव या तिहींचाही त्याग करावा.

३७. ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ।
ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ।। १७.२३

ॐ, तत् आणि सत् या तीन शब्दांनी परब्रह्माचा निर्देश केला जातो. याच तीन शब्दांच्या निर्देशाने पूर्वीच्या काळी ब्राह्मण, वेद आणि यज्ञ निर्माण केले.

३८. काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ।
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ।। १८.२

काम्य कर्माचा त्याग करणे म्हणजे संन्यास असे शहाणी माणसे मानतात. सर्व कर्मांच्या फळांचा त्याग करणे यास त्याग असे पंडित लोक (विचक्षण) समजतात.

३९. न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ।
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ।। १८.११

शरीर धारण केलेल्या माणसास कर्मे निःशेष टाकणे शक्य नाही. म्हणून जो कर्मफलांचा त्याग करतो त्याला त्यागी असे म्हणतात.

४०. यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ।
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ।। १८.४६

ज्याच्यापासून सर्व भूतांची निर्मिती होते आणि ज्याने हे सर्व विश्व व्यापले आहे त्याची पूजा स्वतःचे नियत कर्म योग्यप्रकारे करून माणसास सिद्धी प्राप्त होते.

४१. **श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ।**
**स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ।। १८.४७**

दुसऱ्याचा धर्म आचरण्यास सोपा असला तरी आपला धर्म सोडू नये. भले तो एखादेवेळी सदोष असला तरी चालेल. आपल्या स्वभावाप्रमाणे जे नियत कर्म आहे ते केले असता पाप लागत नाही.

४२. **सहजं कर्म कौन्तेय सदोषमपि न त्यजेत् ।**
**सर्वारम्भा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ।। १८.४८**

हे अर्जुना, आपल्या वाटणीस आलेले सहज (नियत) कर्म जरी दोषयुक्त असेल तरी त्याचा त्याग करू नये. कारण अग्नी ज्याप्रमाणे धुराने वेढलेला असतो त्याप्रमाणे सगळी कर्मे कोणत्या ना कोणत्या दोषाने युक्त असतातच.

४३. **ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।**
**भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ।। १८.६१**

ईश्वर सर्व प्राणिमात्रांच्या हृदयप्रदेशात रहातो. हे अर्जुना, तो त्यांना जणू काही यंत्रावर चढवून स्वतःच्या मायेने फिरवीत असतो.

४४. **सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ।**
**अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ।। १८.६६**

सर्व धर्म बाजूला सारून तू मला एकट्यालाच शरण ये. मी तुला सर्व पातकांपासून मुक्त करीन, भिऊ नकोस.

४५. **इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ।**
**न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ।। १८.६७**

हे गुह्य ज्ञान जो तप आचरीत नाही, जो भक्त नाही किंवा ज्याला ऐकण्याची इच्छा नाही अथवा जो माझी निंदा करतो त्याला कधीही सांगू नये.

४६. **यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ।**
**तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ।। १८.७८**

जेथे योगेश्वर श्रीकृष्ण व धनुर्धर अर्जुन आहेत तेथेच ऐश्वर्य, विजय, चिरंतन उत्कर्ष व नीति राहील असे माझे मत आहे.

❀ ❀ ❀



# ३१. विषयसूची


| विषय | प्रश्नक्रमांक |
|---|---|
| अक्षय्य सुख | ५०, ८२ |
| अधिदैवत | ११५ |
| अधिभूत | ११४ |
| अधियज्ञ | ११६ |
| अध्यात्म | ११२ |
| अर्जुनाची स्थिती | ३१, ३२, ३४ |
| अर्जुनाला उपदेश | ४०, १३७, १३९, १५५, १७३ |
| अवतार | ६५ |
| अश्वत्थ वृक्ष | १८२, १८३ |
| आत्मा | ३९, १७२, १८७, १९० |
| आत्मोद्धार | ८७ |
| आत्म्याचे अमरत्व | ३६, ३८ |
| आहार | २०३ |
| उत्पत्ति | १२८, १७५ |
| उपासना | १३४ |
| एकश्लोकी गीता | ११८ |
| कर्ता | २२१ |
| कर्म | ५२, ५९, ६०, ६७, ८०, ११३, २१६, २१७, २२०, २२६ |
| कर्मफल | ४४ |
| कर्मयोग | ४५, ६२, ६३, ६४, ७५ |
| कर्मसंग्रह | २१८ |
| कर्मसंन्यास | ७५ |
| कुंडलिनी | ९८ |
| कुरुक्षेत्र | १८, १९, २० |
| कुलक्षय | २८, २९ |
| क्षर, अक्षर | १९० |

| विषय | प्रश्नक्रमांक |
|---|---|
| क्षेत्र | १६६, १६८ |
| क्षेत्रज्ञ | १७०, १७३ |
| गती | १२३ |
| गीताध्यान | ११, १२ |
| गीतेतील श्लोक | ८, ९ |
| गुह्यातील गुह्य | २३० |
| चातुर्वर्ण्य | ६६, २२५ |
| जीव | १८५, १८६ |
| ज्ञान | ७१, ७२, ७३, ९९, १००, १२५, १६९, २१९ |
| ज्ञानी | ८१ |
| तप | २०५, २०६ |
| त्याग | २१३, २१४, २१५ |
| त्रिगुण | १७६, १७७, १७८ |
| त्रिगुणातीत | १७९, १८० |
| दान | २०७ |
| दैवी आसुरी संपत्ती | १९३, १९४, १९५, १९६, १९७ |
| धृती | २२३ |
| ध्यान | १६२, १६३ |
| नऊ द्वारे | ७९ |
| नरकाची द्वारे | १९८ |
| नियत कर्म | ५३ |
| नैष्कर्म्य | ५४ |
| पण्डित | ६८ |
| परमेश्वर | ८०, १०९, ११७, ११९, १२०, १२९, १३०, १३१, १३२, १३५, १३६, १४०, १८९ |
| पाप | ६१ |
| पुनर्जन्म | ३७ |
| प्रकृती | १०१, १०२, १७१ |
| बुद्धी | ४३, २२२ |





| विषय | प्रश्नक्रमांक |
|---|---|
| बुद्धियोग | १४२ |
| ब्रह्म | १११, १२२, २०८, २०९, २१० |
| ब्रह्मदेवाचा दिवस | १२१ |
| ब्रह्मपद | १८४ |
| ब्रह्मरूप माणूस | २२८, २२९ |
| ब्रह्मसूत्रे | १६७ |
| भक्त | १०६, १०७, १५९, १६०, १६१, १६४ |
| भक्तिभाव | १३५ |
| भगवद्गीता | १ |
| भारतीय युद्ध | १३, १४, १५ |
| महाभारत | २, ३, ४, ५, ६, ७, १६, १७ |
| मनाची चंचलता/स्थिरता | ९६, १६१ |
| मात्रास्पर्श | ३५ |
| माया | १०५ |
| मुक्त | ८३ |
| यज्ञ | ५५, ६९, ७०, १३३ |
| यज्ञचक्र | ५६, ५७ |
| योग | ४२, ९६, ९७ |
| योगारूढ | ८६ |
| योगी | ८८, ८९, ९०, ९१, ९२, ९३, ९४, ९५, ९७ |
| राजविद्या | १२६, १२७ |
| लोकसंग्रह | ५८ |
| विज्ञान | ९९ |
| विषयांचे चिंतन | ४८ |
| विभूती | १४३, १४४, १४५ |
| वीर | २३ |
| शंख | २४ |
| शास्त्र | १९९ |
| श्रद्धा | २०१, २०२ |

| विषय | प्रश्नक्रमांक |
|---|---|
| श्रीकृष्ण | १०३, १०४, १४८, १४९, १५०, १५१, १५२, १५६, १५७ |
| सकामभक्ती | १०८ |
| संजय | २१ |
| संन्यासी/संन्यास | ७६, ८५, २१२ |
| समत्वबुद्धी | ४६ |
| सांख्य व योग | ४१, ७७ |
| सात महर्षी व चार मनू | १४१ |
| सूर्य व चंद्राचे तेज | १८८ |
| सैन्य | २२, २५, २६ |
| स्थितप्रज्ञ | ४७, ४९ |


❁❁❁

## ३२. निवडक ग्रंथसूची


१. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक - गीतारहस्य

२. वासुदेव लक्ष्मण पणशीकर - भगवद्गीता (श्रीधरीव्याख्यासहिता)

३. जर्नादन सखाराम करंदीकर - संक्षिप्त गीतातत्त्वमंजरी

४. विष्णु वामन बापट - श्रीमद्भगवद्गीताभाष्यार्थ

५. एस्. राधाकृष्णन् - दि भगवद्गीता (इंग्रजी)

६. विनोबा - गीता प्रवचने

७. विनोबा - गीताई

८. शंकर वामन दांडेकर - सार्थ ज्ञानेश्वरी

९. गजानन श्रीपत खैर - मूळ गीतेचा शोध

१०. गीता प्रेस, गोरखपूर - श्रीमद्भगवद्गीता


❁❁❁



डॉ. श्री. म. भातखंडे व माझा परिचय सुमारे एक तपाचा. महाविद्यालयात शिकत असताना षड्दर्शने, गीता, ब्रह्मसूत्रे इ. विषय त्यांच्याकडून शिकण्याची सुसंधी मिळाली आणि आज ''विश्वमोहिनी गीता'' या पुस्तकाच्या निमित्ताने सर्वांचा परिचय देण्याचा सुयोग आला.

मुंबई विद्यापीठात विविध पदांचा कार्यभार सांभाळून भातखंडेसर उपकुलसचिव म्हणून निवृत्त झाले. त्यांनी संस्कृत विषयात एम्. ए. व वेदान्तशास्त्रात डॉक्टरेट या पदव्या संपादन केल्या. एम्.ए. पदवीसाठी त्यांना वेदान्तशास्त्राचे विख्यात ''झाला वेदान्त'' पारितोषिक मिळाले. **'Valmiki's influence on Kalidasa'** या निबंधासाठी त्यांना 'विश्वनाथ नारायण मंडलिक सुवर्णपदक' देण्यात आले. गायत्रीमंत्राच्या संशोधनासाठी त्यांना **'Springer Research Scholarship'** मुंबई विद्यापीठाने प्रदान केली. संस्कृत भाषा व वेदान्त तत्त्वज्ञान या विषयांचा व्यासंग त्यांनी अध्ययन, अध्यापन, वाचन, लेखन याद्वारे जोपासला आणि वृद्धिंगत केला. त्याचे फलित म्हणजे पुढील पुस्तके :-

**१) The Chāndogya Upaniṣad and the Brahmasūtras of Bādarāyaṇa - a comparative study.**

**२) नित्यसूत्राणि (संस्कृत, इंग्रजी) ३) नित्यसूत्रे (संस्कृत, मराठी)** ही स्वतंत्र पुस्तके.

तसेच भारतीय संस्कृती, श्रीस्तुती व वेदमाता गायत्री ही संयुक्त पुस्तके. याशिवाय विविध विषयांवर त्यांचे अनेक लेख प्रसिद्ध झाले आहेत.

गीता, ब्रह्मसूत्रे व उपनिषद हे भातखंडेसरांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाले आहेत. 'स्वामिन् तव शरणम्' या द्वैमासिकाचे संपादकीय सल्लागारपद तसेच ठाणे येथील 'सुरवाणी ज्ञानमंदिर' या संस्कृत पाठशाळेचे कार्याध्यक्षपद या पदांचा कार्यभार समर्थपणे वहात असतानासुद्धा ठाण्यात अध्यात्मवर्गाच्या रूपाने त्यांचे ज्ञानदानाचे मौलिक कार्य अविरत सुरू आहे.

गीतेच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करण्याचे त्यांचे कार्य या पुस्तकरूपाने सिद्धीस जावो ही ईश्वरचरणी प्रार्थना.

– डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके.